व्यवहारपद्धति.

व्यवहारपद्धति.

हें पुस्तक

रा. रा. कृष्णाजी भिकाजी पळनिटकर.

यांनीं लिहिलें

तें

समर्थविद्यालयाच्या व्यवस्थापक मंडळीनें

'गणपत कृष्णाजी प्रेस कंपनी—मुंबई'
यांचे छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शके १८३१.

किंमत १ रुपया.



प्रकाशकांचे दोन शब्द.

विद्यार्थ्यांचें शील उत्तम करावयाचें हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे, असें सर्व तज्ञांचें मत आहे. त्यास अनुसरून नवीन शिक्षणसंस्थांतून धर्म व नीतीच्या शिक्षणास प्राधान्य द्यावें, याबद्दल सर्वांचें एकमत होऊं लागलें आहे. समर्थविद्यालयाच्या हेतूंपैकीं हा एक प्रधान हेतु आहे. तो सिद्धीस नेण्यास वसतिगृहें, धर्माचारपालन, धर्म व नीति या विषयांवरील ग्रंथांचें वाचन, इत्यादि अनेक उपाय आहेत, व हे वरील विद्यालयांत प्रचारांत आणलेले आहेत. संस्कृतांत या विषयांवर अनेक ग्रंथ आहेत, पण असे ग्रंथ मराठींत झाल्यास वाचनाचें काम सुलभ व थोडक्या वेळांत होऊन विद्यार्थ्यांना जास्त उपयोग होईल. विद्यालयाची निराळी पुस्तकावलि काढण्याचा संकल्प पूर्वींच जाहीर केलेला आहे, त्याप्रमाणें क्रमिक पुस्तकें काढण्याचे काम बऱ्याच खर्चाचें व अनुभवाचें आहे, तें साध्य होण्यास लोकाश्रयाची जरूर असल्यामुळें दिनावधि लागत आहे, तोंपर्यंत इतर वाचनीय पुतस्कांचा उपयोग करणें भाग आहे. अशा प्रकारचें हें प्रस्तुत पुस्तक रा. रा. कृष्णाजी भिकाजी पळनिटकर यांनीं लिहिलें

आहे, तें त्यांनीं समर्थविद्यालयास सर्व हक्क सुद्धां अर्पण केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. संस्थेस जशी द्रव्याची तशीच चांगल्या माणसांची वाण असल्यामुळें, ग्रंथ छापविण्याचें सर्व काम करण्याबद्दल रा. पळनिटकर यांसच विनंति करावी लागली, व त्यांनीं तें काम मोठ्या उल्हासानें केलें; ही त्यांनीं संस्थेची सेवाच केली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांची वृद्धावस्था व डोळ्यांचा अधूपणा याचा विचार केला असतां, या कामीं संस्थेवर त्यांचे पुष्कळ उपकार झाले आहेत. यांचें मोडी हस्ताक्षर अत्युत्कृष्ट आहे, व हल्लींच्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत ह्मणजे एक अमोलिक व संग्रहणीय हस्ताक्षर आहे, व तें त्यांनीं संस्थेंत ठेवण्यास देण्याची व्यवस्था केल्यास शाळेचे प्रेक्षकांस शाळेबरोबर तेंही पहावयास सांपडेल.

या पुस्तकाची किंमत वाचल्यावर प्रत्येकास कळून येईलच, प्रारंभीं दोनचार शब्द लिहिल्यास बस्स होतील. एकंदर पुस्तकांतील भाषा विषयास साजेल अशी प्रगल्भ आहे, व विवेचन पद्धतीही व्यवस्थित आहे. पूर्वींच्या धर्मग्रंथांतील ठिकठिकाणीं आधार दिलेले आहेत, त्यामुळें वाचकांजवळ सुभाषिताचा बराचसा संग्रह होतो. मधून मधून उदाहरणादाखल ऐतिहासिक गोष्टी दिल्या-

मुळें, विषयाची मांडणी हृदयंगम झाली असून पुस्तकांत गोविलेलीं तत्वें मनावर चांगल्या रीतीनें ठसण्यास विशेष साहाय्य होतें. विचारसरणी सत्वगुणप्रधान आहे, पण अंतिम साध्याच्या दृष्टीनें हा दोष नसून एक गुणच आहे. कारण, इतर गुणांचें अवलंबन किंवा उपयोग, ते गुण साध्य ह्मणून नव्हे, तर साधनें ह्मणूनच करावयाचा असतो.

हें पुस्तक नवीन पिढीकडून लहानपणींच वाचलें गेल्यास, आर्यसंस्कृतींतील श्रेष्ठनीतितत्वें लहानपणींच मनावर ठसतील, व तीं पुढें आचरणांत आणण्यास तितकें सुलभ जाईल, असा लेखकाचा व प्रकाशकांचा भरंवसा आहे. त्याप्रमाणें पालक व शिक्षक या पुस्तकाचा उपयोग करून घेतील, अशी आशा आहे. या पुस्तकांत अजूनही सुधारणा करण्यास पुष्कळ जागा आहे, त्याप्रमाणें कोणीं सूचना केल्यास त्यांचा पुढील आवृत्तीचे वेळीं आवश्य विचार केला जाईल.

रा.रा.पुरुषोत्तम वामन पाटणकर मुक्काम चिखलें, यांनीं पुस्तक छापविण्यास येणाऱ्या खर्चापैकीं साठ रुपये संस्थेस दिल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. त्याचप्रमाणें गणपत कृष्णाजी प्रेस कंपनी, यांनीं छापण्याचें काम काळजीपूर्वक केल्याबद्दल त्यांचेही आह्मी आभार मानतों.

खर्च वजा जातां पुस्तकविक्रीचें जें उत्पन्न होईल, तें समर्थविद्यालयाचें असल्यामुळें, सर्व लोक संस्थेस या रीतीनें मदत करण्याची ही संधी वाया दवडणार नाहींत, अशी आशा आहे.

मिति आषाढ शु॥३
शके, १८३१.

जनार्दन विनायक ओक.
समर्थविद्यालय.

प्रस्तावना.

प्रकृत ग्रंथाविषयीं प्रस्तावनेंत सांगावयासारखी मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे ग्रंथाचा उद्देश काय, व त्याचा उपयोग कितीं, हें वाचकांस ग्रंथ वाचण्यापूर्वीं कळविणें, हीच होय. या गोष्टीची पूर्वसूचना असली ह्मणजे, वाचकांस ग्रंथवाचनाविषयीं लालसा उत्पन्न होते. परंतु हें काम या पुस्तकाच्या प्रकाशक मंडळीनें पूर्वींच उरकून टाकिलें आहे. त्यांनीं आपल्या चटकदार दोन शब्दांतच वर सांगितलेल्या मुख्य गोष्टीचें मार्मिकपणानें प्रतिपादन करून ग्रंथकाराचे लेखनश्रम हलके केले, यामुळें केवळ सांप्रदाया करितांच लेखक या नात्यानें मजला पूर्वोक्त गोष्टीचें किंचित् पुनरुद्घाटन करावयाचें आहे.

आपल्या देशांत दिवसेंदिवस पाश्चात्य लोकांचें दळणवळण वाढूं लागल्यामुळें, आपला स्वधर्माभिमान, आचारविचार, प्रापंचिकव्यवहार, व पहिराव इत्यादि गोष्टींतील पूर्वपरंपरा अगदीं सुटत चालली, व तेणें करून आपल्या राष्ट्राची स्थिति खालील पद्यांत वर्णन केल्याप्रमाणें विचित्र झाली आहे.

॥ न संध्यां संधत्ते नियमित निमाजान्न कुरुते
॥ नवा मौंजीबंधं कलयति नवा सौनत विधिम् ॥

॥ नरोजाज्ञानीते व्रतमपि हरे नैंव कुरुते ॥
॥ नकाशिर्मक्कावा शिव! शिव! न हिंदुर्न यवनः ॥

ही गोष्ट माझे मनांत येऊन मी एके दिवशीं उद्विग्न चित्तानें या गोष्टीचा विचार करीत असतां मजला वाटलें कीं, आह्मी गृहस्थाश्रम स्वीकारून इतर आश्रमांचें पोषण करावें, अशा परोपकारबुद्धीनें प्रपंच करणारे सात्विक लोक, परस्थांच्या संसर्गानें द्रव्यलोभी व ठक बनूं लागलों. आह्मां हिंदूंचें मुख्य लैंगिक चिन्ह ह्मटलें ह्मणजे, आमची शेंडी, पण ती देखील पाश्चात्य रिवाजाप्रमाणें वाढविलेल्या माथेरानांत आज दिसत नाहिंशी झाली. युरोपांतील अठरा टोपकरांनीं आह्मांस टोपी घातल्यामुळें, आमच्या देशांतील अठरापगडजातीच्या डोक्यावरील पगड्या नाहिंशा होत चालल्या. आमच्या देशी भाषांत इंग्रेजी शब्दांचे डिस्प्रपोरशनेट[1] अॅड्मिक्सचर होऊन त्या हाफ्क्यास्ट बनल्या. सारांश, इतर राष्ट्रांपासून आमच्या हिंदी राष्ट्रास वेगळें करणारे सर्व भेदक गुण नाहिंसे होत चालल्यामुळें, तें थोड्याच दिवसांत दुसऱ्या एका बलिष्ठ राष्ट्रांत समाविष्ट होऊन त्या राष्ट्राचा ह्मारवडा बनणार कीं काय, अशी शंका येऊं लागली.

मी अशा तऱ्हेच्या विचारपरंपरेंत मग्न असतां निराशेनें

१ ही इंग्रेजी शब्दांची योजना हल्लींच्या धेडगुजरी भाषा बोलण्याच्या प्रचाराची दर्शक आहे.

माझा किंचित् डोळा लागला, इतक्यांत माझी मनोदेवता स्वप्नांत मजपुढें आविर्भूत होऊन मजला ह्मणाली, ॥ "किं निःशंकं शेषे, शेषे वयसः समागतो मृत्युः" ॥ या भयप्रद इशाऱ्यानें मी दचकून जागा झालों. प्रथमतः मजला या कानउघाडणीचा कांहींच अर्थ कळेना, परंतु बऱ्याच वेळानें तिचा आशय माझ्या ध्यानीं येऊन, मी मागील आज्या पंज्यांच्या पिढीचा प्रापंचिकव्यवहार सिंहावलोकनपूर्वक ध्यानीं आणला, व तो कितीं धार्मिक, कितीं सरळ, व कितीं दक्षतेचा असे, व चालू पिढीचा कितीं श्रद्धाहीन, कितीं कुटिल व कितीं हलगर्जी आहे, याचा विचार करून प्रस्तुत पुस्तक लिहिलें. रचना केवळ विधिनिषेधात्मक न करितां जागोजागीं सामान्य वाचकांच्या बुद्धीस आकलन करितां येईल, अशी तात्विक विवेचनात्मक केली आहे. मधून मधून उदाहरणार्थ मनोरंजक ऐतिहासिक गोष्टीही गुंफल्या आहेत. गुरुवर्य विजापूरकरांसारख्या विद्वान्, अनुभवी, व परीक्षक महाशयांनीं पुस्तक वाचून समर्थविद्यालयांत चालू करण्याचें अनुमोदन दिलें असल्यामुळें, त्याच्या उपयुक्ततेविषयीं पाल्हाळ करण्याचें मजला कारणच उरलें नाहीं.

प्रकृत पुस्तक लिहावयास डाक्तर त्रिंबक दिनकर वेलणकर यांनीं दृष्टि दिली, चिरंजीव पुरुषोत्तम वामन

पाटणकर यांनीं ममतापूर्वक प्रोत्साहन देऊन, पुस्तक संस्थेस आर्पण करण्याची संमति दिली. व समर्थ-विद्यालयाच्या सर्व शिक्षक व चालक मंडळीनें माझ्या अल्प सेवेचा व ग्रंथरूपी उपायनाचा सन्मानपूर्वक स्वीकार करून किंचितहिरण्यपुष्पदक्षिणेनेंही माझा परितोष केला, यास्तव मी वरील सर्व सद्गृहस्थांचा फार फार आभारी आहें.

मी व्यवहारपद्धति नामक या पुस्तकाचे सर्व हक्क समर्थविद्यालयास स्वसंतोषानें अर्पण केले आहेत.

मुंबई,
मिति, आषाढ शुद्ध ५
शके, १८३१.

कृष्णाजी भिकाजी पळनिटकर.
ग्रंथकर्ता.

अनुक्रमणिका.

सूचनाः——प्रस्तुत पुस्तकांत मुद्रितें (प्रुफें) तपासतांना ग्रंथकाराच्या दृष्टिवैगुण्यामुळें कांहीं थोड्या ठिकाणीं ऱ्हस्वदीर्घादि अशुद्धें राहिलीं आहेत. बारीक टाइपानें छापलेल्या टिपांतही कांहीं स्थळीं कानामात्रा विशेषें करून अनुस्वार, स्पष्ट उठले नाहींत. कोशांत, उत्पाटन शब्दाचा पर्याय उच्छेद, हा उपायन शब्दापुढें पडला आहे, आसन्नमरण, आन्हिकपरंपरा, परिशीलन, व वीरसू हे चार शब्द अशुद्ध छापले गेले आहेत.

क्षमाशील वाचकांनीं याविषयीं सावधान असावें, अशी सविनय प्रार्थना आहे.

ग्रंथकर्ता.

॥ श्री ॥

व्यवहारपद्धति.

॥ जे इच्छितात अपुल्या प्रिय बालकांस ॥
॥ राष्ट्रीय उन्नत सुशिक्षण द्यावयास ॥
॥ त्यांनीं प्रपंच, परमार्थ व शिष्टरीती ॥
॥ आहे मुलांस उचित प्रतिपादणें ती ॥

प्रकरण पहिलें.

नीतीचें स्वरूप व तिचे प्रकार.

विषयांतःप्रवेश, नीतीचें स्वरूप, तिचे प्रकार, सामान्य नीति, राजनीति, त्यांची उपयुक्तता, कुटुंब व राज्य यांचें सादृश्य, पुरुषार्थविचार, त्यांचा परस्पर अनुबंध, सद्वर्तनास आवश्यक सद्गुण, नित्य कृत्यांत कालाची वांटणी, ती ठरविण्याचे सामान्य विचार.

—:o:—

गृहस्थमात्रास आपला प्रपंचव्यवहार नीटनेटका करितां येणें अत्यावश्यक आहे. याकरितांच श्रीसमर्थांनीं **'आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थविवेका'** असा उपदेश केला आहे. प्रपंचांत ऐहिक, पारमार्थिक,

सार्वजनिक व राजकीय श्रेय फार गूढतेनें झांकलेलें असतें. तें लोकांची बरीवाईट प्रपंचराहटी बघून सर्वांस दिसावयाजोगें नाहीं. तें विशदतेनें दिसूं लागण्यास गुरूनें विद्यार्थ्यांच्या ज्ञानचक्षूवरचें मोहपटलच दूर केलें पाहिजे. यावरून प्रपंचव्यवहार हा लोकशिक्षणाचा मुख्य विषय समजणें भाग आहे, व तो गुरुमुखानें सांगोपांग समजला पाहिजे. परंतु सांप्रतकालीं तत्संबंधीं सुव्यवस्थित शिक्षण मुलांस मातापितरांकडून अथवा शिक्षकांकडून बिलकुल मिळत नाहीं. प्रपंच शिरावर पडला ह्मणजे अनुभवहीन तरुण लोक, तो नीतिनिर्बंधाशिवाय मनमानेल तसा करितात; यामुळें बहुजनसमाजाचा प्रापंचिक व्यवहार आपमतलबी, कपटप्रचुर, हिंसायुक्त व निर्घृण, अतएव बेभरंशाचा झाला आहे. प्रस्तुतकालीं कापट्य हें व्यवहारज्ञतेचें निदर्शक झाल्यामुळें, संस्कृतांत धूर्त हा शब्द "शठ, चोर, कपटी" अशा निंदाव्यंजक अर्थानें रूढ असतां, त्यावर आजच्या चालू भाषेंत, "शाहणा, हुषार, व्यवहारज्ञ" असा स्तुतिपर अर्थ रूढ होऊन बसला आहे, एवढीच गोष्ट वरील विधानाचें समर्थन होण्यास पुरेशी आहे. अशा बेभरंशाच्या लोकव्यवहारामुळें लोकसमाज विस्कळित होऊन आपलें राष्ट्र मोडकळीस येत चाललें आहे. त्यास प्रपंचशिक्षणाचा धिरावा देऊन

त्याचा जीर्णोद्धार करणें हें राष्ट्रीयशिक्षणसंस्थांचें आद्य-कर्तव्य आहे.

प्रपंचप्रवाह फार विस्तीर्ण व दुस्तर आहे. त्यांत अनेक भोंवरे व लाग आहेत. यास्तव योग्य तरणोपाय असल्याशिवाय त्यांतून दुर्बळ मानव सुरक्षितपणें उत्तीर्ण होणार नाहींत, हें जाणून गुरुशुक्रादि महर्षींनीं दयार्द्र बुद्धीनें त्यांकरितां नीतिरूप सुदृढ नौका तयार करून ठेविली आहे. ह्या नौकेच्या आश्रयानें अनेक ज्ञाते पुरुषांना हा प्रपंचसागर गोष्पदोपम झाला आहे. ह्यास्तव आपणासही त्या नीतिरूप नौकेचाच आश्रय केला पाहिजे. परंतु नीति कशास ह्मणावें, हें प्रथमतः समजल्याशिवाय तिचा आश्रय करितां येणें शक्य नाहीं, यास्तव तिचें अर्थनिर्णायक विवरण व स्वरूपकथन करणें प्राप्त आहे.

संस्कृतभाषेंत नी (नय्) ह्या धातूचा अर्थ बोट धरून चालवीत नेणें असा आहे, व त्या धातूपासून जी अडचणींतून बोट धरून अस्खलितपणें चालवीत नेते ती नीति, असें नाम झालें आहे. नीति शब्दाचा विस्तृत अर्थ ह्मटला ह्मणजे आपणासहवर्तमान सर्व

१ बृहस्पत्युशनःप्रोक्तैर्नयैर्धार्यन्ति मानवाः ॥ २९ ॥
वनपर्व, अ० १५०.

लोकसमाजास इहलोकीं व परलोकीं सुखप्राप्ति होईल, असे मनुष्यमात्रानें आचरावयाचे नियम. नीतीचा संबंध केवळ स्वसुखाशींच नसतो, तो इतरांच्याही सुखाशीं असतो, हें तत्व कोणीं विसरतां कामा नये. हे नीतिविषयक नियम धर्मशास्त्रांत विधिनिषेधरूपानें सांगितले असतात, ह्मणून तद्विरुद्ध वर्तणूक धर्मबाह्य होऊन ती जननिंदेस पात्र होते, व ती स्वपरसुखाचा नाश करणारी असल्यामुळें ईश्वर व राजा ह्यांच्या क्षोभास व शासनास पात्र असते, हें सांगावयास नकोच. ह्यास्तव शाहण्या व धार्मिक मनुष्यानें नीतीचा कधींही अनादर करूं नये.

नीतीचें लक्ष्य आपल्या व इतरांच्या सुखाभिवृद्धीकडे आहे, असें वर सांगितलें आहे खरें, तरी ती सुखाभिवृद्धि क्षणिक व दुःखपरिणामी नसावी, हें उघडच आहे. क्षणिक व दुःखपरिणामी अभिवृद्धि ही खरी अभिवृद्धि नव्हे, तो केवळ नकली सुखभ्रम आहे. तसेंच जो क्षय किंवा अपकर्ष क्षणिक असून शाश्वत

१ न वृद्धिर्बहुमन्तव्या या वृद्धिः क्षयमावहेत्। क्षयोऽपि बहु मन्तव्यो यः क्षयो वृद्धिमावहेत् ॥६॥ न स क्षयो महाराज ! यः क्षयो वृद्धिमावहेत्। क्षयः स त्विह मन्तव्यो यं लब्ध्वा बहु नाशयेत् ॥७॥
उद्योगपर्व, अ० ३९.

अभिवृद्धीस कारणीभूत आहे, त्यास क्षय तरी कसें ह्मणावें ? विचारदृष्टीनें पाहिलें तर ती अभिवृद्धीच समजली पाहिजे. पण इतकी विवेकबुद्धि व दूरदृष्टि सर्वजनसमुदायास असणें शक्य नाहीं. यामुळें सर्वकाळीं बहुतेक लोक किंबहुना सर्व लोक, थोडद्या फार मानानें अनीतीनें आपली अभिवृद्धि करण्यास प्रवृत्त झाल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें; तथापि ज्या देशांत व ज्या काळांत हें नीतिनिर्बंधाचें शैथिल्य कमी, तो देश व तो काळ चांगला; व ज्या देशांत व ज्या काळांत हें शैथिल्य फार, तो देश व तो काळ वाईट; कारण देशाची भरभराट व सुख ह्या गोष्टी त्या देशाचा कृष्यादि[1] व्यवहार व व्यापार यांवर अवलंबून असतात, व तो व्यवहार आणि व्यापारही पाहूं गेलें तर विद्या, कळा व नीति यांवर अवलंबून असतो, व त्यावर लोकांची उपजीविका[2] चालते. देशांतील सत्य व प्रामाणिकपणा समूळ नष्ट

---

१ कृषिगोरक्ष्यवाणिज्यमिहलोकस्य जीवनं । दण्डनीतिस्त्रयीविद्या तेन लोको भवत्युत ॥ २४ ॥ वनपर्व, अ० २०७.

पण्याकरवणिज्याभिः कृष्यागोजाविपोषणैः । वार्तया धार्यते सर्वं धर्मैरेतैर्द्विजातिभिः ॥ ३० ॥ वनपर्व, अ० १५०.

२ त्रयी वार्तां दण्डनीतिं स्तिस्रोविद्या विजानताम् । ताभिः सम्यक्प्रयुक्ताभिर्लोकयात्रा विधीयते ॥ ३१ ॥

झाला तर व्यवहार आणि व्यापार हे अज्जीबात बंद पडतील, व त्यामुळें मर्यादा[1] सुटून लोकांस दारिद्र्य व दुःख भोगावें लागेल, तसेंच देशांतील असत्य व अप्रमाणिकपणा अज्जी नाहींसा होईल तर व्यवहार व व्यापार अप्रतिबंध वाढून सार्वजनिक सुखाचा परमावधि होईल.

सांप्रत आपला देश अतिशय कंगाल स्थितींत आला आहे, याचें मुख्य कारण आपली नीतिनिर्बंधाविषयीं ढिलाई हेंच आहे असें आह्मांस वाटतें; पण कितीएकांचें असें ह्मणणें पडतें कीं, परकीय राजसत्तेमुळें लोक निर्धन व बुभुक्षित झाले आहेत व "**बुभुक्षितः किं न करोति पापं**" या न्यायानें लोक अनीतिमान् होऊन परस्परांशीं दगलबाजी व फसवाफसवी करितात. आतां वास्तविक ह्मटलें तर हें ह्मणणें अगदीं अमान्य करण्याइतकें निरर्थक नाहीं, हें आह्मीही प्रांजलपणें कबूल करितों; पण आमच्या ह्मणण्याचा मतलब इतकाच आहे कीं, आपणास आज परकीयांची राजसत्ता झुगारून देतां येत नाहीं, व यद्यपि आली असती, तरी परकीयांपासून आपणास अद्यापि

१ सा चेद्धर्मकृता नस्यात्त्रयीधर्ममृते भुवि । दण्डनीतिमृते चापि निर्मर्यादमिदं भवेत् ॥ ३२ ॥
वार्ताधर्मेह्य वर्तिन्यो विनश्येयुरिमाः प्रजाः । सुप्रवृत्तैस्त्रिभिर्ह्येते धर्मे सूयन्ति वै प्रजाः ॥ ३३ ॥ वनपर्व, अ० १५०.

पुष्कळ उपयुक्त गोष्टी शिकावयाच्या आहेत, याकरितां तसें करणें इष्टही नाहीं. असें जर आहे तर अशक्य व अत्याज्य गोष्टींची सबब सांगून नीतिवर्तनाविषयीं उदासीन राहणें, व अनीतीचा कैवार घेणें, हें कोणी शाहणा पुरुष कबूल करणार नाहीं. अनीतीचें किंवा अधर्माचें कारण दुर्भिक्ष किंवा जीवनसामुग्रीची ददात हें जरी खरें आहे, तरी सर्व राष्ट्रास प्राप्त झालेली ददात, परस्परांविषयीं हितबुद्धि धरून एकजुटीनेंच नाहींशी केली पाहिजे. राष्ट्रीय विपत्तीमध्यें प्रत्येक इसम आपला योगक्षेम[1] नीट चालावा ह्मणून अनीतीनें दुसऱ्याच्या योगक्षेमास जेव्हां अडचण आणितो, तेव्हां कोणाचाही योगक्षेम दीर्घकाल न चालतां, सर्व राष्ट्र दुर्बल व अकिंचन होऊन नाहींसें होतें. नीतिनिर्बंध नाहींसा झाल्यावर कुटुंब, ग्राम व देश यांतील जनसमुदायाचें एकत्र वास्तव्य हें शुष्कपर्णांच्या ढिगाप्रमाणें समजावें. ह्या ढिगास जरा वाऱ्याची झुळुक लागली कीं, त्यांतील प्रत्येक पान दशदिशेस उडून जाऊन जसें नाहींसें होतें, तद्वतच कुटुंब, ग्राम व देश यांस संघटित करणारें राष्ट्रीयत्वाचें आकलन ढिलें झालें व नीतिनिर्बंध सुटला, ह्मणजे वि-

---

१ " योगोऽप्राप्तस्यप्रापणं, क्षेमस्तद्रक्षणं " योग ह्मणजे अप्राप्तार्थांचें संपादन, व क्षेम ह्मणजे प्राप्तार्थांचें संरक्षण.

स्कलित झालेला जनसमुदाय राष्ट्रीय विपत्तीच्या वावटळींत नाश पावतो. सूक्ष्म विचार केला तर बुभुक्षितपणामुळें जरी अनीतिमत्ता उद्भवत असली तरी तो बुभुक्षितपणाच केवळ आमच्या सांप्रतच्या अनीतिमत्तेस सर्वांशीं कारण आहे, असें आह्मांस वाटत नाहीं. कोणताही देश कितीही कंगाल झाला तरी त्यांत कांहीं लोक समृद्ध व खातेपिते असतातच. त्याप्रमाणें आमच्याही देशांत गांवोगांव असे कांहीं समृद्ध लोक आहेत, व त्यांचाच अनीतिमत्तेंत पहिला नंबर आहे. अशा लोकांस अनंत तऱ्हेचीं पापकर्में प्रतिष्ठितपणाचा बुरखा घेऊन जशीं करितां येतात तशीं, साधनें नसल्यामुळें गरीब लोकांस करितां येत नाहींत. प्रसंगविशेषीं कंगाल लोकांनीं पोटासाठीं चोरीमारी केली, तरी ती आठचार दिवसांच्या शिधापाण्याच्या मोबदल्यांत अखेर श्रीमंत लोकांच्या पेटींतच सांठविली जाते. वरवर पाहणारास दिसणारे जें ह्या दांभिकांचें धर्माचरण तें खरोखर अधर्ममूलकच असतें, व हे धनलोभी लोकच गरीबलोकांस अनीतीच्या खळग्यांत

१. पापानां विद्ध्यधिष्ठानं लोभमेव द्विजोत्तम ! ॥ ५८ ॥
लुब्धाः पापं व्यवस्यन्ति नरा नातिबहुश्रुताः । अधर्मा धर्मरूपेण तृणैः कूपा इवावृताः ॥ ५९ ॥
तेषां दमः पवित्राणि प्रलापा धर्मसंश्रिताः । सर्वं हि विद्यते तेषु शिष्टाचारः सुदुर्लभः ॥ ६० ॥ वनपर्व, अ० २०७.

पाडीत असतात ह्यांत संशय नाहीं. अशा लोकांचें धर्मशास्त्र स्वार्थसाधनांत कांहीं पाप घडत असल्यास स्वार्थ साधून त्या पापाच्या क्षालनार्थ, एखादि एकादशिनी कर किंवा गाईस मूठभर चारा घाल ह्मणजे झालें, असें सांगत असतें. भीमानें धर्मराजास हेंच स्वार्थसाधू धर्मतत्व सांगितलें होतें. या प्रच्छन्न पातक्यांचा, आपल्या अनीतीवर पांघरूण घालणारा दानधर्म गरीब लोकांच्या नीतिमत्तेस व उदात्त वर्तनास विरजण लावणारा असतो. अशा लोकांच्या स्वार्थपरायणतेमुळेंच परस्परांमधील विश्वास उडून जाऊन सांप्रत जुटीची फूट झाली आहे. आक्षेपकांच्या ह्मणण्याप्रमाणें परकीय राजसत्तेमुळें आलेला कंगालपणा हाच जर अनीतिमत्तेला मुख्य कारण ह्मणावा, तर थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीनंतर जी अंगावर शहारे येण्यासारखी अनीतिमत्ता बळावली, ती कंगालपणामुळें बळावली, कीं परकीयांच्या राजसत्तेमुळें बळावली, ह्मणून ह्मणावी बरें ? आपल्या लोकांची अमर्याद वाढलेली स्वार्थबुद्धीच आपल्या अनीतिमत्तेला व तज्जनित निकृष्टावस्थेला कारणीभूत आहे, जपानच्या

---

१ अथवाऽनडुहे राजन्साधवे साधुवाहिने । सौहित्यदानादेतस्मादेनसः प्रतिमुच्यते ॥ ३५ ॥ वनपर्व, अ० ३५.

सर्व संस्थानिकांनीं आपली सत्ता व संस्थानें स्वदेशाकरितां एकदम राजपदीं अर्पण करून स्वातंत्र्य जोडलें, व आमच्या देशांतील सरदारांनीं स्वार्थपर होऊन दुफळी माजविली, व पारतंत्र्याची बिडी सर्व लोकांसहवर्तमान आपल्या पायांत ठोकून घेतली, हें सर्वांस महशूर असतां भलतेंच विधान कसें करावें ?

सारांश, सार्वजनिक सुखासहवर्तमान स्वसुख संपादन करण्याकडे नीतिवर्तनाचा सदोदित कल असतो. अन्यायानें दुसऱ्याच्या सुखावर धाड घालून कोणासही शाश्वतसुख प्राप्त होत नाहीं. आतां अनीतीनें वागूनही कधीं कधीं व्यक्तिविशेषाची बढतीच होत चाललेली यद्यपि दृष्टीस पडते, तरी अन्यायानें सुस्थिति जोडणाऱ्या मनुष्याचा शेवट गोड होत नाहीं. त्याची लौकिकांत पत कमी होते. त्याचा सर्व प्रतिष्ठित लोक तिरस्कार करितात, व त्यास आपली अनीति लोकांच्या ध्यानीं येऊं नये म्हणून अतिशय काळजी वहावी ला-

१ भूतानामपरः कश्चिद्धिंसायां सततोत्थितः। वञ्चनायां च लोकस्य स सुखी जीवते सदा ॥ ११ ॥ वनपर्व, अ० २०९.

वर्द्धत्यधर्मेण नरस्ततोभद्राणि पश्यति। ततः सपत्नाञ्जयति समूलस्तु विनश्यति ॥ ४ ॥ वनपर्व, अ० ९४.

गते. याशिवाय त्याचें मनच त्याला खात असतें. अशा प्रकारें आपल्या मनाशीं आपणच चोर बनणारा मनुष्य कोणचें पाप करणार नाहीं ![1] अधर्म अल्प जरी असला तरी तो बीजरूप होऊन वृद्धिंगत[2] होतो, व त्याचें फळ जरी लागलेंच मिळालें नाहीं, तरी तो अधर्म कालांतरानें पुत्रपौत्रादिकांच्या[3] नाशास कारणीभूत होतो. अतिशय सावधगिरीनें चोरून केलेलें अनीतिवर्तन प्रसंगीं लोकांच्या व राजाच्या नजरेस न आलें, तरी तें ईश्वरास व हृदयस्थित अंतरात्म्यास[4] ज्ञात झाल्यावांचून रहात नाहीं, व त्याबद्दल होणारें ईश्वरी शासन कोणासही

---

१ आमरणात्किंशल्यं ? प्रच्छन्नं यत्कृतं पापं ॥ (प्रश्नोत्तरमाला. श्रीमच्छंकराचार्य).

योऽन्यथा संतमात्मानमन्यथा प्रतिपद्यते । किं तेन न कृतं पापं चौरेणात्मापहारिणा ॥ २७ ॥ आदिपर्व, अ० ७४.

२ स्वल्पमेव यथा दत्तं दानं बहुगुणं भवेत् । अधर्म एवं विप्रर्षे ! बहुदुःखफलप्रदः ॥ १२ ॥ आदिपर्व, अ० १०८.

३ नाधर्मश्चरितो राजन्सद्यः फलति गौरिव । शनैरावर्त्यमानो हि कर्तुर्मूलानि कृंतति ॥ २ ॥

पुत्रेषु वा नप्तृषु वा नचेदात्मनि पश्यति । फलत्येव ध्रुवं पापं गुरुभक्तमिवोदरे ॥ ३ ॥ आदिपर्व, अ० ८०

४ पापं कृत्वा हि मन्येत नाहमस्मीति पूरुषः । तं तु देवाः प्रपश्यन्ति स्वस्यैवान्तरपूरुषः ॥ ५४ ॥ वनपर्व, अ० २०.

मन्यते पातकं कृत्वा न कश्चिद्वेत्ति मामिति । विदन्ति चैनं देवाश्च यश्चैवान्तरपूरुषः ॥ २३ ॥ आदिपर्व, अ० ७४.

लांचलुचपतीनें चुकवितां येत नाहीं. तस्मात् अनीतीनें प्राप्त होणारें सुख हें वध्यमनुष्यास सुळावर देण्यापूर्वी मिष्टान्न खाऊं घालतात त्याप्रमाणें दुःखपरिणामी आहे. असलें ओंगळ सुख भ्रमिष्टाशिवाय कोणीही ग्राह्य करणार नाहीं; परंतु दुर्दैवानें ह्या देशांत सांप्रत अन्यायानें प्राप्त होणाऱ्या दुःखपरिणामी, नकली सुखास भुलणारे भ्रमिष्ट फार निपजूं लागले आहेत, ते पुढें आपणास सुळावर चढावयाचें आहे ह्या गोष्टीचें भान विसरून पुढें आलेल्या मिष्टान्नावर यथेच्छ ताव देत बसतात हें केवढें आश्चर्य !

असो, इतका वेळ केलेल्या नीतीच्या निरूपणावरून तिची उपयुक्तता व आवश्यकता ध्यानीं आली असेलच; आतां तिचें स्वरूप कसें आहे ह्याविषयीं विचार करूं. नीतीचें स्वरूप दोन प्रकारचें आहे, एक सरळ व दुसरें कुटिल; सरळ नीतीस सामान्यनीति व कुटिल नीतीस विशेषनीति, किंवा राजनीति असें ह्मणतात. सामान्यनीति एकमार्गी आहे. ती पारलौकिक सुखावर दृष्टि देऊन आपली गमनदिशा न बदलतां मार्गक्रमण करीत असते, मग वाटेंत कांटे लागोत, किंवा नद्या, नाले आडवे येवोत; कितीही अडचणी आल्या तरी ती आपली गमनदिशा सोडीत नाहीं.

असा प्रकार राजनीतीचा नाहीं. तिची दृष्टि जरी पारलौकिक सुखावरच असते, तरी ती वाटेंत कांहीं अडचणी आल्या असतां, युक्तिप्रयुक्तीनें त्या टाळून व वारा वाहील तशी पाठ फिरवून इच्छित स्थळीं जाण्यास बघत असते. अशा रीतीनें संकटें टाळण्याकरितां ती जेव्हां आडवळणें घेते, तेव्हां अदूरदृष्टीचे लोक ती आडरानांत बहकली, व तिचा खरा मार्ग सुटला अशी उगाच कावकाव करितात, परंतु वास्तविक गोष्ट तशी नसते. सामान्य नीतीस संकटें सोसण्याची ताकद असते, व राजनीतीस संकटें टाळण्याची, किंवा त्यांतून युक्तीनें निभावून जाण्याची, नजर व हिकमत असते; अशा प्रकारें दोघीही आपआपल्या अंगच्या निरनिराळ्या गुणांनीं परलोकप्राप्ति करून घेतात; यास्तव जे सडे फटिंग असतील, व ज्यांस सहनशक्ति विशेष असेल, त्यांनीं इच्छा असल्यास सामान्य किंवा सरळनीतीची सोबत धरणें कदाचित् चांगलें होईल, परंतु ज्यांच्या पाठीमागें संसाराचें लटांबर आहे व ज्यांस तितकी सहनशक्ति नाहीं, त्यांनीं राजनीतीचाच आश्रय केला पाहिजे. अशा लोकांचा सरळनीतीच्या कांसेस लागून निभाव लागत नसतो. यास्तव संसारी जनास, अर्थात बहुजनसमाजास, उपयुक्त जी राजनीति, तिचें प्रस्तुत स्थळीं सामान्यतः वर्णन करूं.

संसारी मनुष्याचें कुटुंब हें लहानसें राज्य व त्याचा व्यवहार हा लहानसा राज्यकारभारच होय. कुटुंबाचा जो अधिपति किंवा प्रवर्तक, तो या राज्याचा राजा, त्याचें घर हें राजधानीचें शहर, त्याची पत्नी हा मुख्य मंत्री, मुलगा हा युवराज, कुटुंबांतील इतर माणसें हीं लहानमोठी दरकदार मंडळी, व चाकरमाणसें हे राजसेवक होत. तसेंच, त्याच्या आश्रयावर असणारीं दुसरीं कुटुंबें हें त्याचें सामंतचक्र किंवा ताब्यांतील संस्थानें, व शेजारचीं इतर घराणीं हीं सभोंवतालचीं स्वतंत्र राज्यें होत. ह्यांत कोणी प्रतिस्पर्धी, कोणी मित्र, व कोणी उदासीन, असा त्रिविध प्रकार असावयाचाच.

अशा सर्वांगांनीं युक्त राज्याचें आधिपत्य ज्यांस प्राप्त झालें असेल त्यांनीं धर्म, अर्थ, काम व मोक्ष असे चारी पुरुषार्थ प्राप्त होण्याकरितां, नीतिरूप कामधेनूचीच आराधना केली पाहिजे. सामान्यनीति व राजनीति ह्या दोघीही इच्छित देणाऱ्या कामधेनु खऱ्या; तथापि सामान्यनीतिरूप कामधेनु सर्वांस हात घालूं देत नाहीं, व तिचे अर्थ व काम हे पुरुषार्थ देणारे दोन्ही सड आज मितीस अगदीं सुकून गेले आहेत, आणि धर्म व मोक्ष हे पुरुषार्थ देणारे जे सड, ते मात्र कांहींसे ओले आहेत, तथापि त्यांतून पयःस्राव

झाला तरी तो फार कुचंबतच होतो, यामुळें संसारी जनांचें तेवढ्यावर भागत नाहीं. त्यांस अर्थप्राप्ति व कामपूर्ति यांच्या द्वारें जेवढें मोक्षसाधन घडेल तेवढेंच इष्ट असतें. परंतु कामपूर्ति अर्थाशिवाय होत नाहीं, व अर्थ आणि धर्म यांचा तर दृढतर अन्योन्याश्रय आहे. ह्मणजे अर्थाशिवाय धर्म घडत नाहीं, व धर्माशिवाय निर्दोष व सुखदायक अशी अर्थप्राप्तीही होत नाहीं, व त्याप्रमाणेंच धर्मव्यतिरिक्त मोक्षप्राप्तीही होणें दुर्लभच. वास्तविक ह्मटलें तर हे चारी पुरुषार्थ परस्परांवर अवलंबून असतात; यास्तव एकाचीच विशेष आराधना करून दुसऱ्याची अनास्था करितां येत नाहीं. याच कारणास्तव रामचंद्रांनीं भरतास व नारदांनीं धर्मराजास प्रश्नद्वारें राजनीति सांगितली आहे; तींत धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष, ह्या चौकडीपैकीं एकापासून दुसऱ्यास बाध न आणितां योग्य काळीं सर्वांचेंही सेवन करीत अस-

---

१ सर्वथा धर्ममूलोऽर्थोधर्मश्चार्थपरिग्रहः । इतरेतरयोर्नीतौ विद्धि मेघोदधी यथा ॥ २९ ॥ वनपर्व, अ० ३३.

२ कच्चिदर्थेन वा धर्ममर्थं धर्मेण वा पुनः । उभौ वा प्रीतिलोभेन कामेन न विबाधसे ॥ ६२ ॥

कच्चिदर्थं च कामं च धर्मं च जयतां वर ! । विभज्य काले कालज्ञ ! सर्वान्वरद ! सेवसे ॥ ६७ ॥   रामायण, अयोध्याकांड, सर्ग १००.

तांना ? ह्मणून विचारिलें आहे. ज्या विरक्त पुरुषांना अर्थ व काम यांची तादृश अपेक्षा नसते त्यांचा सामान्यनीतीवर निर्वाह झाला तर कोण जाणे, परंतु जे धर्मार्थकामासहवर्तमान मोक्षाची इच्छा करितात, अशा संसारी गृहस्थांनीं राजनीतीच्या चारी सडांस हात घातल्याशिवाय त्यांचा गुजारा होणार नाहीं. सामान्यनीतीचे ठायीं तारतम्य कमी असल्यामुळें कधीं कधीं ती धर्म करीत असतां तिजपासून अधर्म घडतो. समजा कीं " अहिंसा परमो धर्मः " हें सामान्यनीतीचें एक तत्व हृदयांत वागवून सामर्थ्य असतां, बालहत्येच्या भयास्तव एकाद्या शस्त्रवैद्यानें अडलेल्या बायकोची सोडवणूक केली नाहीं, किंवा प्राणिवधाच्या भयास्तव एकाद्या शिपायानें माणसाचे पाठीस लागलेल्या वाघावर गोळी घातली नाहीं, किंवा एकाद्या गलबताच्या मालिमानें तुफानांत सांपडलेल्या गलबतावरील सर्व उतारूंच्या संरक्षणार्थ दहा पांच उतारूंस समुद्रांत फेंकून दिलें नाहीं, व सर्वांसहवर्तमान आपणांस ' समुद्रास्तृप्यन्तु ' करून घेतलें, तर हें वर्तन धार्मिकपणाचें ह्मणतां येईल काय ? थोडच्या अधर्मानें पुष्कळ धर्म जोडतो आहे तर तो अधर्म नव्हे.

१ एवमेव मनुष्येंद्र ! धर्मं त्यक्त्वाल्पकं नरः । बृहन्तं धर्ममाप्नोति स बुद्ध इति निश्चितम् ॥ ६७ ॥ वनपर्व, अ० ३३.

तसेंच शठ, चोर, आततायी इत्यादि दुष्टजनांचा निग्रह जेव्हां सरळ मार्गानें होणें शक्य नसतें, तेव्हां तो कुटिलतेनें करूनही सर्वांचें रक्षण करावें, हाच धर्म होय.

याच कारणास्तव अत्यंत नीतिमान्, धार्मिक व साधुपुरुषांनीं योग्य अडचणीच्या प्रसंगीं सामान्यनीतीचा त्याग करून सत्कृत्यासाठीं अनीतीचाही स्वीकार केला आहे. धर्मराजाचें संदिग्ध भाषण, भरताची मातृनिंदा, कबीराची चोरी, व शिवाजीमहाराजांची कावेबाजी, यांस कोणी अदूरदृष्टीचे लोक अनीति ह्मणतील तर ह्मणोत, पण विचारी पुरुष तसें कधींही ह्मणणार नाहींत. शिवाजीमहाराजांनीं जावळीच्या राजाशीं केलेली कावेबाजी व एकनिष्ठेनें भक्ति करणाऱ्या एकलव्य निषादाशीं द्रोणाचार्यांनीं केलेली निष्ठुरता या गोष्टी दुष्टांस भावी सत्कृत्यांत अडथळा आणतां येऊं नये ह्मणूनच होत. द्रोणाचार्यांनीं एकलव्य निषादास अंगुष्ठहीन करून निर्बल केलें होतें, तें कांहीं निषादानें त्यांच्याशीं अन्यथा-वर्तन केलें होतें ह्मणून नव्हे. तें केवळ तो दुर्जन स्वकार्या-करितां आपणाशीं आज सरळ वागतो आहे खरा, परंतु स्वकार्य साधल्यानंतर तो लोकपीडक होईल, हें मनांत आणूनच केलें होतें. गुरुदक्षिणेप्रीत्यर्थ अंगुष्ठ घेऊन त्यास निर्बल केलें असतांही त्या दुष्टास मारणें कृष्ण-

परमात्म्यास पुढें कठिण पडलें. शिवाजीमहाराज, राजारामसाहेब व पहिले बाजीरावसाहेब इत्यादि राजकारस्थानी पुरुषांनीं साधेल त्या रीतीनें मुलुख जोडिले व राखिले, ते चमचमीत जेवून घोरत पडावयास सांपडेल ह्मणून नव्हेत. या तिघांसही मुसलमानांची सुस्थिर व बद्धमूल झालेली राजसत्ता मोडून टाकावयाची होती, व ती मोडून टाकण्यास आपणांस सर्व आयुष्यभर कष्ट व संकटें भोगावीं लागतील याची त्यांस पक्की कल्पनाही होती. चार दिवस धामधूम केली कीं, आपणास राज्यसुख भोगावयास सांपडेल, असा त्यांस भ्रम नव्हता. पूर्वींच्या ब्राह्मणज्ञातीस व क्षत्रिय ह्मणविणाऱ्या मराठे ज्ञातीस, "आपण द्विजातींनीं इहलोकीं सुखाची इच्छा न करितां जन्मभर कष्ट सोसून मरणोत्तर अनंत सुख संपादावें, ह्मणूनच आपणांस देह प्राप्त झाला आहे" हें धर्मशास्त्राचें उदात्त तत्व चांगलें विदित होतें. ह्मणूनच त्यांनीं वारंवार धारातीर्थीं आपले देह अर्पण केले, व क्वचित् प्रसंगीं कुटिल नीतीचाही आश्रय केला. शेकडों प्रसंगीं एकएकट्यानें शेपन्नास वीरांशीं झुंजही घेतलें व कितीएक वेळां अंगास

---

१ द्विजातीनामयं देहो न भोगाय प्रकल्पते । इह क्लेशाय महते प्रेत्यानन्तसुखाय च ॥ स्मृतिरत्नाकर.

राख फांसून भिक्षाही मागितली, पण हीं सारीं जिवावरचीं, अनीतीचीं व हलकेपणाचीं कृत्यें इमामदांडग्यांपासून गरीब देशबांधवांचा बचाव करावा ह्मणून केलीं, स्वसुखाकरितां केलीं, असें नव्हे. यास्तव त्या कृत्यांस अनीति कसें ह्मणावें? लोकोत्तर गुणांनीं संपन्न अशा राजकीय पुरुषांचें वर्तन सामान्य जनांच्या वर्तनाहून कांहीं भिन्न असतें हें तत्व सर्वमान्य आहे. सामान्यनीति विशेष नीतीनें बाधित असते, यामुळें कधीं कधीं नीतीला अनीतीचें स्वरूप व अनीतीला नीतीचें स्वरूप प्राप्त होतें. यास्तव दुष्टजनांच्या निष्कारण पीडेपासून अगर कौटिल्यापासून जेव्हां सरळमार्गानें बचाव होत नसेल; अथवा व्यक्तिविशेषाचें थोडें अहित करून पुष्कळ सार्वजनिक सुख साध्य होत असेल, व तें साधण्यास सरळ मार्ग नसेल, तेव्हां थोडीशी अनीति स्वीकारली असतांही ती व्यवहारांत नीतिरूपच होते.

नीतिवर्तन ह्मणजे समयोचित सद्वर्तन हें यथासांग

---

१ लोकवृत्ताद्राजवृत्तमन्यदाह बृहस्पतिः । तस्माद्राज्ञाऽप्रमत्तेन स्वार्थश्चिन्त्यः सदैव हि ॥ ६ ॥ सभापर्व, अ० ५५.

चातुर्वर्ण्यहितार्थं हि कर्तव्यं राजसूनुना ॥
नृशंसमनृशंसं वा प्रजारक्षणकारणात् ॥
पातकं वा सदोषं वा कर्तव्यं रक्षता सदा ।
राज्यभारनियुक्तानामेष धर्मः सनातनः ॥

श्लोक १७ ते १९ पहा. रामायण, बालकांड, सर्ग २५.

संपादिलें जाण्यास परिमित स्वार्थत्याग, परोपकारबुद्धि, कष्ट सोसण्याविषयीं असामान्य धैर्य, व्यवहारदक्षता, काळाचा यथायोग्य व्यय करण्याचा गुण, निरलस स्वभाव, स्वधर्मनिष्ठा, बरेंचसें इंद्रियदमन, व मनोनिग्रह, हे गुण अंगीं असावे लागतात. बरेंचसें इंद्रियदमन ह्मणण्याचें कारण संसारी मनुष्यास रसरूपगंधादि विषयांचा सर्वथैव त्याग व सर्वांशीं मनोनिग्रह होणें नाहीं, व असा सर्वथैव त्याग त्यांस इष्टही नाहीं. त्यांनीं इंद्रियलालनांत अगदीं लंपट न झालें व मनोविकारांस अनावर होऊं न दिलें ह्मणजे पुरे आहे.

नीतियुक्त वर्तन घडण्यास वर सांगितलेले सद्गुण अंगीं असणें आवश्यक आहे खरें, तथापि ते असल्यानेंच केवळ यथान्याय वर्तन घडेल असें ह्मणतां येत नाहीं. तें घडण्यास पुर्वोक्त सद्गुणांसमवेत धर्मार्थकामाविषयीं तारतम्यविचार ध्यानीं आणण्याचें सामर्थ्यही असलें पाहिजे. ज्या कर्मानें निष्कलंक समृद्धि प्राप्त

---

१ उपस्थितस्य कामस्य प्रतिवादो न विद्यते । अपि निर्मुक्तदेहस्य कामरक्तस्य किं पुनः ॥ ४५ ॥ उद्योगपर्व, अ० ३९.

२ समुच्छ्रये यो यतते स राजन्परमो नयः ॥ ११ ॥
सभापर्व, अ० ५५.

होते ती नीति, व जें नीतियुक्त कर्म तोच धर्म, असें ज्ञात्यांचें ह्मणणें आहे.

श्रुतिप्रणीत जें कर्म तो धर्म असें वृद्धांचें ह्मणणें आहे खरें, पण नानाविध श्रुतींची एकवाक्यता करून श्रुत्यर्थ निश्चित करणें हें कर्म पंडितांसही कठिण पडतें, मग सामान्य जनांचा पाड काय? द्रौपदीनें भीष्माचार्यांस मी जिता कीं अजिता हें ठाम निर्णय करून सांगा, ह्मणून विनंति केली असतां, त्यांनींही मोठ्या संकोचानें " **न धर्मसौक्ष्म्यात्सुभगे! विवेक्तुं, शक्नोमि ते प्रश्नमिमं यथावत्** " असें संदिग्ध उत्तर देऊन धर्माच्या सूक्ष्मतेस हात जोडले, मग इतरांची काय कथा! धर्मानें अधर्म व अधर्मानें धर्म किंवा सत्यानें अनृत व अनृतानें सत्य घडतें असा श्रुतिप्रणीत धर्मांत विपर्यय दृष्टोत्पत्तीस येतो, यास्तव त्याचा निश्चय होणें

---

१ आरंभो न्याययुक्तोऽयः स हि धर्म इति स्मृतः। अनाचारस्त्वधर्मेत्ति एतच्छिष्टानुशासनं ॥ ७८ ॥ वनपर्व, अ० २०७.

२ श्रुतिप्रमाणो धर्मोऽयमिति वृद्धानुशासनं। सूक्ष्मा गतिर्हि धर्मस्य बहुशाखा ह्यनंतिका ॥ २ ॥

३ प्राणांतिके विवाहे च वक्तव्यमनृतं भवेत्। अनृतेन भवेत्सत्यं सत्येनैवानृतं भवेत् ॥ ३ ॥ वनपर्व, अ० २०९.

अधर्मो यत्र धर्माख्यो धर्मश्चाधर्मसंज्ञितः। स विज्ञेयो विभागेन यत्र मुह्यंत्यबुद्धयः ॥ २७ ॥ वनपर्व, अ० १५०.

कठिण. यामुळें जें कृत्य प्राणिमात्रास सुखावह होतें तोच धर्म व तेंच सत्य, व ज्या कृत्यानें आपणासहवर्तमान आपल्या जातिबांधवांस क्लेश होतील तो कुधर्म, असें शाहण्यांनीं स्थूलमानानें ठरवून ठेविलें आहे.

जेव्हां दोन धर्मतत्त्वें परस्परविरोधी असून एकमेकांस बाध आणितात, तेव्हां त्या संबंधानें गुरुलाघवाविषयीं विचार करून ज्यांत बाधा कमी असेल त्याचा स्वीकार करावा, व दुसरें तत्त्व कुधर्म समजून सोडून द्यावें. अर्थरहित व केवळ निष्काम असा धर्म, संसारी जनांस आचरण्याची शक्ति नसते, यास्तव तसा धर्म आ-

---

१ यद्भूतहितमत्यन्तं तत्सत्यमिति धारणा। विपर्ययकृतो धर्मः पश्य धर्मस्य सूक्ष्मताम् ॥ ४ ॥ वनपर्व, अ० २०९.

श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्नाः नैकोमुनिर्यस्य वचः प्रमाणम्। धर्मस्य तत्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पन्थाः ॥

२ धर्मं यो बाधते धर्मो न स धर्मः कुवर्त्म तत्। अविरोधात्तु यो धर्मः स धर्मः सत्यविक्रम ! ॥ ११ ॥

विरोधिषु महीपाल ! निश्चित्य गुरुलाघवं। न बाधा विद्यते यत्र तं धर्मं समुपाचरेत् ॥ १२ ॥

गुरुलाघवमादाय धर्माधर्मविनिश्चये। यतो भूयांस्ततो राजन्कुरुष्व धर्मनिश्चयम् ॥ १३ ॥ वनपर्व, अ० १३१.

कर्षणार्थो हि यो धर्मो मित्राणामात्मनस्तथा। व्यसनं नामतद्राजन्नधर्मः स कुकर्म तत् ॥ २१ ॥ वनपर्व, अ० ३३.

३ सर्वथा धर्मनित्यं तु पुरुषं धर्मदुर्बलम्। त्यजतस्तात ! धर्मार्थौ प्रेतं दुःखसुखे यथा ॥ २२ ॥ वनपर्व, अ० ३३.

चरण करूं पाहणाऱ्या दुर्बल मनुष्यास पीडा मात्र होते. अशा मनुष्यास धर्माचें रहस्य[1] नीट समजत नाहीं, असेंच ह्मणणें भाग पडतें. धर्म, अर्थ व काम ह्या त्रिवर्गापासून पीडा व सुख ह्या दोन्ही गोष्टी होत असतात, यास्तव पीडांचा त्याग करून शाहण्यानें सुखांचा[2] संग्रह करीत असावें; ज्या धर्मानें आपलें कर्षण होतें तो धर्म नव्हे, तें व्यसन अथवा कुधर्म होय; यास्तव केवळ धर्माच्या मागें लागून अर्थ व काम ह्यांच्याकडे दुर्लक्ष करूं नये. तसेंच अर्थ व काम ह्यांवरच केवळ नजर देऊन धर्माकडे दुर्लक्ष करणें योग्य नाहीं. तद्वत् कामतृप्तीसाठींच सर्वकाळ झटत राहिल्यास त्यापासून धर्म व अर्थ ह्या दोहोंचाही नाश होऊन सरतेशेवटीं आपलाही नाश होतो. याकरितां या तिघांपासून परस्परांस अडथळा न होईल अशा रीतीनें कृत्यें केल्यास तीं सुखप्रद व फलदायी होतात.

---

१ यस्य धर्मोहि धर्मार्थं क्लेशभाङ् न स पण्डितः। न स धर्मस्य वेदार्थं सूर्यस्यान्धप्रभामिव ॥ २३ ॥ वनपर्व, अ० ३३

२ त्रिवर्गे त्रिविधा पीडा ह्यनुबन्धस्तथैव च। अनुबंधाः शुभाज्ञेयाः पीडास्तु परिवर्जयेत् ॥ ७० ॥

धर्मं विचरतः पीडा सापि भ्द्वाभ्यां नियच्छति।अर्थं चाप्यर्थलुब्धस्य कामस्यातिप्रवर्तिनः ॥ ७१ ॥ आदिपर्व, अ० १४२.

यथोचित वर्तन घडण्यास आवश्यक नित्य कृत्यांत अहोरात्र काळाची वाटणी करून नेमलेलीं कृत्यें नेमलेल्या वेळीं यथानुक्रम करणें फारच आगत्याचें आहे. असें केल्यानें दुर्वर्तन करण्यास वेळच सांपडत नाहीं. रिकामटेकड्या मनुष्याच्या डोक्यांत सर्व पिशाचगणांसहवर्तमान वेताळाचा दरबार भरत असतो, ही गोष्ट मनांत वागवून प्राचीन ऋषींनींही, आपला सर्व काळ आन्हिक परंपरेंत गुंतवून टाकिलेला असे. आतां त्यांचें लक्ष्य विशेषेंकरून निवृत्तिमार्गावर असल्यामुळें त्यांनीं स्वीकारलेली कार्यपरंपरा त्या मार्गास अनुलक्षून होती; तिचा संसारीजनांच्या प्रवृत्तिमार्गाशीं सर्वांशीं जम बसणार नाहीं, इतकेंच कायतें; परंतु अशा प्रकारचें भिन्नत्व असलें तरी त्या त्या मार्गास अनुरूप अशी कार्यपरंपरा व तिजमध्यें काळाची वांटणी करून सर्व काळ व्यापृत राहणें हें दोन्ही पंथांच्या लोकांस अगदीं आवश्यकच आहे. ह्या काळाच्या वांटणीकडे मागील पिढीच्या लोकांचा किती कटाक्ष होता, हें श्रीमती गोपिकाबाईसाहेब

---

१ यः पश्चात्पूर्वकार्याणि कुर्यादैश्वर्यमास्थितः। पूर्वं चोत्तरकार्याणि न स वेद नयानयौ ॥ ५ ॥

देशकालविहीनानि कर्माणि विपरीतवत् । क्रियमाणानि दुष्यन्ति हवींष्यप्रयतेष्विव ॥ ६ ॥ रामायण, युद्धकाण्ड सर्ग ६३.

ह्यांणीं श्रीमंत सवाई माधवराव पेशवे ह्यांस लिहून पाठविलेल्या दिनचर्येवरून सुज्ञांच्या ध्यानीं येईल.

पुढें दिलेला कार्यक्रम व कालाची वांटणी पुष्कळांस सोयकर होईल, असें वाटल्यावरून दिली आहे. ती धंद्याच्या मानानें ज्यांस सोयकर नसेल, त्यांनीं आपल्या सोयीस पडेल असा तींत बदल केल्यास कांहीं हरकत आहे, असें नाहीं.

नित्यकृत्यांत कालाची वांटणी.

५॥ ते ६, प्रातःकालीं साडेपांच वाजतां उठून स्वस्थचित्तानें परमेश्वराचें ध्यान व नामस्मरण करावें आणि तदनंतर आत्महिताची विचारणा करावी. '**ब्राह्मे मुहूर्ते चोत्थाय चिंतयेदात्मनो हितं**' अशी स्मृति आहे.

६–६॥, शौचविधि, मुखमार्जन व स्नान वगैरे कृत्यें आटोपावीं.

६॥–७॥, ब्राह्मणांनीं संध्यावंदन, पितृतर्पण, अग्निपूजा व देवपूजा वगैरे, व इतरांनीं आपल्या वर्णाश्रम धर्माप्रमाणें देवतार्चन वगैरे.

७॥–८, शारीरव्यायाम.

८–१०॥, व्यवहारासंबंधीं कामधंदा.

१०॥–११, ब्राह्मणांनीं माध्यान्हसंध्या व नैवेद्य, वैश्वदेव वगैरे.

११–१२, भोजन व तांबूलग्रहण वगैरे.

१२–१, किंचित् आराम व वामकुक्षी वगैरे.

१–२॥, भागवतरामायणादि ग्रंथाचें अवलोकन, इतर विद्याव्यासंग व वर्तमानपत्रें वाचणें वगैरे.

२॥–५॥, व्यवहारसंबंधीं कामधंदा.

५॥–६, देवदर्शन व रपेट वगैरे.

६–७, ब्राह्मणांनीं सायंसंध्या, स्तोत्रपाठ, धूपारती इत्यादि.

७–७॥, भोजन.

७॥–८, तांबूलग्रहण व मंडळीसहवर्तमान संभाषण.

८–९॥, जमाखर्ची व चिटणिशी लेखन.

९॥–१०, झालेल्या कामाचें मानसिक पर्यालोचन व दुसरे दिवसाच्या कामधंद्याची योजना.

१०–११, मित्र व विश्वासु सेवक यांच्या द्वारें गांवांतील कुटाळ लोकांचे बेत व खलबतें इत्यादि गोष्टींचा गुप्तरीतीनें बित्तम शोध राखणें.

११–५॥, निद्रा. ही पूर्वरात्र गत झाल्यांवर पुढच्या दोन प्रहर रात्रींत घ्यावी, व पहाटेच्या प्रहरीं उठून धर्मार्थाचें चिंतन करावें. “ कच्चिद्दौ

प्रथमौ यामौ रात्रेः सुप्त्वा विशांपते! । संचिन्तयसि धर्मार्थौ याम उत्थाय पश्चिमे ? ॥ ८८ ॥ सभा०-अध्याय ५" (मनुष्यास साडे सहा तास निद्रा अगदीं पुरेशी होते, असें वैद्यशास्त्राचें मत आहे.)

एकूण तास चोवीस.

ही दिनचर्या व कालाची वांटणी शेतवाडी व व्याजबट्टा इत्यादि धंदा करून जे स्वतंत्रतेनें घरच्याघरीं राहतात त्यांच्या सोयीची जितकी आहे, तितकी जे घरदार सोडून इतर ठिकाणीं सेवाधर्मानें राहतात त्यांच्या सोयीची नाहीं, हें खरें आहे, तथापि प्रत्येक व्यवसायी मनुष्यानें आपल्या सोयीस पडेल अशा रीतीनें आपला कालक्रम ठरवून टाकिला पाहिजे, व तो ठरवितांना त्यांत इतकें धोरण ठेविलें पाहिजे कीं, व्यवहारसंबंधीं कडाकुटीचे परिश्रम व विश्रांति या दोहोंचें मान साधारणपणें सारखें असावें. परिश्रमाशिवाय विश्रांति आनंददायक होत नाहीं, व विश्रांतीशिवाय सतत परिश्रम करवत नाहींत. शरीरप्रकृति दुरुस्त राहण्यास मनुष्यास सहापासून सात तास निद्रा आवश्यक असते, व ती विश्रांतीच होय. निद्रेसारखा दुसरा विश्रांतीचा प्रकार परम सुखावह नाहीं, कारण निद्रेंत जसा मानसिक अगर शारीरिक

कष्टांचा विसर पडतो, तसा इतर कोणत्याही प्रकारांत पडत नाहीं. पुत्रशोकासारख्या महत्तम कष्टांचीही निद्रेंत पूर्ण विस्मृति होते. व ठणका, तिडीक, इत्यादि तीक्ष्ण शारीरवेदनाही अनुभवास येत नाहींत. निद्रा ही मूढसमाधीच आहे. ह्या समाधीच्या बळावर मनुष्य पुन्हा कष्ट करण्यास व सोसण्यास ताजातवाना होतो, यास्तव निद्रा सुमारें सहा तास तर दगदगीचे परिश्रमही सहा तासच असावे. ह्यापेक्षां जास्त असूं नयेत. याच धोरणावर दरबारी कचेऱ्यांचा काळ सहा सात तास ठरविलेला असतो. याप्रमाणें निद्रा व दृढ परिश्रम ह्यांत चोवीस तासांपैकीं सुमारें बारा चवदा तास काळ वांटून गेल्यावर, बाकी राहिलेल्या दहा बारा तास काळाचे सरासरी चार सारखे भाग करावे. व त्यांपैकीं एक भाग वर्णाश्रमधर्माप्रमाणें अत्यंत आवश्यक जें आन्हिक व परमेश्वराचें भजनपूजन ह्यांत घालवावा. व दुसरा भाग भोजन, उपहार व तत्संबंधीं इतर गोष्टी ह्यांत खर्च करावा. तिसरा भाग ग्रंथावलोकन व विद्याव्यासंग ह्यांकडे लावावा, आणि चवथा भाग स्वजनपरिजन यांसहवर्तमान संभाषण करण्यांत, व गांवांतील उपद्व्यापी मंडळी व शत्रु ह्यांचीं कारस्थानें व उलाढाली काय चालल्या आहेत ह्यांचा फारच गुप्तरीतीनें व बारकाईनें

शोध ठेविण्यांत घालवावा. या चार भागांत करावयास पडणाऱ्या कृत्यांनीं परिश्रम अगदीं होत नाहींत असें नाहीं, परंतु ते दृढ परिश्रम नव्हत. हीं कृत्यें पुष्कळ अंशीं मानसिक श्रमाचीं आहेत; ह्यांत पाहूं गेलें तर शारीरश्रमाचें मान, खंडींत पाव रत्ती असतें, असें ह्मटलें तरी चालेल. यास्तव त्यास निराळा विश्रांतीचा काल पाहिजे असें नाहीं; कारण मन कधींही निर्व्यापार रहात नसून तें सदोदित व्यापृत असलें तरी थकत नाहीं; त्याचा निद्रेंत देखील धुडकूस चालूच असतो. मनाची निर्विकल्पस्थिति योग्यांसही दुःसाध्य असून ती त्यांस देखील जड जाते. यास्तव मनाला विश्रांति देणें, ह्मणजे त्यास एका व्यापारांतून काढून दुसऱ्या व्यापारांत गुंतविणें, हेंच होय. निद्रेचा काल व निर्वाहार्थ दृढतर परिश्रम करण्याचा काल, ह्या खेरीज इतर वेळीं जीं विविध प्रकारचीं कामें करावयाचीं असतात, तीं दगदगीचीं नसून त्यांत वैचित्र्य स्वाभाविकच असतें. एके घडीस जर मन भजनपूजनांत गुंतलेलें असलें, तर दुसऱ्या घडीला तें आहारविहारांत दंग असतें. व एके वेळीं ग्रंथावलोकनांत मग्न असलें, तर दुसऱ्या वेळीं स्वजनपरिजनांशीं संभाषण व हास्यविनोद करण्यांत चूर असतें. सारांश असल्या कामांचा थकवा घालविण्याकरितां निराळा वेळ खर्चीं घालावयास पाहिजे असें नाहीं.

प्रकृत प्रकरणांत नीतीचें स्वरूप, तिची आवश्यकता व उपयोग, चतुर्विध पुरुषार्थ व त्यांचा अन्योन्याश्रय, नित्यकृत्यांत काळाची वांटणी व ती ठरविण्याचीं धोरणें, इत्यादि गोष्टींविषयीं चार ठळकठळक विचार यथावकाश कथन केले. पुढील प्रकरणीं दिनचर्येंतील निरनिराळ्या कृत्यांविषयीं सविस्तर ऊहापोह करण्यांचा विचार केला आहे.

प्रकरण पहिलें समाप्त.

प्रकरण दुसरें.

दिनचर्या.

शयनोत्थान, प्रातःस्मरण, प्रातर्विधि, देवतार्चन, व्यायाम, व्यवहारधंदा, सेवकपरीक्षण, तत्संबंधी ऐतिहासिक गोष्टी, नोकरांच्या कामाची देखरेख, नैवेद्यवैश्वदेव, अतिथिप्रतीक्षा, भोजन कोणास द्यावें, भोजन, पाकनिष्पत्ति, भोज्यपदार्थघटक द्रव्यें, पंक्तिप्रपंचनिषेध, ' अन्नं न निंद्यात् ', आग्रह न करणें, अत्यशननिषेध, मितभोजनाचे षड्गुण, तांबूलग्रहण, वामकुक्षी, ग्रंथावलोकन, सभास्थान, दप्तरी कामकाज व दप्तर, रपेट व देवदर्शन, सायान्हकर्मे, स्वजनसंभाषण, शिल्लक सांखळी मिळविणें, व नाजूक पत्रव्यवहार, कुटाळांच्या उलाढालींचा शोध, निद्रा.

—:०:—

प्रकृत प्रकरणांत भिन्न भिन्न व्यवसायी जनांच्या दिनचर्येंतील नानाविध कृत्यांचा ऊहापोह करणें शक्य नाहीं, यास्तव शेतीवाडी व सावसाहुकारी करून उपजीविका करणाऱ्या गृहस्थाचें उपलक्षण घेऊन, त्याच्या दिनचर्येंतील नित्यकृत्यांचीच येथें चर्चा केली आहे, तथापि तींतील विचारसरणीवरून, इतर धंद्यांच्या लोकांसही आपआपलीं नित्यकृत्यें ठाकठिकीनें कशीं करावीं, हें ठरविण्यास चांगला उपयोग होईल. यास्तव वाचकांनीं पुढील

विवरणाच्या तात्पर्यार्थावर विशेष लक्ष ठेवावें. केवळ उक्त गोष्टींवरच भिस्त ठेऊन राहूं नये.

प्रथमतः अरुणोदयापूर्वी शयनोत्थित होऊन मुखप्रक्षालन करावें, आणि शयनावर स्थित असतांच प्राङ्मुख होऊन, परमेश्वराचें एकाग्रचित्तानें व श्रद्धाळूपणानें ध्यान करावें, आणि परमात्मा भूतमात्राच्या ठायीं व स्थिरचरपदार्थांत भरलेला आहे, अशी चित्ताची भावना करावी. येणेंकरून भूतमात्राच्या ठायीं प्रेम उत्पन्न होतें, व द्रोहबुद्धि बरीच कमी होते. सर्वथैव अजातशत्रुत्व संपादणें हें सांप्रत शक्य नाहीं, व पूर्वकालींही ही गोष्ट पुष्कळ अंशीं तात्विक असून अंशतःच आचरणीय असे. धर्मराजास अजातशत्रु ह्मणत, परंतु त्यासही कौरवांशीं झगडणें भाग पडलें, व कौरवांनींही स्वार्थाकरितां धर्मराजाशीं द्वेष केला, हें सुप्रसिद्धच आहे. मनुष्यांचें परस्परांशीं स्वाभाविक वैर नाहीं. तें बहुधा स्वार्थामुळेंच उत्पन्न होत असतें, व तो स्वार्थ तर कोणास सुटला नाहीं. यामुळें सर्वथैव वैरभाव नष्ट होणें शक्य नाहीं हें उघडच झालें; परंतु असें जरी आहे, तरी सद्विचारानें त्याचें मान पुष्कळ कमी करितां येतें, व तें कमी झाल्यावर

१ नास्ति वै जातितः शत्रुः पुरुषस्य विशांपते ! । येन साधारणी वृत्तिः स शत्रुर्नेतरोजनः ॥ १५ ॥ सभापर्व, अ० ५५.

साहजिकच ऐक्यभाव बळावूं लागून, देशाचें बल व तेज वृद्धिंगत होऊं लागतें. राष्ट्राची एकी संकेतानें होत नसते; ती देशांतील प्रत्येक व्यक्तीच्या उदात्त विचारानें व परस्परांच्या प्रेमभावानेंच होणें शक्य असते. अशा रीतीनें प्रातःस्मरण झाल्यावर आपल्या हितांविषयीं चिंतन करून द्रव्यार्जनाचाही विचार करावा. तदनंतर बहिर्दिशेस जाऊन मुखमार्जन व स्नान करावें. प्रकृति सशक्त व नीरोगी असेल तर शीतोदकानें स्नान करण्याचा परिपाठ राखणें चांगलें. स्नान केल्यानंतर ओल्या अंगावर वारा लागूं देऊं नये; अंग चांगलें पुसून कोरडें वस्त्र परिधान करावें. प्रकृति दुर्बल असेल तर उष्णोदकानें स्नान करावें, व वस्त्र परिधान केल्यावर आसनावर बसून, दुसरे विचार मनांत येऊं न देतां, एकाग्रचित्तानें संध्यावंदन व देवतार्चन, इत्यादि धर्मकृत्यें आटोपावीं. तीं करितांना दांभिकपणा, छांदिष्टपणा व दीर्घसूत्रता करूं नये, व वेठ वारल्यासारखेंही करूं नये. एकदा व्यवहाराची दीक्षा घेतल्यावर प्रहर प्रहर नाक धरून बसणें, किंवा टाळ कुटीत राहणें, योग्य नाहीं. व्यावहारिकांनीं आपला व्यवहार यथान्याय व यथासांग

---

१ कच्चिच्चापररात्रेषु चिन्तयस्यर्थमर्थवित् ?॥ (असा नारदांनीं धर्मराजास प्रश्न केला आहे.) श्लोक ३०, सभापर्व, अ० ५.

केला ह्मणजे तो त्यांचा धर्मच होतो. संध्यावंदनादि कृत्यें आटोपल्यावर निर्वातस्थळीं देवतेस उद्देशून नमस्कारादि शारीरिक व्यायाम, अथवा जोर, जोडी व बैठका इत्यादि प्रकारचा व्यायाम करावा, व तो चांगला अंगांतून घाम फुटेल इतका असावा.

ह्या गोष्टीकडे सांप्रत लोकांचें असावें तितकें लक्ष नसल्यामुळें, आपल्या देशांतील लोकसमाज निष्प्राण व पोषागी झालेला दृष्टीस पडतो. कितीएकांचा समज, तालिमबाजी करणें हें प्रतिष्ठित कर्म नव्हे, असाही झालेला आमच्या आढळांत आहे. प्रातःकालीं स्नानापूर्वी किंवा स्नानानंतर शारीरव्यायाम करण्याची परिपाठी, प्रतिष्ठित लोकांत देखील, फार प्राचीन कालापासून आपल्या देशांत आहे. पांडव धृतराष्ट्राच्या भेटीस[१] जाण्यापूर्वी, व्यायाम व संध्यावंदनादि कृत्यें आटोपून गेले होते, असें भारतांत वर्णन आहे, यावरून ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. थोड्या वर्षांपूर्वी या देशांत पालखीपदस्थ श्रीमान्, भटभिक्षुक, व विद्वान् अविद्वान्, अशी सर्व प्रकारची मंडळी तालिमबाजी करीत असे, हें इतिहासप्रसिद्ध व सर्वतोमुखीं असूनही हा गैरसमज लोकांच्या डोक्यांत

---

१ ततस्तेपुरुषव्याघ्रा गत्वा स्त्रीभिस्तु संविदम् । कृत्वा व्यायामपूर्वाणि कृत्यानि प्रतिकर्म च ॥ ३४ ॥ सभापर्व, अ० ५८.

कसा शिरला कोण जाणे! व्यायामाच्या योगानें क्षुद्बोध होऊन अन्नपचन चांगलें होतें, अंगीं श्रमसहिष्णुता येते, आळस जाऊन उद्योगधंदा करण्यास उल्हास वाटतो, आणि शरीरप्रकृति निकोप व नीरोगी होते; यास्तव आयुरारोग्य देणाऱ्या व्यायामाविषयीं हेळसांड करणें हितावह नाहीं, हें उघडच आहे.

सुमारें आठ वाजेपर्यंत हीं कृत्यें आटोपून दोन अडीच तास व्यवहारधंद्याचा उद्योग करावा. घरंदाज, जिनगीवाले, व व्याजबट्टा करणारे, अशा लोकांनीं उद्योग करावयाचा ह्मटला ह्मणजे उद्योगधंद्याकरितां ठेविलेल्या नोकरांचाकरांवर लक्ष ठेवणें, हाच होय. त्यांस देखरेखीशिवाय स्वतः हातांनीं बहुधा कांहीं करावें लागत नाहीं, यास्तव कार्यकर्तीं माणसें पारखावीं कशीं, व त्यांचा संग्रह करावा कसा, त्यांस योग्यतेनुरूप वेतन द्यावें कसें, हुकूम फरमावावे कसे, आणि त्यांशीं आपली वागणूक असावी कशी, इत्यादि गोष्टींचा विचार कसा करावा, हें सांगणें ओघानेंच प्राप्त झालें.

दुर्बलता, बुद्धिमांद्य, व आळस इत्यादि कारणांनीं ह्मणण्यासारखें कार्यकर्तृत्व पुष्कळांच्या अंगीं नसतें, यामुळें कार्यकर्तीं माणसें आधीं मिळणें कठिण, व अशीं माणसें पारखून काढून त्यांचा संग्रह करणें हें तर त्याहू-

नही कठिण होयं. वैभवास चढूं पाहणाऱ्या लोकांस मनुष्याची पारख करितां न येणें, ही मोठीच उणीव समजली पाहिजे. पूर्वकाळीं वैभवाच्यां शिखरास पोहोंचलेल्या थोर पुरुषांच्या अंगीं हा गुण अप्रतिम असे. ह्मणूनच त्यांच्या हातून दुर्घट व महत् कृत्यें झालीं, व त्यांची जेथें तेथें फत्तेच होत गेली. ह्या गुणाची उपयुक्तता वाचकांच्या मनांत चांगली ठसावी ह्मणून, चालू विवरण जरा तहकूब ठेऊन, या संबंधाच्या कांहीं ऐतिहासिक गोष्टी सांगितल्या असतां उपयोग होईल, असें वाटल्यावरून सांगत आहें, यास्तव त्याबद्दल सुज्ञ वाचकांनीं विषयांतर केल्याचा दोष न द्यावा, अशी त्यांस विनंति आहे.

दक्षिणेंत स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवाजीमहाराजांचे तीर्थरूप, शहाजीराजे, यांस माणसांची पारख चांगली असे. त्यांनीं आपल्या जहागिरींतील इंदापूर व पुणें, या परगण्यांचा कारभार दादोजी कोंडदेव नामक एका कारकुनावर सोंपविला होता. हे दोन्ही परगणे, त्या काळीं बहुतेक ओसाड व जुजबी लागवडीचे होते, व त्यांत नवी वसाहात करून ते आबादानीस आणणें, हें काम मोठ्या कुशलतेचें व पराकाष्ठेचें बिकट होतें, परंतु तें त्यांनीं इतक्या उत्तम रीतीनें बजावलें कीं, पुढें शहाजीराजे यांची मर्जी सुप्रसन्न होऊन, ते त्यांवर

मोठ्या विश्वासाचीं नाजूक कामें बिनदिक्कत सोंपवीत असत. शहाजी राजे कर्नाटक प्रांताच्या बंदोबस्तांत गुंतले असतां, त्यांनीं आपली ज्येष्ठपत्नी जिजाबाईसाहेब, व अज्ञान चिरंजीव शिवाजी महाराज, ह्या उभयतांस पुणेंप्रांतीं आपल्या वतनाच्या जागीं ठेवून, चिरंजिवांच्या विद्याभ्यासावर दादोजींची नजर असावी, अशी व्यवस्था केली होती, व त्याप्रमाणें दादोजींनींही महाराजांस घोडे फेरणें, दांडपट्टा खेळणें, व व्यवहारदक्षता राखणें, इत्यादि गोष्टी फार आस्थेनें शिकविल्या होत्या; परंतु, ह्या सर्व शिक्षणापेक्षां दादोजीपंतांच्या स्वतःच्या वर्तनाचा कित्ताच महाराजांस फार उपयोगीं पडला, असें त्यांच्या एकंदर कारकीर्दीकडे लक्षपूर्वक पाहिलें तर स्पष्ट दिसून येतें. दिल्ली व विजापूर येथील दोन बादशाहांशीं एक्या कालींच वैर बांधून, स्वाऱ्याशिकाऱ्यांच्या दिवसांत नूतन संपादिलेलें राज्य आबादीस आणण्याची हातवटी, मावळें आबाद करण्याची पंतांची पद्धत पाहूनच महाराजांस प्राप्त झाली, असें आह्मांस वाटतें. दादोजीपंतांच्या न्यायी वर्तनाचा ठसा महाराजांच्या मनावर चांगला उठलेला असावा, असेंही त्यांच्या चरित्रांतील कितीएक गोष्टींवरून दिसून येतें. महाराजांचे मुख्य कारभारी अबाजी सोनदेव, हे मुलुखगिरी

करीत असतां त्यांस विजापूरकरांच्या लष्करांतील एक रूपवती स्त्री पाडाव सांपडली होती, ती त्यांनीं महाराजांस नजर केली. त्यासमयीं महाराजांनीं उत्तर केलें कीं, " मातोश्री जिजाऊ साहेब अशा रूपसंपन्न असत्या, तर आह्मीही असेच रूपवान[1] झालों असतों. " असें बोलून त्यांनीं त्या बाईचा वस्त्रालंकारांनीं सत्कार करून, व समागमें स्वार देऊन, तिजला विजापुरीं रवाना केलें. पंतांचा स्वभाव फार न्यायनिष्ठुर असे. त्यांनीं आपल्या दिमतीस असलेल्या आंब्याच्या[2] झाडाचें एक फळ, धन्याच्या परवानगीशिवाय तोडलें होतें, त्याबद्दल ते आपला हात कलम करावयास निघाले होते; परंतु चार संभावित गृहस्थांनीं, मध्यें पडून मोठ्या शर्तीनें त्यांस ह्या कर्मापासून परावृत्त केलें. तरी ते आपला हात तुटला आहे, ह्या गोष्टीच्या निदर्शनार्थ आपल्या अंगरख्याची एक बाही मरेपर्यंत लोंडी[3] ठेवीत असत.

१ (पुरुषोत्तमकवीनें शिवकाव्यांत शिवाजी महाराजांची परस्त्रीविषयीं अनासक्ति कशी होती, हें खालील श्लोकांत वर्णन केलें आहे).
तरुणीं रमणीं परस्त्रियं जननीं स्वां मनुतेस्म सर्वदा । निजयोषितमीश्वरोऽबिकामिव देहार्धगताममन्यत. ॥ शिवकाव्य.

२ काव्येतिहाससंग्रहांत छापलेली, मराठीसाम्राज्याची छोटी बखर पान १८ पहा.

३ ही गोष्ट तुकारामचरित्र अध्याय १९ ह्यांत अन्य तऱ्हेनें वर्णिली आहे.

असा त्यांचा इमानी व स्वामीनिष्ठ स्वभाव पाहून शहाजी महाराजांनीं त्यांचा तनखा सातशें होन केला होता. ह्या सर्व गोष्टी इतिहासप्रसिद्धच आहेत.

शहाजी राजे यांनीं आपले दुसरे चिरंजीव व्यंकोजी राजे, हे चवदा वर्षांचे असतां, त्यांस रघुनाथपंत नांवाच्या एका कारकुनाच्या दिमतीस देऊन, त्यांची चंदावरच्या जाहगिरीवर स्थापना केली होती. हे रघुनाथपंतही मोठे तेजस्वी, विश्वासू, व स्वामीकार्यधुरंधर होते. ते दादोजीपंतांप्रमाणें व्यंकोजीराजांस शिकवणीच्या गोष्टी सांगून शिवाजी महाराजांप्रमाणें पराक्रम करण्याविषयीं नेहमीं उत्तेजन देत असत. स्वपराक्रमानें कांहीं नवें संपादन न करितां, वडिलार्जित जहागिरीचा उपभोग घेऊन, अल्पसमाधानी बनणें, हें राजेलोकांस उचित नाहीं. उंदरांची ओंजळ चार दाण्यांनीं भरते, परंतु सिंहाचें पोट हत्तीचा छावा मारूनही भरत नाहीं. निरुत्साही समाधानवृत्ति अभ्युदयास विघातक आहे, असें त्यांचें

---

१ असंतुष्टा द्विजा नष्टाः संतुष्टाश्च महीभुजः । सलज्जा गणिका नष्टा निर्लज्जाश्च कुलस्त्रियः ॥ हितोपदेश.

२ सुपूरा वै कुनदिका सुपूरो मूषकाञ्जलिः । सुसंतोषः कापुरुषः स्वल्पकेनैव तुष्यति. ॥ ९ उद्योग, अ० १३३.

३ संतोषो वै श्रियं हन्ति तथानुक्रोश एव च । अनुत्थानभये चोभे निरीहो नाश्नुते महत्. ॥ ३४ उद्योग. अ० १३४.

व्यंकोजीराजांस वारंवार सांगणें असे. परंतु व्यंकोजींच्या अंगीं कर्तृत्व नसल्यामुळें, ते त्यांच्या हितोपदेशाची नेहमीं अवगणना करून उलटा त्यांस दोष देत. यामुळें अखेर त्रासून त्यांनीं यजमानापासून काशीयात्रेस जाण्याची परवानगी मिळविली, व नोकरीवर लाथ मारून ते महायात्रेस चालते झाले. हें वर्तमान शिवाजीमहाराजांस कळल्यावर त्यांनीं रघुनाथपंतांस आपल्या समीप आणवून, व हे वडिलार्जित कर्ते सेवक असें जाणून, त्यांचा त्यांनीं मोठा गौरव केला.

तेसमयीं रघुनाथराव फार संतुष्ट होऊन महाराजांस ह्मणाले कीं, चंदावरचें[१] राज्य आपलेंच आहे, व त्याचा उपभोग धाकटे महाराज घेतच आहेत, पण चंदी आपले ताब्यांत नसून, तेथें खवासखानाचा अंमल आहे, व त्याप्रमाणेंच बेंगरूळही अद्याप मोकळेंच आहे. यजमानांची मर्जी असेल तर हीं दोन्हीं ठिकाणें मिळून बावन लक्षांचा मुलूख सरकारच्या पदरीं पाडून देतों. हा बुद्धिवाद महाराजांनीं ग्रहण करून पंतांच्या मार्फतीनें चंदीचें नवें राज्य तत्काळ हस्तगत केलें. अशा वर सांगितलेल्या उदाहरणांवरून शहाजीराजे ह्यांस मा-

---

१ काव्येतिहाससंग्रहांतील मराठीसाम्राज्याची छोटी बखर पान ४३ पहा.

णसाची पारख कशी होती, व कर्त्या सेवकास गुणज्ञ यजमान मिळाला तर प्रचंड कार्यभाग सहजरीतीनें कसे पार पडतात, ह्या दोन्ही गोष्टींचा वाचकांस चांगला उलगडा होण्यासारखा आहे.

शिवाजी महाराजांसही मनुष्याची पारख फार अप्रतिम होती. त्यांच्या पदरीं लाखों माणसें होतीं, परंतु त्यांत एकही हलगर्जी, बेहुकुमी किंवा निकामी मनुष्य नव्हतें, सर्व माणसें पारखून ठेविलेलीं होतीं. ह्या विधानाची सत्यता महाराजांच्या तोंडच्या शब्दांनींच सिद्ध होते, त्यास दुसरा पुरावा नको.

चंदीच्या राज्यावर स्वारीस जात असतां महाराजांनीं राजकारणाकरितां भागानगरीं तानाशा पादशहाची सलूख्याची मुलाखत घेतली होती. तेसमयीं, महाराजांच्या फौजेची पादशहास सलामी होत असतां, पादशहा खूष होऊन, " ह्यांत कोणी हत्तीशीं झुंजण्यासारखा मर्दाना (शूर शिपाई) आहे काय ? " ह्मणून पुसूं लागले. तेसमयीं महाराज ह्मणाले, " पादशहाच्या हत्तीशीं झुंजणारा कोण सांपडणार ! तथापि, पादशहांनीं हत्ती सोडवून चमत्कार पहावा. " हें ऐकून पाद-

१ काव्येतिहाससंग्रहांतील मराठासाम्राज्याची छोटी बखर. पान ४४।४५ पहा.

शहाचा हुकूम होतांच माहुतानें निशाणाचा मदोन्मत्त हत्ती आणून पुढें उभा केला. हें पाहतांच, जवळ एसाजी काळे उभे होते, त्यांस महाराजांनीं इशारा केल्याबरोबर ते पुढें सरसावून हत्ती अंगावर सोडावा, असें ह्मणाले, त्याबरोबर माहुतानें हत्ती त्यांच्या अंगावर घातला. काळे यांनीं हत्तीची सोंड तोडून त्याच्या मर्मस्थानीं तरवारीचे पांच चार वार केले, तेव्हां हत्ती मागें फिरला. हें कर्म पाहून पादशहांनीं तोंडांत बोट घातलें, व काळे आदिकरून सर्व फौजेस नांवाजून शिरपाव दिले.

पुढें पादशहांनीं महाराजांस आपले बाळाजी आवजी मुनशी आह्मांस देणें, ह्मणून आपली इच्छा दर्शविली, त्यावेळीं महाराज ह्मणाले कीं, एकएक माणूस मिळवून माळेस मणी लाविले आहेत, ते माळेचे मणी कसे काढितां येतील ? हें ऐकून पादशहा स्तब्ध झाले.

राजकारणी पत्रव्यवहारांतील लेखनचातुर्यावरून पादशहाचें चिटणिसांवर मन बसलें, यांत मोठेंसें नवल नाहीं. परंतु प्रथमतः बाळाजी आवजी राजापूरच्या सुभेदारापाशीं कारकून होते, त्यासमयीं त्यांच्या अंगचा मुत्सद्दीपणा महाराजांस कळून येण्यास कांहीं मार्ग न-

१ काव्येतिहाससंग्रहांतील मराठीसाम्राज्याची छोटी बखर पान ४९ पहा.

व्हता, फक्त सुभेदाराकडून जे हुजूर कागदपत्र येत, ते पाहूनच महाराजांनीं चिटणिसांच्या गुणांचें अनुमान करून सुभेदारास गळ घातली, व त्यांस मागून घेतलें, आणि केवळ आपल्या जिवाचा कलिदा समजून पदरीं बाळगिलें. यावरून महाराजांस मनुष्याची पारख कशी करितां येत असे, या गोष्टीचें अनुमान सहज करितां येईल.

पहिल्या बाजीराव साहेबांनींही आपल्याकडे हार घेऊन मल्हारराव होळकरासारख्या शूर पुरुषाचा संग्रह केला, यावरून मनुष्याची पारख, व योग्यप्रसंगीं आवश्यक असणारी सबूरी, हे दोन्ही गुण त्यांच्या अंगीं चांगलेच होते, असें ह्मणणें भाग पडतें. बाजीरावसाहेब व मल्हारराव होळकर ह्यांच्या पहिल्या मुलाखतीची हकीकत[1] मोठी विचारणीय आहे. शाहू महाराजांनीं बाळाजी विश्वनाथ व पहिले बाजीराव ह्यांस मोंगलाईंत लुटालूट करून मोंगलांस उपद्रव देण्याचा परवाना दिला होता. राजानें प्रतिस्पर्धी राजाच्या राज्यास उपद्रव[2] देत राहून, त्यास क्षीणबल करावें, हें राजनीतिदृष्ट्या वि-

---

१ काव्येतिहाससंग्रहांत छापलेली होळकरांची कैफीयत पान २ ते ४ पहा.

२ परार्तिश्च महीपालः पुरेनीकस्य योजयेत् । उपरुध्यारिमासीत राष्ट्रं चास्योपपीडयेत्. ॥ शांतिपर्व.

हितच आहे. शत्रु आपणापेक्षां अति बलवान् असल्यामुळें त्याशीं लढाई करून आपला निभाव लागणार नाहीं, असें दिसून आलें तरी देखील, त्याशीं एकदम संधी करण्यास प्रवृत्त न होतां, त्याच्या राष्ट्रास पीडा करून त्यास जेरीस आणावें, आणि नंतर त्याशीं संधी करावा; असें केल्यानें संधी ह्मणजे तह हा सर्वांशांनीं आपणांस प्रतिकूल व अपमानकारक होत नाहीं, असें भीष्माचार्यांनीं शांतिपर्वांत सांगितलें आहे. शाहू महाराजांनींही याच धोरणावर पेशव्यांस मोंगलाईंत मोवासपणा व पेंढारदंगा करण्यास परवानगी दिली होती. या पुंडाव्यास पेशव्यांनीं जें लष्कर जमा केलें होतें, त्यास वेतनमुशाहिरा कांहींएक नसून लुटींत ज्यास जें सांपडेल तें त्यानें घ्यावें, व हुकूम मात्र आपला चालावा, असा ठराव केला होता. बाजीरावसाहेबांचें हें लष्कर, दिल्लीनजीक एके महालाची खंडणी ठरत होती, ह्मणून तेथें तळ देऊन राहिलें होतें. खंडणीच्या ठरावांत वैरणीकरितां, पेशव्यांच्या लष्करानें शेतांतील उभ्या पिकाची नासाडी करूं नये, असें करारांत ठरलें

१ न च वश्यो भवेदस्य नृपो यश्चातिवीर्यवान् । हीनश्च बलवीर्याभ्यां कर्षयंस्तत्परो भवेत्. ॥ राष्ट्रं च पीडयेत्तस्य शस्त्राग्निविषमूर्च्छनैः । अमात्यवल्लभानां च विवादांस्तस्य कारयेत्. शांतिपर्व.

असल्यामुळें, कोणीं उभ्या पिकाची नासाडी करूं नये, अशी बाजीरावांनीं लष्करांत सक्त ताकीद फिरविली होती. ह्या लष्करांत मल्हारराव होळकर स्वतःच्या दहावीस घोड्यांनिशीं सामील झाले होते. त्यांच्या थकलेल्या घोड्यांस वैरण मिळेना, ह्मणून त्यांनीं ताकिदीकडे विशेष लक्ष न देतां, शेतांतील ओला कडबा कापून आपल्या घोड्यांस घातला. या अगळिकीबद्दल कागाळी बाजीरावांकडे आली, तेव्हां बाजीराव स्वतः हातांत छडी घेऊन या गोष्टीच्या चौकशीस गेले, आणि पाहतात तों होळकरांच्या घोड्यांपुढें ओला कडबा आहे, असें त्यांच्या नजरेस आलें, तेव्हां त्यांनीं होळकरांच्या असामीपैकीं एका इसमास या बेकायदा वर्तनाबद्दल हातांतील छडीनें शिक्षा केली. त्यासमयीं मल्हारजी हे आपल्या राहुटीच्या तोंडाशीं चऱ्हाट वळीत बसले होते. त्यांनीं हा निकर पाहून बाजीराव साहेबांस ओरडून उत्तर केलें कीं, "आह्मांस काय रोजमुरा देऊन भागलास ह्मणून अशा काठ्या मारितोस, तुझ्या ताकिदीकरितां आह्मी आपलीं घोडीं उपाशीं मारून शिपाईगिरी कशी करावी?" असें ह्मणून रागानें त्यांस एक ढेंकूळही फेकून मारिलें. हें एकेरीचें व धीटपणाचें वर्तन बघून बाजीरावसाहेब त्यावेळीं निमुटपणें आपले गोटांत गेले, व त्यांनीं मल्हारजीस लुटून घेऊन

त्याचें पारिपत्य करावें, असा निश्चय केला, परंतु तो तोंडोतोंडीं होळकर यांच्या कानावर आला, तेव्हां त्यांनीं आपल्या मंडळीचा एक कट करून खोगेरें, दवासनें व डेरेदांड्या वगैरे आपला सर्व अजबाब जाळून, अंगास राख फांसली, व हातांत ढाल तरवारी घेऊन, जवळच एक टेकडी होती तिच्या आसऱ्यानें दहावीस असामी जिवावर उदार होऊन, मारूं किंवा मरूं या निश्चयानें फळी धरून उभे राहिले. पेशव्यांच्या लष्करांत एक, हजार-बाराशें धनगरांच्या जमातीचा सरदार होता, त्यानें मल्हार-रावाचा हिय्या बघून तोंडांत बोट घातलें, व तो लाग-लाच उठून बाजीरावांकडे गेला, आणि बहुत प्रकारें नि-षेध करून त्यांस ह्मणाला कीं, सरदारकी करूं पाहतां आणि शिपाई लोकांची बरदास्त अशा प्रकारची राखतां काय ? अशानें वेळ मांडवास कसे जातील ? मुशाफ-रींत निरुपायास्तव हुकुमास अंतर झालें होतें, तर खावं-दांनीं शेतवाल्याचें नुकसान भरून द्यावयास पाहिजे होतें. जो तुह्मांस ढेकूळ मारण्यास भ्याला नाहीं, तो तुमच्या वैऱ्याचें डोकें कापून आणण्यास भिईल काय ? तो तर आपल्या जिवावर उदार होऊन मरणास तयार झाला आहे, त्यास व त्याच्या दहावीस लोकांस मारून तुमचा पुरुषार्थ वाढतो असें नाहीं, पण जरकरितां आमच्या

जमावांतील मंडळी, जातीच्या अभिमानानें त्यास सामील झाली, तर वेळ कशी पडेल, या गोष्टीचा विचार खावंदांनीं ध्यानीं आणिला पाहिजे. ह्या पोक्त बुद्धिवादानें बाजीराव साहेबांच्या हृदयांत उजेड पडला, व त्यांनीं मल्हारजीची समजूत करून अजबाबीच्या तसनशीबद्दल, व जमात वाढविण्याकरितां, दहाबारा हजार रुपये देऊन तंटा मिटविला, व पुढील स्वारींत पांच हजार स्वारांची सरदारी सांगूं, असें वचन दिलें. वरील हकीकतीचा विचार करून पाहतां, बाजीराव साहेबांनीं आपणांकडे हार घेऊन दिलजमाई केली, ती बाजीराव साहेब शेंदाड-शिपाई होते ह्मणून नव्हे. त्यांची शिपाइगिरी सर्वविश्रुतच आहे. त्यांस मल्हारराव कितीही शूर असता, तरी त्याचें पारिपत्य करणें अशक्य होतें, असें नाहीं. यावरून इतकें मात्र निर्विवाद सिद्ध होते कीं, बाजीराव साहेबांच्या अंगीं मनाचा आंवर करणें, शांतपणें दुसऱ्याचा हितोपदेश ऐकून घेऊन तो मनास आणणें, व मनुष्याची तेजस्विता पाहून त्याची पारख करणें, इत्यादि गुण अप्रतिम होते.

राजकारणी पुरुषांची गोष्ट एकीकडे ठेविली, आणि इतर जनांविषयीं पाहिलें, तरी पूर्वकालीं जनसमुदायाच्या ठायीं माणसाची पारख करण्याचा गुण विशेष होता,

असें दिसून येतें. अर्वाचीन विद्वन्मण्डळांत ज्यांची प्रमुखत्वानें गणना होत असे, असे जे कृष्णशास्त्री चिपळुणकर, त्यांचे गुरु मोरशास्त्री साठे, हे लहानपणीं विद्या शिकण्याकरितां कोंकणांतून प्रथमतः पुणें मुक्कामीं आले, त्यावेळीं पुणें शहरांत चारसहा शास्त्रांचें कडकडीत अध्ययन केलेले बरेच विद्वान् होते. त्यांत नीलकंठशास्त्री थत्ते हे अग्रगण्य असल्यामुळें, मोरशास्त्री त्यांकडे गेले, आणि शास्त्रीबोवांस त्यांनीं आपला मनोदय कळविला, परंतु थत्ते यांनीं त्यासंबंधें कांहींएक उत्तर न देतां, साठे यांस भोजनास राहवून घेतलें. दोनप्रहरीं भोजनाचीं पानें मांडतांना माजघराच्या कोपऱ्यांत एक शिकें टांगलेलें होतें, त्या खालीं साठे यांचें पान मुद्दामच मांडविलें होतें, तेथें मोरशास्त्र्यांस भोजनास बसवून बसतांना वरतीं शिकें आहे ह्मणून सूचना केली होती, जेवतांना शिक्याचा विसर पडावा ह्मणून साठे यांस मुद्दामच कोंकणांतील हालहवाल विचारून बोलण्याच्या नादांत गुंतविलें होतें, परंतु भोजनोत्तर उठतांना शिक्याचें अवधान राखून साठे लवूनच उठले. हें पाहून थत्ते यांस आनंद झाला, व ह्या मुलास शिकविल्यास परिश्रमाचें चीज होईल, असें त्यांस वाटलें. पुढें थत्ते यांजपाशीं मोरशास्त्री यांनीं अध्ययन करून, ते पुणें शहरांत मोठ्या प्रख्यातीस आले.

वर सांगितलेल्या गोष्टींवरून मनुष्याच्या पारखी-विषयीं धोरण वाचकांच्या ध्यानीं आलेंच असेल, त्या-विषयीं कांहीं ठाम नियम सांगण्यासारिखा तो विषयच नव्हे. ती गोष्ट पारख करणाऱ्याच्या कुशाग्र बुद्धीवरच अवलंबून असणार, तथापि साधारण नियम ह्मटला ह्मणजे, कार्यकर्ता मनुष्य नीतिमान्, तेजस्वी, स्पष्टवक्ता, व धोरणी असतो. तो लांगूलचालनानें किंवा मुख-स्तुतीनें धन्याची मर्जी संपादावयास झटत नाहीं. त्याचें मर्जी संपादण्याचें मुख्य साधन ह्मटलें ह्मणजे सोंपविलेलें कार्य फत्ते करणें हेंच होय. तो कोणतेंही दुर्घट काम करितांना देखील मोठें अवडंबर घालीत नाहीं, सावधान राहून व मुकाट्यानें परिश्रम करून कार्यभाग पार पाडीत असतो. ज्यांच्या अंगीं कामाचा आटोप व कार्यकर्तृत्व नसतें, ते मोठी धामधूम उडवून मालकास आपण मोठ्या कळकळीचे आहोंत असें दाखविण्याचा यत्न करीत असतात, व आपल्या हाताखालील नोकर हलगर्जी आहेत, असें धन्यास भासवून कार्यहानीचें खापर बहुधा दुसऱ्याच्या माथ्यावर फोडण्यास तयार असतात. कर्ता पुरुष बहुधा दुसऱ्याच्या साह्यावर अवलंबून नसतो. त्याच्या दोन हातांत शेंकडों हातांचें कर्तृत्व असतें. तो हाताखालील मंडळी ही आपल्या दर्जास फक्त शोभाभूत

आहे, असें समजून सामर्थ्यानुरूप ते जें काम करितील तेवढ्यावर संतुष्ट राहून हाताखालील माणसांची बद्दी न करितां,उलटा गौरवच करीत असतो. मनुष्याचें कर्तृत्व कार्यसंपादनानंतर सर्वांच्याच दृष्टोत्पत्तीस येतें, पण कुशल पुरुषांस माणसाच्या वागणुकीची तऱ्हा, बोलण्याचालण्याची ढब, पाणीदार स्वभाव, उद्योग करण्याविषयीं उत्साह, व श्रमसहिष्णुता इत्यादि गुणांची झाक दिसल्याबरोबर ते त्याच्या कर्तृत्वाचें धोरण मनांत आणून त्यावर कामगिरी सोंपवितात, व ती त्यानें पार पाडिली ह्मणजे, त्याच्या गुणांप्रमाणें त्यास नांवारुपास चढवितात. हिऱ्यास सहाणेवर घासून पैलू पाडण्यापूर्वीं त्याचें तेज सामान्यजनांच्या नजरेस येत नाहीं, तें रत्नपारखीच ओळखूं जाणत. कितीएक लोक नोकरांची पारख करण्याकरितां त्यांच्या जाण्यायेण्याच्या मार्गावर एखादा दागिना टाकून तो, ते उचलितात कीं काय, हें त्यांस समजूं न देतां छपून पहात बसतात, पण असें करणें फारच वाईट होय. अशा करण्यानें आपण चांगल्या माणसास मुद्दाम मोहांत पाडण्याचा यत्न करितों, असें होतें.

धन्याच्या मनांतील आशय इंगितानें जाणून आज्ञा होण्यापूर्वींच कार्य करणारे, कामसू, अनुरक्त, प्रामाणिक, पायरीनें वागणारे, बहुमानानें मिळालेल्या अल्प

लाभास लाखाच्या ठिकाणीं गणणारे, आणि दुसऱ्या नोकरांची ईर्ष्या न करणारे, असे सेवक यत्नें करून संग्रहणीय समजावे. कोणतेंही काम नीट न करितां, घोटाळा करून ठेविणारे, कामाकडे दुर्लक्ष करणारे, खोटें बोलणारे, दृढ प्रेम न करणारे, पूर्वीं विरुद्ध असून पुनः लोभ संपादन करूं पाहणारे, आपल्यास नानाफडणवीस समजणारे, व व्यसनी अशा नोकरांस एक क्षणभरही पदरीं बाळगूं नये. ज्यांस पुष्कळ चाकरमाणसें ठेवणें जरूर असतें, त्यांस सर्वगुणसंपन्न नोकर सर्वच मिळतील असें नाहीं, यास्तव गुणबाहुल्य ध्यानीं आणून सामान्य न्यूनता असली, तर ती पतकरावी, आणि तीवर लक्ष ठेवावें.[1]

मुख्य कारभारी ठेवणें तो, आपल्या मुलखांतला,[2] कुलपरंपरेप्रमाणें वागणारा, मनाचा निर्मळ, सल्लामसलतींत कुशल, परपक्षास न मिळणारा, निर्व्यसनी, व्यवहाराचीं सर्व अंगें जाणणारा, कुलीन, विद्वान, व अर्थसंपादक

---

१ संक्लिष्टकर्माणमतिप्रमादं नित्यानृतं चादृढभक्तिकं च । विसृष्टरागं पटुमानिनं चाप्येतान्न सेवेत नराधमं च ॥ हितोपदेश.

२ स्वदेशजं कुलाचारे विशुद्धमथवा शुचिम् । मंत्रज्ञमव्यसनिनं व्यभिचारविवर्जितम् ॥ आधीतव्यवहारार्थं मौलं ख्यातं विपश्चितम् । अर्थस्योत्पादकं चैव विदध्यान्मंत्रिणं नृपः ॥ हितोपदेश.

असा असावा. जरा हात सैल सोडून हुशार असा मुख्य कारभारी ठेविला ह्मणजे, त्याच्या हाताखालीं दुसरीं जरा नरमगरम माणसें दिलीं, तरी धंद्याचा आटोप चांगला होतो, व अडाणी नोकरही त्याच्या तालिमेंत राहिल्यानें कामधंद्यांत वाकब होतात. नाटकांत ज्याप्रमाणें एकच व्यक्ति निरनिराळ्या वेळीं कधीं राजाची व कधीं हुजऱ्याची भूमिका घेऊन रंगभूमीवर आलेली दृष्टीस पडते, त्याप्रमाणें सांप्रतकाळीं बहुतेक श्रीमान् गृहस्थांच्या घरीं एकच व्यक्ति, पुढें रुमाल सोडून बसली असतां दिवाणजी, पूजेची वेळ झाली कीं भटजी, यजमान खेड्यापाड्यावर जाऊं लागले कीं बबरजी, दिवाबत्तीची वेळ झाली कीं मशालजी, व यजमानांची गाण्याची लहर लागली कीं तबलजी, अशा नानाविध रूपांनीं दृष्टीं पडते. अशा रीतीनें यजमानांचें मनोधारण करणारे अल्पमोली दिवाणजी कितपत कार्यकर्ते असणार ह्याचा विचार सुज्ञांनींच करावा.

हल्लीं लोकांत गुणग्राहकता राहिली नाहीं, इतकेंच नाहीं. उलटी त्यांस दुर्गुणांस सद्गुण मानण्याची वाईट खोड लागली आहे. हां जी हां जी, होय बा होय बा, करणारास विनयशील, खरें व सडसडीत भाषण करणारास उर्मट, जल्पना केल्याशिवाय मुकाट्यानें कार्य-

भाग करणारास मुखदुर्बळ, व बढाया मारून खोटीं आश्वासनें देणारास कार्यधुरंधर मानण्याची सांप्रत रीतच पडून गेली आहे, यामुळें घाणेरड्या माणसाची बडेजाव व चांगल्या माणसाचें मातेरें होतें, हें कोणी ध्यानीं घेत नाहीं. शेंकडों मूर्खांच्या ऐवजीं एकच शाहणा व हुशार माणूस पदरीं बाळगणें चांगलें, तो संकटकालीं जसा उपयोगीं पडतो, तसे मूर्खसेवक उपयोगीं पडत नाहींत. लुच्चे, चोर, द्वेष करणारे, व मूढ अशीं माणसें नोकरीवर कधींही ठेवूं नयेत. नोकर ठेवावयाचे त्यांची संख्या, आपणास कोणतीं कामें करावीं लागणार, ह्या गोष्टीचा विचार करून प्रथमतः ठरवावी, आणि आपल्या आयाप्रमाणें त्यांचें वेतन मुकरर करावें, व तें त्यांजवर सोंपविलेल्या कामगिरीच्या अनुरूप असावें. कोणी अडलेला पाहून त्यापासून बहुमोलाचें काम घेऊन वेतन थोडें द्यावें, हा न्याय नव्हे. बहुमोलाचें काम घेऊन वेतन थोडें

---

१. कच्चित्सहस्रैर्मूर्खाणामेकं क्रीणासि पण्डितम् । पण्डितो ह्यर्थकृच्छ्रेषु कुर्यान्निःश्रेयसं परम्. ॥ ३६ सभा० अ० ५.

२ कच्चिन्न लुब्धाश्चौरा वा वैरिणो वा विशांपते ! । अप्राप्तव्यवहारा वा तव कर्मस्वनुष्ठिताः ? ॥ ७८ सभापर्व, अ० ५.

३ कृत्यानि पूर्वं परिसंख्याय सर्वाण्यायव्यये चानुरूपा च वृत्तिम् संगृण्हीयादनुरूपान्सहायान् सहायसाध्यानि हि दुष्कराणि. ॥ २४ उद्योग, अ० ३७.

दिलें असतां, नोकर लबाडया करूं लागतात, व जें वेतन किंवा पोटगी द्यावयाची ती वेळच्यावेळीं[1] द्यावी. वेतन देण्यास उशीर लावल्यास हलक्या पगाराच्या नोकरांची फार अडचण होते, व त्यापासून प्रसंगीं एखादा अनर्थही[2] होण्याचा संभव असतो, हें पक्कें ध्यानीं बाळगावें. इतर आश्रितांचीही वृत्ति लोभानें[3], मोहानें, थट्टेनें अगर लुच्चे लोकांनीं सांगितलेल्या चहाडया ऐकून बंद करूं नये.

नोकरांस कामें सांगावयाचीं तीं, ज्याचा त्याचा दर्जा पाहून सांगावीं[4], मोठ्या नोकरास हलकें काम, व हलक्या नोकरास मोठें काम, कधींही सांगूं नये. हुकूम करावयाचे ते, धनीपणाचा तोरा दाखवून, किंवा वाजवीपेक्षां फाजील आर्जवानें न करितां, गोड शब्दानें व आपला रुआब राखून करीत जावें. कामकाज चांगलें

---

१ कच्चिद्बलस्य भक्तं च वेतनं च यथोचितम् ।
संप्राप्तकाले दातव्यं ददासि न विकर्षसि ? ॥ ५० ॥
२ कालातिक्रमणादेते भक्तवेतनयोर्भृताः । भर्तुः
कुर्वन्ति दौर्गत्यात्सोनर्थः सुमहान्स्मृतः ॥ ५१ ॥
} सभापर्व. अ० ५

३ कच्चिन्न लोभान्मोहाद्वा विश्रंभात्प्रणयेन वा । आश्रितानां मनुष्याणां वृत्तिं त्वं संरुणत्सि वै. ॥ ९५ ॥ सभापर्व, अ० ५.

४ कच्चिन्मुख्या महत्स्वेव मध्यमेषु च मध्यमाः । जघन्याश्च जघन्येषु भृत्याः कर्मसु योजिताः ॥ ४४ ॥ सभापर्व, अ० ५.

बजाविल्यास संतोष, व बिघडल्यास नाराजी दाखवावी, परंतु दुर्भाषण बोलूं नये. महत्वाचें काम उत्तम रीतीनें पार पाडल्यास नोकराची सेवा अगदीं विफल करूं नये. थोडेंसें बक्षिस द्यावें, निदान गोड शब्दांनीं नावाजणूक तरी करावी.[1]

मोठ्या कार्यकर्त्या माणसाच्या हातून प्रसंगीं कार्य बिघडलें तरी, त्याच्या मागील नोकरीवर लक्ष देऊन सबूरी करावी, तथापि हयगय आपल्या ध्यानीं आली आहे, असें त्यास भासविल्यावांचून राहूं नये. तेजस्वी माणसाच्या हातून प्रमाद घडल्यास तो आपल्या आपणच मेल्यापेक्षां मेला होतो, मग पुनः शब्दानें त्याचें मृतमारण करण्यांत तात्पर्य काय? असल्या पाणीदार माणसास अल्प दूषणही सहन होत नाहीं. तो निला- जरें तोंड धन्यास न दाखवितां प्रसंगीं मरूनही जातो. याविषयीं एक ऐतिहासिक गोष्ट ध्यानीं ठेवण्यासा- रखी आहे.[2]

शिवाजी महाराजांच्या पदरीं मोरोपंत पेशवे व प्रता-

---

१ कृतकृत्यस्य भृत्यस्य कृतं नैव प्रणाशयेत् । फलेन मनसा वाचा दृष्ट्या चैनं प्रहर्षयेत्. ॥ हितोपदेश.

२ काव्येतिहाससंग्रहांतील चित्रगुप्तविरचित शिवाजी महाराजांची बखर. पान ८९ ते ९२ पहा.

पराव गुजर हे मोठ्या नावलौकिकाचे सरदार होते. त्यांस मोंगलांकडील सरदार दिलेलखान व एखलासखान यांस मारून धुळीस मिळविण्याविषयीं महाराजांची आज्ञा झाली होती. त्याप्रमाणें सालेरी किल्ल्याजवळ दिलेलखान व एखलासखान असतां, कोंकणांतून पेशवे, व घाटावरून प्रतापराव, यांनीं चालून येऊन घोरतर युद्ध केलें. ही लढाई भारती युद्धाप्रमाणें मोठ्या निकराची झाली. तींत पेशवे व प्रतापराव यांच्या लोकोत्तर पराक्रमामुळें महाराजांस जय प्राप्त झाला, व मोंगलांचे सरदार पराभव पावले. त्यासमयीं महाराजांनीं पेशवे व गुजर यांस गौरव करून पत्र लिहिलें तें विचार करण्यासारखें आहे. यास्तव त्या पत्राचा येथें संक्षिप्त उतारा देतों.

" राजश्री मोरोपंत पेशवे व प्रतापराव सर नौबत यांस आज्ञा केली ऐशीजे:— तुह्मी विनंतीपत्र हुजूर पाठविलें, तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण झाला. तुह्मी महत्कार्यकर्ते धुरीण, केवळ महाराजांचे पंचप्राण, दुसरा अर्थ तुमचे ठायीं अणुमात्र नाहीं. तुह्मी यासमयीं जिवाची आस न धरितां एखलासखान नबाब व दिलेलखान हप्तहजारी हे पादशाही उमराव, कांहीं सामान्य नव्हत, केवळ पादशहाचे भात्यांतील तीक्ष्ण तीर, असें असतां, त्या यवनांचा तुह्मी पराभव करून सेवकपणाची कीर्ति

दिगंतास पसरली. सेवक असावे तर असे असावे. धन्य तुमची. यासमयीं तुह्मांस उत्तीर्ण काय व्हावें ! महाराजांची आपणावर दया हाच अर्थ विशेष. येणें-करून उत्तरोत्तर विजयतेस पावाल, हाच अर्थ स्वामींनीं मनांत आणून प्रसादवस्त्रें खासा महाराजांचा मंदील, चादरा, पटके, झगे, सुरवारा, व अलंकार कलगी, मोतियांचे तुरे, शिरपेंच, कर्णमात्रा, रत्नजडित पदकें, कडीं, हस्तमात्रा, व घोडा एक, व हत्ती एक, मोरोपंत पेशवे व प्रतापराव सरनौबत यांस व लहान थोर सर्व सेवकांस गौरव करून महाराजांनीं पाठविला असे. आणि आज्ञा केली जाते जे,—अविंधांचे मातबर उमराव, वजीर व इतर लोक जे जखमी व पाडाव झाले असतील त्यांस वस्त्रें व घोडीं देऊन सोडून देणें. ”

वरील उताऱ्यावरून गुणग्राहक यजमान कार्यकर्त्या सेवकांचा गौरव करून त्यांस खुषदिल कसे ठेवितात, हें ध्यानीं घेण्यासारखें आहे. पुढें कांहीं कालानें वर नांवाजलेल्या प्रतापराव गुजरास विजापूरकरांकडील सरदार बाहलोलखान, हा महाराजांच्या मुलुखावर स्वारी करून येत असतां, त्यास मारून फत्ते करण्याविषयीं महाराजांनीं आज्ञा केली होती. त्याप्रमाणें प्रतापराव यांनीं खानास गांठून चौतर्फा फौजेच्या वेढ्यांत कोंडिलें, व त्यास अन्नपाणी

मिळूं दिलें नाहीं, यामुळें खान अगदीं जेर होऊन प्रतापरावांस शरण आला, व कुराणावर हात ठेऊन, " इतःपर मी महाराजांचा आहें, त्यांच्या वचनाबाहेर वागणार नाहीं. " अशी त्यानें शपथ केली, यास्तव प्रतापराव यांनीं त्यास माघारें जाऊं दिलें. हें वर्तमान महाराजांस कळल्यावर त्यांनीं " सख्य कोणाच्या हुकुमानें केलें. " असें प्रतापराव यांस विचारून किंचित् रोष केला, तो ह्या तेजस्वी पुरुषास सहन झाला नाहीं. तेजस्वी पुरुष हजारों विपत्ति सहन करितो, पण त्यास अपमानाचा एक शब्दही सहन होत नाहीं. " **॥ सहते शतशरपातानश्वश्चैकांकशां न वा सहते । सहते विपत्सहस्त्रं अवमानं न सहते मानी ॥** " असें ह्मटलें आहे, तें खरें आहे. जातिवंत घोडा रणांगणांत शेंकडों तीक्ष्ण बाणांच्या जखमा सहन करितो, परंतु चाबकाच्या एका फटक्यानें त्याच्या अंगाचा तिळपापड होतो. महाराजांनीं दिलेला टपका प्रतापरावांच्या जिव्हारीं लागला होता, यामुळें त्यांनीं पुढें एके प्रसंगीं बाहलोलखान यास पन्हाळे प्रांतीं गांठून त्यावर ते एकदम तुटून पडले, व त्या लढाईंत तरवारीचा वार लागून सरकारकामीं आले अशा रीतीनें हा थोर पुरुष धारातीर्थीं पतन पावल्यामुळें, महाराजांस आपली एक बाजू

अधू झाली असें वाटलें. यासाठीं थोरांच्या हातून प्रसंगीं जरा गैर झालें तरी जहाल जाऊन त्यांस दुखवूं नये. घडलेल्या चुकीनें कष्टी झालेल्या त्यांच्या मनास उमेद देऊन प्रोत्साहनच करावें.

असो, घरंदाज व श्रीमान् लोकांनीं वर सांगितलेले विचार मनीं बाळगून पारखलेलीं माणसें पदरीं बाळगावीं. नोकरांस फरमाविलेलीं कामें त्यांनीं कोणच्या रीतीनें केलीं, हें जेव्हांचे तेव्हां पहावें, दिनावधीवर टाकूं नये, व ह्या देखरेखीच्या कामाची निरवानिरव दुसऱ्यावर कधींही करूं नये. हें काम धन्यानें जातीनें करावयाचें आहे. कर्तव्यकर्म ह्मणून, जें कृत्य आपणासच केलें पाहिजे, तें जो दुसऱ्यावर सोंपवितो, व तत्काल करावयाजोगें काम दिनावधीवर टाकितो, तो मनुष्य महामूढ समजावा. देखरेख आपण वेळच्यावेळीं जातीनें केली ह्मणजे, नोकरांस दहशत राहते, व ते आपापलीं कामें जेव्हांचे तेव्हां लक्षपूर्वक करितात. नोकर कामसू व इमानी, धन्यानें आपल्या दक्षतेनें केले पाहिजेत. स्वभावतः कामसू व

---

१ काव्येतिहाससंग्रहांत छापलेली चित्रगुप्तविरचित शिवाजी महाराजांची बखर. पान ९४ पहा.

२ संसारयति कृत्यानि सर्वत्र विचिकित्सते । चिरं करोति क्षिप्रार्थे स मूढो भरतर्षभ. ॥ ३९ उद्योग, अ० ३३.

इमानी माणसें फारशीं सांपडत नाहींत. व थोडींबहुत सांपडलीं तरी धन्याच्या हलगरजीपणामुळें तीं आळशी व लबाड होतात.

निरनिराळ्या प्रकारचीं कामें प्रत्येक मनुष्य न गमतां करील तर, सात तासामध्यें किती काम होत असतें, याची सरासरीच्या मानानें अटकळ बांधून ठेवावी, व त्या धोरणावर मजूर वगैरे लोकांकडून दिवसाचें काम झालें आहे, कीं नाहीं, तें पहावें. कामाचा अंदाज असल्याशिवाय काम कमी केलें ह्मणून उगाच कोणाशीं किरकीर करूं नये. काम पुरापूर झालें असून अनमानधपक्यानें टपका दिल्यास नोकरलोक, मालकास कळत नाहीं, असें समजून जास्तीच ढिलाई करितात, व टपक्याची क्षीत बाळगीत नाहींत. याकरितां वरील तत्व नेहमीं मनांत बाळगून प्रत्येक कामाची पक्की अटकळ बांधून ठेवणें, हें फार आगत्याचें आहे.

कामास लागणारें हत्यारपात्यार व सामानसुमान, कामास आरंभ करण्यापूर्वींच भरपूर व चोख जमा करून ठेवावें, तसें न केलें तर सबबी सांगून नोकरांस टंगळमंगळ करण्यास फावतें, व आपणास त्यांच्या पदरीं हयगय घालण्यास जागा रहात नाहीं.

अशा रीतीनें आठपासून साडेदहा वाजेपर्यंत कामाची

देखरेख झाल्यावर घरीं येऊन लागलेच हातपाय धुवावे. व साडेदहापासून अकरा वाजेपर्यंत नैवेद्यवैश्वदेवादि कर्मे आटोपून किंचित् आल्यागेल्याची वाट पहावी. व कोणी पांथस्थ अगर खरा अन्नार्थी, असा अतिथि-अभ्यागत आल्यास, त्यास पंक्तीस घेऊन भोजन करावें. परान्नपुष्ट भोजनभाऊ ब्राह्मणास जेवूं घालूं नये, व आळशी करूं नये. श्वानांप्रमाणें परान्नावर उपजीविका करण्याची जो इच्छा करतो, तो अधम ब्राह्मण समजावा. अशा पापी मनुष्याच्या परान्नभोजनाला धिःकार असो. आपल्या घरीं स्वकष्टानें मिळविलेली कोंड्याची भाकर व भाजीपाला खाऊन निर्वाह करणें श्रेयस्कर आहे. परंतु अपमान सोसून नेहमीं दुसऱ्याच्या घरीं जेवणाराला चांगलें पक्वान्नही श्रेयस्कर होत नाहीं, यास्तव अशा लोकांस जेवूं घालण्याबद्दल सज्ज-

---

१ अध्वनि क्षीणगात्रश्च पथि पांसुसमन्वितः । पृच्छते ह्यन्नदातारं गृहमायाति चाशया ॥ तं पूजयाय यत्नेन सोतिथिर्ब्राह्मणश्च सः ॥ ६१।६२ वनपर्व, अ० २००.

२ श्ववत्कीलालपो यस्तु परान्नं भोक्तुमिच्छति । धिगस्तु, तस्य तद्भुक्तं कृपणस्य दुरात्मनः ॥ २९

अर्जितं स्वेन वीर्येण नाप्यपाश्रित्य कंचन । फलशाकमपि श्रेयो भोक्तुं ह्यकृपणं गृहे ॥ ३०

परस्यतु गृहे भोक्तुः परिभूतस्य नित्यशः । सुमृष्टमपि न श्रेयो विकल्पोयमतः सताम्. ॥ ३१ वनपर्व, अ० १९३.

नांचा विकल्पच आहे. निराश्रित, वृद्ध, पंगु, आणि पांथस्थ ह्यांस गृहस्थाच्या घरीं अन्न मिळणें योग्यच आहे. अन्नदानासारखें तृप्तिदायक दुसरें दान नाहीं, व शुचिर्भूत ब्राह्मणासारखें दुसरें सत्पात्र नाहीं, हें खरें आहे. मागें जो निषेध सांगितला आहे, तो केवळ आळशी, उदरंभर, व गलेलठ्ठ ब्राह्मणांविषयीं मात्र समजावा. सांप्रत, कांहींएक उद्योग न करितां, खांद्यास झोळी अडकावून उच्चस्वरावर " **वेदपुरुषायनमः** " ह्मणून आरोळी ठोकणारे, भिक्षा हा बिनभांडवली किफायतीचा धंदा आहे, असें समजणारे, भिक्षेचें धान्य विकून त्यावर भांगतंबाखू फुंकीत बसणारे, व माध्यान्हकाळीं, " भोजनाची सोय होईल काय ? " ह्मणून अगदीं वेळेवर दत्त ह्मणून उभे राहणारे ब्राह्मण जागोजागीं दृष्टीं पडतात, अशा लोकांच्या आळसास उत्तेजन देणें, हा धर्म नव्हे. पंगूंस, विद्यार्जन करणारांस, विरक्त होऊन ईश्वरभजनीं लागलेल्यांस, मोठ्या कुटुंबाचें आपल्या एकट्याच्या उद्योगावर पोट भरत नसल्यामुळें, केवळ आवश्यकतेपुरतीच याचना करणारांस यथाशक्ति साह्य करणें, हें प्रत्येक गृहस्थाचें अनुल्लंघनीय कर्तव्यच आहे, पण आळसास व दांभिक वर्तनास उत्तेजन देणें, हें व्यवहारदृष्ट्या व धर्मशास्त्रदृष्ट्या

गर्हणीयच समजलें जातें. निरुद्योगी, अव्रती, व अविद्वान् ब्राह्मणास ज्या गांवांत भिक्षा मिळते, तो गांव राजशासनास पात्र आहे, अशी धर्मशास्त्राची स्पष्ट आज्ञा आहे. असें असतांही, अशा ब्रह्मबंधूंस देखील विन्मुख न दवडण्याची जी जनरूढि आहे, ती अनुकरणीय नव्हे. सत्पात्र व विपद्ग्रस्त ब्राह्मणास दान करणें, तें संतोषानें व मधुर भाषणपूर्वक करावें. दानधर्म करणाराची कीर्ति त्यानें इच्छा न ठेविली तरी जर आपोआप होते, तर कीर्तीच्या इच्छेनें दान करण्यांत मतलब काय ? पंक्तीस घेतलेल्या ब्राह्मणास एका प्रकारचें अन्न व आपणास एका प्रकारचें अन्न, अशी प्रतारणा कधींही करूं नये. पुष्कळ श्रीमान् लोकांच्या घरीं यजमानास साजूक तूप व आंबेमोहोराचा भात, आणि ब्राह्मणास वाशेळें तूप व जाडद्या तांदुळांचा भात, असा पंक्तिप्रपंच दृष्टीं पडतो. अशा वागणुकीनें अतिथीचा अपमान केल्यासारखें होऊन आपला हलकटपणा जगजाहीर होतो, व केलेलें अन्नदान निष्फल होतें.

असो, अकरा वाजल्याबरोबर जेवावयास बसावें.

---

१ अव्रता ह्यनधीयाना यत्र भैक्ष्यचरा द्विजाः । तं ग्रामं दण्डयेद्राजा चौरभक्तप्रदो हि सः ॥ दानहेमाद्रिः

२ ब्रह्मबंधु शब्दाचा अर्थ अधम ब्राह्मण असा आहे.

जेवणाचा बेत ऐपतीप्रमाणें उत्तम किंवा साधा, कसाही असो, पण पाकनिष्पत्ति स्वच्छतेनें व काळजीनें केलेली असावी. कोंड्याचा मांडा करून खावा. पण सुग्रास अन्नाचें कदन्न करून खाऊं नये. भोजनप्रसंगीं कोणासही फाजील आग्रह करूं नये. आमच्या लोकांत ही आग्रहाची चाल फार वाईट पडलेली आहे. जेवतांना कोणासही सिद्ध असलेला पदार्थ मागण्याची जरूर पडणार नाहीं, अशा बेतानें वाढण्याची तजवीज असली, ह्मणजे झालें. भोजन शांतवृत्तीनें करावें, त्यासमयीं क्षोभास येऊं नये. एखादा पदार्थ बिघडला असल्यास स्वयंपाकिणीस पुढें सावध राहण्याचा इशारा मिळण्यापुरतेंच, " भाजी किंचित् खारट किंवा अळणी झाली आहे " असें सौम्य शब्दांनीं सुचवावें, परंतु अन्नाची निंदा किंवा वाच्यता करीत बसूं नये.

जेवतांना दोन घासांनीं कमी जेवावें. अत्यशन व अतिपान हें श्रुतीनें प्रायश्चित्तार्ह गणलें आहे. आरोग्य, दीर्घायुष्य, बल, सुख, शुद्धसंतति, व लोकांनीं खादाड ह्मणून नांव न ठेवणें, असे मितभोजनाचे सहा गुण सांगितले

---

१ गुणाश्चषण्मितभुक्तं भजंते आरोग्यमायुश्च बलं सुखं च ।
अनाविलं चास्य भवत्यपत्यं न चैनमाद्यून इति क्षिपन्ति ॥ ३४ ॥
उद्योगपर्व, अ० ३७.

आहेत. खादाड मनुष्य आपल्या घरीं बाळगूं देखील नये, याउपर आपण स्वतः खादाड असूं नये, हें सांगणें कशास पाहिजे. सर्व उद्योगधंदा माध्यान्हकाल साजरा व्हावा ह्मणूनच करावयाचा, यासाठीं जेवणाखाणांत गैरवाजवी बारकाई अगर काटकसर करूं नये. खंडी पाठीमागें रुपया दोन रुपये, भाव जास्त येतो ह्मणून चांगलें भात विकून भिजकें, रातड, व हलकें भात खाण्यास ठेवण्याची वहिवाट बऱ्याच लोकांच्या घरीं असते, अशा करण्यानें लाभ थोडा, व अडचण फार होते, हें ते लोक ध्यानीं आणीत नाहींत. भोजन हें पराक्रम, बल, तेज, कांति, व बुद्धि वाढविणारें आहे, याकरितां सामर्थ्यानुरूप तें जितकें सुग्रास करवेल तितकें करण्यास काटकसर करूं नये, पण रोज दिवाळी करणेंही चांगलें नाहीं, हें ध्यानांत ठेवावें.

शरीरपोषणास मांसवर्धक सत्वांश, (ज्यास इंग्रजींत आल्ब्युमेन ह्मणतात तो), स्निग्धांश, क्षारांश, शर्करांश, व जलांश हे पदार्थ अत्यावश्यक असतात, व ह्यांपैकीं

---

१ अकर्मशीलं च महाशनं च लोकद्विष्टं बहुमायं नृशंसम् । अदेशकालज्ञमनिष्टवेषमेतान्गृहे न प्रतिवासयेत ॥३५॥ उद्योगपर्व,अ.३७.

अनारोग्यमनायुष्यमस्वर्ग्यं चाति भोजनम् । अपुण्यं लोकविद्विष्टं तस्मात्तत्परिवर्जयेत् ॥ ५७ ॥ मनु, अ० २.

कांहीं, किंवा सर्व आवश्यक पदार्थ, खाण्याच्या सर्व जिनसांत थोड्या फार मानानें असतातच, पण त्यांचें यथायोग्य प्रमाण दुधाशिवाय इतर पदार्थांत असत नाहीं, या करितांच भोजनांत नानाविध पदार्थांची आवश्यकता असते. दुधाशिवाय दुसरा कोणताही एकच पदार्थ खाल्ला तर मनुष्याचा निर्वाह चांगल्या रीतीनें होणार नाहीं. एकट्या दुधानें मात्र कांहींसा होईल, यास्तव, गोरसाचा अंश भोजनांत जितका अनुकूल असेल तितका चांगलाच. भाज्यापाले यांच्या योगानें अन्नास रुचि येऊन पचनक्रियाही चांगली घडते, यास्तव हे सर्व विचार मनांत आणून अन्नसामुग्रीची व्यवस्था ठेवावी.

भोजन आटोपल्यावर बैठकीच्या जाग्यावर बसून, सर्वांस तांबूल द्यावा, व आपणही ग्रहण करावा. आपल्या देशांत तांबूलाची योजना केवळ मुखवासार्थच नाहीं. त्याच्या योगानें दुसऱ्याचा सन्मान व आदर केला जातो, व मजलस बरखास्त झाल्याचा इशाराही तोच आहे. पानसुपारी होऊन कचेरी बरखास्त झाली ह्मणजे, एकांतस्थलीं किंचित् पाव अर्धातास वामकुक्षी करावी, परंतु झोंप घेऊं नये.

तदनंतर मुखमार्जन करून भागवतरामायणादि ग्रंथ

चित्त देऊन वाचीत बसावें. ह्या उपयुक्त व रमणीय ग्रंथांचीं सांप्रत मराठी भाषांतरें झालीं आहेत, तीं लक्षपूर्वक मुळाशीं ताडून वाचण्याचा परिपाठ ठेविला ह्मणजे पुष्कळ संस्कृत शब्दांशीं परिचय होऊन, साधारणतः कोणत्याही संस्कृत श्लोकाचा भावार्थ समजण्याची अटकळ येते; आणि लोकव्यवहार, मनुष्यस्वभाव, व नीतितत्वें कळावयास लागून मन प्रगल्भ होतें, व याशिवाय परमार्थही जोडतो. तसेंच आपणास जर जगांत रहावयाचें आहे, तर जगांतील उलाढाली समजून घेण्याची आपणास आवश्यकता आहेच आहे. यास्तव वर्तमानपत्रांच्या द्वारें स्वदेशांत व परदेशांत काय उलाढाली चालल्या आहेत, हें समजून घेत असावें.

सांप्रत वर्तमानपत्रें वाचण्यास आतुर असलेले लोक खेड्यापाड्यांतूनसुद्धां पुष्कळ आढळतात खरे, परंतु त्यांपैकीं पुष्कळ लोकांस लेखांतील ग्राह्याग्राह्य काय आहे, हें ओळखण्याचें तारतम्य बिलकुल नसतें. मुंबईंतील कांहीं हलक्या लोकांची हजामतीच्या वेळीं तोंडापुढें वर्तमानपत्र धरून न्हाव्यास ऐट दाखविण्याची जशी वहिवाट आहे, त्याच मासल्याचा हा मागें सांगितलेला प्रकार आहे. बोअर किंवा जपानी लोकांचा जय, व इंग्रज किंवा रशियन लोकांचा पराजय, झालेला वाचून

टि-या पिटाऱ्या, व उलट प्रकार वाचण्यांत आला कीं, तोंड आंबट करावें, एवढेंच कार्यतें. पण बोअर किंवा जपानी लोकांचें सामर्थ्य आपणास प्राप्त होण्यास आपण काय केलें पाहिजे, हा विचार एकाच्याही मनांत येत नाहीं. जो जपान देश, साठ पाउणशें वर्षांपूर्वी बहुतेक अज्ञानांधःकारांत बुडालेला होता, जेथील लोकांचीं शस्त्रास्त्रें ह्मटलीं ह्मणजे तीरकामटे, तोच देश इतक्या थोड्या अवधींत अर्वाचीन पाश्चात्य युद्धकलेंत अत्यंत प्रवीण होऊन, एका बलिष्ठ पाश्चात्य राष्ट्राशीं टक्कर मारतो, आणि आह्मी फार प्राचीन कालापासून शस्त्रास्त्रविद्येंत प्रवीण असतां, जवळ जवळ तेवढ्याच अवधींत अगदीं दुर्बळ बनतों, ह्याचें कारण काय, हें कोणी ध्यानीं आणितो आहे काय ? जपानी लोकांचा स्वार्थत्याग, उद्योग, विद्याव्यासंग, व दृढनिश्चय ह्या गोष्टींचा कित्ता आह्मी गिरविला, तर आमच्या देशाचें दैन्य कशास राहील ? शिळोप्याच्या वेळीं चव्हाट्यावर बसून चार गप्पा मारतां याव्या, व साहेब लोकांचें माकडा सारखें अनुकरण करावें, एवढ्या करितांच वर्तमानपत्रें वाचावयाचीं असतील, तर त्यांत कांहीं फायदा नाहीं. लेखांतील गूढ तात्पर्य समजून न घेतां, नुसत्या पोपटपंची शब्दचर्चेंत प्रावीण्य संपादन केलें तर फायदा काय !

एक मठ्ठ विद्यार्थी गुरूजवळ व्याकरणशास्त्राचें अध्ययन करून घरीं परत जात असतां, एके गांवीं, गांवाबाहेर शंकराचें देवालय होतें, तेथें संध्याकाळीं वस्तीस उतरला. तिनसांजां देवदर्शनास गेलेल्या लोकांनीं त्यास येथें रात्रीं वाघ येत असतो, ह्मणून येथें उतरूं नये, गांवांत कोणाच्यातरी घरीं उतरावें, असें सांगितलें, परंतु हा गृहस्थ पडला व्याकरण शिकलेला, त्यानें मनांत विचार केला कीं, गुरुजींनीं आपणास व्याघ्र शब्दाची व्युत्पत्ति, " **विशेषेण आघ्रायते स व्याघ्रः** " अशी सांगितली आहे, त्या अर्थीं वाघ आलाच तर, तो हुंगील आणि जाईल, त्यांत आपलें काय बिघडणार आहे ! असें ह्मणून त्यानें कांहींएक विचार न करितां, तेथेंच तळ दिला. गांवकऱ्यांनीं सांगितल्याप्रमाणें रात्रीं वाघ येऊन त्यानें शास्त्रीबोवांचा चट्टामट्टा केला.

अशा प्रकारचें अध्ययन किंवा वर्तमानपत्रांचें वाचन निरर्थक होय. वाचलेलें नीट समजून घेऊन त्याप्रमाणें वागण्याचा दृढनिश्चय केला पाहिजे. आचरणाशिवाय नुसतें पांडित्य काय उपयोग ? " क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे. " असें रामदासस्वामींनीं ह्मटलें आहे, तें उगाच नाहीं. काव्यें, नाटकें, व्याकरण, इतिहास, पदार्थविज्ञान, व गणित इत्यादि प्रकारचाही

ग्रंथसंग्रह जवळ बाळगून, ते ग्रंथ मननपूर्वक वाचल्यानें चित्ताचें रंजन होतें व बुद्धीस ग्राहकताही येते.

जमीनजुमला ज्यांच्या पदरीं आहे, त्यांस जमीनीची मोजणी करितां येऊन तिचे नकाशे काढितां येणें, व काढलेले समजणें, फारच आवश्यक आहे, तथापि त्याविषयीं माहिती करून न घेतां क्षुल्लक गोष्टीसाठीं तलाठ्यासारख्या सामान्य कामगाराचें देखील आर्जव करीत बसणें लोकांस आवडतें, हें आश्चर्य नव्हे काय ? एकाग्रचित्तानें रोज तास दोन तास नानाविध विषयांचें परिशीलन करीत गेलें असतां, मनुष्य कालांतरानें बहुश्रुत व व्यवहारज्ञ होतो. यास्तव कांहीं तरी अध्ययन केल्याशिवाय दिवस फुकट घालवूं नये.

अशा रीतीनें भोजनोत्तर कालक्रमणा केल्यानंतर अडीच वाजण्याच्या सुमारास सभ्यरीतीचा पोषाख करून कचेरीस येऊन बसावें. कसातरी नितंबप्रदेश झांकला जाईल असा बुधवारी पंचा नेसून काटकसरीपणा व साधेपणा दर्शविण्याचें वेड पुष्कळ खात्यापित्या लोकांच्या डोक्यांत शिरलेलें असतें, व ह्यांतच ते संसारदक्षता मानतात. परंतु अन्नाच्छादनावरून मनुष्याच्या कुलीनतेची पारख होत असते, हें त्यांस कळत नाहीं. यास्तव

१ परिच्छदेन क्षेत्रेण वेश्मना परिचर्यया । परीक्षेत कुलं राजन्भोजनाच्छादनेन च ॥ ४४ ॥ उद्योगपर्व, अ० ३९.

कुलीन व घरंदाज लोकांनीं हीन वेषानें दुसऱ्याच्या दृष्टीस पडूं नये हें चांगलें.

कचेरीच्या जाग्यांत दप्तरचें काम चालतें, व्यवहाराची घडामोड होते, व थोर लोकांची मुलाखतही घेतली जाते, या करितां ती जागा घराच्या पुरोभागीं असून जरा शोभिवंत केलेली असावी, व तेथें बैठक घालून तीवर तक्ये, लोडें, ठेविलेलीं असावीं. कचेरीच्या मध्यभागीं आपलें बसण्याचें आसन असून बाजूस शिष्ट व थोर लोकांस बसण्याची जागा असावी, आपल्या डाव्या बाजूस किंचित् तफावतीनें कारकून वगैरे लोकांच्या दप्तरची जागा करावी. सवड असेल तर कचेरीच्या जाग्यापासून थोड्या अंतरावर आपणांस एकटें बसण्याकरितां एक स्वतंत्र खोलीची योजना केल्यास फार चांगलें.

कचेरींत आल्याबरोबर व्यवहार संबंधीं जी कांहीं चौकशी करणें असेल ती करून, कारकून वगैरे नोकरांस जे हुकूम फर्मावयाचे ते स्पष्ट समजूत होण्यासारखे, ज्याचा त्याचा दर्जा पाहून, मधुरवाणीनें व प्रसन्नमुद्रेनें फर्मावावे. टपका देणें झाल्यास सर्वांदेखत अपमान होईल असा न देतां, बहुधा एकीकडे कानउघाडणी करावी. कुळेंडाळें आलीं असल्यास, त्यांच्या

तडजोडी कराव्या, व लागलेंच किरकोळ काम कारकुनावर सोंपवून आपल्या एकटें बसण्याच्या खोलींत जावें. असें केल्यानें नोकर लोकांस फार वेळ अदब संभाळून बसावें लागत नाहीं, व कामकाज आटोपण्यास निर्वेध वेळ सांपडतो, आणि ह्यापासून आणखीही एक महत्वाची गोष्ट साधली जाते, ती अशी कीं, भेटीस आलेल्या ज्या गृहस्थास आपण उठून ताजीम देणें, कितीएक कारणांनीं वाजवी नसून त्याच्या तत्कालीन स्थितिपरत्वें न देणेंही रास्त होत नाहीं, असा कोणी भेटीस आल्यास त्यास आपल्या नोकरांनीं कचेरींत स्वागत करून बसविल्यावर, आपण त्याच्या भेटीस गेल्यानें, त्यासच आपणास उठून ताजीम देणें भाग पडतें.

आपली बसावयाची स्वतंत्र खोली असली ह्मणजे त्या स्थळीं कागदपत्र वाचून तत्संबंधीं विचार करण्यास आपणास सोईचें पडतें. या खोलींत नोकर लोकांस मात्र कामापुरतेंच येण्याची परवानगी असून, इतर सर्व लोकांस बंदी असावी, व तिचें दार आपण आंत असलों तरी उघडें न टाकितां नेहमीं बंद असावें, पण दार बंद करून आंत डुलक्या घेत, किंवा विड्या फुंकीत, बसूं नये. कोणत्या दस्तऐवजाची मुदत किती राहिली आहे, कोणते दस्तऐवज फिर्यादीस द्यावयाचे, फिर्यादींच्या

कैफियती कशा तयार करावयाच्या, पुराव्यास कागद कोणते द्यावयाचे, व वकिलास कोणते मुद्दे व हकीकती कळवावयाच्या, इत्यादि गोष्टींचीं टांचणेंटिपणें स्वहस्तें करावीं. हीं कामें केवळ कारकुनावर टाकूं नयेत. नक्त व ऐनजिनशी कीर्दींचीं तेरजें व आढावे, लक्षपूर्वक ध्यानीं आणावे. कारकुनाकरवीं जडजवाहीर, दागदागिना, उंची वस्त्रेंपात्रें, भांडींकुंडीं, व इतर प्रकारच्या हरजिनशी वस्तु, यांचें वजनमाप व नग यासुद्धां यादी, कोणची वस्तु कोणापासून कधीं घेतली, किंवा करविली, यांच्या तपशिला-सहीत तयार करून दप्तरीं ठेवाव्या. गांवगन्नावार असलेल्या शेतवाड्यांचीं नांवें, एकरगुंठे, सरकारी आकार, वरकस व पोटखराब यांची फोड, कसणाराचें नांव, मक्त्याचा ठराव, व त्यास जामीन जो कोणी असेल त्याचें नांव, इत्यादि तपशिलाचें फेरिस्त तयार ठेवावें. गुराढोरांचीं नावें, रंग, शिंगाशिंगोटी, व अदमाशी उमर या तपशिलाची नोंद ठेवून, दरसाल एक दिवस नेमून, त्या दिवशीं मरगत व नवी उपज काय झाली, हें पहात असावें.

जमाखर्ची लिहिण्यासंबंधानें रोजची देवघेव कच्चया खड्यांस व रोजकीर्दीस रोजचे रोज बार होतच असते, परंतु खतावण्या पुष्कळांच्या घरीं सहासहा महिन्यांच्य

मागसलेल्या असतात, ही चाल बरी नाहीं. रोजच्या पांचपंचवीस रकमांच्या देवघेवीची खतावणी चालू तारखेवर ठेवणें कांहीं जड आहे, अशी गोष्ट नाहीं. कारणपरत्वें आठ चार दिवसांच्या फरकानें मागसली असली, तरी फारशी नड नाहीं, परंतु फार मागसलेली असूं देऊं नये, कारण, कोणाचाही हिशेब त्यानें मागितल्यापासून तास दोन तासांच्या आंत त्याच्यापुढें ठेवितां येईल, अशी जमाखर्चाची शिस्त असावी, हें बरें.

रोजकीर्दीवर मळपृष्ठासारखीं कांहीं कोरीं पानें अंक घातल्याशिवाय ठेवून त्यांवर कुटुंबांतील मुलेंबाळें जन्मास येतील, त्यांच्या जन्मवेळा, तिथि, वार, व नक्षत्र यासुद्धां टिपलेल्या असाव्या, तसेंच कोणी मयत झालें असल्यास त्यांच्या मृत्युतिथि नोंदून ठेवाव्या, याशिवाय सालाबादी कुलाचार, कुलदेवतांचीं नांवें, वार्षिक नैवेद्य, व लग्नमुंजी इत्यादि कार्यांत कुलाचाराप्रमाणें बोडणें, गोंधळ, वगैरे घालण्याची जी परिपाठी असेल, ती नोंदून ठेवावी, ह्मणजे मुलांबाळांस ह्या गोष्टींची माहिती व कुलपरंपरागत पद्धति ठाऊक होते. याशिवाय हव्यकव्यें, श्रावणी व लग्न-मुंजी इत्यादि कृत्यांत लागणारे पदार्थ, ह्मणजे पान-पत्रावळ, तैवजीसामान, अत्तरगुलाब, दर्भसमिधा, नारळ-सुपाऱ्या, कापडचोपड इत्यादि सामानाच्या यादी व

दक्षणेचे निरख दप्तरीं असूं द्यावे. येणेंकरून अशा प्रसंगीं लागणारें सामान बिनबोभाट सिद्ध ठेवितां येऊन आपली दूरदृष्टि व दक्षता दिसून येते.

तसेंच आपल्या कारकीर्दींत यात्रा वगैरे झाल्या असल्यास मुक्काम कोठें केले होते, तेथें सोयी, गैरसोयी कोणत्या होत्या, बरोबर सामान कोणचें घ्यावें लागलें होतें, तीर्थश्राद्धें व इतर दानधर्म काय झाला होता, त्या क्षेत्रीं आपला उपाध्याय कोण होता, याविषयीं तपशीलवार लेख दप्तरीं असूं द्यावे.

ह्याप्रमाणें सर्व हिशेबी काम साडेचारपावणेपांच वाजेपर्यंत आटोपून चिटणिशी कामास प्रारंभ करावा, पत्रें लिहितांना उगाच पाल्हाळ न करितां, व मुद्दा जाऊं न देतां, मजकूर थोडक्यांत लिहावा, तथापि तपशील परिपूर्ण असून त्यांत संदिग्धता ठेवूं नये, लिहितांना ज्यास पत्र लिहावयाचें त्याच्या योग्यतेनुरूप मायन्याबरहुकुम, व आपणास किंवा दुसऱ्यास कमीपणा न येईल अशा बेतानें, उभयतांचा बोज राखून लिहावें. होतां होईल तोंपर्यंत गळलेला मजकूर खालीं ताजाकलम घालून लिहिण्याची पाळी येऊं देऊं नये. मित्ती, सन, व वारनिशी पत्रांक (नंबर) घातल्याशिवाय पत्र रवाना न होण्याची दक्षता असूं द्यावी, अशा रीतीनें

फक्त शिलकसांखळी मिळविणें व तारीख बंद करणें राखून ठेवून कचेरी पांच पासून साडेपांच वाजण्याच्या आंत बंद करावी.

येणेंप्रमाणें, प्रातःकाळीं सुमारें तास दोन तास घराबाहेर जाऊन नोकराचाकरांच्या कामाची चौकशी व दुपारीं प्रहरसहाघटका दप्तरचें काम, पहात गेल्यास कितीही फैलाव्याचा व्यवहार असला तरी, त्याचा आटोप होण्यास अडचण पडत नाहीं, व काम दररोज शिस्तवार केलें तर श्रम व वेळ फार न लागतां, ह्याच वेळांत कायदेकानू व हायकोर्टाचे ठराव वगैरे व्यवहारोपयोगी माहिती संपादन करण्यास विपुल वेळ सांपडतो.

अशा रीतीनें साडेपांच वाजेपर्यंत नेटानें काम केल्यानंतर देवदर्शन व रपेट करण्यास जावें. बाहेर फिरावयास जातांना कोणास तरी बरोबर घ्यावें, व त्याचा दर्जा असेल त्याप्रमाणें त्याशीं संभाषण करावें. हवा जिकडे स्वच्छ वहात असेल तिकडे सहल करणें चांगलें.

सहल करून घरीं परत आल्याबरोबर हातपाय धुवून संध्यावंदन व धूपारती करावी आणि भोजनाची सिद्धता होईपर्यंत, गुराढोरांस खाणें घातलें व दुधें काढलीं किंवा नाहीं, याची चौकशी करून भोजन करावें.

तदनंतर आठ वाजेपर्यंत पानसुपारी झाल्यावर थोडा वेळ मुलेंलेंकरें व आश्रित ह्यांशीं संभाषण करून कचेरीस बसावें, व रोजची शिलकसांखळी मिळवून, दूर असलेल्या समवयस्क मित्र मंडळीस सल-गीचीं किंवा गुप्त मजकुराचीं पत्रें, जीं आपण स्वतःच लिहिलीं पाहिजेत, तीं लिहावीं. आणि सूर्योदयापासून झालेल्या घडामोडींचें पर्यालोचन व दुसऱ्या दिवशींच्या कामाची योजना करून नोकरा चाकरांस जे हुकूम सांगावयाचे असतील ते सांगावे, व दहा वाजल्याबरोबर कचेरींतून उठावें, आणि अंतर्गृहांत एकांतस्थलीं जावें.

तेथें गेल्यावर मित्र व विश्वासू सेवक यांच्या द्वारें गांवांतील कुटाळ मंडळीच्या उपद्व्यापांची व वैऱ्यांच्या कारस्थानांची बातमी घ्यावी. मागें सांगितलेंच आहे कीं, गांवांत अगर परगांवांत जीं घराणीं आपल्या आ-श्रयावर किंवा अनुषंगानें नसतात, त्यांत कोणी प्रति-स्पर्धी, कोणी मित्र, व कोणी उदासीन असा त्रिविध प्रकार असतोच, त्यांत जे उदासीन असतात, त्यांज-पासून आपणास कोणच्याही प्रकारचा उपसर्ग नसतो, व मित्र असतात, ते तर आपले हितचिंतकच असतात, परंतु जे प्रतिस्पर्धी असतात, ते आपल्या नाशावर असतात, ह्या करितां त्यांस आपल्या दाबांत ठेवितां यावें, ह्मणून त्यांचीं व्यंगें व बलाबल आपणास माहित

असणें जरूर असतें. तसेंच, परपक्षाचीं कारस्थानें अगाऊ कळलीं असतां, त्यांचा प्रतीकार करण्यास सोयीचें पडतें, यास्तव गुप्तहेराच्या द्वारें वैऱ्यांच्या मसलतीची बातमी ठेवीत जावी. आपण इतरांशीं निर्वैर व सौजन्यानें वागलों, तरी जगांत परोत्कर्षाविषयीं असहिष्णुता, स्वार्थ, व मत्सर इत्यादि दुर्गुणांची समृद्धि आहे, यामुळें दुसरे लोक आपल्याशीं कांहीं कारण नसतां हेवादावा करण्यास प्रवृत्त होतात. यामुळें, आपली इच्छा नसतांही, सहजच दुसऱ्याशीं वैर उत्पन्न होतें. निदानपक्षीं, आपला बचाव तरी आपणास करावा लागतोच. कोणच्याही कारणानें कां हाईना, एकदां विरोध उद्भवला ह्मणजे गाफल रहाणें, मोठ्या धोक्याचें आहे.

शत्रूकडील बातमी काढण्यास योजावयाच्या हेरांविषयीं विचार पुढील प्रकरणीं व्हावयाचाच आहे, तो ध्यानीं आणून योग्यस्थळीं बातमीदार योजावे. व त्यांनीं सांगितलेलें वृत्त नीट ऐकून घेऊन आपलें व शत्रूचें बलाबल ध्यानीं आणावें आणि नंतर निद्रा करावी.

अशा दिनचर्ये प्रमाणें वागून जो मनुष्य सर्वकाळ आपल्या कामाधंद्यांत गुंतलेला राहतो, व व्यवहाराच्या सर्व अंगांवर आपली करडी नजर ठेवितो, त्याचा व्यवहारांत उत्कर्षच होतो, व त्याचें वजन सर्वांवर पडतें.

दुसरें प्रकरण समाप्त.

प्रकरण तिसरें.

बलाबलविचार.

दैवबल, बुद्धिबल, कुलबल, बाहुबल, द्रव्यबल, मन्त्रबल. ज्ञातिबल, सुहृद्बल, सेवकबल, सेवकांचे प्रकार, सेवकगुण, तत्संबंधी ऐतिहासिक गोष्टी.

मागील विवरणाच्या ओघानें प्राप्त झालेला बलाबलविचार, प्रस्तुत प्रकरणीं सविस्तर सांगावयाचा आहे. यद्यपि सर्वबलांमध्यें दैवबल प्रधान, असें ह्मणण्याची परिपाठी पडली आहे, तथापि लोकव्यवहार पाहिला असतां, तसें कोणी मानीत नाहीं, असेंच निदर्शनास येतें. दैव दुर्ज्ञेय, व पंगु असून तें यत्नसाध्य नसल्यामुळें प्रकृत स्थलीं त्याचा विचार तरी काय करावा? दैवबलाच्या अभावामुळें, किंवा त्याच्या प्रतिकूलतेमुळें अवसरप्राप्त कार्य, कोणासही सोडितां येत नाहीं, याकरितां हिम्मतबहाद्दर पुरुषांनीं[1] दैवप्रतिकूलतेची, व अपशकुनादिकांची भीति मनांत आणून कार्यविमुख होऊं

---

१ विक्लवो वीर्यहीनो यः स दैवमनुवर्तते । वीराः संभावितात्मानो न दैवं पर्युपासते ॥ १७ ॥
दैवं पुरुषकारेण यः समर्थः प्रबाधितुम् । न दैवेन विपन्नार्थः पुरुषः सोवसीदति ॥ १८ ॥
(वा० रामायण, सर्ग २३.)

नये. जे नामर्द व भ्याड असतात, तेच दैवावर अवलंबून राहतात. ग्रहांची[1] इष्टानिष्टता, दुःस्वप्नें, व अपशकुन यांचीं फळें काकतालीयन्यायानें प्राप्त होत असतात, यास्तव बुद्धिमान् लोक त्यांस फारसे भीत नाहींत. या गोष्टी सवड असेल तेव्हां मात्र लोकाचार समजून अवश्य पहाव्या. रस्ता झाडून मार्ग आक्रमण करण्याची जेव्हां सवड असेल, तेव्हां तसें करणें अधिक श्रेयस्कर व बिन धोक्याचें आहे, हें उघडच आहे.

दैव श्रेष्ठ किंवा पौरुष श्रेष्ठ, हा वाद अनादिसिद्धच आहे. परंतु त्याचा तर्कवितर्कांनें अद्याप निर्णय लागला नाहीं. इतकें मात्र खरें आहे कीं, आजपर्यंत कोणीही दैवावर भिस्त ठेवून उद्योग सोडून दिलेला पाहण्यांत येत नाहीं, यावरून उद्योग किंवा पुरुषयत्नच प्रधान समजला पाहिजे. कोणास दैवासच प्रधानत्व देणें मान्य असेल तर, त्यास दैव ह्मणजे काय, असा आह्मी प्रश्न करितों. प्राक्जन्मींचा जो पुरुषयत्न, त्यासच दैव ह्मणावयाचें असेल तर पुरुषयत्नच प्रधान, असें दैववाद्यांच्या

१ महाणां चरितं स्वप्नं निमित्तोत्पातकं तथा । फलंति काकतालीयं तेभ्यः प्राज्ञो न बिभ्यति ॥ वेणिसंहार

विषमावस्थिते दैवे पौरुषे फलतां गते । विषादयंति नात्मानं सत्त्वोपाश्रयिणो बुधाः ॥ १७ ॥ वनपर्व, अ० ७९.

मुखानेंच कबूल झाल्यासारखें होत नाहीं काय ? जो आळशी पुरुष दैवावर भरंवसा ठेवून हटवादीपणानें कांहीं उद्योग करीत नाहीं, तो निश्चयानें नाश पावतो. "असेल माझा हरी तर देइल खाटल्यावरी" असें ह्मणून केवळ दैवपर होणें रास्त नाहीं. उद्योग करूनही दुर्दैवानें फलप्राप्ति न झाली तर धीर पुरुष, मजला जेवढें करणें शक्य होतें तेवढें मी सर्व केलें आहे, असें मनांत आणून आपल्यास दोषी समजत नाहीं. उद्योगास आरंभच न केला तर फल प्राप्त होणार कसें ? व आपल्या अंगीं कर्तृत्व आहे किंवा नाहीं याचा निर्णय होणार तरी कसा ? तस्मात् पराक्रम हा केलाच पाहिजे. उद्योगाहून अन्य, असा कोणी फलदाता ईश्वर निराळा आहे, असें मानिलें तरी तो ईश्वर क्रियावानासच फल देतो, आळशास देत नाहीं.

---

१ यो हि दिष्टमुपासीनो निर्विचेष्टः सुखं शयेत् । अवसीदेत्सुदुर्बुद्धिरामो घट इवाम्भसि ॥ १४ ॥ तथैव हठदुर्बुद्धिः शक्तः कर्मण्यकर्मकृत्। आसीत न चिरंजीवेदनाथ इव दुर्बलः ॥ १५ ॥ } वनपर्व, अ० ३२.

२ यदन्यःपुरुषः कुर्यात्तत्कृतं सकलं मया। तच्चेदफलमस्माकमपराधो न मे क्वचित्. ॥. इति धीरोन्ववेक्ष्यैवनात्मानं तत्र गर्हयेत्. । ४८ । ४९ वनपर्व, अ० ३२.

३ अस्ति चेदीश्वरः कश्चित्फलरूप्यन्यकर्मणाम् । कर्तारं भजते सोऽपि नह्यकर्तुः प्रभुर्हि सः ॥ भागवत दशमस्कंध, अ० २४.

वरील विचारावरून दैवबल अचिंतनीय आहे, असें समजून त्याचें परिगणन न करितां ज्ञात्यांनीं बाहुबल, कुलबल, बुद्धिबल, द्रव्यबल, आणि मंत्रबल अशीं मनुष्याच्या ठायीं असणारीं पांच[1] प्रकारचीं बलें मात्र विचारणीय मानलेलीं आहेत. ह्या पांचांही बलांमध्यें सर्वांत श्रेष्ठ बुद्धिबल, व सर्वांत निःकृष्ट बाहुबल होय, असें समजावें. तशांत सांप्रत युद्धकाल नसल्यामुळें बाहुबलास फारच निःकृष्टपणा आला आहे.

कुलबल ह्मणजे पिढीजाद खानदानी, हें एक मोठेंच बल आहे. नानासाहेबांचें बंड जसें वाढत गेलें, तसें वासुदेव बळवंताचें बंड वाढलें नाहीं, ह्याचें मुख्य कारण कुलबलच होय. कुलीन मनुष्यास शेंकडों साह्यकर्ते मिळतात, त्याच्या पूर्वजांच्या शौर्यौदार्यादि गुणांनीं लोकांचा त्याजवर लोभ व विश्वास विशेष उत्पन्न झालेला असतो, तसा प्रकार अप्रसिद्ध किंवा कुलहीन मनुष्याचा नसल्यामुळें, त्यास यत्नें करूनही चांगलें साह्य

[1] बलं पञ्चविधं नित्यं पुरुषाणां निबोध मे। यत्तु बाहुबलं नाम कनिष्टं बलमुच्यते ॥ अमात्यलाभो भद्रंते द्वितीयं बलमुच्यते । धनलाभं तु बलमाहुर्मनीषिणः ॥ यत्त्वस्यसहजं राजन्पितृपैतामहं बलं। अभिजातबलं नाम तच्चतुर्थं बलं स्मृतम्. ॥ येन त्वेतानि सर्वाणि संगृहीतानि भारत । यद्बलानां बलं श्रेष्ठं तत्प्रज्ञाबलमुच्यते ॥ ५२ ते ५५ उद्योगपर्व, अ० ३७.

मिळत नाहीं. परंतु बाहुबल, कुलबल, व बुद्धिबल हीं तिन्हीं बलें जितकीं ईश्वरेच्छेवर अवलंबून आहेत, तितकीं मनुष्ययत्नावर अवलंबून नाहींत. यामुळें त्यांविषयीं येथें विचार काय करावा ?

प्रस्तुत स्थलीं द्रव्यबल व मंत्रबल आणि ह्या दोन्हीं बलांस कार्यसाधकत्वामुळें अत्यंत उपकारक असें मनुष्यबल, अशा तीन प्रकारच्या बलांविषयींच विशेषत्वानें विचार करणें इष्ट आहे. द्रव्य [1]सांह्यकर्त्यांच्या द्वारें, व साह्यकर्ते द्रव्यद्वारें प्राप्त होत असतात, ह्या दोन्हीं गोष्टींचा अन्योन्याश्रय आहे. यास्तव उपलब्ध असलेल्या साधनांनीं या दोन्ही गोष्टी यत्नपूर्वक संपादन कराव्या. "द्रव्येण सर्वे वशाः" असें ह्मटलें आहे, यास्तव द्रव्यार्जनाविषयीं दक्ष असावें, व अर्जित असेल त्याचें रक्षण करावें हें खरें, तथापि तें अधर्मानें कधींही संपादन करूं नये, व त्याचें कृपणत्वानें रक्षणही करूं नये. दुष्कर्मानें मिळविलेल्या द्रव्याचा उपभोग घेण्यास वांटेकरी बहुत मिळतात, पण तज्जनित पापाचे वाटेकरी कोणी होत नाहींत. एका [2]संपादकासच त्या पापाचें

१ सहायबन्धना ह्यर्थाः सहायाश्चार्थबन्धनाः । अन्योन्यबन्धनावेतौ विनान्योन्यं न सिद्ध्यतः ॥ ३८ ॥ उद्योग, अ० ३७.

२ एकः पापानि कुरुते फलं भुङ्क्ते महाजनः । भोक्तारो विप्रमुच्यंते कर्ता दोषेण लिप्यते ॥ ४७ ॥ उद्योग, अ० ३३.

ओझें उचलावें लागतें. अशा रीतीनें मिळविलेलें द्रव्य लोकांच्या मनांत वैरभाव उत्पन्न करून संपादकाचा नाश मात्र करितें, व तें फार दिवस टिकतही नाहीं, यास्तव कुमार्गानें द्रव्य मिळविणारा मनुष्य महामूर्ख[1] समजावा. धर्मन्यायानें मिळविलेलें द्रव्य कधीं घटतें[2] नाहीं, व नाहींसेंही होत नाहीं, परद्रव्याचा अपहार[3] करणें, हें निष्ठुरपणाचें व नीचपणाचें कृत्य आहे. परस्वापहार करणें, हा वैभवास चढण्याचा राजमार्ग नव्हे. लोकमान्य राजमार्ग ह्मटला ह्मणजे, परांभिलाष[4] न करणें, स्वतःच्या द्रव्यावर संतुष्ट असणें, सतत उद्योग करणें, व मिळविलेलें रक्षण करणें हाच होय. दीर्घोद्योगी[5], दक्ष, व विपत्तीमध्यें न डगमगणारा मनुष्य बहुतकरून चांगले दिवस पाहतोच पाहतो.

तसेंच जवळ असलेलें द्रव्य रक्षण करावें, असें जरी आहे, तरी पुष्कळ धान्यप्राप्ती व्हावी, एतदर्थ जसा

---

१ अर्थांश्चाकर्मणा प्रेप्सुर्मूढइत्युच्यते बुधैः ॥३५॥उद्योग,अ०३३.

२ धर्ममूलां श्रियं प्राप्य न जहाति न हीयते॥३१॥उद्योग,अ०३३.

३ अनार्याचरितं तात परस्वस्पृहणं भृशम् । स्वसंतुष्टः स्वधर्मस्थो यः स वै सुखमेधते ॥ ६ ॥

४ अव्यापारः परार्थेषु नित्योद्योगः स्वकर्मसु । रक्षणं समुपात्तानामेतद्वैभवलक्षणं ॥ ७ ॥

५ विपत्तिष्वव्यथो दक्षो नित्यमुत्थानवान्नरः । अप्रमत्तो विनीतात्मा नित्यं भद्राणि पश्यति ॥ ८ ॥

(३–५: सभापर्व. अ० ५४)

कांहीं थोड्या धान्याचा बीज[1]रूपानें व्यय करावा लागतो, तसाच प्रकार धनाचाही आहे. आधीं पैसा खर्च केल्याशिवाय पैसा मिळत नाहीं, यास्तव प्रसंगानुरूप छाती करून नूतन द्रव्यप्राप्तीकरितां संचित द्रव्याचा व्यय करण्यासही कचरूं नये. हिम्मत[2] हेंच द्रव्य मिळविण्याचें मुख्य साधन आहे. हिमती शिवाय इतर साधनें व्यर्थ होत. भागू[3]बाई बनल्यानें, किंवा " घालग बाई जोगवा " असें ह्मणून याचना करीत गेल्यानें, अथवा सदोदित टाळ कुटीत राहून कोणासही द्रव्य प्राप्त होत नाहीं. नेहमीं थोड्या[4] खर्चानें व अल्पायासानें विपुल अर्थप्राप्ति होईल, असे न्याय्य उद्योग मनांत योजून ते लागलेच हातीं घ्यावे. उद्योग करितांना निद्रा[5], आळस, भय, क्रोध, नाजुकपणा, व चेंगटपणा,

---

१ अर्थत्यागोपि कार्यः स्यादर्थं श्रेयांसमिच्छता । बीजौपम्येन कौंतेय मा तेभूदत्र संशयः ॥ ६९ ॥ वनपर्व, अ० ३३.

२ सत्वं हि मूलमर्थस्य वितथं यदतोन्यथा । न तु प्रसक्तं भवति वृक्षच्छायेव हैमनि ॥ ६४ ॥ वनपर्व, अ० ३३.

३ न चार्थो भैक्ष्यचर्येण नापिक्लैब्येन कर्हिचित् । वेत्तुं शक्यः सदा राजन्केवलं धर्मबुद्धिना ॥ ४९ वनपर्व, अ० ३३.

४ कच्चिदर्थान्विनिश्चित्य लघुमूलान्महोदयान् । क्षिप्रमारभसे कर्तुं न विघ्नयसि तादृशान्. ॥ ३१ सभा, अ० ५.

५ षडनर्था महाराज कच्चित्ते पृष्ठतः कृताः । निद्रालस्यं भयं क्रोधो मार्दवं दीर्घसूत्रता. ॥ १२८ सभापर्व अ० ५.

इतक्या गोष्टी करूं नयेत, हे उद्योगास सहा अनर्थ ह्मणून गणलेले आहेत. सामर्थ्य[1], देश, काल, व आपला आदा ह्या गोष्टींचा विचार करून जो कामास हात घालतो, तो तोंडघशीं न पडतां तें काम निर्वेध पार पडतो.

आद्यापेक्षां जास्त[2] खर्च करणें, जमाखर्चाकडे लक्ष न पुरवणें, पापपुण्याची पर्वा न करितां साधेल त्या रीतीनें पैसा मिळविणें, आणि दूर असलेले अर्थ संपादन करण्यास अवघड पडतें, ह्मणून तें सोडून देणें, ह्या गोष्टी कोशबलास अगदीं अनिष्ट आहेत. जो मनुष्य आपला आदा काय आहे, हें न पाहतां[3] वाटेल तसा खर्च करितो, तो कुबेरासारखा श्रीमान् असला तरी गरीबीस येतो, ह्मणून सदोदित आपला आदा काय व खर्च काय, हें पहात राहून सुबत्ता असेल तेव्हां आद्याच्या[4] चौथ्या हिश्शांत, मध्यम काल असेल तेव्हां आद्याच्या अर्ध्या

१ सामर्थ्ययोगं संप्रेक्ष्य देशकालौ व्ययागमौ । विमृश्य सम्यक्च धिया कुर्वन्प्राज्ञो न सीदति ॥ ३६ सभा, अ० १३.

२ अतिव्ययोऽनवेक्षा च तथार्जनमधर्मतः । मोक्षणं दूरसंस्थानां कोशव्यसनमुच्यते ॥ हितोपदेश.

३ क्षिप्रमायमनालोच्य व्ययमानः स्ववाञ्छया । परिक्षीयत एवासौ धनी वैश्रवणोपमः ॥ हितोपदेश.

४ कच्चिदायस्य चार्धेन चतुर्भागेन वा पुनः । पादभागैस्त्रिभिर्वापि व्ययः संशोध्यते तव ? ॥ ७३ ॥ सभापर्व, अ० ५.

हिश्शांत, व दुर्भिक्ष असेल तेव्हां आद्याच्या पाउण हिश्शांत, खर्च आटपेल अशा धोरणानें खर्चाचा बेत राखावा.

व्यवहारी लोकांचें द्रव्य बहुधा व्यापारांत गुंतलेलें असतें, तें बहुतकरून जरूरीच्या वेळेस खुलें होऊन उपयोगीं पडत नाहीं, यामुळें अशा प्रसंगीं दुसऱ्या कडून ऐवज आणण्याची पाळी येते, व तसें झालें ह्मणजे माणसाची इभ्रत जाते. इभ्रतीवर मोठमोठीं कामें पार पडत असतात, यासाठीं ती कमी होऊं नये ह्मणून, जो गृहस्थ आपल्या व्यवहाराच्या मानाप्रमाणें कांहीं नियमित रोकड सदोदित जवळ बाळगितो, त्याचा भ्रम खुला न होतां, लोकांत त्याची इभ्रत रहाते. मनुष्याच्या ऐपतीचा भ्रम व साख, या दोन गोष्टी मिळून पत होते. ऐपत आहे पण साखसचोटी नाहीं, तर पत रहात नाहीं. बरें साखसचोटी आहे पण ऐपत नाहीं, तर सावकारास आपली रक्कम परत येण्याचा भरंवसा पटत नाहीं, यामुळें पत रहात नाहीं. घरांत तहादर रोकड व बाहेर पत असली ह्मणजे, प्रसंगवशात् कांहीं किफायतवार सवदा जुळून आल्यास, तो पदरीं पाडितां येतो. व संकटकालीं अडचणींत पडून दुसऱ्याचें घर पहावें लागत नाहीं.

द्रव्य होतां होईल तोंपर्यंत आपले हातांत राखावें, तें दुसऱ्याच्या हातांत जाऊं देऊं नये, पण कारणपरत्वें

तें दुसऱ्याच्या स्वाधीन करणें भागच पडलें, तर आपणापेक्षां बलिष्ठ[1], आपले बंधुवर्ग[2], ज्यांनीं आपणास बालपणीं कडेखांद्यावर घेऊन खेळविलें आहे, असे जुने नोकर[3], व ज्यांचे आपले शिरावर पूर्वीं मोठे उपकार झाले आहेत असे लोक, यांच्या स्वाधीन तें कधींही करूं नये. इतर विश्वासू मनुष्य पाहून त्याच्या स्वाधीन करावें. कारण, जबरदस्त मनुष्य आपल्या सामर्थ्याच्या जोरावर कमजोर मनुष्याची ठेव गिळंकृत करण्यास भीत नाहीं. भाऊबंद दायादत्वामुळें सर्वच गडप करून बसण्यास चुकत नाहींत, जुने नोकर धन्यास कालचें खेळविलेलें पोर समजून बेफाम वागतात, व कदर धरून त्यांवर दाबही बसवितां येत नाहीं, आणि उपकारकर्ते[4], आपण केलेल्या उपकाराची ध्वजा उभारून तोंडावाटे शब्दही काढूं देत नाहींत. सारांश वर सांगितलेल्या लोकांवर पैशाचा कारभार सोंपविणें, हें दूरद-

---

१ नियुक्तः क्षत्रियो द्रव्ये खड्गं दर्शयते ध्रुवम् ।

२ सर्वस्वं ग्रसते बंधुराक्रम्य ज्ञातिभावतः ॥

३ अपराधेपि निःशंको नियोगी चिरसेवकः । स स्वामिनमवज्ञाय चरेच्च निरवग्रहः ॥

४ उपकर्ताधिकारस्थः स्वापराधं न मन्यते । उपकारं ध्वजीकृत्य सर्वमेवावलुम्पति ॥ हितोपदेश.

र्शीपणाचें लक्षण नव्हे. तसेंच राजा[1], राजसेवक, वेश्या, बंधु, विधवा, कामावरून दूर केलेले नोकर, व दुर्वर्तनी पुरुष यांशीं देवघेवीचा व्यवहार सर्वथैव वर्ज करावा.

आतां मंत्रबलाविषयीं विचार करूं. मंत्र या शब्दाचा अर्थ येथें गुप्त मसलत असा आहे. योग्य व गुप्त मसलतीनें जयप्राप्ति[2] होते. बुद्धिचातुर्यानें ठरविलेल्या मसलतीनें जसा कार्यभाग पार पडतो, तसा पराक्रमानेंही पार पडत नाहीं, ह्मणूनच ज्ञात्यांनीं ह्मटलें आहे, " **उपायेन हि यच्छक्यं न तच्छक्यं पराक्रमैः** " शिवाजी महाराज, बरोबर दहावीस सेवक घेऊन दिल्लीस अवरंगजेबाचे भेटीस गेले असतां, ते ज्या वाडयांत रहात होते, त्या वाड्यासभोंवतीं अवरंगजेबानें पोलादखान कोतवालाच्या पांच हजार लोकांचा पहारा ठेवून महाराजांस प्रतिबंधांत ठेविलें. दहावीस लोकांसहवर्तमान परक्या ठिकाणीं पांच हजार लोकांच्या वेढ्यांत सांपडल्यावर महाराज जरी पराक्रमी होते, तरी केवळ पराक्रमाच्या जोरावर त्यांस शिर सलामत राखून वेढ्याची

१ घृणी, राजा, पुंश्चली, राजभृत्यः, पुत्रो, भ्राता, विधवा बालपुत्रा, । सेनाजीवी, चोद्धृतभूतिरेव व्यवहारेषु वर्जनीयाः स्युरेते ॥ ३० ॥ **उद्योगपर्व**, अ० ३७.

२ मंत्रमूलं च विजयं प्रवदन्ति मनस्विनः ॥ ९ वा. **रामायण, युद्धकाण्ड, सर्ग ६.**

फळी फोडून निसटून जाणें अशक्य होतें. अशा बिकट प्रसंगीं न गांगरतां मसलत योजून महाराजांनीं अवरंगजेबाच्या हातावर कशा तुरी दिल्या, हें आबालवृद्धांस माहितच आहे, यास्तव तें येथें सांगण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं. बिकट[1] प्रसंगामध्यें जो भांबावत नाहीं तोच पुरुष संकटांतून तरून जातो.

कोणत्याही महत्कार्याची मसलत एकट्यानेंच आपल्या बुद्धीनें ठरवूं नये, कारण, काम, क्रोध, लोभ, ईर्ष्या, व मत्सर इत्यादि मनोविकारांनीं बुद्धि एकदर्शी होऊन तिजला इच्छित गोष्टीची जेवढी अनुकूल बाजू असते, तेवढीच दिसते, प्रतिकूल बाजू दिसत नाहीं, यामुळें कार्यभाग फसतो. तसेंच बहुतांसहवर्तमान मसलतीचा विचार केला असतां, तो जगजाहीर झाल्यासारखाच होतो, या करितां तीन[3] किंवा तीहींहून एकदोन जास्ती, इतक्याच मसलतगारांसमवेत मसलतीची विचारणा करावी.

मसलतगारांच्या ठिकाणीं शहाणपणा, मनोनिग्रह,

---

१ उत्पन्नेष्वपि कार्येषु मतिर्यस्य न हीयते । स निस्तरति दुर्गाणि भृतिबुद्धिप्रभावतः ।। हितोपदेश.

२ कच्चिन्मंत्रयसे नैकः कच्चिन्न बहुभिः सह । कच्चित्ते मन्त्रितो मन्त्रो राष्ट्रं न परिधावति ।। वा. रामायण, अयोध्याकाण्ड सर्ग १००.

३ मन्त्रिभिस्त्वं यथोद्दिष्टं चतुर्भिस्त्रिभिरेव वा । कच्चित्समस्तैर्व्यस्तैश्च मन्त्रं मन्त्रयसे बुध । रामायण, अयोध्या. सर्ग १००.

व आपणाविषयीं दृढतर प्रेमभाव हे तीन गुण साहचर्यानें[1] वसत असले पाहिजेत. या तिहींपैकीं कोणत्याही एका गुणाची कमताई असून दुसरे दोन्ही गुण भरपूर असले, तरी त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. ज्यांस नीतिशास्त्रान्वयें कार्याचा उपक्रम कसा करावा, स्वपरबलाबलाविषयीं तारतम्य कसें पहावें, देशकालविभाग ध्यानीं कसा आणावा, कार्यांत अडचणी आल्यास त्या दूर कशा कराव्या, व कार्याचा निर्गम कसा लावावा, ह्या पांच गोष्टींचें ज्ञान चांगलें असून जे साम, दान, व भेद या तिन्ही उपायांची योजना करण्यांत कुशल, तेच मसलती पुरुष गणले जातात. विचाराकरितां पुढें आलेल्या गोष्टीचें तात्पर्य ध्यानीं आणून विचारपूर्वक सल्ला देणारे, मन न दुखवितां सत्य व स्पष्ट भाषण करणारे, व द्रव्य लोभास्तव विश्वासघात न करणारे मसलतगार मंत्रनिर्णयास योग्य होत. अनुकूल-

---

१ अपण्डितो वापि सुहृत्पण्डितो वाप्यनात्मवान् । नापरीक्ष्य महीपाल कुर्यात्सचिवमात्मनः ॥ १९ उद्योग, अ० ३८.

२ उपप्रदानं सांत्वं च भेदं काले च विक्रमम् । योगं च रक्षसां श्रेष्ठ तावुभौ च नयानयौ ॥ ११ ॥
काले धर्मार्थकामान्यः संमन्त्र्य सचिवैः सह । निषेवेतात्मवाँल्लोके न स व्यसनमाप्नुयात् ॥ १२ ॥
हितानुबन्धमालोक्य कुर्यात्कार्यमिहात्मनः । राजा सहार्थतत्वज्ञैः सचिवै र्बुद्धिजीविभिः ॥ १३ ॥
} रामायण युद्धकाण्ड. सर्ग ६३

तेचें यत्किंचित् चिन्ह दिसल्याबरोबर हर्षानें हुरळून जाणारे लोक, व नीतिशास्त्र[1] आणि अर्थशास्त्र यांची तत्वें माहित नसतां, तर्कटी वाक्चातुर्याच्या जोरावर अहितकारक गोष्टी हितकारक आहेत, असें भासविणारे लोक, यांचा बुद्धिवाद ऐकूं नये. मंदबुद्धि, चेंगट, तोंडपुजे, (प्रायः भटभिक्षुक) ठक, स्त्रिया, आणि बाल, इतक्या प्रकारचीं माणसें मंत्र निर्णयास वर्जनीय[2] समजावीं. कारण, मंदबुद्धि मनुष्यास कार्याकार्य विवेक नसतो. चेंगट मनुष्य कालयापन करून संधी फुकट दवडितो. भटभिक्षुक व स्त्रिया यांच्या ठायीं अधीरता, अदूरदृष्टि, लावालावी, व तोंडी तीळ न ठरण्याचा गुण, इत्यादि दोष असतात. बालकांच्या ठायीं अपक्कता, उतावळेपणा, व अनुभवहीनता हे दुर्गुण असतात. व ठक तर बोलून चालून लुच्चेच, ते साधेल त्या

१ अनभिज्ञाय शास्त्रार्थान्पुरुषाः पशुबुद्धयः ।
प्रागल्भ्याद्वक्तुमिच्छन्ति मन्त्रिष्वभ्यंतरीकृताः ॥ १४
अशास्त्रविदुषां तेषां कार्यं नाभिहितं वचः । अर्थ-
शास्त्रानभिज्ञानां विपुलां श्रियमिच्छताम्. ॥ १५
अहितं च हिताकारं धार्ष्ट्याज्जल्पन्ति ये नराः ।
आवश्यं मन्त्रबाह्यास्ते कर्तव्याः कृत्यदूषकाः ॥१६
(रामायण युद्धकाण्ड सर्ग. ६३)

२ अल्पप्रज्ञैः सह मन्त्रं न कुर्यान्न दीर्घसूत्रैरभसैश्चारणैश्च ॥ (असें विदुरानें धृतराष्ट्रास सांगितलें आहे.) धूर्तः स्त्री वा शिशुर्यस्य मन्त्रिणः स्युर्महीपतेः । अनीतिपवनः क्षिप्तः कार्याब्धौ स निमज्जति.
हितोपदेश.

रीतीनें स्वार्थ साधण्याकरितां परार्थाची हानि करावयास चुकत नाहींत.

कांहीं लोक दुसऱ्या लोकांसमक्ष आपला अभिप्राय स्पष्टपणें सांगत नाहींत, व अनेकांशीं एककालीं केलेल्या मसलतींत प्रसंगीं मतभेद पडून आग्रहवाद उत्पन्न होतो, याकरितां सवड असल्यास प्रथमतः निरनिराळ्या मसलतगारांचा पृथक् पृथक् अभिप्राय घेऊन नंतर सर्वांसमवेत मंत्र निर्णय करावा. सवड नसेल तर प्रथमच सर्वांचा एकदम अभिप्राय घेतला तरी हरकत नाहीं.

जो मनुष्य मंत्र्यांसमवेत मसलतीचा नीट ऊहापोह करून मग कार्यास उद्युक्त होतो, तो उत्तम[१] पुरुष, जो आपल्याच बुद्धीनें मसलतीचा इत्यर्थ ठरवून कार्यास हात घालतो, तो मध्यम पुरुष, व जो मुळींच विचार न करितां कार्यास प्रवृत्त होतो, तो नीच पुरुष समजावा.

---

१ त्रिविधाः पुरुषा लोके उत्तमाधममध्यमाः । तेषां तु समवेतानां गुणदोषौ वदाम्यहम् ॥ ६ ॥ मन्त्रस्त्रिभिर्हि संयुक्तः समर्थैर्मन्त्रनिर्णये । मित्रैर्वापि समानार्थैर्बान्धवैरपि वाधिकैः ॥ ७ ॥ सहितोमन्त्रयित्वा यः कर्मारम्भान्प्रवर्तयेत् । दैवे च कुरुते यत्नं तमाहुः पुरुषोत्तमम् ॥ ८ ॥ एकोर्थं विमृशदेको धर्मे प्रकुरुते मनः । एकः कार्याणि कुरुते तमाहुर्मध्यमं नरम् ॥ ९ ॥ गुणदोषौ न निश्चित्य त्यक्त्वा दैवव्यपाश्रयम् । करिष्यामीति यः कार्यमुपेक्षेत्स नराधमः ॥ १० ॥

रामायण, युद्धकाण्ड, सर्ग ६.

त्याचप्रमाणें ज्या मसलतीविषयीं सर्व मंत्र्यांचें तत्काळ एकमत होतें, ती उत्तम मसलत, जी विषयीं मंत्र्यांचा प्रथमतः मतभेद होऊन मागून एकवाक्यता होते, ती मध्यम मसलत, व जिच्याविषयीं मंत्र्यांचा वाद-विवाद चालून एकमतानें कांहीं निश्चित ठरत नाहीं, ती वाईट मसलत समजावी.

मसलतीचा विचार फार गुप्त रीतीनें करावा. ज्या पुरुषाचें भावी कार्य अथवा भावी कार्याविषयीं केलेला विचार, दुसऱ्याच्या समजण्यांत न येतां, योजिलेलें कार्य पार[1] पडल्यानंतर तें इतरांच्या ध्यानीं येतें, त्यालाच शाहणा ह्मणावें. मंत्रबीज फुटलें[2] तर तें रुजत नाहीं, याकरितां घरांत जेथें माणसाची वाग नाहीं, अशा ठिकाणीं भिंतीस कान असतात, अशी कल्पना करून हलक्या शब्दानें मसलतीची वाटाघाट करावी. किंवा पर्वतांच्या[3]

---

१ यस्य कृत्यं न जानन्ति मन्त्रं वा मन्त्रितं परे। कृतमेवास्य जानन्ति सवै पण्डित उच्यते ॥ २३ ॥ उद्योगपर्व, अ० ३३.

२ मन्त्रबीजमिदं गुप्तं रक्षणीयं यथातथा। मनागपि न भिद्येत तद्भिन्नं न प्ररोहति ॥ हितोपदेश.

३ धर्मकामार्थकार्याणि तथा मन्त्रो न भिद्यते । गिरिपृष्ठमुपारुह्य प्रासादं वा रहो गतः ॥ १७ ॥ अरण्ये निःशलाके वा तत्र मन्त्रोभिधीयते । नासुहृत्परमं मन्त्रं भारतार्हति वेदितुम् ॥ १८ ॥ उद्योगपर्व, अ० ३८.

शिखरावर अथवा झाडझुडुप नाहीं, अशा निर्जन अरण्यांत जाऊन मसलतीचा बेत ठरविल्यास, तो बाहेर फुटण्याचें भय रहात नाहीं.

इतकी खबरदारी घेतली तरी देखील बोलणेंचालणें व मुखचर्या इत्यादिकांत अंतर्गत मसलतीचें प्रतिबिंब दिसून येतें, व त्यावरून चतुर[1] पुरुष मसलतीचा घाट[2] तर्कानें तेव्हांच ताडितात. साक्षात् गोष्ट कानीं पडल्यावर पशूंनां[3] देखील समजते, मग मनुष्यास समजली तर नवल काय! ह्याकरितां बोलणेंचालणें व मुखचर्या यांतही मसलतीचें प्रतिबिंब दिसूं देऊं नये.

इतकी काळजी घेऊनही प्रसंगवशात् मसलत फुटली तरी देखील न कचरतां मोठ्या कुशलतेनें तीवर झांकण

---

१ आकारश्छाद्यमानोऽपि न शक्यो विनिगूहितुम्। बलाद्धि विवृणोत्येव भावमन्तर्गतं नृणाम् ॥ ६४ **रामायण. युद्ध. सर्ग १.७**

२ उदीरितार्थः पशुनापिगृह्यते हयाश्च नागाश्च वहन्ति देशिताः । अनुक्तमप्यूहति पण्डितो जनः परेंगितज्ञानफला हि बुद्धयः। **हितोपदेश**

३ आकारैरिंगितैर्गत्या चेष्टया भाषणेन च । नेत्रवक्त्रविकारेण लक्ष्यतेंतर्गतं मनः ॥ वर्णाकारप्रतिध्वानैर्नेत्रवक्त्रविकारतः । अप्यूहन्ति मनो धीरास्तस्माद्रहसि मन्त्रयेत्. } **हितोपदेश.**

तसेंच, रामचंद्र भरतास विचारतात.

कच्चिन्नतर्कैर्युक्त्या वा ये चाप्यपरिकीर्तिता । त्वया वा तव वामात्यैर्बुद्ध्यते तात मन्त्रिनम्. ॥ २१ **रामायण. अयोध्या. सर्ग. १००**

घालून परपक्षास संदेहांत पाडावें, व आपला डाव सई करावा. असें करील तो खरा मुत्सदी. संकट निघून गेल्यावर, " असें केलें असतें तर तसें झालें असतें, व तसें केलें असतें तर असें झालें असतें, अशा प्रकारचें पांडित्य कोण करीत नाहीं ! मसलत फुटली असतां तीवर झांकण घालतांना व घोर संनिपात झाला असतां त्यावर उपचार करितांना मुत्सद्याची[1] व वैद्याची बुद्धि कसास लागून गुणाची पारख होते.

ज्याप्रमाणें वर्षाकालाच्या प्रारंभीं क्षितिजाशीं लहान लहान ढग उत्पन्न होऊन ते अतिविरल असल्यामुळें प्रथमतः कोणाच्या नजरेस येत नाहींत, पण थोड्याच अवकाशानें लहान लहान ढगांचें मोठें काहूर जमून दशदिशा व्यापून जातात, व गडद अंधःकार पडून वारा व पाऊस ह्यांचा असह्य वर्षाव होऊं लागतो, व विजांचे कोरड फुटूं लागतात. अशा प्रसंगीं मोठे धैर्यवान् पुरुषही घाबरून जातात, मग इतरांचा काय पाड ! तद्वतच जे खरे मुत्सदी असतात, ते प्रथमतः कार्याचा उपक्रम कोणाच्या ध्यानीं न येईल असा सूक्ष्म करून थोड्याच अवधींत शत्रूस आपल्या मसलतीच्या जाळ्यांत घेरून टाकितात व त्याची अक्कल गुंग करून सोडतात.

---

१ मन्त्रिणां भिन्नसंधाने भिषजां सांनिपातके । कर्मणि व्यज्यते प्रज्ञा सुस्थे को वा न पण्डितः ॥ हितोपदेश.

असो, येथवर मंत्रबलाविषयीं जे चार ठळक-ठळक विचार सुचले ते यथामतीनें निवेदन केले, आतां सरतेशेवटीं एवढेंच सांगणें आहे कीं, जयप्राप्तीस साधनीभूत जें मंत्रिमंडळ, तें संग्रहीं असल्यानेंच केवळ जयप्राप्ति होते, असा अर्थ नाहीं. साधकानें त्या साधनांचा योग्य रीतीनें उपयोग करून घेतला पाहिजे. दुरुपयोग केल्यास अनर्थ रोकडा ठेविलेला आहे, असें पक्कें समजावें.

बाळाजी विश्वनाथांच्या[1] कारकीर्दीपासून पेशवाईची इभ्रत आपल्या तरवारीच्या जोरावर वाढविणारे, व योग्य प्रसंगीं नेकनामी सल्ला देणारे, मल्हारराव होळकर, व त्यांच्यासारखे आणखी दुसरे तरवारबहाद्दर व मुत्सद्दी जवळ असतां सोनपतपानपतच्या लढाईंत भाऊसाहेबांनीं त्यांचा बुद्धिवाद न ऐकतां, आपलाच आग्रह चालविला, यामुळें कसा परिणाम झाला, तो सर्वांस महशूर आहेच. हितेच्छु पुरुषानें नीतीला अनुसरूनही केलेला उपदेश काळाच्या तावडींत सांपडलेल्या मनुष्यास रुचत[2] नाहीं, असें जें ह्मटलें आहे, तें अक्षरशः खरें आहे. भाऊसाहे-

---

१ काव्येतिहाससंग्रहांत छापलेली होळकरांची कैफियत, पान २४, २५, २६, पहा.

२ सुनीतं हितकामेन वाक्यमुक्तं दशानन । न गृह्णन्त्यकृतात्मानः कालस्य वशमागताः ॥ २० ॥ **रामायण, युद्धकाण्ड. सर्ग १६.**

बांस मल्हारराव होळकरांचें सांगणें असें होतें कीं, एके ठिकाणीं घोड्यास दाणाचारा केला, तर तेथून दहा कोसांवर भाकरी भाजावी, व पुढें वीस कोसांवर जेवण करावें, आणि अशा गनीमी काव्यानें शत्रूस जेर करून सोडावें. पण हा हितवाद न ऐकतां भाऊसाहेबांनीं एके ठिकाणीं तळ देऊन लष्करास उपासमार पाडली, बरें ती अडचण होळकरांनीं जाटाशीं संधान बांधून दूर केली, व त्यांच्या सांगण्यावरून जाटानें पेशव्यांच्या लष्करांत एक महिनाभर दीडमणाची धारण करून लोकांची खाण्याची उठवण मोडली, तरीदेखील तशा साह्यकर्त्या जाटाशीं कलह करून भाऊसाहेबांनीं त्यास घालवून दिलें, व मल्हाररावांस दरबार बंद करून, त्यांचा अपमान केला, व गर्वानें बादशाही तक्त फोडून रजपूत व जाट लोकांचें मन दुखविलें. त्यावेळीं भवितव्यानुसार भाऊसाहेबांच्या मतीस इतका भ्रंश झाला होता कीं, त्यांस जे रजपूत व जाट बादशाही तक्ताचे पुरातन नोकर व रक्षक ह्मणून गणले जात, त्यांच्या समक्ष असा राजासनाचा केलेला उपमर्द त्यांस सहन होणार नाहीं, व ते आपली बाजू सोडून गिलच्यांस मिळतील, आणि त्या योगें शत्रूचें बळ वाढेल, हें समजलें नाहीं. जाटाचें मराठ्यांविषयीं मन कसें

होतें, हें लढाई आटोपल्यावर पराजित व दीन झालेल्या मराठ्यांस त्यानें चिरकाल स्मरण राही असें अनुपम साह्य केलें, त्यावरून ध्यानीं येईलच. पानपतच्या लढाईंत जो अनर्थ गुदरला, तो योग्य मसलतीची अवधीरणा केल्यामुळेंच गुदरला, दुसरें कांहीं कारण नाहीं.

असेंच दुसरें ऐतिहासिक उदाहरण[1] ह्मटलें ह्मणजे संभाजीमहाराजांचें होय. शिवाजीमहाराजांच्या कसोटीस उतरलेलीं मोरोपंत पेशवे, व बाळाजी आवजी चिटणीस, व ह्यां सारखीं दुसरीं शेंकडों तरवारबहाद्दर व कलमबहाद्दर माणसें संभाजी महाराजांच्या पदरीं होतीं, पण त्यांचा काय उपयोग झाला ! त्यांनीं ह्या राजकार्यधुरंधर माणसांपैकीं कोणास हत्तीच्या पायीं देऊन मारिलें, कोणाचा कुटुंबघात केला, व कोणास नोकरीवरून दूर केलें. फार काय सांगावें, त्यांनीं आपल्या सापत्न मातोश्री सोयराबाईसाहेब, ह्यांस भिंतींत चिणून मारिलें, राज्य शत्रूच्या घशांत घातलें, व शेवटीं आपण प्राणास मुकले.

पण उलट पक्षीं, त्यांचेच कनिष्ठबंधु राजारामसाहेब पहा. त्यांनीं संभाजीमहाराजांच्या तडाख्यांतून जीं कार्यकर्तीं माणसें बचावलीं होतीं त्यांस हाताशीं धरून

---

१ मल्हाररामरावकृत संभाजीमहाराजांचें चरित्र पान ४ते७ पहा.

चंदीचंदावर प्रांतीं जाऊन आपली स्थिरस्थावर केली, व ते तेथें बळ धरून राहिले, आणि मुत्सद्यांच्या सल्ल्याप्रमाणें वागून अवरंगजेबाच्या घशांत गेलेलें राज्य, त्याच्या नरड्यांत हात घालून, हिसकावून घेतलें. आपल्या आईस मारणाऱ्या सापत्न भावाच्या मुलास शत्रूच्या हातून सोडविण्याकरितां एका रात्रींत मोठी दहापंधरा कोसांची दौड करून अवरंगाबादेची पेठ मारली, ते दिवशीं जर शाहूमहाराज अवरंगाबादेंत असते तर, ह्या छाप्यांत त्यांची सुटका खचित झाली असती, परंतु योग आला नव्हता ह्मणून गोष्ट फसली. सावत्र भावाचें लेंकरूं शत्रूच्या हातीं सांपडलें असतां, व मनगटाच्या जोरावर गेलेलें राज्य पुनः संपादन केलें असतां, त्यांस सिंहासनारूढ होण्याची इच्छा झाली नाहीं, व तशी बदसल्ला देऊन दुफळी माजविण्याची कोणी हांव धरली नाहीं, ही गोष्ट सामान्य नव्हे. राजारामसाहेबांनीं अखेर पर्यंत मंचकावर बसून शाहूमहाराजांच्या नांवानें राज्यकारभार केला, ही गोष्ट शाहण्या पुरुषांनीं आपल्या हृदयावर खोदून ठेविण्यासारखी आहे.

---

१ मल्हाररामरावकृत थोरल्या राजाराम साहेबांचें चरित्र पान ६३ पहा.

१ मल्हाररामरावकृत थोरल्या राजाराम साहेबांचें चरित्र पान ६३ पहा.

असो, आतां प्रस्तावक्रमानें मनुष्यबलाविषयीं विचार करणें प्राप्त झाला, यास्तव त्याविषयीं थोडासा विचार करूं. मनुष्यबल हें मंत्रबलास उपकारक आहे, कारण, मसलतीची घटना यथायोग्य झाली, तरी तीप्रमाणें कार्यांचा उपक्रम व निर्गम ह्या गोष्टी मनुष्यबलानेंच व्हावयाच्या असतात, यास्तव मनुष्यबलाचा अंतर्भाव मंत्रबलांत केला तरी साजण्यासारखें आहे.

ज्ञातिबल, सुहृद्बल, व सेवकबल मिळून एकंदर मनुष्यबल होतें. या त्रिविध प्रकारांत ज्ञातिबल प्रधान समजण्याची रीत पडलेली आहे. कारण कसेंही असले तरी आप्त[१] ते आप्तच, व परकी ते परकीच, संकटकालीं बंधुवर्गाशिवाय तिऱ्हाईत कळकळीनें साह्य काय करणार! पण हा विचार सकृद्दर्शनीं जरी खरा भासतो, तरी तो प्राचीनकालापासूनही एकदेशीच गणला आहे. त्याची सत्यता पूर्वींही अबाधितपणें सर्वत्र दिसत नसे. तसें असतें तर रामचंद्रास व धर्मराजास वनवास भोगण्याचें कारणच पडलें नसतें. भावाबंदांपासून मागें कधीं उपकार व कधीं अपकारही होत असे, परंतु ह्या कलिकालांत सारेंच पारडें उलटें फिरल्यामुळें भावाबंदांपासून

---

१ गुणवान्वा परजनः स्वजनो निर्गुणोपि वा । निर्गुणः स्वजनः श्रेयान् यः परः पर एव सः ॥ १५ रामायण, युद्ध. सर्ग. ८७.

एकमेकांस अपकारच होत असल्याचीं शेंकडों उदाहरणें दृष्टीं पडतात, स्वजनांशीं वैर व परजनांशीं मैत्री हा आश्चर्यकारक कलिमहिमा आहे. वास्तविक ह्मटलें तर भावाबंदांचें जेवणखाण, बोलणेंचालणें, वारंवार एकत्र होत राहून त्यांनीं परस्पर गुण्यागोविंदानें नांदावें, हेंच श्रेयस्कर आहे. जळतीं लांकडें परस्परांपासून विलग्न असलीं तर तीं धुरकटत राहतात, त्यांपासून ज्वाला उत्पन्न होत नाहीं, परंतु तींच एकत्र झालीं तर प्रज्वलित होऊन प्रकाश पाडितात, त्याप्रमाणेंच भाऊबंदही एकमेकांपासून फाटून राहिले तर त्यांचें तेज पडत नाहीं, पण तेच एकमेकांस चिकटून राहिले तर त्यांचें तेज पडतें. पण भाऊबंद हे परस्पर वांटेकरी असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं मत्सर स्वभावतःच असतो, त्यांस एकमेकांचें बरें पाहून आनंद होत नाहीं, विपत्ति पाहूनच आनंद

---

१ सीदन्ति संतो विलसंत्यसंतः पुत्रा म्रियन्ते जनकश्चिरायुः । परेषु मैत्री स्वजनेषु वैरं पश्यन्तु लोकाः कलिकौतुकानि ॥

विश्वगुणादर्श.

२ संभोजनं संकथनं संप्रीतिश्च परस्परं । ज्ञातिभिः सह कार्याणि न विरोधः कदाचन ॥ २४ उद्यो , अ० ३६.

३ धूमायन्ते व्यपेतानि ज्वलंति सहितानि च । धृतराष्ट्रोल्मुकानीव ज्ञातयो भरतर्षभ ॥ ६० उद्योग, अ० ३६.

४ समृद्धैश्च न नन्दन्ति बांधवा बांधवैरपि ॥ ३७ वनपर्व, अ० २०८.

हृष्यन्ति व्यसनेष्वेते ज्ञातीनां ज्ञातयः सदा ॥ ३ ॥

रामायण, युद्ध. सर्ग १६.

होत असतो. त्यांस कितीही दिलेंघेतलें तरी त्यांचा संतोष व्हावयाचा नाहीं. कुत्र्याचें शेपूट सरळ करूं पाहणें आणि दायादांचें आराधन करणें, ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच अशक्य आहेत. सर्व आप्तवर्गांत दायाद हे सहजशत्रु गणले जातात, हे बाहेरून बंधुत्व दाखवितील, आणि आंतून केसानें गळा कापितील, यास्तव ह्यांचें साह्य नेहमीं संदिग्ध समजावें. व त्यांचा फाजील विश्वास कधींही धरूं नये. व्याही, जांवई, मेहुणे, व मामेभाचे ह्यांस वांटा घ्यावयाचा नसतो, यामुळें त्यांचें प्रेम द्रव्यपर नसतें, यास्तव त्यांस सहजमित्र ह्मटलें आहे.

सर्व प्रकारच्या मनुष्यबलांत मित्रबल विश्वसनीय खरें, पण तें निर्भेळ सांपडणेंच फार कठिण, त्यांत शाळूसोबत्यांची भेसळ झालेली फार असते. जरा चलतीचा काळ असला कीं पायलीचे पन्नास मित्र जमा होतात, पण तोच काळ फिरला कीं जाग्यावर एक देखील मिळावयाचा नाहीं. उपकार व प्रेम केलें, ह्मणजे सख्य तेव्हांच जोडलें जातें, यास्तव मित्र संपादन

१ नित्यमन्योन्यसंहृष्टा व्यसनेष्वाततायिनः । प्रच्छन्न हृदयाघोरा ज्ञातयस्तु भयावहाः ॥ ९ रामायण, युद्ध सर्ग. १६.

२ धनवन्तं हि मित्राणि भजन्ते चाश्रयन्ति च स्खलितार्थं पुनस्तानि संत्यजन्ति च बांधवाः ॥ ३९।४० उद्योग, अ० १३६.

करणें फारसें कठीण नाहीं, पण क्रोध, अविश्वास, व मनाचें चांचल्य, यांपासून तें राखणें कठिण आहे. दीर्घकालपर्यंत[1] टिकलेली मैत्री[2] फारशी पाहण्यांत येत नाहीं. कालाच्या स्थित्यंतरामुळें पुढें मित्रत्वांत विपर्यास होऊन, मित्रही अमित्र होण्याचा संभव असतो, याकरितां अति विश्वास टाकून त्यांना आपलें गुह्य निष्कारण सांगूं नये, व त्यांच्या अदक्षतेमुळें त्यांचें गुह्य आपणास कळलें तर तें हृदयांत ठेवावें. ह्या सांगण्याचा अर्थ मित्राशीं प्रतारणा करावी, असा समजूं नये. कारणाशिवाय आपलें गुह्य दुसऱ्यास न सांगणें, ही प्रतारणा नव्हे, केवळ दक्षता आहे. मित्राशीं प्रतारणा[3] व कपट करणें, हें अत्यंत अधमपणाचें कृत्य आहे. विश्वासू मनुष्यावर अगर मित्रावर अतिविश्वास[4] टाकूं नये, हें जरी खरें आहे, तरी अशा लोकांविषयीं अति-

---

१ सर्वथा सुकरं मित्रं दुष्करं प्रतिपालनं । अनित्यत्वात्तु चित्तानां प्रीतिरल्पेपि भिद्यते. ॥ ७ **रामायण, किष्किंधा सर्ग. ३२.**

२ नसख्यमजरं लोके हृदि तिष्ठति कस्य चित् । कालो ह्येनं विहरति क्रोधो वैनं हरत्युत ॥ ७ **आदिपर्व. अ० १३१.**

३ अमित्रं कुरुते मित्रं मित्रं द्वेष्टि हिनस्ति च । मिथ्याचरति मित्रार्थे यश्च मूढः स उच्यते ॥ ३६ ३८ **उद्योग, अ० ३३.**

४ न विश्वसेदविश्वस्ते विश्वस्तेनातिविश्वसेत् । विश्वासाभयमुत्पन्नं मूलान्यपि निकृन्तति ॥ ९ **उद्योग, अ० ३८.**

शंका[1] घेणें ही हानिकारक आहे, याकरितां तारतम्य पाहून वर्तन करीत असावें.

मित्राचें लक्ष आपल्या ठिकाणीं सदोदित रहावें, याकरितां आपल्या हातून जीं त्याचीं कामें होण्यासारखीं असतील, तीं सर्व एकदम करून टाकून त्यास अगदीं कृतकृत्य होऊं देऊं नये. कांहीं कामें नेहमीं शिल्लक[2] ठेवीत असावीं, ह्मणजे तो स्वकार्याकरितां आपल्या कच्छपीं राहतो.

द्रव्य[3], विद्या, वय, व स्वभाव इत्यादि गुणांत ज्यांचें साम्य असतें, त्यांचीच मैत्री घडते. असमांची मैत्री बहुधा होत नाहीं. दोघे सारख्याच स्वभावाचे किंवा दोघेही सारख्याच संकटांत पडलेले असले, तर त्यांचें सख्य दृढतर जमतें. स्वभावसाम्यामुळें दुर्योधनाचें व कर्णाचें, आणि सारख्याच अडचणीमध्यें असल्यामुळें रामचंद्राचें व सुग्रीवाचें सख्य जमून गेलें होतें, हें सर्व विश्रुतच आहे. याकरितांच ज्ञात्यांनीं " समानशील-

---

१ परस्वानां च हरणं परदाराभिमर्शनम् । सुहृदामतिशंका च त्रयो दोषाः क्षयावहाः ॥ २४ रामायण, युद्ध सर्ग. ८७.

२ नार्थिकोऽर्थिनमभ्येति कृतार्थे नास्ति संगतम् । तस्मात्सर्वाणि साध्यानि सावशेषाणि कारयेत्. ॥ ८० उद्योग. अ० १४२.

३ ययोरेव समं वित्तं ययोरेव समं श्रुतम् । तयोर्विवाहः सख्यं च नतु पुष्टविपुष्टयोः १० आदिपर्व, अ० १३३.

व्यसनेषु सख्यं " असें ह्मटलें आहे. कृतज्ञ[1], धार्मिक, सत्यवक्ते, थोर मनाचे, प्रेमळ, इंद्रियदमन करणारे, पायरीनें वागणारे, आणि कसाही प्रसंग आला तरी सोडून न जाणारे, जे मित्र तेच खरे मित्र ह्मणून समजावे.

संपत्काळ[2] असो किंवा विपत्काळ असो, कोणच्याही स्थितींत सोभत देऊन मित्र हाच आपला आधार, असें समजणाऱ्या मित्राकरितां धनदौलत[3] अथवा हवें तें खर्ची घालून त्याचा संग्रह करावा.

अति[4] गर्विष्ठ, मूर्ख, तामसी, अविचारी, आणि धर्मबाह्य वर्तन करणारे, अशा लोकांशीं मैत्री करूं नये. गुप्तगोष्ट[5] फोडणें, जें तें मागत सुटणें, निष्ठुरपणा करणें, धरसोडीचें वर्तन ठेवणें, रुष्ट होणें, खोटसाळपणा करणें,

---

१ कृतज्ञं धार्मिकं सत्यमक्षुद्रं दृढभक्तिकम्। जितेंद्रियं स्थितं स्थित्यां मित्रमत्यागि चेष्यते. ॥ ५१ उद्योग, अ० ३९.

२ आढ्यो वापि दरिद्रो वा दुःखितः सुखितोपि वा। निर्दोषश्च सदोषश्च वयस्यः परमा गतिः ॥ ८
३ धनत्यागः सुखत्यागो देशत्यागोपि वानघ। वयस्यार्थे प्रवर्तंते स्नेहं दृष्ट्वा तथाविधम् ॥ ९
} रामायण किष्किंधा. सर्ग. ८

४ अवलिप्तेषु मूर्खेषु रौद्रसाहसिकेषु च। तथैवापेतधर्मेषु न मैत्रीमाचरेद्बुधः ॥ ५० उद्योग, अ० ३९.

५ रहस्यभेदो याञ्चा च नैष्ठुर्यं चलचित्तता। क्रोधो निःसत्यता द्यूतमेतन्मित्रस्य दूषणं ॥ हितोपदेश.

आणि द्यूत ह्मणजे पैज मारून सोंगट्या वगैरे खेळणें, ह्या गोष्टी मित्रत्वास दूषणें मानलेलीं आहेत.

मित्राजवळ जें तें मागत सुटूं नये अथवा याचना करूं नये ह्मणून जें वर सांगितलें, तें त्यास लुबाडण्याची बुद्धि ठेवूं नये, हें सुचविण्याकरितांच फक्त आहे, त्यावरून मित्राजवळ असलेल्या वस्तूची आपणास फार जरूरी असतांही अभिमानानें ती त्याजवळ मागूं नये, असा अर्थ समजूं नये. उलटपक्षीं प्रसंगविशेषीं मित्राची चांचणी पाहण्याकरितां जरूर नसतांही एखादी वस्तु[१] मागून पहावी, ह्मणजे मित्राच्या स्वभावाची खोलीउंची ध्यानीं येते.

ज्यांशीं साशंक[२] वागावें लागतें, व ज्यांविषयीं रात्रंदिवस मनास दचका राहतो, तो मित्र कसला! पित्याप्रमाणें ज्यांवर विश्वास टाकितां येतो, तोच खरा मित्र. तसेंच ज्यांस आपल्या पासून कांहीं एक कार्यभाग करून घ्यावयाचा नसतो, व पूर्वींचा[३] कांहींएक संबंध न-

१ अर्थयेदेव मित्राणि सति वासति वा धने । नानर्थयन्प्रजानाति मित्राणां सारफल्गुताम् ॥ ४३ **उद्योग**, अ० ३६.

२ न तन्मित्रं यस्य कोपाद्बिभेति यद्वा मित्रं शङ्कितेनोपचर्यम् । यस्मिन्मित्रे पितरीवाश्वसीत तद्वै मित्रं संगतानीतराणि. ३७ **उद्योग**, अ० ३६.

३ यः कश्चिदप्यसंबद्धो मित्रभावेन वर्तते । स एव बन्धुस्तन्मित्रं सा गतिस्तत्परायणम् ॥ ३८ **उद्योगपर्व**, अ० ३६.

सतां जो आपल्याशीं प्रेम भावानें वागतो, तोच खरा मित्र, व तोच खरा हितकर्ता, त्याच्या अनुरोधानें आपण वागत असावें.

अशा प्रकारचे केवळ निरपेक्षबुद्धीनें व मनाच्या उदारपणामुळेंच बनलेले मित्र अनुचित गोष्टीस मर्जीचा कल पाहून रुकार देत नाहींत, साह्य करण्याची लटकी हमी भरून चढीस लावीत नाहींत. कडू लागेल ह्मणून खरें बोलण्यास भीत नाहींत, व वांकडें पाऊल पडत असतां शेंडी धरून मागें ओढण्यास कचरत नाहींत, असे जिव्हाळ्याचे व सन्मार्ग दर्शक मित्र ज्यांस सुदैवानें लाभतात, त्यांस विजय व लक्ष्मी हात जोडून वश होत असतात.

सेवकबलाविषयीं पूर्व प्रसंगीं बऱ्याच विस्तारानें विचार झालेलाच आहे, तथापि प्रस्तावक्रमाचा भंग न व्हावा ह्मणून येथें तत्संबंधें थोडेंसें विवरण करितों.

सेवक तीन प्रकारचे असतात, पहिले हंगामी, दुसरे वेतनी, व तिसरे वतनी. जे नोकर कार्य उपस्थित झाल्यावर तेवढ्याच कामाकरितां ऐत्या वेळेस गोळा केलेले

---

१. आकेशग्रहणान्मित्रमकार्यात्संनिवर्तयन् । अवाच्यः कस्यचिद्भवति कृतयत्नो यथा बलम् ॥ १२ उद्योग. अ० ९३

किं दानमनाकांक्षं, किं मित्रं यन्निवर्तयति पापात् (प्रश्नोत्तरमाला श्रीमच्छंकराचार्य.)

असतात ते हंगामी होत. हे सर्वांत निःकृष्ट. ह्यांत बहुधा " मोलें घातलें रडाया, नाहीं असूं आणि माया." अशा प्रकारचेच फार असतात, यास्तव त्यांविषयीं येथें कांहीं विशेष सांगावयाचें नाहीं. दुसरे वेतनी, हे वर्तमानकाळीं किंवा भविष्यत्काळीं कार्य उपस्थित झालें असतां तत्काल कामीं पडावे ह्मणून, आधींपासून पगार देऊन ठेविलेले नोकर होत. ह्यांस पगारी नोकर असेंही ह्मणतात. हे मध्यम समजावे. तिसरे वतनी, ह्मणजे ज्यांस नोकरी-करितां कांहीं स्वास्थ्य अगर वतन करून दिलें असून, त्याचा जे वंशपरंपरेनें उपभोग घेत व सेवा करीत आले असतात, ते होत. ह्यांस मौल असेंही ह्मणतात. हे सर्वांत उत्तम व विश्वसनीय समजावे. ह्या द्विविधप्रकारच्या सेवकांच्या ठायीं, खालीं सांगितलेला गुणसमुच्चय जसा असेल, त्या मानानें लहानमोठ्या कामावर त्यांची योजना करावी.

जे[1] धन्याचें महत्कार्य करूनही मर्यादशीलपणानें

(खालील राजसेवकांच्या लक्षणावरून सर्व सेवकांविषयीं तोच विचार ध्यानीं आणावा.

१ यः कृत्वा सुकृतं राज्ञो दुष्करं हितमुत्तमम् । लज्जया वक्ति नो किंचित् तेन राजा सहायवान् ॥ योनाहूतः समभ्येति द्वारि तिष्ठति सर्वदा । पृष्टः सत्यं मितं ब्रूते स भृत्योऽर्हो महीभुजाम्. ॥ अनादिष्टोपि भूपस्यदृष्ट्वाहानिकरंच यः । यतते तस्य नाशाय स भृत्योऽर्हो महीभुजाम् ॥ न क्षुधा पीड्यते यस्तु निद्रया तु न कर्हिचित् । न च शीतातपाद्यैश्च स भृत्योऽर्हो महीभुजाम् ॥ — पंचतंत्रम्.

तोंडावाटे बढाईचा चकारशब्द काढित नाहींत, जे धन्यापुढें सत्य व मितभाषण करितात, ज्यांस धन्याचें कांहीं नुकसान होत आहे, असें दिसून आल्याबरोबर जे हुकुमाची वाट न पाहतां, त्या नुकसानीचें निवारण करण्यास झटतात, आणि स्वामिकार्याकरितां भूक, तहान, थंडी, व श्रम यांची गणना बिलकुल करीत नाहींत, तेच खरे कार्यकर्ते सेवक, बाकीचे सारे पोटभरू होत. हे जोंपर्यंत श्रमसायासाची वेळ आली नाहीं, तोंपर्यंत ढेंकर येई तों खातील, आणि आणीबाणीची वेळ आली कीं सोडून जातील.

पिढीजादे कुलीन सेवक, स्वामीकडून अपकार झाला असतांही, खाल्लेल्या अन्नाची जाण विसरत नाहींत. अशा कुलीन सेवकांनीं पूर्व अपकार न आठवितां, प्रसंगीं आपला जीव धोक्यांत घालून स्वामीचें रक्षण केल्याची इतिहासप्रसिद्ध अनेक उदाहरणें आहेत.

शिवाजीमहाराजांच्या परमकृपेंतले सेवक बाळाजी आवजी चिटणीस व त्यांचे बंधु शामजी आवजी, आणि वडील चिरंजीव आवजी बल्लाळ अशा त्रिवर्गांस, कलुशा नामक हलकट मनुष्याच्या चिथावणीवरून, संभाजीमहाराजांनीं हत्तीच्या पायीं दिलें, तरीही बाळाजी आवजींचे दुसरे चिरंजीव खंडो बल्लाळ यांनीं मनांत अपकाराची आ-

ठवण न धरितां, ते संभाजीमहाराज गोंव्यावर स्वारी करून जात असतां, त्यांच्या स्वारीमागून पायउतारा जात होते, इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें त्याच वेळीं मदनगडाहून कांहीं राजकारणी पत्रें आलीं, त्यांचा जाब लिहून देण्यास कोणी स्वारी समागमें लिहिणारा आहे काय ? ह्मणून संभाजीमहाराजांनीं जवळच्या शिपाईप्याद्यांस विचारलें, तेव्हां त्यांनीं उत्तर केलें कीं, चिटणिसांचे चिरंजीव स्वारी समागमें पायउतारा धावत येत आहेत. ते समयीं संभाजीमहाराजांनीं खंडो बल्लाळ यांस हांक मारवून पत्राचे जाब लिहिण्यास आज्ञा केली, त्या काळीं तत्क्षणींच जमीनीवर बसून चिटणिसांनीं जाब लिहिले. इतक्यांत सरकारस्वारी बरीच पुढें गेली होती, तरी त्यांनीं धांवत जाऊन सरकारच्या हातची मोहरनिशाणी पत्रांवर करून तीं जिकडच्या तिकडे रवाना केलीं. परंतु धावण्याचे श्रम जिवापरते झाल्यामुळें ते तेथेंच रक्तांची[1] गुळणी ओकून पडले. हें पाहून संभाजीमहाराजांनीं त्यांस पाणी प्यावयास देऊन स्वारीस घोडाही दिला. अशा रीतीनें सरकारस्वारी समागमें घोड्यावर

---

१ कुलीनाः शौर्यसंयुक्ताः शक्ता भक्ताः क्रमागताः । ते तु संमानमात्रेण प्राणैरप्युपकुर्वते ।। पंचतन्त्रम्. मल्हाररामरावकृत संभाजीमहाराजांचे चरित्र पान १३।१४ पहा.

बसून जात असतां, थोड्याच वेळानें स्वारी गोंव्याजवळ खाडीच्या तीरीं येऊन दाखल झाली. त्यावेळीं खाडीस भरती होती, तरी संभाजीमहाराजांनीं विचार न करितां पाण्यांत घोडा घातला. त्याबरोबर चिटणीसानींही पाण्यांत घोडा घालून स्वामींची पाठ सोडिली नाहीं. घोडीं पोहणीस लागल्याबरोबर खंडो बल्लाळ यांनीं पोहत जाऊन स्वामींस घोड्यासहवर्तमान पैलतीरास संभाळून नेलें. ते समयीं संभाजीमहाराजांनीं खंडो बल्लाळ यांस पोटाशीं धरून ह्मटलें कीं, आह्मीं हलक्या माणसांच्या सांगण्यावरून आपल्या वडिलांस मारलें, हें आमच्यापासून मोठें गैर झालें, परंतु त्यास आतां उपाय नाहीं.

पुढें संभाजीमहाराजांचा अवरंगजेबाच्या हातून शेवट झाल्यावरही, खंडो बल्लाळ यांनीं अनेक संकटें भोगून स्वामीसेवेची निस्सीमता दाखविली, ती कोठवर वर्णन करावी. थोरले राजारामसाहेब अवरंगजेबाच्या उपद्रवामुळें वेष पालटून चंदीस जात असतां, कर्नाटक प्रांतीं एक्या गांवीं यात्रेकरूंच्या वेषानें उतरले होते. तेथें पाय धुतांना महाराजांच्या पायांवर बरोबरची मंडळी पाणी घालीत होती, हें त्या गांवांतील लोकांनीं पाहिलें, तेव्हां ते आपसांत कानडी भाषेंत बोलूं लागले कीं, हे यात्रेकरू

कापडी लिंगाईत इत्यादिकांप्रमाणें दिसतात खरे, परंतु ते कोणीतरी मोठे लोक असावेत. हें त्यांचें भाषण, महाराजांकडील कोणी एका इसमास कानडी येत होतें, त्यानें ऐकिलें. तेव्हां खंडो बल्लाळ यांनीं संताजी घोरपडे, धनाजी जाधव, व खंडेराव दाभाडे इत्यादि बरोबरच्या मंडळीस सांगितलें कीं, या गांवीं मोंगलांची चौकी आहे, त्या चौकीवाल्यांच्या कानीं हा गांवकऱ्यांनीं केलेला अंदाज गेला कीं, मोंगलांचें धरणें येईल, याकरितां, तुह्मी सर्वजण महाराजांस घेऊन या क्षणीं वाट फुटेल तिकडे चालते व्हा, आह्मी थोडच्या लोकांसहवर्तमान तळावर राहतों, ह्मणजे तुमचा पाठलाग होणार नाहीं. ही मसलत सर्वांस मान्य होऊन महाराज व कांहीं मंडळी ताबडतोब निघून गेली. इतक्यांत मोंगलांचें धरणें आलें. त्यांनीं खंडो बल्लाळ व इतर तळावर राहिलेल्या इसमांस राखेचे तोबरे देऊन चाबकांनीं फोडून काढिलें, तरी कोणी कबूल आला नाहीं.[१] दुसरे लोक कोठें गेले ह्मणून विचारतां, त्यांस जाणें होतें तिकडे गेले, आह्मांस दुसरीकडे जाणें, सबब आह्मी राहिलों, असें सांगितलें. तेव्हां हे यात्रेकरूच आहेत, अन्य कोणी असते तर, मारझोडीनें

---

१ मल्हार रामरावकृत थोरले राजारामसाहेब यांचें चरित्र पान २९ पहा.

कबूल झाले असते, असें समजून मोंगलांकडील लोकांनीं त्यांस सोडून दिलें. पुढें चंदी मुक्कामीं सर्व एकत्र जमल्यावर तेथील किल्याच्या आश्रयानें राहून चंदीचंदावरच्या राज्याचा व स्वदेशाचा बंदोबस्त राजारामसाहेब करूं लागले. चंदीचंदावर प्रांत शहाजीमहाराजांपासून मराठ्यांच्या ताब्यांत होता, हें वाचकांस माहित असलेच. हें पाहून अवरंगजेबानें विचार केला कीं, मराठ्यांस महाराष्ट्रांतून हाकून दिलें. तरी ते कर्नाटक प्रांतीं बळ धरून काबीज केलेल्या मुलुखास उपद्रव करितात, हें ठीक नाहीं. त्यांचें खूळ अज्जीबात मोडल्या शिवाय राज्यांत स्वस्थता राहणें अशक्य आहे. यास्तव त्यानें आपला सरदार झुल्फिकारखान या समागमें बहुत सैन्य देऊन त्याकडून चंदीच्या किल्ल्यास वेढा देवविला. वेढ्यांत राजारामसाहेब कबिल्यासहवर्तमान कोंडले गेले. बाहेर पडण्यास सवड मिळेना. लढाई द्यावी तर मोंगलांच्या अफाट सैन्याशीं आपल्या थोड्या लोकांचा निभाव लागणार नाहीं, तेव्हां सर्व मुत्सदी मिळून विचार करितां, खंडो बल्लाळ चिटणीस यांनीं राजकारण सिद्ध करण्याची तजवीज काढिली. मोंगलांकडील लष्करांत राणोजी शिर्के या नांवाचे सरदार दहापांच हजार फौजेनिशीं झुल्फिकारखान याच्या मदतीस होते, त्यांकडे किल्ल्याच्या

नैर्ऋत्यबाजूकडील चौकी पहारा होता. हे शिर्के शिवाजीमहाराजांचे पूर्वीचे आश्रित व आप्त आणि जातीनें मराठे आहेत, प्रसंगीं त्यांचा उपयोग झाला तर होईल, असा विचार करून चिटणीस मध्यरात्रीच्या सुमारास पाळण्यांत बसून किल्ल्याच्या तटाखालीं उतरले, आणि जिवाची आस्था न धरितां शिर्के यांच्या गोटांत शिरले, विचारपूस झाली त्या प्रसंगीं, खाशांच्या परिचयाचे आहोंत, भेट घेऊन परत जाण्याची त्वरा आहे, असें सांगून त्यांनीं शिर्के यांची गांठ घेतली, व येण्याचा आशय सुचविला. त्यांनीं प्रथमतः चिटणिसांचें ह्मणणें अमान्य करून उत्तर केलें कीं, आह्मी भोसल्यांचे आप्त असून थोरल्या महाराजांपासून एकनिष्ठपणें सेवा करीत असतां, संभाजीमहाराजांनीं निष्कारण निकर करून आमचे सर्व पुरुष मारले, व आमचा कुळक्षय करण्याचा इरादा धरला. आह्मी बादशहाची नोकरी संपादून जीव बचावून राहिलों, त्या अर्थी भोसल्यांचें कूळ नष्ट झालें तरी वावगें नाहीं, आह्मांस तें इष्टच आहे. तेव्हां चिटणिसांनीं त्यांची बहुतच समजावणी करून सांगितलें कीं, आपले पुरुष संभाजीमहाराजांनीं मारिले, त्याप्रमाणें आमचेही तीन पुरुष कांहीं अपराध नसतां मारिले, तथापि मराठ्यांच्या

राज्यास आह्मी जिवापाड जपतच आहों. आपण तर महाराजांचे आप्तच आहां. यासमयीं थोरपणा केल्यास आपली कीर्ति होऊन स्वराज्य बचावेल. हें ऐकून शिर्के ताळ्यावर आले, आणि ह्मणाले कीं, तुह्मांस थोरल्या महाराजांनीं दाभोळच्या देशमुखीचें वतन दिलें आहे, तें आपण आह्मांस घाल, तर आह्मीं आपलें ह्मणणें मान्य करून, राजारामसाहेबांस किल्ल्यांतून निघून जाण्यास मार्ग देऊं. आह्मी मराठे आहों, मराठी राज्य कसेंही सुटावें व वृध्दीस जावें, हेंच आह्मांस श्रेयस्कर आहे. पुढें परंपरेनें कार्यास तेच येतील. मुसलमान आमचे कार्यास किती दिवस येणार! ह्यावर चिटणीसांनीं उत्तर केलें कीं, स्वामी कार्याहून वेतन काय जास्त आहे, आह्मांस स्वामीहून जीवितही अधिक नाहीं. स्वामीचे पाय हेच आमचे सर्व अर्थ आहेत. अशा रीतीनें राजकारण सिध्द झाल्यावर शिर्के यांस दाभोळच्या वतनाच्या सनदा करून देऊन, एके दिवशीं रात्रीं चिटणिसांनीं राजारामसाहेबांस किल्ल्यांतून गुप्तरूपें काढून सुरक्षितपणें स्वदेशीं आणिलें, व पुन्हां स्वराज्याचा बंदोबस्त केला.

वरील गोष्टीवरून पिढीजादे व कुलीन सेवक अपकार न आठवितां उपकारच स्मरतात, हें स्पष्ट दिसून येतें. फार काय सांगावें, त्यांचे पुत्रपौत्र देखील अन्नाची

क्रिया धरून स्वामीकार्यास आपला देह खर्ची घालण्यास मागें घेत नाहींत.

तसेंच मनुष्यबळ अल्प कां असेना, पण तें निवडक व कार्यधुरंधर असावें, ह्मणूनच " **वरमल्पबलं सारं न कुर्यान्मुंडमंडलिम्** " असें ज्ञात्यांचें ह्मणणें आहे. कार्यकर्तीं थोडीं माणसें चांगलीं, खोगिरभरती बाजारबुणगें पुष्कळ असून काय उपयोग !

शिवाजीमहाराजांनीं अफझुलखानाचा वध केल्यानंतर त्याचा मुलगा फाजलखान, यानें विजापूरच्या बादशहापाशीं, माझ्या बापाचा सूड घ्यावा, ह्मणून आग्रहपूर्वक विनंती केली, यावरून बादशहानें फाजलखान व शिद्दी बिलावलखान यां समागमें ऐशींहजार फौज व तोफखाना वगैरे शिलेपोस सरंजाम देऊन त्यांस शिवाजीवर रवाना केलें. त्या फौजेनें महाराज पन्हाळगडावर असतां किल्ल्यास वेढा दिला, तेव्हां त्रिंबकराव इंगळे यांनीं महाराजांस सुचविलें कीं, आपण किल्ल्यांत कोंडलें राहूं नये. बाहेर पडून शत्रूच्या फौजेस उपसर्ग देत रहावें. ही पोक्त सूचना महाराजांच्या ध्यानीं आली, व त्यांनीं रात्रीच्या वेळीं तीस चाळीस हजार मावळे समागमें घेऊन किल्ला सोडिला. परंतु ही बातमी फाजलखान यास लागली, व त्यानें रात्रीचा समय ह्मणून चंद्रज्योतीचा प्रकाश

करून सैन्यासहवर्तमान महाराजांचा पाठलाग केला. उजाडण्याच्या सुमारास विशाळ गडानजीक एक्या खिंडीजवळ महाराजांच्या लोकांची व विजापूरकरांच्या फौजेची गांठ पडली. तेव्हां महाराजांसमागमें बाजी परभू या नामें मोठा शूर धारकरी होता, त्यास महाराजांनीं हाक मारून विचारलें कीं, आतां कसें करावें ? ते समयीं परभू यांनीं उत्तर केलें कीं, स्वामींनीं बेफिकीर विशाळगडावर जावें, व तेथें पोंचल्यावर इशाऱ्याच्या तोफा कराव्या. तोफांचे आवाज ऐकूं येईतों, शत्रूच्या सैन्यास ही खिंड चढूं देत नाहीं. स्वामिकार्यास देहपतन पावला तर मुलालेकरांस अन्न देणार स्वामींचे पाय समर्थ आहेत. स्वामींनीं या अफाट बाजारबुणग्याचा वचक मनीं बिलकुल न धरावा. हें परभू यांचें हिंमतीचें भाषण ऐकून, महाराजांनीं त्यांसमागमें निवडक पंधरावीस हजार लोक ठेविले, व बाकीच्या लोकांनिशीं ते विशाळगडाकडे चालते झाले. मागें बाजी परभू यांनीं खिंड रोखून मोठ्या जहामर्दीनें शत्रूस एक पाउलही पुढें टाकूं दिलें नाहीं. ही लढाई मोठ्या शर्तीची झाली. व तींत बाजी परभू यांस जखमा लागून ते रणांत पडले, तरी ते आपल्या लोकांस आश्वासन देतच होते. इतक्यांत किल्यावरून तो-

फांचे आवाज ऐकूं आले, ते कानीं पडतांच बाजी परभू ह्मणाले, आतां हा जीव गेला तरी चिंता नाहीं. खाविंद गडावर सुरक्षित पोंचले, येणें करून मी समाधान पावलों. तोफखान्यासहवर्तमान शिलेपोस सरंजामानिशीं पाठीस लागलेल्या ऐशीं हजार फौजेचें परभू यांच्या पंधरावीस हजार सडच्या शिपायांनीं कांहीं चालू दिलें नाहीं. यावरून बलिष्ठ व निवडक असें मनुष्यबल अल्प असलें, तरी तें खोगिरभरती प्रचंड जमावासही भारी[2] असतें, ही गोष्ट सिद्ध होते.

उद्भवलेल्या विरोधाचें परिमार्जन करण्यासाठीं सम्यक् उपायांची योजना करितां यावी, ह्मणून स्वपरबलाबल फार बारकाईनें पहावें लागतें, असें पूर्वप्रकरणीं सांगितलें होतें, तदनुरोधानें प्रस्तुत प्रकरणांत स्वपरबलाचा तारतम्यभाव कोणत्या विचारांवर ध्यानीं आणावा, हें सांगितलें. पुढील प्रकरणांत शत्रु व त्यांची प्रतिक्रिया या विषयीं विवरण करावयाचें योजिलें आहे.

प्रकरण तिसरें समाप्त.

---

१ मराठी साम्राज्याची छोटी बखर पान २७ पहा.

२ वरमल्प बलंसारं न कुर्यान्मुंडमंडलिम्। कुर्यादसार भंगो हि सारभंगमपिस्फुटम्. ।। हितोपदेश.

प्रकरण चौथें.

शत्रु व त्यांची प्रतिक्रिया.

हेर व त्यांचे प्रकार-गुप्तहेर (चार), प्रकट हेर (दूत), निसृष्टार्थदूत (वकील), मितार्थदूत (हेजीब), वार्ताहरदूत (जासूद), शत्रु व त्यांचे प्रकार-उच्छेद्य शत्रु, पीडनीय शत्रु, कर्षणीय शत्रु, बाहिरायात शत्रु, वैरनिर्यातनाचे उपाय-साम, दान, भेद, निग्रह, गृहस्थास शस्त्रयुद्ध अविहित, गृहस्थांस खडर्यांची लढाई मात्र उचित, सामान्य विचार.

परपक्षाकडील भेद घेण्यास योजावयाच्या हेरांचे दोन प्रकार असतात. पहिला प्रकार गुप्तहेर, यांस चार किंवा प्रणिधी असें ह्मणतात. यांनीं नानातऱ्हेच्या वेषांनीं व बहाण्यांनीं आपलें स्वरूप प्रकट होऊं न देतां, शत्रूच्या आसमंतात् राहून त्या कडील खडानखडा बातमी आपले योजकास देत असावी, हें ह्यांचें काम आहे. वास्तविक ह्मटलें तर इतकें नाजूक काम ज्याचें त्यानेंच सावधपणानें करावें, हें खरें. परंतु " **शंकाभिःसर्वमाक्रान्तम्** " हा विचार ध्यानीं आणिला ह्मणजे ह्या कामाची स्थलमर्यादा फार विस्तृत आहे, अशी खात्री होऊन तें आपलें आपण करणें, ह्मणजे गगनाला गवसणी

घालण्यासारखें अशक्य आहे, असें स्पष्ट समजून येतें. यास्तव निरुपायामुळें त्या कामावर हेरांची योजना करणें भाग पडतें.

शंकास्थानीं जे हेर योजावयाचे ते एकाहून जास्त, निदानपक्षीं चार पांच तरी असावे, ह्मणजे त्यांच्या सांगण्याचा पडताळा घेतां येतो, व याचकरितां त्यांची एकमेकांस दख्खलगिरी नसावी. त्या पैकीं प्रत्येकास मी धन्याच्या विश्वासांतला, व मजहून अन्य मनुष्यावर त्याचा विश्वास नाहीं, असें वाटत असावें, ते मोठे स्वामिभक्त, कार्यदक्ष, गुणी, चतुर, निर्व्यसनी, शांत, दुसऱ्याचें हृद्गत नुसत्या मुद्रेवरूनही जाणणारे, नानाविध वेषांनीं व अनेक निमित्तें योजून परपक्षाकडे पायरव ठेवणारे, भोळसटपणाचें ढोंग करून वागणारे, समयोचित भाषणें करून शत्रूच्या पोटांत शिरणारे, व वेतनादि रूपानें त्यांकडूनही द्रव्य उपटणारे, असे[1] असावे. वर सांगितलेल्या गुणांनीं युक्त असे जे हेर, तेच कार्यसाधक होतात. जे हेर श्रमसायासास कंटाळणारे, देशकालाविषयीं धोरण न ठेवितां वागणारे, शहाणपणाच्या घमेंडींत राहणारे व आळशी असतात, ते बहुतेक सिद्ध

---

१ प्रणिधींश्च ततः कुर्यात् जडांधबधिराकृतीन्। पुंसः परीक्षितान् प्राज्ञान्क्षुत्पिपासाश्रमक्षमान् ॥ शान्तिपर्व.

होत आलेल्या कार्याचीही घाण करितात, याकरितां अशा नाजुक कामीं योजिलेलीं माणसें फारच अजमावून हाताशीं धरिलीं पाहिजेत.

हेरांची योजना केवळ बाह्य शत्रूंवरच करून स्वस्थ बसूं नये. कुटुंबनायकास आणि प्रजानायकास बाह्यशत्रू-प्रमाणें अंतःशत्रुही पुष्कळ असतात, ह्यास्तव त्यांची योजना आपले दाईज, मित्र, व सल्लामसलतगार[1] यांवरही असावी. ही मंडळी स्वजन समजून त्यांविषयीं बेफिकीर राहणें योग्य नाहीं. कारण, पुत्रकलत्रादिकांपासूनही पुष्कळांस अपकार झाल्याचीं अनेक उदाहरणें दृष्टीस पडतात.

हेरांचा दुसरा प्रकार प्रकट हेर ह्मणजे दूत हा होय. दूतांतही निसृष्टार्थदूत, मितार्थदूत, व वार्ताहरदूत असे तीन पोटभेद आहेत. जे दूत शिष्टाई करण्यास, तहाचें बोलणें लावण्यास, किंवा नेहमीं विरुद्धपक्षाच्या सन्निध राहून वकिलातीचें काम करण्यास योजिले असतात, ते निसृष्टार्थदूत समजावे. ह्यांस स्वाम्यर्थसाधनाकरितां प्रसंगविशेषीं धन्याच्या वतीनें थोडें मुकत्यारीनें बोलण्याचा

---

१ अमात्येषु च सर्वेषु मित्रेषु विविधेषु च । पुत्रेषु च महाराज प्रणिदध्यास्समाहितः ॥

पुरे जनपदे चैव तथा सामंतराजसु । यथा न विद्युरन्योन्यं प्रणिधेयास्तथा हि ते ॥ शान्तिपर्व, अ० ६९.

अधिकार असतो. श्रीकृष्णानीं कौरवसभेंत पांडवांतर्फे जें दूतत्व केलें, तें अशाच प्रकारचें होतें. धर्मराजानें, त्यांस बरें दिसेल तें आपण बोलावें, अशी मुकत्यारी दिली होती, ही गोष्ट सर्वांस विदितच आहे.

असेच गोविंदराव काळे, हे पेशव्यांच्या तर्फे हैदराबादेस निजामअल्लीखां यांचे दरबारीं वकील होते, त्यांच्या समक्ष, मोंगलाचे दिवाण मश्रुन्मुलुख यांनीं तमाशा करवून भर दरबारांत सवाईमाधवराव व नानाफडणीस यांचीं सोंगें आणविलीं. ते समयीं काळे यांनीं पेशव्यांच्या इतल्याशिवाय आपल्या मुकत्यारीनें निजामअल्लीखां सारख्या राजपुरुषाशीं प्रतिज्ञापूर्वक जरबीचें भाषण केलें, व पेशव्यांनींही सेवकाचा अभिमान धरून त्या भाषणाची निभावणी केली, ह्या दोन्ही गोष्टींपासून अनेक प्रकारचे बोध घेतां येण्यासारखे आहेत. हें काळे यांचें भाषण स्वामिप्रभाव दर्शित करणारें, समयोचित, निर्भय असूनही विनीत, व करारीपणाचें कसें होतें, याचा मासला सर्वांस कळावा ह्मणून तें येथें उतरून घेणें, आह्मांस बरें वाटतें.

गोविंदराव[1] काळे निजामअल्लीखांस ह्मणाले, " हा

---

१ पेशव्यांची बखर, काशिनाथ नारायण साने यांनीं प्रकाशित केलेली. आवृत्ति चौथी पान १६९ पहा.

राजदरबार आहे. येथें आमच्या खावंदांचीं सोंगें आलीं. आतां आमची येथें बसण्याची मजा नाहीं. आपणही आह्मांस आमच्या खावंदांप्रमाणेंच आहां. आह्मांस बसावयास आग्रह करूं नये. आतां या कचेरींत आह्मीं सर्वांं देखतां सरकारास अर्ज करितों एवढा समजून ठेवावा. आमचे खावंदांचीं सोंगें आपण तमाशांत आणविलीं, आणि लोकांस दाखविलीं, याचें उसनें आपलेकडील दिवाण वगैरे मंडळी पुण्यांत नेऊन व दारोदार फिरवून लोकांस दाखवूं, हें पक्कें समजून ठेवावें. आह्मी असें करून दाखवूं तरच गोविंदराव काळे होऊं. यांत अंतर व्हावयाचें नाहीं. ”

वरील उताऱ्यावरून निसृष्टार्थदूतांस अल्पमर्यादेपर्यंत स्वामीच्या तर्फें मुकत्यारीनें बोलण्याचा अधिकार असतो, हें ध्यानीं येईल, व ह्या विशिष्ट अधिकारामुळें ते सर्व प्रकारच्या दूतांत श्रेष्ठ समजावयाचे, ह्यांस मराठी भाषेंत वकील ही संज्ञा आहे.

दूतांचा दुसरा पोटभेद मितार्थदूत ह्मणून आहे, ह्यांस मराठी भाषेंत हेजीब असें ह्मणतात. हे स्वामींनीं जितकें सुचविलें असेल तितकेंच विरुद्ध पक्षास स्वमुखें निवेदन करितात, ह्मणून ते केवळ निरोप्ये समजावे. अफझुलखानाकडून शिवाजीमहाराजांकडे संदेश घेऊन

आलेले [1] कृष्णाजी भास्कर, व महाराजांकडून अफझुलखानाकडे उलट संदेश घेऊन गेलेले दत्ताजी गोपिनाथ, हे मितार्थदूत होत. हे अधिकारदृष्ट्या मध्यम दर्जाचे गणले जातात.

तिसरा पोटभेद वार्ताहर दूत, हे विरुद्ध पक्षाकडे लिखितपत्रें पोंचविण्याच्या कामावर योजिलेले असतात. ह्यांस मराठी भाषेंत जासूद असें ह्मणतात. हे सर्वांत कनिष्ठ दर्जाचे समजावे. मागें उत्तम, मध्यम, व कनिष्ठ असे जे दूतांचे त्रिविध प्रकार सांगितले, ते त्यांस नियुक्त केलेल्या अधिकाराच्या तफावतीनेंच झालेले आहेत, त्यांच्या बुद्धिमत्तेच्या तफावतीनें झालेले नाहींत. कारण, हे तिघेही अत्यंत बुद्धिमान[2] व अनेक गुणांनीं युक्त असे असावे लागतात. शिवाजीमहाराजांजवळ बहिरजी नाईक ह्मणून एक जासूद होता, त्यास त्याच्या पेशामुळेंच जासूद म्हणावयाचें, एरव्ही पाहूं गेलें तर तो महाराजांच्या श्रेष्ठ मसलतगारांपैकीं एक इसम

---

१ मराठी साम्राज्याची छोटी बखर, काव्येतिहास संग्रहांत छापलेली पान २२ पहा.

२ दूतं चैव प्रकुर्वीत सर्वशास्त्रविशारदं । इंगिताकारचेष्टज्ञं शुचिं दक्षं कुलोद्गतं ॥
अनुरक्तः शुचिर्दक्षः स्मृतिमान्देशकालवित् । वपुष्मान्वीतभीर्वाग्मी दूतो राज्ञः प्रशस्यते ॥ } मनु.

होता. हा जातीचा बहुरूपी असल्यामुळें नानाविध वेषांनीं संचार करण्यास योग्य आहे, असें जाणून महाराजांनीं त्यास जासूदगिरिच्या कामावर योजिलें होतें. या गोष्टीवरून महाराजांच्या योजकतेची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच होते.

या तिन्ही प्रकारच्या दूतांस, वर सांगितलेलें प्रकट रीतीनें करावयाचें काम करूनही, शत्रूकडील नाजूक व गुप्त मसलतींचा शोध ठेवावयाचा असतो. शत्रूच्या हालचालीवर लक्ष ठेवणें, इंगितानें अंतर्गत मसलती ताडणें, व साधल्यास शत्रूच्या कार्यकारी माणसांत फितूर करणें इत्यादि गोष्टीही त्यांच्या मुख्य कामापैकींच असल्यामुळें त्यांस हेर ही संज्ञा योग्यच आहे.

वर सांगितलेल्या सर्व प्रकारच्या हेरांच्या द्वारें शत्रूचें बलाबल निश्चित झाल्यावर, शत्रू कोणच्या प्रकारचा आहे, हें ध्यानीं आणावें, आणि तदनुरूप वैरनिर्यातनाच्या योग्य उपायांची योजना करावी.

कुटुंब हें छोटेखानी राज्यच समजलें जातें, म्हणून कुटुंबव्यवहाराचीं व राज्यव्यवहाराचीं मूलतत्वें साधारणपणें सारखींच असतात हें खरें, तथापि त्यांत तफावतही बरीच असते. गृहाधिपतीला प्रजाधिपतीइतकें स्वातंत्र्य, सामर्थ्य, व द्रव्यानुकूल्य नसतें, एकाचा अ-

धिकार फारच संकुचित असतो, व दुसऱ्याचा अतिविस्तृत असतो, या वैगुण्यामुळें त्या दोघांच्या व्यवहारांत कांहीं भिन्नत्व असणारच, यास्तव तें भिन्नत्व ध्यानीं आणून पुढील विवेचनांतील तात्पर्यार्थावर लक्ष द्यावें, केवळ शब्दार्थावर भिस्त ठेवूं नये.

शत्रु हे उच्छेद्य, पीडनीय, कर्षणीय, व बहिरायात असे चार प्रकारचे असतात. अंगीं पराक्रम नाहीं, आप्त सोयरे व सेवक ह्यांचें साह्यही जितक्यास तितकेंच, द्रव्यबलही यथा तथा, असा बलहीन शत्रु उच्छेद्य समजून त्याचें समूळ उत्पाटन करावें. त्यासहवर्तमान सहसा संधी करूं नये. कारण, मित्रही एकवार वैर करण्यास सिद्ध झाला असतां त्याशीं देखील तडजोड करून संधी करणें, ह्मणजे मृत्यूलाच[2] बोलावून आणण्यासारखें आहे, मग वैऱ्याविषयीं जास्त काय सांगावें.

तसेंच आपणाहून जो बलिष्ठ, ज्याशीं सामना देऊन लढाईस उभें राहिलें असतां, आपला निभाव लागणार नाहीं, नाशच होईल, असा जो शत्रु तो पीडनीय समजून त्याशीं साक्षात् सामना न देतां, संधी

१ हीयमानेन कर्तव्यो राज्ञा संधिः समेन च । न शत्रुमवमन्येत ज्यायान्कुर्वीत विग्रहम् ॥ १० ॥ **रामायण. युद्ध. सर्ग ३५.**

२ सकृद्दुष्टं तु यो मित्रं पुनः संधातुमिच्छति । स मृत्युमेव गृह्णाति गर्भमश्वतरीयथा ॥ **हितोपदेश**

सांपडली कीं त्यास उपद्रव करून त्रस्त करून सोडावें. " बलिनासह योद्धव्यमिति नास्ति निदर्शनम् " इत्यादि वचनें बलिष्ठाशीं कलागत उकरून काढून आपण मुद्दाम संकटांत पडूं नये, हें सुचविण्याकरितांच आहेत. परंतु दुर्बलानें बलिष्ठाशीं आपण होऊन वैर न केलें, तरी दुर्बल हे बलिष्ठाचें उपजीवन असल्यामुळें पुष्कळ प्रसंगीं दुर्बलाचें बलिष्ठाशीं वैर उद्भवतेंच, यास्तव कलह उत्पन्न झाल्यावर भेकडपणा धरून व पूर्वोक्त एकदेशीय वचनावर भिस्त ठेवून उदासीन होऊं नये. वैराची प्रतिक्रिया करीतच असावी. आपणापेक्षां बलिष्ठ शत्रूस आपण निर्बल ह्मणून उच्छेद्य असतों, व तो आपणास निर्मूल करण्यास जरी बघत असतो, तरी तो आपणापासून वारंवार उपद्रव पावल्यामुळें जेर होऊन संधी करण्यास आर्त होतो. यास्तव बलिष्ठ शत्रूसही प्रथमतः कांहींसा नरम करून मग त्याशीं तहाचें बोलणें लावावें, व त्यांत कांहीं आपले अर्थ, व बरेचसे त्याचे अर्थ, करारांत आणून तह करावा. आणि सामर्थ्याची अनुकूलता होईपर्यंत कालयापन करावें, केवळ तह झाला ह्मणून स्वस्थ[१] बसूं नये. संधी

---

१. योऽरिणासहसंधाय शयीतकृतकृत्यवत् । स वृक्षाग्रे यथा सुप्तः पतितः प्रतिबुध्यते. ॥ ७६ ॥ आदिपर्व, अ० १४२.

केलेल्या शत्रूच्या पराभवाचीं साधनें मिळवीत राहून अनुकूल समय आला कीं, त्याचा उच्छेद करावा.

अवरंगजेबाचें राज्य मोठें, बल फार, व संपत्तीही अपार, यास्तव तो आपणास पीडनीय शत्रु आहे, उच्छेद्य नव्हे, असा विचार करून शिवाजीमहाराजांनीं होतांहोईल तों त्याशीं उघड सामना देण्याची टाळाटाळ केली, व ते त्यास गनीमी काव्यानें सतत वीस वर्षें एकसारखी पीडा देत राहिले. महाराजांच्या उपद्रवामुळें त्यास कधींही सुखाची झोंप घ्यावयास सांपडली नाहीं.

आतां कर्षणीय शत्रू कोणचे ते सांगतों. आपले दोन शत्रु जर ते परस्पर शत्रुत्वानें वागत असतील तर त्यांपैकीं जो आपणास विशेष बाधक नसेल, आणि ज्याचा नाश कालावधीनें झाला तरी चालण्यासारखें असेल, तो आपला कर्षणीय शत्रु समजावा. अशा शत्रूचा नाश तत्काल करितां येण्यासारखा असला तरी त्याचा नाश न करितां, फक्त त्यास तंबी देऊन व कृशबल करून राखून ठेवावा. कारण तहाच्या योगानें त्यास बगलेंत मारून आपणा उभयतांचा दुसरा जो बलिष्ठ शत्रु असतो, त्याचा समाचार घेण्यास त्यास तोंडाशीं देतां येतें.

तसेच आपले बंधुवर्ग व दाईज हे मत्सरानें किंवा गर्वानें आपणाशीं द्वेष करूं लागतील, परंतु सर्वस्वापहार,

विषप्रयोग, अगर अग्निप्रलय करून सर्वस्व नाश करण्यास उद्युक्त नसतील, तर तेही कर्षणीय शत्रु समजावे, उच्छेद्य समजूं नयेत. गोत्रज नाश करणें, हें रागानें आपलें मनगट आपणच चावून घेण्यासारखें आहे. यास्तव अशा शत्रूस फार वाढूं न देतां, क्षीणबल करून आपल्या लगामीं ठेवावें. समूळ नाश कधींही करूं नये. अस्वल हा प्राणी घातक आहे, तरी त्याच्या नाकांत नथनी घालून दरवेशी जसा त्यास आपल्या इच्छेनुरूप वर्तावयास लावितो, आणि त्यापासून आपणास उपयोग करून घेऊन त्याचाही निर्वाह चालवितो, गोळी घालून त्यास जिवें मारित नाहीं. तद्वत् बंधुवर्गादि कर्षणीय शत्रूंसही आपल्या नीतिबलानें स्वच्छंदानुगामी करून ठेवावें.

परंतु त्यांनीं आततायिता धारण केल्यास, अन्यविचार मनांत न आणतां समूळ नाश[१]च करावा. कौरवांनीं पांडवांचे ठायीं आततायिता धारण केल्यामुळें श्रीकृष्णांनीं त्यांचा समूळ नाश करण्याविषयीं पांडवांस अनुमोदन दिलें, व साह्यही केलें, ही गोष्ट सर्व विश्रुतच आहे.

---

१ आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन् । नाततायिवधेदोषो हन्तुर्भवति कश्चन ॥

पिता वा यदि वा भ्राता पुत्रो वा यदि वा सुहृत् । प्राणच्छेदकरा राज्ञा हन्तव्या भूतिमिच्छता ॥ मनु.

आतां [1]आततायी कोणास ह्मणावें तें सांगतों. आग लावणारा, विष घालणारा, शस्त्र उगारून अंगावर येणारा, सर्वस्व हरण करणारा, बायको काढून नेणारा, व शेतवाडी बळकावून बसणारा, असे सहाजण आततायी समजून त्यांस बेलाशक जिवें मारावें, अशीं स्मृतिवचनें आहेत. त्यांच्या हत्येमुळें त्यांचा वध करणारा दोषी होत नाहीं. परंतु हा विचार धर्मशास्त्रदृष्टच्या मात्र विहित आहे. प्रस्तुत काळच्या कायद्याच्या दृष्टीनें विहित नाहीं, हें सांगावयास नकोच.

क्षमा हें भूषण खरें, पण ती कोणास भूषणभूत होते, व कोणास दूषणभूत होते, हें नीतिज्ञ पुरुषांनीं ध्यानीं आणून तिचा तारतम्यानें स्वीकार केला पाहिजे. हजार रुपयांची नथ आहे, पण ती पुरुषास भूषणभूत कशी होईल ? शत्रु असो, मित्र[2] असो, त्याची क्षमा करणें, हें यतीनां भूषण खरें, परंतु शत्रूंचा अपकार सहन करून त्यांस क्षमा करणें, हें राजांस भूषण तर नाहींच, पण उलटें दूषण मात्र आहे. कुटुंबनायक पुरुष, हा प्रकारांतरानें राजाच समजला जातो. शान्तिनिष्ठ तपस्वी समजला

---

१ अग्निदो गरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहः । क्षेत्रदारापहर्ता च षडेते ह्याततायिनः ॥ हितोपदेश.

२ क्षमा शत्रौ च मित्रे च यतीनामेव भूषणं । अपराधिषु सत्वेषु नृपाणां सैव दूषणम् ॥ हितोपदेश.

जात नाहीं. यास्तव व्यवहारसंपन्न गृहस्थानें अत्यंत क्षमाशील असूं नये. ज्याला कधींही राग येत नाहीं, व जो नेहमीं क्षमाशील असतो, तो स्त्रीही[1] नव्हे, आणि धड पुरुषही नव्हे. अशा अक्रोधी[2] व क्षमाशील पुरुषाची सर्व लोक अवगणना[3] करीत असतात. सर्वच काल शान्तिब्रह्म होऊन बसणें, किंवा सर्व काल क्रोधवृत्ति धारण करणें, हें व्यवहारी पुरुषास योग्य नव्हे. सदां शान्तिनिष्ठ पुरुषाची लोक अवज्ञा करितात. व सदां क्रोधी असणाऱ्या पुरुषापासून लोक उद्वेग[4] पावतात. याकरितां क्षमा व शांति केव्हां धरावी, व क्रोध केव्हां करावा, हें ज्यास चांगलें समजतें, तोच मोठेपणा पावतो.

मुद्दाम अपकार करून तो न समजतां झाला, असें खोटसाळ प्रतिपादन करणाऱ्या शठांची[5] कधींही उपेक्षा

---

१ एतावानेव पुरुषो यदमर्षी यदक्षमी । क्षमावान्निरमर्षश्च नैव स्त्री न पुनः पुमान् ॥ ३३ ॥ उद्योगपर्व, अ० १३३.

२ निर्मन्युश्चाप्यसंख्येयः पुरुषः क्लीबसाधनः ॥ ६ ॥ उद्योग. अ० १३३.

३ यो नित्यं क्षमते तात बहून्दोषान्सर्विंदति । भृत्याः परिभवन्त्येनमुदासीनास्तथारयः ॥ ७ ॥

४ मृदुर्भवत्यवज्ञातस्तीक्ष्णादुद्विजते जनः । काले प्राप्ते द्वयं चैतद्यो वेद स महीपतिः ॥ ३७ ॥

(३, ४: वनपर्व, अ० २८)

५ अथ ये बुद्धिजं कृत्वा ब्रूयुरेतदबुद्धिजं । पापान्स्वल्पेपि तान्हन्यादपराधे तथानृजून ॥ २८ ॥ वनपर्व, अ० २८.

करूं नये, त्यास शासनच करावें. तसेंच एकवार क्षमा केली असतांही पुनरपि अपराध[1] करण्यास प्रवृत्त झालेल्या दुष्टाची आवश्यमेव खोड मोडलीच पाहिजे. हेतु नसतां सहजगत्या[2] अगर केवळ अजाणपणामुळें[3] अगळीक झाली असेल, तर त्या अगळिकीची माफी करणें रास्तच आहे. परंतु जो हेतुपुरस्सर सर्वस्व नाश करण्यास उद्युक्त होतो, त्यास निर्मूल करून टाकिलाच पाहिजे, त्याची उपेक्षा करणें वाजवी नाहीं.

नाना फडनविसांनीं, इंग्रेज व टिपू अशा आपल्या दोघां शत्रूंचा परस्पर विरोध पाहून, टिपूस कर्षणीय शत्रु लेखिलें, व तो इंग्रजांचा पराभव करण्यास उपयोगी पडेल, असें ध्यानीं आणून त्याशीं निकरानें न लढतां, त्यास राखून[4] ठेवण्याविषयीं हरिपंत फडके यांस पत्रें लिहिलीं होतीं. त्या प्रमाणेंच राघोबादादा हे महद-

---

१ सर्वस्यैकोपराधस्ते क्षन्तव्यः प्राणिनो भवेत् । द्वितीये सति वध्यस्तु स्वल्पेप्यपकृते भवेत् ॥ २९ ॥

२ अजानता भवेत्कश्चिदपराधः कृतो यदि । क्षन्तव्यमेव तस्याहुः सुपरीक्ष्य परीक्षया ॥ ३० ॥

३ अबुद्धिमाश्रितानां तु क्षन्तव्यमपराधिनाम् । नहि सर्वत्र पाण्डित्यं सुलभं पुरुषेण वै ॥ २७ ॥

(वनपर्व, अ० २८.)

४ काव्येतिहाससंग्रहांत छापलेली, होळकरांची कैफियत. पान ५८ पहा.

पराधी असतांही त्यांस कर्षणीय शत्रु समजून, नानांनीं त्यांस इंग्रजांपासून आपले हातीं घेऊन, गंगातीरीं हृतवीर्य करून ठेविलें होतें.

शिवाजीमहाराजांनींही व्यंकोजीराजे हे आपले सापत्नबंधु असें लक्षांत आणून, त्यांचें राज्य घेणें शक्य असतांही तें न घेतां, त्यांस आपले अंकित मात्र करून ठेविलें, अगदीं उन्मूलन केलें नाहीं.

आतां बहिरायात शत्रु कोणचे ते सांगतों. जे शत्रु परस्थलाहून अकस्मात् येऊन लुटालुट करितात, व पुन्हां स्वस्थलास परत जातात, स्थायिक होऊन विरोध करीत बसत नाहींत, ते बहिरायात शत्रु होत.

सोरटीसोमनाथ वगैरे देवालयांचा विध्वंस करणारा महंमुद, व शिकंदर हे येथील रहाणारे नसून, त्यांनीं बाहेरून येऊन हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या, आणि लुटालूट करून ते पुन्हां परत स्वदेशीं चालते झाले, येथें स्थायिक होऊन येथील राजांशीं विरोध करीत बसले नाहींत, ह्मणून ते येथील राजांचे बहिरायात शत्रु होत.

कुटुंबी लोकांचे बहिरायात शत्रु ह्मटले ह्मणजे, दरवडेखोर वगैरे लोक समजावयाचे. अशा शत्रूंस सामर्थ्य असेल तर पिटाळून लावावें. सामर्थ्य नसेल तर दारें बंद करून कांहीं वेळ नोकरांचाकरांकडून थोडा अवरोध

करवून, तितक्या अवकाशांत जें जडजवाहीर लांबविण्यासारखें असेल तेवढें लांबवून, त्वरित पार्श्व भागानें पोबारा करावा,व राहिलेलें जें ते नेतील तें नेऊं द्यावें.

मागील विवरणावरून शत्रूंचे भिन्न भिन्न प्रकार ध्यानीं आलेच असतील, आतां वैरनिर्यातनाचे सामदानादि जे चतुर्विध उपाय, त्यांविषयीं थोडेंसें विवरण करूं. शत्रूचें निवारण करण्याचे मुख्य व प्रसिद्ध उपाय ह्मटले ह्मणजे तीन[१]च आहेत, त्यांत पहिला साम, हा उपाय उत्तम, दुसरा दान हा उपाय मध्यम, व तिसरा भेद हा कनिष्ठ उपाय समजावा. कोणी दंड किंवा निग्रह (लढाई) हा चवथा उपाय मानितात, परंतु विचार करून पाहिलें तर तो उपाय नव्हे, निरुपाय आहे. पूर्वोक्त तिन्ही उपायांनीं वैराचा उपशम न होईल तर निरुपायानें लढाईस उभें राहणें भाग पडतें. यद्यपि जनपवादाप्रमाणें त्याची उपायांत गणना केली, तरी तो अगदीं निःकृष्ट उपाय समजावा. कारण त्या उपायानें मनुष्यबलाची व द्रव्यबलाची फार खराबी होऊन, पुनः जयाची खात्रीही नसते, यास्तव होतां होईल तों लढाईचा प्रसंग

---

१ त्रयोपाया मनुष्याणां श्रूयन्ते भरतर्षभ । कनीयान्मध्यमः श्रेष्ठ इति वेदविदो विदुः ॥ ६७ ॥ उद्योगप. अ० ३३.

टोळीत असावें. परंतु हा विचार शत्रूनेंही मनांत वागविला पाहिजे, तो न वागवील तर आपणास लढाईस उभें राहणें भागच पडतें.

साम ह्मणजे शिष्टाईच्या व नीतीच्या चार गोष्टी सांगून शत्रूशीं सख्य करणें, हा उत्तम उपाय, कारण ह्यानें उभयपक्षांचा आब राहून कोणच्याही प्रकारची हानि होत नाहीं. संप्रदान ह्मणजे देणगी देऊन शत्रूशीं सल्ला करणें, हा उपाय मध्यम, कारण, ह्या उपायानें देणगी देणारास लघुत्व येतें. ही देणगी अनेक प्रकारची असते, त्यांत द्रव्यरूपानें जी देणगी देतात, तीस खंडणी असें ह्मणतात. भेद ह्मणजे फितूर हा निःकृष्ट उपाय होय, कारण त्यांत कुटिलता मात्र असते. शूरास व संभावितास शोभण्यासारखी मर्दुमकी अगर सुजनता बिलकुल नसते.

मागें सांगितलेल्या शत्रूंच्या चतुर्विध प्रकारांपैकीं उच्छेद्यशत्रु, सामदानादि उपायांस अयोग्य असून दृढतर निग्रहासच पात्र असे समजावे. पीडनीय व कर्षणीय शत्रु निर्मूलन करण्यास अनुक्रमें अशक्य व अयोग्य असल्यामुळें, संप्रदान व सौम्योपचार ह्यांस योग्य होत. बहिरायात

१ साम्ना दानेन भेदेन समस्तैरथवा पृथक् । साधितुं प्रयतेतारीन्न युद्धेन कदाचन ॥ हितोपदेश.

नहि युद्धं प्रशंसन्ति सर्वावस्थमरिन्दम ॥ २ ॥ उद्योग, अ० ५८

शत्रु सामदानादि उपायांस अयोग्य असून, सामर्थ्य असेल तर तत्काळ दंडनीय होत. सामर्थ्य नसेल तर मागाहून त्यांच्या जमातींत भेद पाडून कांहीं शासन करितां येईल, किंवा नुकसानी भरून घेतां येईल, तर पहावी.

वरील विचारावरून साम, संप्रदान व निग्रह हे उपाय केव्हां वर्जनीय, व केव्हां अशक्यही असतात, परंतु भेद ह्मणजे फितूर हा उपाय सर्वकाळीं व सर्व ठिकाणीं योजितां येण्यासारखा आहे. ह्या उपायाची योजना करण्याचीं मुख्य स्थानें ह्मटलीं ह्मणजे, अधिकाराचें सूत्र आपल्या हातीं यावें असें इच्छिणारे शत्रूचे पुत्र, शत्रूच्या सवती सवती स्त्रिया, किंवा उपस्त्रिया, अपमान पावलेले सेवक, व गुणाप्रमाणें किंवा कामाप्रमाणें वेतन मिळत नाहीं, ह्मणून रुष्ट असणारे हलके नोकर, इत्यादि होत. ह्यां लोकांच्या अंतःकरणाचा प्रथमतः बुडीद टाकून पक्का ठाव घेतल्यावर कारस्थान उपस्थित करून शत्रूच्या साह्यकर्त्यांत द्विधाभाव, व शत्रूच्या मनांत आपल्याच लोकांविषयीं संदेह, उत्पन्न करावा. असा संदेह उत्पन्न झाल्यावर शत्रु, अविश्वासामुळें जिवास जीव देणाऱ्या खऱ्या साह्यकर्त्यांशींही भेदभ्रांतीनें रुष्ट व तेढा वागावयास लागून हतबल होतो, आणि लवकरच नाश पावतो.

मागें नुकतेंच सामदानादिकांचा विचार सांगत असतां, अतिबलिष्ठ शत्रूशीं सामना देऊन लढाई न करितां, युक्तीनें व सामानेंच त्याचें निवारण करावें ह्मणून सांगितलें खरें, परंतु तें सांगणें सामान्यत्वाचें समजावें. विशेषप्रसंगीं बलिष्ठ शत्रूशींही अधीर व उतावीळ होऊन एकदम साम करण्यास तयार होऊं नये. असे प्रसंग ह्मटले ह्मणजे, शत्रु बलिष्ठ असून जर अनुत्साही, विषयासक्त, वृद्ध, दीर्घ रोगी, भीरु, अत्यंत लोभी, केवळ दैवपरायण, संकटांत पडलेला, अनेकांच्या मसलती ऐकून चित्ताची धरसोड करणारा, ज्यास अनेक शत्रु उद्भवले आहेत असा, व करारांचें प्रामाण्य न ठेवणारा, असा असेल तर, त्याशीं संधी न करितां धैर्य धरून कूटयुद्ध करीत रहावें, ह्मणजे तो कालावधीनें आपोआपच लयास जातो.

तसेंच ज्यानें स्त्रीचा अपहार, धर्मभ्रष्टता, किंवा बंधुनाश करून तोंडास काळोखी लाविली व जीवित कष्टप्रद केलें, आणि युद्ध न करितांही कांहीं हित होण्याची सवड राखिली नाहीं, असा दुर्धर प्रसंग आणिला, त्यास मारीन किंवा मरून जाईन, असा दृढनिश्चय

१ अयुद्धेपि यदा पश्येन्न किंचिद्धितमात्मनः। युध्यमानस्तदा प्राज्ञ म्रियते रिपुणा सह. ॥ हितोपदेश. ॥

करून बलाबलाविषयींही फारसा विचार न करितां सूड उगवावा; तडजोड करण्याच्या भरीस कदापिही पडूं नये. जीविताची आशा धरून कोंडयांच्या[१] धगटीप्रमाणें नेहमीं मनांत धुमसत रहाण्यापेक्षां एक मुहूर्तभर प्रज्वलित होऊन, नंतर नष्ट होऊन जाणें बरें. निस्तेज होऊन धुरकटत रहाणें बरें नाहीं.

आतां प्रस्तावक्रमाच्या ओघानें युद्ध विचार प्राप्त झाला खरा, परंतु प्रस्तुत काल हा आपला शस्त्रयुद्धाचा काल नव्हे. व शस्त्रयुद्धाचें शिक्षण हें अनुभवानेंच प्राप्त करून घ्यावें लागतें, तें शाब्दिक उपदेशानें प्राप्त होत नसतें. गुरुमुखानें युद्धाच्या चार गोष्टी ऐकून कोणी शूर शिपाई झाल्याचें पहाण्यांत नाहीं. आणि तशांत कोणच्याही कालीं झालें तरी, कुटुंबव्यवहाराच्या वादांत कुटुंबिकांस शस्त्रयुद्ध विहित मानलेलें नाहीं, तें राजकारणांत मात्र विहित मानलेलें आहे. यास्तव आह्मांस तें प्रकृतस्थलीं विचारणीय वाटत नाहीं. येथें

---

१ (विदुलेनें आपल्या पुत्रास उपदेश केला आहे.)

अलाततिंदुकस्येव मुहूर्तमपि हि ज्वल । मातुषाग्निरिवानर्चिर्धूमायस्व जिजीविषुः ॥ १४ ॥

मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरं । माहस्म कस्य चिद्गेहे जनिराज्ञः खरो मृदुः ॥ १५ उद्योग. अ. १३३

काय तो कुटुंबव्यवहारांतील खडर्यांच्या लढाईचाच विचार कर्तव्य आहे.

व्यवहारी लोकांचें युद्ध ह्मटलें ह्मणजे कागदापत्रांची लढाई, हींत कागदाचे घोडे नाचवावयाचे असतात, व कलमबहाद्दरी दाखवावयाची असते, येथें तरवारबहाद्दरीचा कांहीं उपयोग नाहीं. अशा लढायांचें रणांगण ह्मटलें ह्मणजे न्यायसभा, शस्त्रें ह्मटलीं ह्मणजे पुराव्याचे कागदपत्र, व सैनिक ह्मटले ह्मणजे पक्षकार, साक्षीदार, व वकील हेच होत. या लढाईंत दस्तऐवज वगैरे कागदपत्र, जमाखर्चांच्या वह्या, व पुराव्याची इतर सामुग्री ही चोख असावी लागते. लढाईस उभें रहावयाचें, व हातांत तरवार गंजलेली व बोथट घ्यावयाची, हें काय उपयोग, अशा ढिलाईचा परिणाम कांहीं जोशास विचारावयास नको. तसेंच लढाईचीं शस्त्रास्त्रें जय्यत आहेत, पण त्यांपैकीं कोणचें केव्हां व कसें वापरावें, ह्या गोष्टीची वाकबगारी नसली तर अपजय ठेविलेलाच आहे, असें समजावें. शत्रु दोनशें कदमांवर हातांत जोडनळीची बंदुक घेऊन उभा आहे, व आपण हातांत पट्टा चढवून ठाणमाण रोखूं लागलों, तर प्राण जाण्यास कांहीं उशीर लागेल काय ? तसेंच शत्रु अफजुलखानासारखा कंबरेस बिलगला, आणि आपण बंदुक उचलूं

लागलों तर काय उपयोग! अशा हातघाईच्या प्रसंगीं जंबिया अगर वाघनखें पोटांत खुपसून कोथळा फोडून टाकणेंच उचित, व्यावहारिकांच्या बहुतेक लढाया द्रव्यार्थंच उद्भवलेल्या असतात, द्रव्योत्पादनार्थ व रक्षणार्थ द्रव्यापेक्षांही कागदपत्रांची खबरदारी विशेष घ्यावी लागते. कारण दस्तऐवजी कागद हे द्रव्य रक्षणाचीं शस्त्रें समजलीं पाहिजेत. शस्त्र अरक्षितपणें टाकून दिलें, आणि दागिन्यांचा डबा उरापोटाशीं घट्ट धरून निजलें, तर एखादा क्षुद्र भामटयाही मुसकुटांत मारून डबोलें उचलून चालता होईल, पण तेंच डबोलें खोलींत ठेवून दाराशीं हातांत तरवार घेऊन उभें राहिलें, तर सराईत रामोशीही क्षणभर वचक धरील. पुष्कळ लोकांच्या घरीं दप्तरी कागद जितक्या बंदोबस्तानें ठेवावे लागतात, तितक्या बंदोबस्तानें ठेविलेले नसतात. व कितीएक लोक तर दप्तरी रुमाल ओटी माझघरच्या कोनाडयांत टाकून, एक दिडकी लागली तर खोलींतून सात कुलुपें उघडून आणितांना आह्मीं पाहिले आहेत.

सर्व प्रकारच्या पुराव्यांत लेखी[1] पुरावा वजनदार मानिला जातो, यास्तव हरएक गोष्टीबद्दल लेखी पुरावा

१ विवादेऽन्विष्यते पत्रं पत्राभावे तु साक्षिणः । साक्ष्यभावात्ततो दिव्यं प्रवदन्ति मनीषिणः ॥ पञ्चतंत्रम्.

जितका हातीं राखतां येईल, तितका राखण्या विषयीं पूर्वींपासूनच धोरण राखीत जावें. प्रथमतः व्यवहाराचा अंकुर उत्पन्न होतो, ते समयीं तो रोमांकुरासारखा सरळ व सूक्ष्म असतो, पण तो कालांतरानें वाढला ह्मणजे त्यांत केशभाराप्रमाणें वक्रता, गुंतागुंत, व मलिनता उत्पन्न होते. कोणताही व्यवहार प्रथमतः बरेपणावरच घडतो, पण कालांतरानें तो बरेपणा राहीलच असा भरंवसा धरितां येत नाहीं. याकरितां पतीचा माणूस असो, मित्र असो, किंवा आप्त असो, त्या पासून दस्तऐवज चोख करून घ्यावे, त्यांत संदिग्धता अगदीं राहूं देऊं नये. प्रसंगविशेषीं नजर न पुरल्यामुळें संदिग्धता राहिलीच, तर तिचा उलगडा समजुतींत आल्याबरोबर व बरेपणा आहे तोंच, चिटीचपाटी करून घेऊन ती चिटी पुरवणीदाखल त्या दस्तऐवजांत सामील करून ठेवावी. आपण दुसऱ्यास लेख लिहून देणें ते, व कुळास पावत्या वगैरे द्यावयाच्या त्याही, आपणांस पुढें दगलबाजी करितां यावी, अशा धोरणानें संदिग्ध किंवा द्व्यर्थी कधींही लिहून देऊं नयेत.

पुष्कळ लोक संदिग्ध व दुटप्पी लिहिणें, हें मोठें कारकुनीचें कसब समजतात, पण ही चूक आहे. लिहिण्यांत सुईचें अग्र शिरण्यास देखील फट न ठेवणें, व भवति

न भवति उत्पन्न होण्यास जागा न राखणें, हेंच खरें कारकुनीचें कसब आहे. व्यवहार ही कांहीं ठकबाजी नव्हे. व्यवहारांत विश्वासघात, ठकबाजी, व निष्कारण निष्ठुरता करून आपली पत घालवावी, व बदलौकिक करून घ्यावा, आणि पाप जोडावें, ह्यांत पुरुषार्थ काय ?

आपण लिहून दिलेला कोणचाही लेख असो, त्याची बारनिशी व नक्कल ठेविल्याशिवाय तो लेख दुसऱ्याच्या हातांत पडावयाचाच नाहीं, असा शपथ घेतल्याप्रमाणें नियम पाळावा. व त्या कागदांचें मित्तीवार अनुक्रमानें फेरिस्त लावून निराळें दप्तर ठेवावें. अशी व्यवस्था नसली तर आपण टाकांत कितीं गुंतलों आहों, व लेखांत दुसऱ्यास पेंचांत धरण्यास काय सवड आहे, हें प्रसंगास आपलें आपल्यास न स्मरून वृथैव संदेहांत पडावें लागतें.

वकील हे भाड्यानें आणलेले शिपाई. ह्यांपैकीं बहुतेकांस पक्षकाराच्या लाभहानीची किंवा जयापजयाची बिलकुल पर्वा नसते, ते फक्त आपल्या फीची मात्र परवा करीत असतात. त्यांस आपल्या शिरावर पक्षकाराच्या हिताहिताची कांहीं जबाबदारी आहे, असें वाटत नाहीं. यास्तव पुराव्याची सामुग्री मिळविण्यांत, साक्षीदारास बदफैली करूं न देण्यांत, व वकीलसाहेबांस कायद्याचे आधार व हायकोर्टाचे ठराव काढून देण्यांत, आपण स्वतः

दक्षता न ठेविली, तर लढाईंत जय होईलच ह्याचा भरंवसा नाहीं, अशी मनाची पक्की समजूत असूं द्यावी. व वकिलांस मुद्दे नीट समजावून देण्यास आपण स्वतः वकील, किंबहुना त्यांचे गुरु बनावें लागतें, तेव्हां पार लागत असतो, ही गोष्ट कोणीही विसरूं नये. बहुतेक वकील केवळ नसराळ्याचें काम करीत असतात. व या नसराळ्याच्या गळ्यांत बेपर्वाई, हलगर्जीपणा, व गर्व इत्यादिकांचा मळ सांचलेला असतो. यामुळें आपण त्यांच्या तोंडांत जें ओतावें, तेंही नीटपणें बाहेर पडत नाहीं.

साक्षीदारांस न्यायासनासमोर खोटें बोलणें, हें बेअब्रूचें पापकर्म आहे, असें सांप्रत वाटत नसल्यामुळें त्यांवर लक्ष ठेवणें, फार जरूर असतें. हल्लीं कोर्टांत शपथेवर खोटें बोलणें, हें सांप्रदायिकच झालें आहे. त्यामुळें जनांत अप्रतिष्ठितपणा किंवा कुत्सा होईल, अशी धास्ती कोणासही उरली नाहीं. या करितां साक्षीदारांनीं सत्यच्युत होऊं नये, याबद्दल दक्षता ठेवणें प्रस्तुत आवश्यक आहे खरें, तरी त्यांस अमुक रीतीनें साक्षी द्या, असें शिकवूं नये. लांचलुचपत देऊन त्यांस खोटें बोलावयास लावणें निंद्य आहे.

वादांत आपली बाजू हलकी पडली किंवा वाद सफाई बुडाला, तरी बेहेत्तर, परंतु जय होण्याकरितां

खोटसाळपणा, खोटे दस्तऐवज, किंवा खोटे साक्षीदार उभे करूं नये. असलें हलकट कर्म करण्यापेक्षां अपजय झाला तरी पुरवला. ज्ञातेजन वादशूराचा मान जयापजयावर समजत नाहींत, कारण, तो पाक्षिकच आहे. तो कोणत्यातरी एकाच पक्षास मिळणार, यास्तव ते वादकौशल्यावरच मानापमान लेखितात. शत्रूला सफाईचे दोन हात दाखवून, व प्रसंगीं त्याचा वार अंगावर सहे झाला तरी तो घेऊन, रणांत मरून जाणें बरें, परंतु मारेकऱ्याचें कर्म करून जय मिळविणें, हें अपजयाहूनही वांईट समजावें.

वादास उभा राहिलेला सामनेवाला अधर्मानें अपरिमित खोटसाळपणा करीत आहे, व त्याच्या लबाडीनें आपल्या सत्पक्षाची सर्वथैव हानि होत आहे, व त्या हानीचें निवारण करण्यास लबाडीशिवाय दुसरा सरळ मार्ग नाहीं, असें धर्मसंकट येऊन पडल्यास आपद्धर्म समजून थोडेंसें अन्यथा कर्म केल्यास, तें कांहींसें क्षम्य मानलें जातें खरें, तथापि स्तुत्य मानलें जात नाहीं. आपद्धर्म नेहमीं धर्मरक्षणार्थ सांगितलेले असतात, अधर्म करण्याकरितां सांगितलेले नसतात, हें ध्यानीं आणलें पाहिजे. आपद्धर्म समजून सत्यरक्षणार्थ केलेल्या अन्यथावर्तनाचा जगांत बभ्रा झाल्या-

वांचून रहात नाहीं, यामुळें समोरच्या बदमाष सामने-वाल्यास आपली अनीति झांकून ठेवून उगाच काव-काव करण्यास सवड सांपडते. हा गांवगुंडांनीं केलेला बभ्रा व सामनेवाल्याची कावकाव बंद करण्यास समर्पक उत्तर देण्याची योजना करून, त्यांचे दांत त्यांच्या घशांत घालण्यास अगदीं कसर करूं नये.

वालीनें अन्यायानें सुग्रीवास हाकून देऊन, तो प्रत्यक्ष भाउजयीशीं कुकर्म करण्यास प्रवृत्त झाला असतां, त्याचें पारिपत्य करणें अवश्य होतें. परंतु तो फार बलिष्ठ, त्यांचें सरळ मार्गानें शासन करणें फार दुर्घट, यास्तव सत्यवर्तनी रामचंद्रासही त्याचा कपटानें वध करणें भाग पडलें. तेव्हां वालीनें आपलें कुकर्म पुढें न आणतां रामचंद्राच्या कपटवर्तनाची कावकाव आरंभिली, त्यावेळीं रामचंद्रांनीं त्यास समर्पक उत्तर करून ह्मटलें, बाबारे तू जातीनें शाखामृग व भाउजयीशीं कुकर्म करून कर्मानेंही पशु बनलास, त्या अर्थीं मजसारख्या राजानें मृगयेंत पशूचा वध छपूनही केल्यास तें दूषणीय नाहीं, इतकेंच नव्हे. तर तें शास्त्रसम्मतही आहे. तू जर अधर्म न करितां राजाप्रमाणें धर्मरक्षण करितास, तर तुला मी राजा समजून रणांत समोर उभा राहून मारलें असतें. हें भाषण ऐकल्यावर वालीनें खालीं मान घालून हृदयांतलें शल्य उपटलें, व प्राण सोडला.

अर्थशास्त्रदृष्ट्या अन्यथा वर्तन करणाराशीं अन्यथा वागलें असतां दोष नाहीं, अशीं ज्ञात्यांचीं वचनें[1] आहेत, तथापि जशास तसें वागावयाचें तें निरुपायानें प्रसंगविशेषींच वागावें. आपद्धर्माचें आचरण आपत्कालाशिवाय[2] करूं नये.

एकानें आधीं दुसऱ्याचें वाटेल तसें गैर करावें, व त्यानें तें सहन न करितां उलट चांगला हात दाखविला ह्मणजे, गांवांतील चार कुटाळांनीं " कायहो तो एक मूर्ख बनला, परंतु तुह्मीतरी कांहीं सबूरी करावयास पाहिजे होती कीं नव्हती " असें चारगटपणाचें पांडित्य करून त्यास असहिष्णुतेचा उगाच दोष द्यावा, असा जगांत उलटा न्याय आहे. अशा चारगटपणाच्या जल्पनेस तोंडानें उत्तर देण्यापेक्षां हृदयांत चांगला उजेड पडेल, असें हातानें उत्तर देतां येईल तर पहावें, व तें

---

१ निकृत्या निकृतिप्रज्ञा हन्तव्या इति निश्चयः । नहि नैकृतिकं हत्वा निकृत्या पापमुच्यते ॥ २२ वनपर्व, अ. ५२.

यस्मिन्यथा वर्तते यो मनुष्यस्तस्मिंस्तथा वर्तितव्यं स धर्मः । मायाचारो मायया वर्तितव्यः साध्वाचारः साधुना प्रत्युपेयः ॥ ७ उद्योग, अ० ३७.

यो यथा वर्तते यस्मिंस्तस्मिन्नेव प्रवर्तयन् । नाधर्मं समवाप्नोति न चाश्रेयश्च विन्दति ॥ ५४ उद्योग, अ० १७८.

२ आपत्कालेन यो धर्मं कुरुते ऽनापदि द्विजः । स नाप्नोति फलं तस्य परत्रेति विचारितम् ॥ २८ मनु, अ० ११.

ड्यांच्या पदरीं परशत्रूच्या निवारणार्थ आपलें सैन्य चाकरीस ठेवण्याचा करार करून बाहेरून त्यांचें साहाय्य करितोंसें भासविलें, परंतु, त्यायोगें त्यांचे हातपाय पक्के बांधून टाकिले, हें मायाचाराचें उदाहरण समजावें.

शत्रु अंगावर चाल करून येत असतां त्यास अवरोध न करितां, व त्याची गुमान न बाळगतां, कावेबाजीनें त्यास टाळा देऊन निसटून जाणें, व त्याचा यत्न विफल करणें, अशा हुलकावणीस उपेक्षा ह्मणतात. चक्रव्यूहाचा भेद करितांना, द्वारीं असलेल्या द्रोणाचार्यांनीं कालयापन व्हावें ह्मणून अर्जुनास आडविलें. परंतु त्यानें आचार्यांशीं युद्ध न करितां त्यांस डावलून त्यांची उपेक्षाच केली. हें वरील प्रकारचें उदाहरण समजावें.

वस्तुस्थिति एके प्रकारची असतां, शत्रूस ती दुसऱ्या प्रकारची आहे असें भासविणें, ह्या ठकबाजीस इंद्रजाल असें ह्मणतात. शिवाजी महाराजांनीं रानांतील झाडांस व बैलांच्या शिंगांस पेटलेले पलिते बांधून शाइस्तेखानाच्या सैन्यास आपल्या लोकांचा जमाव भलत्या बाजूस आहे, असें भासविलें, व आपण दुसऱ्या बाजूनें निसटून गेले, हें इंद्रजालाचें इतिहासप्रसिद्ध[१] उत्कृष्ट उदाहरण होय.

१ काव्येतिहाससंग्रहांत छापलेली मराठी साम्राज्याची छोटी बखर पान २७ पहा.

परंतु पूर्वकथित सर्व उपाय, जोंपर्यंत आत्मजय झाला नाहीं, तोंपर्यंत व्यर्थ होत. ज्यास मनोजय[1] झाला नाहीं, तो शत्रुजय कसा करणार! या करितां यत्नेंकरून पहिल्यानें षड्रिपूंचें दमन करावें. अमर्याद वाढलेला मत्सर-भाव व स्वार्थाभिलाष ह्यांचें निग्रहानें दमन केल्याशिवाय, कोणासही स्वपरहित साधणें नाहीं. प्रत्येक इसम आपलें कर्तव्य समजून निरभिलाष बुद्धीनें देशहितार्थ झटेल, तर प्रत्येकाचें स्वहित साधणें दुःसाध्य नाहीं. हें तत्व वरील दुष्ट मनोविकारांच्या फिसादीमुळें, सांप्रत बहुतेकांस कळत नाहींसें झालें आहे. याकरितां मनोजयाची अत्यंत आवश्यकता दाखवून हें प्रकरण पुरें करितों. पुढील प्रकरणीं देशहितांत प्रत्येकाचें स्वहित कसें गुंतलेलें असतें, ह्याविषयीं विचार करावयाचा आहे.

प्रकरण चौथें समाप्त.

---

१ आत्मा जेयः सदा राज्ञा ततो जेयाश्चशत्रवः । अजितात्मानरपतिर्विजयेत कथं रिपून्. ॥ शान्तिपर्व.

प्रकरण पांचवें.

देशहित विचार.

देशहित करण्याचें पात्रत्व कशानें येतें, देशहितास झटणें हें स्वकर्तव्य वाटलें पाहिजे, मनुष्य मात्र लोकसमाजाचा ऋणी आहे, देशहितास झटण्याची हयगय अज्ञानानें होत नाहीं, लबाडीनें होते, देशहिताविषयीं सामान्य जनांचे कोते विचार, देशहितपराङ्मुखतेपासून पुढें ओढवणारें संकट, जातिमत्सर हा देशहितास विघातक आहे, तत्संबंधीं सामान्यविचार, देशहितास झटण्याची प्रवृत्ति होण्यास देशाभिमान जागृत झाला पाहिजे, देशाभिमान उत्पन्न कसा होतो, व तो उत्पन्न होण्याचीं कारणें.

ज्या अर्थीं प्रत्येक मनुष्य हा देशांतील एकंदर जनसमुदायाचा एक घटक अवयव आहे, त्या अर्थीं त्यास स्वदेशहिताचा यथाविभाग वांटा मिळणारच आहे, असें सर्वांस वाटत असतें, ह्मणून स्वदेशहित कोणासही नकोसें नसतें, हें उघड आहे. परंतु अशारीतीनें स्वदेशहिताविषयीं सर्वांची अनुकूलता असूनही जेव्हां तें होत नाहीं, व उत्तरोत्तर देश विपन्नावस्थेस जात आहे, असें दृष्टीं पडतें, तेव्हां दीर्घकालाच्या कसोटीस उतरून प्ररूढ झालेली त्या देशाची सदाचारपद्धति बिघडली अ-

सावी, आणि तेथील लोकांचें विचारसामर्थ्य व शारीरसामर्थ्य अगदीं क्षीण झालें असावें, असें बिनदिक्कत अनुमान करितां येतें. या गोष्टीची सत्यता आज आमच्या देशाच्या स्थितींतहि स्पष्ट दिसून येते. वर्तनाचें प्रवर्तकत्व जरी विचारशक्तीकडे असतें, तरी तें केवळ साक्षात् नसतें; सदाचारपद्धतीच्या द्वारें परंपरेनें असतें, हें कोणाच्याही ध्यानीं येण्यासारखें आहे. कोणत्याही देशांत झालें तरी सारा लोकसमुदाय तत्ववेत्ता असतो असें नाहीं. कोठेंही झालें तरी असे तत्वदर्शी फार थोडे असतात, व ते ज्या वर्तनाचा प्रघात लोकांत सुरू करितात, तो प्रघात दीर्घ कालपर्यंत हितावहच होत आहे, असें जेव्हां लोकांच्या अनुभवास येतें, तेव्हां तो प्ररूढ होऊन त्यास शिष्टाचारत्व येतें, आणि मग तें एक, धर्माचें अंग बनतें. व तसें झाल्यावर साधारण लोकांच्या वागणुकीची मोड त्या आचारधर्मावर पडत असते. सर्वांच्या वागणुकीचें धोरण एकसारखें असलें ह्मणजे, सर्वांस जी उद्दिष्ट गोष्ट असते, ती कितीही कठिण असली तरी जमातीच्या जोरावर तडीस जाते, पण देशांतील लोकांचें तसें एक धोरण नसलें तर त्यांच्या हातून क्षुल्लक गोष्टही पार पडत नाहीं.

सांप्रत आमच्या हातून हलकें अगर भारी कोण-

च्याही प्रकारचें देशहिताचें कार्य पार पडत नाहीं, याचें मुख्य कारण हेंच आहे. सध्यां आमच्या लोकांत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. व एकाचा विचार दुसऱ्याच्या विचाराशीं कधींही जुळावयाचा नाहीं. एक पायानें चालावें ह्मणाला; तर दुसरा ह्मणतो, काय ही अविचाराची गोष्ट सांगतां, डोक्यापेक्षां पाय मृदु व मांसल आहेत, त्यामुळें त्यांस खडाकांटा रुतून डोक्यापेक्षां जास्त पीडा होण्याचा संभव आहे. डोक्याची कवटी परमेश्वरानें हाडकाची मुद्दाम कठिण केली आहे, ती केवळ निष्कारण हवेंत तरंगत राहण्याकरितां केली आहे कीं काय ? तिचा हेतु मनुष्यानें डोक्यानें चालावें हा स्पष्ट दिसत असतां, तुह्मी गतानुगतिक बनून पायानें चालतां, हें मला बरोबर दिसत नाहीं. आपणास बरें वाईट कळत नव्हतें, तोंपर्यंत आपण पुरातन चालीप्रमाणें पायानें चालत आलों, परंतु आतां आपणास विचार करण्याचें सामर्थ्य आलें असूनही आपण डोक्यानें चालावयास लागूं नये, हें आपल्या मूर्खपणाचें दर्शक आहे.

तिसरा म्हणतो, गतानुगतिक बनून न राहतां आपणास पुरातन चालींत थोडीशी सुधारणा केली पाहिजे, एवढी गोष्ट मात्र मजला मान्य आहे, तथापि जुन्या

चालींचा सर्वथैव त्याग मजला सम्मत नाहीं. कारण, त्यांत अंशतः कांहीं तरी ग्राह्य करण्यासारखें बहुधा सांपडतेंच. माझ्या मतें आपण चालण्याच्या कामीं पायांबरोबर हातांचाही उपयोग करूं लागलों, तर फारच फायदा होईल. तसें केल्यानें आपल्या शरीराचा गुरुत्वमध्य संभाळण्यास हल्लींपेक्षां सोपें जाऊन पडण्याचें भय मुळींच उरणार नाहीं. ज्यांस पृथ्वीच्या पाठीवरच सदोदित संचार करावा लागतो, अशा पशूंस परमेश्वरानें आपल्या अगाध चातुर्यानें चार पाय दिले आहेत, व पक्ष्यांस पृथ्वीच्या पाठीवर संचार करण्याचा अगदीं थोडा प्रसंग पडतो, ह्मणून त्यांस दोनच पाय दिले आहेत, हें आपण लक्षपूर्वक ध्यानीं आणिलें पाहिजे. मनुष्यास पक्ष्यांप्रमाणें जमिनीवर थोडकेंच चालावें लागतें असें नाहीं, हें मनांत आणूनच विधात्यानें ह्या गोष्टीबद्दल योग्य तरतूदही करून ठेविली आहे. मनुष्यासही पशूप्रमाणेंच सर्वकाल पृथ्वीच्या पाठीवरच वागावें लागतें, विचारदृष्ट्या पाहिलें तर मनुष्य प्राणी हाही एक जातीचा पशूच समजला पाहिजे, व त्यासही परमेश्वरानें चालण्याकरितां चार पृथक् अवयव दिले आहेत, परंतु त्यानें वृथाभिमानानें त्यांपैकीं दोन अवयवांस हात हें नाव देऊन, त्यांचा चालण्याच्या

कामीं उपयोग करण्याचें सोडून दिलें, व ह्या वेडेपणामुळें त्याची स्वाभाविक चपलता फारच कमी झाली आहे. माकडांनीं तसें केलें नाहीं, ह्मणून तीं माणसापेक्षां चपळ व शाहणीं आहेत, असें मी समजतों. याकरितां आपण माकडांप्रमाणें हातांपायांवर चालावें, हें मला सुयुक्तिक दिसतें.

अशाप्रकारें आमच्या लोकांची विचारसरणी भिन्न भिन्न, व तज्जनित वर्तनपद्धतीही भिन्न भिन्न, ज्यास त्यास मी मोठा तत्वदर्शी आहें, असें वाटून जो तो आपल्या अविचारास युक्तीचा पैराव चढवून, जगास मोहून वेडें करून टाकीत आहे, परंतु नटाचा नखरा व स्त्रीवेष, कितींही मोहक झाला तरी तो वांझच. प्रत्येक इसमास आपल्या मनसोक्त दुर्वर्तनास अटकाव न होतां, चैनींत अंतर न पडतां, व कवडीस झीज न लागतां, जर देशहित होईल तर मात्र तें पाहिजे आहे. तसें होत नसेल तर कोणासही देशहिताची जरूरी नाहीं. अशा अनीतिपर स्वार्थपरतेनें आजपर्यंत कोणच्याही देशाचें शाश्वत हित झालेलें नाहीं. आमचे लोक देशहिताचे निरनिराळे मार्ग कितींही सुचवोत, परंतु माझ्या मतें देशहिताचा खरा व राजमार्ग म्हटला म्हणजे सदाचारच होय. समाज सदाचरणसंपन्न झाल्याशिवाय त्याच्या हातून

स्वदेशहित कधींही व्हावयाचें नाहीं, हें अगदीं ब्रम्हलिखित म्हणून समजावें.

सदाचार ह्मटला कीं, त्यांत दुर्वर्तनाचा अभाव व सद्वर्तनाची प्रवृत्ति, हा अर्थ ध्वनित होतो. उपकाराची ओळख न ठेवणें, दुसऱ्यास लुबाडणें, खोटसाळपणा करणें, कुटिलपणानें वागणें, इंद्रियलालनांत मग्न असणें, कष्ट पडतात ह्मणून कर्तव्यविमुख होणें, इत्यादि अनेक तऱ्हेच्या दुर्वर्तनापासून अलिप्त राहून कृतज्ञबुद्धीनें अगर परोपकारबुद्धीनें दुसऱ्याच्या उपयोगीं पडणें, परापहारबुद्धि न ठेवणें, सचवटी राखणें, सरळपणानें वागणें, विषयसुखांत लंपट न होणें, व तहान भूक आणि थंडीवारा सहन करून रात्रंदिवस सत्कार्यास झटणें, ह्यासच सदाचरण ह्मणतात. व अशा सदाचारानें जे लोक वागतात, त्यांच्यांत परस्पर विश्वास व प्रेमबुद्धि वाढून, ते देशहिताचें मोठें दुर्घट कार्यही करण्यास पात्र होतात. अशा रीतीचें नीतिवर्तन, देशहिताचा विचार मनांत न येतां जरी घडत गेलें, तरी त्याचा शेवट परिणाम देशहितांतच होतो. मनुष्यानें चिरायु होण्याचा संकल्प करून अमृत प्राशन केलें तरच मनुष्य चिरायु होतो, एरव्हीं होत नाहीं, असा कांहीं अर्थ नाहीं. पोटांत गेल्याबरोबर प्राण्यास चिरायु करावें, हा अमृताचा

धर्मच आहे. तद्वतच नीतियुक्त उदात्तवर्तन घडल्याबरोबर तें करणारास व दुसऱ्यास सुखकर होतें. हा त्याचा नैसर्गिक गुणच आहे. सारांश, सद्वर्तनानें मनुष्यास स्वदेशहित करण्याची पात्रता येते. परंतु पात्रता आल्यानें स्वदेशहित साध्य झालेंच, असें ह्मणतां येत नाहीं. एकादें कृत्य करण्याची मनुष्यास पात्रता असली तरी, तें कृत्य करणें केवळ ऐच्छिक नसून त्याबद्दल आपणावर जबाबदारी आहे, असें त्यास वाटलें पाहिजे. एरव्हीं तें कृत्य तो नेटानें करणार नाहीं. यास्तव मनुष्यमात्रावर स्वदेशहित करण्याची जबाबदारी किती आहे, याविषयीं विचार करणें प्राप्त झालें.

मनुष्य जन्मास येतो, ते समयीं तो आपल्या डोक्यावर अनेक प्रकारच्या ऋणांचा बोजा घेऊन येतो. किंबहुना त्या ऋणानुबंधानेंच त्यास जन्म प्राप्त झालें असतें. हें ऋण फिटेपर्यंत तो दासाप्रमाणें परतंत्र आहे, त्यास स्वतंत्रता बिलकुल नाहीं. व तें यथाशक्ति न फेडतां तो जास्ती जास्ती ऋणच करित जाईल, तर ह्या कष्टप्रद जन्मबंधनांतून कधींही मुक्त होणार नाहीं. ऋण[१], रोग, शत्रु, व अग्नि, हीं अल्प जरी असलीं तरी त्यांची

१. ऋणमग्निर्गदः शत्रुरल्पमेतच्चतुष्टयं । इति मत्वा सुखं शेते यो नरः स विषीदति ॥ शिवकाव्य.

शाहण्यानें उपेक्षा करूं नये. उपेक्षा केल्यास तीं दिवसेंदिवस वाढतच जातात, आणि शेवटीं नाश करितात. देव, ऋषी, पितर, व लोकसमाज यांच्या उपकारांचा भार प्रत्येक मनुष्याच्या डोक्यावर असतो, व यामुळें तो ह्या सर्वांचा ऋणी आहे. ह्या निरनिराळ्या सावकारांचें ऋण त्यास निरनिराळ्या प्रकारांनीं फेडावें लागतें. देवऋणाची फेड यजन व अर्चन इत्यादिकांनीं होते. ऋषिगणांनीं निरपेक्ष बुद्धीनें विद्या, कला, व शास्त्रें उर्जितदशेस आणून, निरनिराळ्या समाजास हितावह होणारे धर्म व आचार कथन केले आहेत. व तेणेंकरून मनुष्याचें सुख अपरिमित वाढलें आहे. या करितां, तो या तपोनिष्ठ विद्वन्मंडळाचा ऋणी आहे. व त्यास ह्या ऋणाची फेड विद्याध्ययन[२] व विद्यादान करून करावी लागते. मातापितरें, आपण गर्भांत असतों तेव्हांपासून आपलें पोषण, संगोपन, व लालन करित असतात, आपलें पुढें चांगलें चालावें ह्मणून द्रव्यार्जन करून ठेवित असतात. व आपणांस विद्या वगैरे उदरनिर्वाहाचें शिक्षण देऊन

१ ऋणं देवस्य यागेन ऋषीणां दानकर्मणा। संतत्या पितृलोकानां शोधयित्वा परिव्रजेत्.

२ स्वाध्यायेनार्चयेदृषीन् होमैर्देवान् यथाविधि। पितॄन् श्राद्धैश्च नॄनन्नैर्भूतानि बलिकर्मणा ॥ ८ ॥ मनु अ. ३

पुढें आपली संसारयात्रा सुखानें पार पडावी ह्मणून रात्रंदिवस झटत असतात, यास्तव आपण प्रत्येकजण आपआपल्या मातापितरांचे ऋणी आहों व तें ऋण मातापितरें हयात आहेत तों पर्यंत त्यांचें पोषण व शुश्रूषा करून, व त्यांच्या मरणानंतर पितृकर्मे व वंशवृद्धि करून आपणांस फेडावें लागतें. लोकसमाजाचेंही ऋण त्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या शिरावर अपरिमित असतें. व व्यवहारदृष्ट्या बाकीच्या सर्व ऋणांहून तें प्रधान आहे. तथापि तें सामान्यजनांच्या लक्षांत बहुधा येत नाहीं. सूर्य पृथ्वीस आधार आहे, त्याच्या प्रभावानें प्राणिवर्गांची व वनस्पतिवर्गांची उत्पत्ति व पोषण होतें, त्याच्या प्रकाशानें सर्व प्राण्यांचे व्यवहार चालतात, असा जरी तो सर्वांच्या प्राणरक्षणास अत्यावश्यक आहे, तरी त्याच्या उपयुक्ततेचें महत्व जसें सामान्य जनांस कळत नाहीं, तसेंच समाजबंधनानें प्राप्त होणाऱ्या फायद्यांचेंही महत्व सामान्य जनांस वाटत नाहीं. असें होण्याचें मुख्य कारण, ते फायदे अयत्नसिद्ध प्राप्त होत असतात हें आहे. यत्नांवांचून जें प्राप्त होतें, त्या विषयीं लक्ष कोण पुरवितो, व त्याजविषयीं महत्व तरी कोणास वाटणार ! पण सूर्यापासून होणाऱ्या फायद्यांची अयत्नसिद्धि आणि समाज व्यवस्थेपासून हो-

णाऱ्या फायद्यांची अयत्नसिद्धि, यांमध्यें जमीनअस्मानचें अंतर आहे. प्राण्यांचें पोषण व्हावें ह्मणून परमेश्वरानें सूर्य निर्माण केला आहे, व त्याच्या उद्देशाप्रमाणें प्राण्यांचें पोषण अबाधितपणें होत आहे. सूर्यापासून होणाऱ्या फायद्यांचें महत्व लोकांस न वाटलें, तरी त्यांच्या अज्ञानानें परमेश्वराच्या संकल्पास बाध येत नाहीं. कारण, तो मनुष्याच्या अज्ञानानें बाधित होण्याइतका दुर्बल नाहीं. परंतु लोकसमाजापासून होणाऱ्या फायद्यांची गोष्ट तशी नाहीं. लोकसमाज हा विवक्षित फायद्यांचा उद्देश मनांत बाळगून मनुष्यांनीं निर्माण केला आहे. यास्तव त्या समाजांतील लोकांस ज्या मानानें मूळच्या उद्देशाचा विसर पडेल, किंवा त्यांच्या हातून ज्या मानानें मूळचा उद्देश सिद्धीस नेण्याची हेळसांड होईल, त्या मानानें उद्दिष्ट फायद्यांचें मान कमी होईल, हें उघड आहे.

आतां येवढी गोष्ट खरी आहे कीं, समाजांतील काह थोड्या लोकांनीं मूळच्या उद्देशांची ओळख न ठेवितां, किंवा ते उद्देश सिद्धीस नेण्यास जाणूनबुजून हयगय केली असतांही, अशा अविचारी व कृतघ्न लोकांस इतरांच्या कार्यतत्परतेचा व परिश्रमाचा फायदा यत्नावांचून मिळतो, पण ती कांहीं नैसर्गिक अयत्नसिद्धि नव्हे. तो

केवळ दुसऱ्याच्या मेहनतीचा कृतघ्नपणानें केलेला लाजिरवाणा अपहार होय. पण असा लाजिरवाणा आयता फायदा समाजांतील पुष्कळ लोक मिळवूं पाहतील, तर कामसू व अंगचोर, अथवा विचारी व अविचारी, असे सारे लोक त्या फायद्यास अंतरतील.

उदाहरण, एखाद्या कुटुंबांत एखादा वेडा किंवा आळशी मनुष्य संसाराच्या कामीं उपयोगीं पडत नसला, तरी बाकीच्या इतर मनुष्यांच्या संसारदक्षतेमुळें त्याचें कांहीं कमी पडणार नाहीं; पण जर त्या कुटुंबांतील बहुतेक माणसें वेडगळ समजुतीनें कांहीं एक करीत नाहींशीं झालीं, व एक मनुष्य मात्र मरेमरे तों कष्ट करीत राहिला, तर त्या बिचाऱ्यास हा वेड्यांचा बाजार पोसावा लागल्यामुळें साऱ्यांबरोबर उपाशीं मरावें लागेल.

सांप्रतची आमच्या देशाची अशीच स्थिति आहे. आमच्या समाजांतील बहुतेक लोक देशहिताच्या कामीं अंतर्यामापासून उदासीन असून फक्त दांभिकपणानें बाहेरून मात्र उगाच कळकळ दाखवितात, व शरत्कालच्या मेघाप्रमाणें पोकळ गर्जना मात्र करितात, व कांहीं थोडे महात्मे पुरुष मात्र खऱ्या कळकळीनें रात्रंदिवस जिवापाड परिश्रम करून हाडें झिजवितात, त्यांस

समाजापासून साहाय्य यथायथाच मिळतें, यामुळें देशहिताच्या कामीं आपलें पाऊल पुढें पडत नाहीं. अशा दांभिकपणानें आह्मी आपल्या हितकर्त्या पुढाऱ्यांच्या गळ्यांत अडकाविलेले जड धोंडे बनून त्यांसहवर्तमान लवकरच रसातळास जाऊन बसणार, ह्यांत काडीइतका देखील संदेह नाहीं. आह्मी असे आत्मघातकी व कृतघ्न बनून काय जोड मिळविणार ! कृतघ्न[1] पुरुषावरचा विश्वास उडून त्यास कोणी जोडयाशीं उभें करीत नाहीं. त्याचा दुर्लौकिक मात्र होतो, व त्यामुळें त्यास सुखाचा लेशही लाभत नाहीं. शास्त्रांत पंचमहापातकांसही प्रायश्चित्त सांगितलेलें आढळतें, परंतु कृतघ्नपणाच्या दोषास प्रायश्चित्त[2] सांगितलेलें कोठेंही दृष्ट नाहीं.

समाजव्यवस्थेपासून समाजांतील व्यक्तिमात्रास अनंत फायदे होतात, व त्यांविषयीं कोणासही अज्ञान नसतें. श्रमसंविभाग करून एक जुटीनें कोणतेंही काम केलें असतां, तें चांगलें व पुष्कळ होतें, व त्यास साधन सामुग्री थोडी पुरून कालही थोडा लागतो, हें तत्त्व अम-

---

१ कुतः कृतघ्नस्य यशः कुतः स्थानं कुतः सुखं । अश्रद्धेयः कृतघ्नो हि कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ॥ ११ ॥ उद्योग. अ० १०७

२ गोघ्ने चैव सुरापे च चौरे भग्नव्रते तथा । निष्कृतिर्विहिता सद्भिः कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ॥ १२ ॥ रामायण किष्किंधा० अ० ३४

यांदकालाच्या अनुभवानें मूढापेक्षां मूढासही पक्कें समजून चुकलें आहे, यामुळें ठाकूरकातकरी वगैरे रानटी लोकही रानांत टोळ्याटोळ्यांनीं झोंपड्या बांधून एकजुटीनें राहतात, जमातीनें शिकार करितात, व रात्रीं एकोप्यानें शेकूटीशीं नाचतमाशे करून मनोरंजन करितात, ह्यावरून अशा रानवट मनुष्यांस देखील समाजव्यवस्थेच्या फायद्यांचें अज्ञान आहे, असें ह्मणतां येत नाहीं. तर मग तें सुधारलेल्या लोकांस आहे, असें कसें ह्मणतां येईल ? यावरून देशहितास झटण्याची हयगय अज्ञानानें होत नाहीं. केवळ लुच्चेगिरीनें होते. कांहीं अंगचोर मनुष्यांस कांहींएक न करितां दुसऱ्याच्या मेहनतीचा आयता फायदा होत असलेला पाहून, सांप्रत बहुतेक लोक अंगचोरी करूं लागले आहेत. कितीएक नीतीचें पाठबळ नसल्यामुळें देशबुडव्या स्वार्थी अधिकाऱ्यांच्या वक्रदृष्टीस भिऊन आपण स्वतः देशबुडवे व स्वार्थसाधु बनले आहेत. कितीएकांची अशी समजूत झाली आहे कीं, ज्या गोष्टीची नुकसानी व अडचण कालांतरानें अनुभवास येणार, त्या गोष्टीकरितां आज शरीराची व द्रव्याची झीज सोसण्यांत काय मतलब ? आमची व आमच्या पुत्रपौत्रांची हयात सध्यां चालतें आहे त्याप्रमाणें चालून निघून जाईल, पुढच्या

पंचवीस पिढ्यांचें कोणीं पाहिलें आहे, त्याची आज विवंचना करीत बसण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. पण अशा प्रकारें आपणांस धूर्त ह्मणविणाऱ्या लोकांस असें कळत नाहीं कीं, सांप्रत जें संसाराचें गाडें चालतें आहे ह्मणून ते ह्मणतात, तें खरोखर चालतें आहे, किंवा जेमतेम कसेंतरी कष्टानें रेटून न्यावें लागत आहे, व तें असें कांहीं दिवस रेटलें जाईल, कीं मध्येंच मोडून पडेल; अशा लबाड, भ्याड, व अदूरदृष्टीच्या लोकांनीं आपले दुर्गुण टाकून देऊन व लोकऋणाच्या फेडीची जबाबदारी ध्यानीं आणून आज लोकहितास जपलें, तरच आपला निभाव लागेल, नाहींपेक्षां थोडेच दिवसांत अफ्रिकन शिध्धी लोकांप्रमाणें आपणांस परदेशस्थांचे गुलाम बनावें लागेल, ह्याविषयीं प्रत्येकानें आपल्या हृदयांत खातरजम्मा बाळगून रहावें.

संकटकाल प्राप्त होण्यापूर्वींच विचारी पुरुष त्याविषयीं सावध रहात असतात. ह्यामुळें संकट प्राप्त झालें असतां, त्याचा त्यांस प्रतिकार करितां येतो. ज्या गाफल पुरुषाला संकटकाल प्राप्त झालेला समजत नाहीं, तो संक-

---

१ पुरतः कृच्छ्रकालस्य धीमाञ्जागर्ति पूरुषः। स रुच्छ्रकालं संप्राप्य व्यथां नैवेति कर्हिंचित् ॥ १ ॥

यस्तु कृच्छ्रमनुप्राप्तं विचेता नावबुध्यते। स कृच्छ्रकाले व्यथितो न श्रेयो विन्दते महत् ॥ २ ॥ उद्योग, अ० २३४

टांत क्लेश पावतो, व त्याचें पुढेंही चांगलें होत नाहीं. यास्तव आजच्या कष्टकालावरून पुढच्या कष्टतर कालाचें अनुमान करून सर्वांनीं आजच सावध व्हावें, आणि प्रथमतः सद्वर्तनानें वागून आधीं देशहित करण्याची अंगीं पात्रता आणावी आणि नंतर आपल्या शिरावर लोकऋणाचें ओझें कितीं आहे ह्याचा पूर्ण विचार करून कृतज्ञबुद्धीनें तें यथाशक्ति फेडण्याचो उत्साहानें कंबर बांधावी. ॥ " भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः । तस्मात् सर्वप्रकारेण ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ॥ " असे नास्तिकपणाचे कोते विचार मनांत आणूं नयेत. देह हाच आत्मा समजणें, व सदोदित त्याच्याच लालनांत मग्न असणें, हा आधीं कोता विचार, व त्या विचारावर सर्वांनीं ऋण काढून तें फेडण्याची बुद्धि न ठेवितां दिवाळी करणें, हा तर फारच कोता विचार होय. असा बुडवेपणा धरल्यानें कांहीं कालानें ऋणदाते सावकार कंगाल होऊन ऋणही मिळणार नाहीं, व घृतही मिळणार नाहीं.

असो, लोक ऋणांतून मुक्त होण्याची पात्रता अंगीं आणण्याविषयीं, व तें फेडण्याची जबाबदारी मनांत वागविण्याविषयीं, आवश्यकता दाखवित असतां काय केल्यानें तें फिटेल, ह्याविषयीं सामान्यत्वानें निर्देश झालाच आहे. अमुक अमुक केल्यानें देशहित होईल, असें

विशेषत्वानें सांगणें, हें देशकालावर व तें करणाऱ्याच्या सामर्थ्यादि अनेक गोष्टींवर अवलंबून असल्यामुळें शक्य नाहीं. तत्संबंधानें आपले विद्वान्, सच्छील, व दीर्घदर्शी असे लोकनायक, हे देव, राजा, व प्रजा ह्यां पैकीं कोणाच्याही अधिकाराचा अतिक्रम न करितां, समयास अनुलक्षून वेळोवेळीं जो विहित मार्ग दाखवितील, त्या मार्गास आपण दृढनिश्चयानें व स्वाभिमानानें अनुसरावें, व तसें करितांना देशबुडव्या दुर्जनांच्या छळणुकीस भिऊं नये. स्वदेशहिताची रास्त गोष्ट करीत असतां धन, स्वजन, व जीवित ह्यांस अंतरण्याची जरी वेळ आली तरी बेहेत्तर, असा मनाचा पक्का धडा करावा. वसईचा किल्ला सर करितांना लाखबांगडी फुटली, व सोनपत पानपतची लढाई झाली, त्या वेळीं साऱ्या महाराष्ट्रांत एक घरही सुतकाखेरीज नव्हतें, अशा गोष्टी आपण इतिहासांत वाचतों, त्यावरून शेंदीडशें वर्षांपूर्वीं आपल्या पूर्वजांनीं पुढील पिढीच्या हिताकरितां आपले प्राण खर्ची घातले हें स्पष्ट होतें, असें असतां आज आपणांस आपल्या मुलाबाळांच्या हिताकरितां दुर्जनांचा साधारण छळही सहन करण्याचें धैर्य नसावें, हें केवढें आश्चर्य! सुस्थिति ही नेहमीं कष्टसाध्यच असते, यास्तव कष्टांस कंटाळून ती कधींही प्राप्त होणार नाहीं. व्यक्तिमात्राची सुस्थिति देश सुस्थितींत

असल्याशिवाय होत नसते, देशाची सुस्थिति लोकांच्या एकजुटीशिवाय होत नसते, लोकांची एकजूट एकमेकांचा विश्वास वाढल्याशिवाय होत नसते, व एकमेकांचा विश्वास प्रत्येकाच्या सद्वर्तनाशिवाय वाढत नसतो, असें सद्वर्तन हें सर्व श्रेयस्कर गोष्टींस आदिकारण आहे. तें न सुधारतां कितीही तांडव केलें तरी स्वहित व देशहित होणें नाहीं.

देशहित जर एकजुटीवर अवलंबून आहे, तर ती एकजूट होईल कशी, व ती नाहींशी होण्यास कारणें काय झालीं, याचा तपास ज्यानें त्यानें आपल्या मनाशीं केला पाहिजे. तो न करितां एकजूट व देशहित ह्यांविषयीं सभा भरवून कितीही जोराचीं व्याख्यानें दिलीं व ऐकिलीं, किंवा मी जसें अरण्यरूदन करित आहें त्याप्रमाणें आणखी कितीकांनीं जरी केलें, तरी त्यापासून तिळभरही फायदा होणें नाहीं. मी हा जो मानवी आयुर्दायाच्या चवथ्या प्रहरांत आक्रोश करित आहें, तो केवळ निर्जन अरण्यांत करित आहें, हें मी पक्कें जाणून आहें, येथें तो ऐकून त्याबद्दल कोणीही विचारपूस करण्यास मजला भेटणार नाहीं, या विषयीं माझी खात्री आहे. हा कंठशोष मी लोकांच्या सहानुभूतीकरितां मुदलींच करीत नाहीं. तो केवळ दुःखाच्या

तीव्र वेदनेनें हृदयस्फोट करून आपोआपच बाहेर पडत आहे, यामुळें तो माझी कशीही समजूत असली, तरी बंद कसा व्हावा. " ॥ शोकक्षोभीं रोदन हृदयस्थैर्या नसे दुजी वाट ॥ " असें जें ह्मटलें आहे, तें अगदीं खरें आहे.

लोकांतला ऐक्यभाव नष्ट होण्यास अनीतीपासून उत्पन्न झालेला बेभरंवसा हें एक जसें कारण आहे, तसें जातिमत्सर हेंही दुसरें बलवत्तर कारण आहे. या देशांत जातिभेद हा कांहीं आजकाल उत्पन्न झालेला नाहीं. आमचें धर्मशास्त्र तो सृष्टीच्या उत्पत्तिकालापासून स्वयंभूच आहे असें सांगतें, व अर्थशास्त्र त्याची आवश्यकताही प्रतिपादन करितें, समाज घटनेपूर्वीं मनुष्यमात्राची जन्मसिद्ध समता अगदीं कांटतोल असते, असें जरी कोणीं मानलें, तरी समाज घटनेनंतर व्यवहारांतल्या सांपत्तिक विषमतेनें व मनुष्याच्या गुणकर्मभेदानें ती समता टिकत नाहीं, हें त्यानें कबूल केलें पाहिजे. मनुष्य, व्यवहाराच्या रंगभूमीवर नाचूं लागला कीं, त्यास दुसऱ्या सहकारी नटाची व आपली समता आहे, ही भावना सोडून देऊन प्राप्त झालेल्या भूमिकेचें काम निमुटपणें करावें लागतें, तू राजा कां व मी दुजऱ्या कां हा शुष्क वाद उपस्थित करून भांडत बसतां येत नाहीं.

पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांत ही अपरिहार्य नीचोच्चता व तज्जनित जातिभेद भिन्न भिन्न स्वरूपानें असतोच, मग तो आमच्याच देशांत कां नसावा ? व ह्या सार्वत्रिक जातिभेदानें, जर इतर देशांत देशकार्यास व लोकांच्या एकजुटीस कांहीं अडथळा होत नाहीं, तर तो येथेंच कां व्हावा ? यावरून जातिभेद हा अपकारक नसून जातिमत्सरच अपकारक आहे, हें उघड होतें.

सांप्रत सुदैवानें ह्मणा कीं दुर्दैवानें ह्मणा, आमचा व्यवहार संपुष्टांत आल्यामुळें ह्या जातिमत्सरास व जातिवादास अवसर सांपडत आहे. ह्या जात्यभिमानाशिवाय दुसरें कांहीं अभिमान वाहण्यास उरलें नाहीं, ह्मणून ह्या पोकळ अभिमानांतच आनंद वाटत आहे, व आमची एकजूट ज्यांच्या डोळ्यांत खुपते, त्यांच्या चिथावणीनें तो वृद्धिंगत होत आहे. हल्लीं आमच्या प्रभूच्या दयालुतेमुळें आमचा व्यवहार इतका आटोपसर झाला आहे कीं, आह्मांस 'येन केन प्रकारेण' मध्यान्हकाळ संभाळतां आला, ह्मणजे आमच्या व्यवहाराची इतिकर्तव्यता झाली. आज आह्मांस एकजुटीनें चोराचिलटयांचा प्रतिकार करण्याचें कारण उरलें नाहीं, परचक्रापासून बचाव करण्याची गरज राहिली नाहीं, व राजकारण तर आमचें नव्हेच, त्या बद्दल आह्मीं वृथैव पराधिकार चर्चा

काय ह्मणून करावी! सारांश, आह्मीं फक्त सहा सात घंटे सरकारची किंवा सावकाराची मन लावून हमाली करावी आणि जगावें. व जगून पुन्हा नव्या दमानें हमाली करावी, किंवा कांहीं हरळीची मुळी लाधली असल्यास, ती खुरडीत जातिबांधवांवर दुगाण्या झाडाव्या. आणि इतकीही अनुकूलता नसेल तर, व्यवहारव्यापाराच्या प्रतिष्ठित नांवावर फसवाफसवी करावी. किंवा एखादा लक्ष्मीपुत्र हुडकून काढून त्याच्या विनोदास पात्रभूत व्हावें. एवढें उरकून आह्मी आपल्या चंद्रमौळी राजमंदिरांत तरटाच्या मसनदीवर आरूढ झालों कीं, आपापल्या घरचे बादशाह आहों. मग आह्मीं बादशहानीं खरें युद्ध नाहीं तर नाहीं; पण नुसतें वाग्युद्ध देखील करूं नये कीं काय?

लोकांस हें वाग्युद्ध जितकें निरुपद्रवी भासतें तितकें तें निरुपद्रवी नसून, खऱ्या युद्धापेक्षां देखील ज्यास्त घातक आहे, असें आमच्या अनुभवास येऊन चुकलें असतांही, अद्याप आमचे डोळे उघडत नाहींत, ह्यास काय ह्मणावें? अजूनही पोकळ अभिमानानें एक दुसऱ्यास, मी देवाच्या तोंडापासून निर्माण झालों असल्यामुळें भूसुर आहें, व तूं देवाच्या शेंडीपासून निर्माण झाल्यामुळें जटासुर आहेस, असें तंडत बसतो, आणि दोघेही देवदैत्य अस्तन्या वर सारून लढाईस प्रवृत्त होतात,

हें केवढें आश्चर्य. पण मी या भूदेवास वंदन करून, व जटासुरास लोटांगण घालून, विनयपूर्वक इतकें सुचवितों कीं, हा प्रसंग तुह्मांस परस्पर लढत बसण्याचा नाहीं, एकजुटीनें समुद्रमंथन करून दर्यागर्क झालेलीं रत्नें हस्तगत करून घेण्याचा आहे. यास्तव तीं प्रथमतः एकीनें प्राप्त करून घ्या, आणि नंतरही पौराणिक समुद्रमंथनाचा इतिहास विचारपूर्वक लक्षांत आणून त्या रत्नांकरितां एकमेकांच्या उरावर बसूं नका. मागील इतिहासाचें तात्पर्य ध्यानीं आणून आपण जर शहाणें होऊं नये, तर इतिहास लिहिण्याचें, वाचण्याचें, व ऐकण्याचें प्रयोजन काय ?

बाबानों, धर्मप्रणीत जातिभेद हा कांहीं तुमच्यांत कलह लावीत नाहीं, धर्मबाह्य जो जातिमत्सर तोच तुमच्यांत कलह उत्पन्न करित आहे, हें ध्यानीं आणा. धर्मांत जातिभेद सांगितला आहे, तरी जातिमत्सर व वृथाभिमान करावा ह्मणून कोठेंही सांगितलेलें नाहीं. वृथाभिमानानें जातिमत्सर हृदयांत वागवून आपसांत फाटाफूट करावी, आणि धर्माच्या नांवानें बोटें मोडावीं, ह्या उलटया चोराच्या बोंबा नव्हत काय ? तुमच्या एकजुटीस धर्म आडवा येण्यास त्याचें महत्व तरी तुमच्या जवळ राहिलें आहे कोठें ? तुमच्या ? हितशत्रूंनीं

तुमच्या कोटकल्याणाकरितां व आपल्या फायद्याकरितां धर्मवेडाचीं पाळेंमुळें देखील तुमच्या डोक्यांत उरूं दिलीं नाहींत, इतकेंच नाहीं, तर त्याचें बीज पुन्हां पेरलें तरी आणखी शेंकडों वर्षें तें तेथें मूळ धरणार नाहीं, अशी तजवीज करून ठेविली आहे. परभांच्या पंक्तीस ब्राह्मण जेवीत नाहींत ह्मणून ब्राह्मण, परभांस व्यवहारदृष्ट्या नीच मानतात, असें मनांत भरविण्याची आग शत्रूंनीं बुद्धिपुरःसर पाखडली आहे, व ब्राह्मण त्या आगीस वृथाभिमानाचा फुंकर घालून जास्त चेतवीत आहेत. ब्राह्मणपरभांचा पंक्तिप्रचार नसणें, हें दोन्ही जातींत कलह उत्पन्न करण्यास आपल्या शत्रूंस जसें आज निमित्त सांपडलें आहे, तसें जेवतांना बापाचा स्पर्श झाला कीं, मुलगा पानावरून उठून जातो, त्या अर्थीं लेक बापास नीच मानतो, असें आमच्या पोकळ डोक्यांत गच्च भरवून देऊन ब्राह्मण जातींतही बापलेकांचें वितुष्ट पाडण्यास उद्यां शत्रूंस निमित्त सांपडणार नाहीं, असें नाहीं. आह्मांस एके तगारींत जेऊं घालण्याचा अश्रांत यत्न आमचे हितचिंतक जो करीत आहेत, तो आमच्या एकजुटीकरितांच का? तसें खरोखर असेल तर, आह्मांस कृतज्ञबुद्धीनें त्यांस शेवटची पानसुपारी करून चार पावलें पोहोंचवावयासही गेलें पा-

हिजे. पण ही उपकाराची फेड परमेश्वर आमच्या हातून करवितो आहे कीं, आह्मांस उपकारांत असेंच कुजत ठेवितो आहे, याचें अनुमान काय करावें ! ईश्वरी संकेत अचिंत्य व दुर्ज्ञेय आहे, तो आह्मा मानवांस काय कळणार ?

धर्मश्रद्धा ह्मणा कीं, धर्म वेड ह्मणा, तें आजच्यापेक्षां शेंदीडशें वर्षांपूर्वीं जास्त होतें. व त्या कालीं धर्मसंबंधानें लोकांचें आचरणही विशेष दृढ होतें. त्यास आजच्या इतकी शिथिलता आली नव्हती. तरी देखील व्यवहारानें धनगरास ब्राह्मणांचा काका बनविलें, परंतु बिचाऱ्या धर्मानें तोंडावाटे ब्र देखील काढिला नाहीं, आणि आज तर सर्व जातींचीं सहभोजनें राजरोस घडत असूनही भिन्नजातीच्या लोकांनीं आपलें देशबंधुत्वाचें खरें नातें त्या धर्मास रुचत नाहीं, हें ह्मणणें अगदीं अयुक्तिक दिसतें. धर्मदृष्ट्या जातिजातींचें ज्येष्ठ कनिष्ठाचें नातें असलें, ह्मणून देशबंधुत्वाचें नातें नाहींसें होणार आहे कीं काय ? मी ब्राह्मण, मी मोठा, व तूं परभू, तूं खोटा, हा पोकळ अभिमान ब्राह्मणांनीं सोडला पाहिजे, व ब्राह्मणांनीं आमच्या पंक्तीस बसलें पाहिजे, हा दुराग्रह परभांनींही सोडला पाहिजे, ह्मणजे दोघेही देशभाई देशहितास सारखेच वांटेकरी होतील, त्यांत एक वडील

असला ह्मणून त्यास कांहीं जास्त मिळणार नाहीं, व एक धाकटा असला ह्मणून त्यास कांहीं कमी मिळणार नाहीं.

थोड्या कालापूर्वीं आपले पूर्वज हा जातिमत्सर न करितां, ब्राह्मण, शेणवी, परभू, व मराठे इत्यादि सर्व जातींचे लोक खांद्याशीं खांदा भिडवून राष्ट्रहिताचा जड-गाडा मोठ्या बिकट मार्गांतून ओढीत होते. कोणीही आपल्या जिवाकडे पहात नव्हता, कोणीही अंगचोरी करीत नव्हता, कोणीही पोरकट उखाळ्यापाखाळ्या काढून तंडत नव्हता, असें असतां, आपापसांत भांडत बसण्याची दुर्बुद्धि, जी आमच्या बापज्याद्यांस नव्हती, ती आजच आह्मांस कोठून आठवली. हा काय दैवदुर्विलास ह्मणावा, कीं शत्रूंनीं चेटुक केलें ह्मणावें ?

बाबांनों व्यवहारदृष्टीनें पाहिलें तर ब्राह्मण कांहीं उंच नाहींत व परभू कांहीं निंच नाहींत, दोघेही एक्या पल-टणींत भरती करण्यासारखे सारख्या उंचीचे कलमब-हाद्दर व तरवारबहाद्दर शिपाईगडी आहेत. मनुष्यानें गुणाची जाण बाळगून रास्त बोलणें जर वाजवी असेल, तर आह्मीं ब्राह्मणांनीं निरभिमानपणें परभूजातीचा धन्यवादच गाणें भाग आहे. कारण, ही जात ब्राह्मण व मराठे यांपेक्षां कमी असूनही, मागील कालीं ह्या जातीनें ब्राह्मण व मराठे ह्या दोन्ही जातींच्या बरोबरीनें

पराक्रम गाजविलेला आहे, मुत्सदीपणांतही आटो-
काट शाहाणपण व दूरदृष्टि प्रगट केली आहे, व कलम-
बहाद्दरींत तर आज तागाईत हे कोणच्याच जातीस हार
गेले नाहींत. हे लोक पुऱ्या नेकीचे, निधड्या काळजाचे,
व नानाफडनिशी अकलेचे आहेत, यांत संशय नाहीं.
ही स्तुति लिहिण्याच्या ओघास आली ह्मणून व सत्य
प्रीतीनें जरी केली आहे, तरी वृथाभिमान ज्यांच्या हृद-
यास खिळून राहिला आहे, ते लोक ह्याबद्दल नाना-
तऱ्हेचे कुतर्क केल्यावांचून राहणार नाहींत; हें मी जा-
णून आहें. यास्तव अशा लोकांस इतकेंच सांगतों कीं,
परभांच्या घरीं मजला चहापाणी पिण्याची इच्छा नाहीं,
दक्षणेची लालुच नाहीं, परभू अधिकाऱ्यांपाशीं नो-
करी मागण्यासारखें माझें वय नाहीं, व पोराबाळांस
नोकरींत चिकटवून देण्यास मजला मूलबाळही नाहीं.
या शिवाय धर्माच्या अनादरबुद्धीनें ब्राह्मणांची पाय-
मल्ली करण्याकरितां, इतर जातींस डोक्यावर घ्यावें, हाही
माझा हेतु नाहीं. मी स्वतः ब्राह्मण असून ब्राह्मण्याचा
पुरा भक्त आहें, तथापि पोकळ अभिमानाचा द्वेष्टा आहें.
धर्मदृष्टया जातिभेदाबद्दल चर्चा करण्याचें माझें काम
नाहीं. मजला व्यवहारदृष्टयाच या संबंधानें कायतो
विचार करणें आहे, व तो करीत असतां परभांची स्तुति

करणें ओघास आली ती मीं निष्पक्षपातानें केली. परंतु त्या स्तुतीनें पूर्वीच्या परभूमंडळीचा जितका गौरव होतो, तितका सांप्रतच्या परभू मंडळीचा होत नाहीं, हेंही मला येथें स्पष्टपणें सांगणें भाग आहे. वरील विवेचनांत परभू जात उपलक्षणार्थ घेतली आहे, त्या उपलक्षणावरून वाचकांनीं सर्व जातींविषयीं तोच विचार ध्यानीं आणावा.

रिकामटेकडच्या लोकांस कोणाची जरूर नसते, पण व्यवहाराच्या प्रचंड खटपटींत जे लोक गुंतलेले असतात, त्यांस सर्वांचें मनोधारण करणें भाग पडतें. ह्मणूनच आमच्यापेक्षां ज्यास्त धार्मिक असून, मागील काळच्या ब्राह्मणांनीं शिवाजी महाराजांच्या मुलास आपला मुलगा ह्मणवून, त्या समागमें आपद्धर्म समजून व समयास सादर होऊन, एके पात्रीं दहींपोहे खाल्ले, आणि प्रायश्चित्त घेऊन त्या दोषाची निष्कृतीही केली. खुद्द सवाई माधवरावांनीं खड्र्याची लढाई फत्ते झाली, तेव्हां शिंद्यांचे दिवाण जिवबादादा व लखोबा नाना हे शेणवी असतां, त्यांचा संतोष राखण्याकरितां कांहीं तडजोड काढून त्यांचे घरीं निरशनाचा फराळ केला. परशरामपंत प्रतिनिधींवर शाहू महाराजांची इतराजी झाली असतां, खंडो बल्लाळ चिटणीस यांनीं त्यांचे प्राण वांचविले ह्मणून, प्रतिनिधींच्या घरीं परशराम पंतांच्या

श्राद्धदिनीं चिटणीस परभूं असतांही, त्यांच्या घरचा कोणी तरी खासा मनुष्य श्राद्धाच्या ब्राह्मणांबरोबर जेवावयास बसवीत असत. ही चाल बरेच दिवसपर्यंत प्रतिनिधींच्या घराण्यांत चालू होती, असें ह्मणतात. नानासाहेब, भाऊसाहेब, व थोरले माधवरावसाहेब आदिकरून थोरल्या बाजीरावा नंतरचे पेशवे, मल्हारराव होळकर धनगर असतांही, त्यांस काका ह्मणत व वडिलांप्रमाणें मान देत, हें तर सर्व विश्रुतच आहे. या ऐतिहासिक गोष्टींवरून पूर्वकालीं निरनिराळ्या जातीचे लोक धर्माचा अनादर न करितां, कांहींतरी तडजोडीनें परस्परांचें मनोधारण करून देशकार्यास झटून पडत, कोणीहि बेविश्वास अगर जातिमत्सर करीत नसे. हल्लींही तोच कित्ता आपण गिरवून एकमेकांचा एकमेकांवर इतबार व लोभ जडेल, असें वर्तन ठेविलें पाहिजे. इतकें केल्यावर एकजूट झाली ह्मणून समजावी. ती होण्यास कांहीं मंत्र तंत्र करावें लागतें असें नाहीं.

परस्परांचा एकमेकांवर विश्वास व लोभ जडला, व नीतिवर्तन वाढलें, ह्मणजे देशहित करण्याची पात्रता येईल हें खरें, परंतु अंगीं पात्रता असून लोकांची देशहित करण्याविषयीं प्रवृत्तीच होत नसेल, तर त्या पात्रतेचा काय उपयोग ? देशहित उत्साहानें करण्यावि-

षयीं प्रवृत्ति होण्यास लोकांच्या मनांत स्वाभिमान जागृत झाला पाहिजे. मनुष्यमात्राची इतर सर्व पदार्थांहून आपल्या आत्म्यावर, विशेष व स्वाभाविक प्रीति असते. आपल्या स्वतःपेक्षां आपणांस दुसरें काय प्रिय असणार ! इतर सर्व पदार्थ जे प्रिय वाटतात, ते आत्मसुखार्थ किंवा आत्मप्रीतीकरितांच वाटतात, असें ज्ञात्यांचें ह्मणणें आहे. मनुष्य विचार करून पाहील तर प्रत्येकाचा अनुभवही तसाच आहे, असें त्यास स्पष्ट कळून येईल. आत्म्याशीं अति निकट संबद्ध, व त्याचें भोगसाधन असलेला देह, तो देखील आत्मसुखार्थच प्रिय होत असतो. देहाकरितां देहावर आत्म्याची प्रीति नसते. कारण, रोगादि कारणांनीं शरीर क्लेशदायक झालें कीं, मरणोपायानें तो त्या शरीराचा त्याग करण्याची इच्छा करितो, हें सर्वांस अनुभवानें विदितच आहे. यावरून आत्म्याविषयीं ह्मणजे आपणा स्वतःविषयीं प्रीति, मनुष्यास जशी स्वाभाविक आहे, तशी इतर पदार्थांविषयीं प्रीति स्वाभाविक नाहीं. ती उत्पन्न होण्यास त्या पदार्थांपासून आत्म्यास सुख होईल असें वाटणें आवश्य असतें. मनुष्यास जे पदार्थ आपणास सुखावह होतील असें वाटतें, त्या पदार्थांस प्रिय मानून तो महाप्रयत्नानें आत्म्याकरितां त्या पदार्थांचा संग्रह

करितो, किंवा ईश्वरकृपेनें ते यत्नावांचून प्राप्त झाले असतील, तर त्याबद्दल आनंद मानितो. व अशा सुखोत्पादक पदार्थांच्या संग्रहाविषयींच त्यास अभिमान वाटतो. ज्या वस्तूपासून सुख होत नाहीं, त्या वस्तूविषयीं कोणासही आपलेपणा व अभिमान वाटत नाहीं. द्रव्य सुखोत्पादक असल्यामुळें त्याचा सांठा घरांत झाला कीं, मी श्रीमान्, मी सुखी, असा मनुष्यास अभिमान वाटूं लागतो. पण घरांत उकिर्डा पुष्कळ सांचला, ह्मणून त्याबद्दल कोणास अभिमान वाटतो काय ? ह्या उकिर्ड्यांचा जोंपर्यंत कांहीं उपयोग दिसत नाहीं, तोंपर्यंत त्याबद्दल कोणासही आपलेपणा वाटत नाहीं. पण तोच जेव्हां साक्षात् अगर परंपरेनें सुखोत्पादक आहे असें ध्यानीं येतें, तेव्हां त्यावर देखील मनुष्य आपलें स्वत्व स्थापित करूं लागतो, त्याजविषयीं अभिमान वाहतो, व त्याचें दक्षतेनें रक्षण करितो. कोंबड्यास उकिर्डा साक्षात् सुखदायक आहे, ह्मणून तो वाकरींत असतां मध्येंच छाती पुढें करून तो मोठ्या डौलानें ओरडतो. मनुष्यास तो जरी साक्षात् उपयुक्त वाटत नाहीं, तरी आत्म्यास भुक्तिसुख देणारें जें धान्य, तें उत्पन्न करण्यास तो परंपरेनें उपयुक्त आहे, असें जेव्हां त्यास वाटतें, तेव्हां तो त्याचा देखील आस्थेनें संग्रह करितो. त्याजवर आपलें स्वत्व दाखवूं

लागतो व कोणी तिऱ्हाईत येऊन तो उकिर्डा आपल्या शेतांत टाकण्याकरितां नेऊं पाहील तर त्यास तो आडवा येतो.

सारांश, वस्तूविषयीं प्रेम, लोभ, अभिमान, संग्रहवासना, व रक्षण ह्या गोष्टी त्या वस्तूच्या सुखोत्पादकतेच्या ज्ञानानें होत असतात. तें ज्ञान नसतां नुसतें एखाद्या वस्तूस पोपटा सारखें दुसऱ्याच्या शिकवणीवरून माझी माझी ह्मटल्यानें वरतीं सांगितलेल्या गोष्टी होणार नाहींत. जनरूढीनें लोकांस माझें कुटुंब, माझा गांव, व माझा देश अशी, माझेंमाझें ह्मणण्याची पोपटपंची शिकविली आहे, तिचा उच्चार मात्र लोक करितात. पण त्यांस ज्ञानाच्या नांवानें आंवळ्या एवढें शून्यच असतें. लोकांस कुटुंबव्यवस्थेचें व तज्जनित सुखाचें खरें व पूर्ण ज्ञान असतें तर, हल्लीं नवराबायको, बापलेक, व भाऊभाऊ यांमध्यें जो निष्कारण कलह दृष्टीस पडतो, तो न पडता. ग्रामव्यवस्थेचें व तज्जनित सुखाचें पूर्ण ज्ञान असतें तर, शेजारीशेजारी एकमेकांचा प्राण घेण्यास उठले नसते. व देशव्यवस्थेचें खरें ज्ञान असतें, व ती व्यक्तिमात्राच्या सुखास कारणीभूत कशी होत असते, हें लोकांस सूक्ष्मतेनें कळतें, तर स्वदेशहितास आजच्या प्रसंगीं कोणीच उदासीन न राहता. कर्तृत्वाच्या नांवानें पुरें औदासिन्य व सभेंतून व चवाठ्यावर पोकळ बडबडीचा गर्गशा जो जिकडेतिकडे ऐकूं येतो, त्याचें कारण या संबंधाचें

लोकांस अगदीं त्रोटक व भ्रामक ज्ञान आहे, हें होय. जों पर्यंत अनीतीनें स्वार्थ संपादन करण्याविषयीं मनुष्याचें मन लालचावत आहे, व जों पर्यंत देशहितापेक्षां स्वहिताची किंमत अधिक वाटत आहे, तों पर्यंत त्यानें देशहिताविषयीं कितीही सूक्ष्मतेनें प्रतिपादन केलें तरी, त्यास त्याबद्दल हृदयसंवेद्य खरें ज्ञान झालें आहे, असें ह्मणतां येत नाहीं. ती त्याची त्रोटक व भ्रामक बडबडच समजली पाहिजे. असलें त्रोटक व भ्रामक ज्ञान हें पुऱ्या अज्ञानापेक्षांही घातक असतें. यास्तव ह्या भ्रामक व मिथ्या ज्ञानाचा निरास करून अशा विस्तृत विषयाचें सूक्ष्म व खरें ज्ञान करून देणें, हें कांहीं एक दोन पानें मजकूर लिहून होण्यासारखें नाहीं, व तो या लेखाचा मुख्य विषयही नव्हे, या करितां तें काम विद्वान व देशहिताची कळकळ बाळगणाऱ्या महात्म्यांनीं हातीं घ्यावें, अशी माझी त्यांस विनंति आहे. गृहस्थाच्या प्रापंचिकव्यवहाराचें तरुण होतकरू गृहस्थांस निवेदन करीत असतां, लेखनौघानें प्राप्त झालेल्या ह्या अप्रकृत विषयाचें केवळ त्याच्या महत्वा करितांच येथें इतक्या पाल्हाळानें विवरण केलें, परंतु तें आतां, 'मिंय्या मूठभर व दाढी हातभर' असें हास्यास्पद होण्याच्या बेतांत आलें आहे.

यास्तव देशहिताबद्दल येथें संक्षेपानें इतकेंच सुचवितों कीं, सांप्रत अज्ञानानें लोकसमुदाय फारच अदूरदर्शी होऊन, ज्यास त्यास आपली बायको व मुलें, ह्यांच्या पलीकडे

ममत्व वाटत नाहींसें झालें आहे. पण ही कोती समजूत बरी नाहीं. ममत्वाचा संकोच करणें, हें विरक्त होऊं पाहणाऱ्या जनांचें काम आहे. संसारीजनांचें काम नाहीं. संसारीजनांनीं डोळस होऊन दूरदृष्टीनें दूरदूरचे हितसंबंध ध्यानीं आणून आपलें ममत्व वाढविलें पाहिजे. आपण हिंदु ह्मणविणाऱ्यांनीं आपलें ममत्व हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत वाढवून एकमेकांच्या सुखास जपलें नाहीं, तर आपण हिंदु कसचे ! आपला हिंदुस्थानदेश ही आपणा हिंदूंची परमपूज्य मातृभूमि आहे. या भूमीवर आपल्या पूर्वजांनीं देह ठेविले आहेत, व देशरक्षणार्थ त्यांनीं आपल्या रक्ताचे तिजवर अभिषेक करून तिजला वीरसुत्व दिलें आहे, ही पवित्र भूमि आपणा हिंदूंस विपदर्णवांतून तारणारी नौका आहे, पण ती आज पांचसातशें वर्षें परराज्यरूपी भयंकर खडकांवर एकसारखी हापटत राहिल्यामुळें, अगदीं डबघाईस आली आहे, व अशा डबघाईस आलेल्या बुडत्या नौकेंत बसलेले आपण हिंदु, केवळ आसन्नमरण झालेले आहों. याकरितां आपण सर्वांनीं जिवापाड मेहनत करून तिची डागडुजी करण्यास एकदिलानें झटलें पाहिजे. असें केलें तरच आपले जीव वांचतील, व आपल्या नौकेचा बचाव होऊन, ती पुढेंही आपल्या पुत्रपौत्रांस विपदर्णवांतून पार पाडण्यास समर्थ राहील.

प्रकरण पांचवें समाप्त.

झालें तरी सुभ्रातृत्व सार्वत्रिक दृष्टीस पडत नसे. आणि हल्लीं तर धनलोभानें वेडे होऊन वेगळे पडण्याची, व एकमेकांच्या मानेस[1] बसण्याचीच इच्छा पुष्कळ लोकांस होत असते, आणि असे स्वार्थानें मूढ[2] बनलेले बंधु आपआपला वांटा घेऊन वेगळे पडले, असें लोकांस दिसून आलें ह्मणजे, त्यांचे जे हितशत्रु असतात, ते परस्परांच्या मनांत वांकडें भरवून देवून त्यांच्यांत पक्कें हाडवैर उत्पन्न करितात. व असें हाडवैर एकदा उद्भवलें ह्मणजे, ज्यास तुलना नाहीं, असा त्यांचा भयंकर नाश होतो. यास्तव धर्ममर्यादेनें बद्ध असलेल्या भावाभावांचा विभक्ताचार चांगल्या लोकांकडून वाखाणला जात नाहीं. एकजूट फायदेशीर आहे, असें शाहण्यांचें ह्मणणें आहे खरें, तथापि तिच्या पोटांत घाताचें बीज झांकलेलें असतें, हें मनांत वागवून सावधपणानेंच जे तिचा स्वीकार करितात, त्यांसच ती फायदेशीर होते.

---

१ विभागं बहवो मोहात्कर्तुमिच्छन्ति नित्यशः । ततो विभक्तास्त्वन्योन्यं विक्षुभ्यन्तेर्थमोहिताः ॥ १८ ॥ आदि० अ० २९

२ ततः स्वार्थपरान्मूढान्पृथग्भूतान्स्वकैर्धनैः। विदित्वा भेदयन्त्येतान मित्रामित्ररूपिणः ॥ १९ ॥

विदित्वा चापरे भिन्नानन्तरेषु पतन्त्यथ । भिन्नानामतुलो नाशः क्षिप्रमेव प्रवर्तते ॥ २० ॥

तस्माद्विभागं भ्रातॄणां न प्रशंसन्ति साधवः । गुरुशास्त्रे निबद्धानामन्योन्येनाभिशंकिनाम् ॥ २१ ॥ आदि० अ० २९

वेळूच्या बेटांतील वेळू एकमेकांशीं जुळून असतात, यामुळें ते दुर्भेद्य होतात. एखादा वेळू तोडून काढीन ह्मटलें तर महत्प्रयास करावे लागतात. परंतु तेच निर-निराळे होऊन बुरडाच्या हातीं पडले कीं, त्यांच्या चिरफळ्या होण्यास उशीर लागत नाहीं. असाच प्रकार भावाभावांच्या एकत्रतेचा आहे. ते एकत्र असतात तोंपर्यंत, त्यांजकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची बहुधा कोणास छाती होत नाहीं, पण त्यांच्यांत फूट झाली कीं, त्यांच्या शत्रूस दोघांपैकीं एका घरभेद्यास बगलेंत मारून एका मागून दुसऱ्याचा नाश सहज करितां येतो.

एकजुटीस बाह्योपाधींचें निवारण करणें जितकें सोपें जातें, तितकें तीस आपल्याच गर्भांत असलेल्या अंतरुपाधींचें निवारण करणें, सोपें जात नाहीं. ह्या विधानाची सत्यता, दृष्टांता करितां घेतलेल्या वरील उदाहरणांतही स्पष्ट दिसून येते. वेळूंच्या दाट जंगलाचा विध्वंस कुऱ्हाडीला फारसा करवत नाहीं. परंतु, त्या जंगलांतील वेळूंच्या परस्पर घासाघासीनें वणवा लागून हां हां ह्मणतां सारें जंगल उध्वस्त होतें. असाच प्रकार कुटुंबाचा आहे. कुटुंबाची भयंकर हानि बाह्य शत्रूंकडून बहुधा होत नाहीं, प्रसंगविशेषीं झालीच तर अल्पस्वल्प हानि होते. परंतु एकत्र कुटुंबांतील माणसांची परस्पर

घासाघास सुरू होऊन कुटुंबें सफाई बुडाल्याचीं वारंवार हवीं तेवढीं उदाहरणें दृष्टीं पडतात. वेळूच्या बेटांत घासाघास सुरू होण्यास वायु जसा कारण होतो, तद्वत् कुटुंबांतील माणसांत घासाघास उत्पन्न होण्यास आप्पलपोटया स्वभाव, निरंकुश वर्तनाची आवड, आणि स्त्रीजितत्व ह्या तीन गोष्टी मुख्यतः कारणीभूत होतात. ह्या तिन्ही दुर्गुणांस सार्वत्रिक प्रचारामुळें सांप्रत लोकोपहासाचें भय उरलें नाहीं. यामुळें तो अमर्याद वाढून कुटुंबांतील अत्यंत जिव्हाळ्याच्या माणसांत घासाघास सुरू होते, यांत नवल तें काय ?

मनुष्यास दुर्वर्तना पासून निवृत्त करणारीं तीन[१] प्रकारचीं शासनें असतात. पहिलें राजशासन, दुसरें लोकशासन, व तिसरें धर्मशासन. या तिन्ही शासनांपैकीं पहिल्यापेक्षां दुसऱ्याचा, व दुसऱ्यापेक्षां तिसऱ्याचा, अधिकारप्रदेश ज्यास्ती ज्यास्ती विस्तृत आहे. राजशासनास बारिकसारिक दुर्वर्तनांचा पत्ता लावून त्याचें नियमन करणें, अशक्य असतें. यास्तव तें बारिक सारिक दुर्वर्तनाकडे, किंवा त्या वर्तनाच्या क्रियारहित वायफळ बोलण्याकडे लक्ष न पुरवितां, कांहीं विशेष

---

१ यमदण्डभयात्केचित्पापाः पापं न कुर्वते । राजदण्डभयात्केचित्परस्परभयादपि ।। महाभारत.

प्रकारच्या घातक दुर्वर्तनाकडे लक्ष पुरवून त्याचें मात्र नियमन करितें. परंतु लोकसमाजास व्यक्तिमात्राचा जसा निकट संबंध असेल, त्या मानानें त्याचें बारिकसारिक दुर्वर्तन दृग्गोचर होतें, व त्यास अवगणना, धिक्कार, व बहिष्कार इत्यादिकांनीं तशा दुर्वर्तनाचें, किंवा त्याच्या क्रियारहित वायफळ प्रतिपादनाचें नियमन करितां येतें. पण असें जरी आहे, तरी लोकसमाजास दुर्वर्तनाच्या चिंतनिकेचा पत्ता लागत नाहीं, व त्यास मानसिक दुर्विचारांचा प्रतिबंधही करितां येत नाहीं. माणसाच्या अंतर्यामापर्यंत हुकमत एक्या धर्मशासनाची मात्र चालते. व तें, पापाची भीति दाखवून मानसिक दुर्विचारांचेंही नियमन करण्यास समर्थ असतें. उदाहरणार्थ, एखाद्यानें आपल्या माता पितरांची अमर्यादा केली, तर राजा हें दुर्वर्तन समजत नाहीं, असें नाहीं. अशी गोष्ट राजाही अनुचितच लेखितो. परंतु तो अशा दुर्वर्तनाकडे स्वतः लक्ष न देतां त्याचा प्रतिबंध करणें, लोकसमाजाकडे सोंपवितो. तसेंच एखाद्यानें दुसऱ्याची वस्तु चोरून नेली, तर राजा असें दुर्वर्तन करणारास शासन करितो. परंतु कोणी चोरी करण्यास हरकत नाहीं, अशी क्रियारहित जल्पना करील, तर राजा अशा वायफळ जल्पनेकडे बिलकुल कान देत नाहीं. पण लोकसमाज

अशा वायफळ बडबडीचीही उपेक्षा करणार नाहीं. तो अशा निंद्याचरणाचें प्रतिपादन करणारास पाजी समजून, त्यास जोड्याशीं देखील उभें राहूं देणार नाहीं. राजा कोणाचेंही क्षुल्लक वर्तन बघण्याची इच्छा करीत नाहीं, व तें त्यास दिसणेंही शक्य नाहीं. तसेंच लोकसमाजासही कोणाचें अंतर्याम दिसणें शक्य नाहीं, यामुळें त्यास कोणाच्याही पापबुद्धीचें शासन अधिक्षेपादिकांनीं करितां येत नाहीं. पापबुद्धीचें नियमन एक्या धर्मशासनासच करितां येतें. त्याचा अधिकार लोकांच्या अंतर्यामा पर्यंतही अबाधितपणें चालूं शकतो.

राजशासन हें, लोकशासनापेक्षां व धर्मशासनापेक्षां जरी उग्र असतें, तरी तें मागील उभयविध शासनांप्रमाणें क्षणोक्षणीं व चिरकाल पीडा देणारें नसतें. लोकांत झालेलें बदनाम किंवा पापकर्माची तळमळ, यांपासून व्यवहारास अडचण, व मनास पीडा, पदोपदीं व यावज्जीव होत राहाते. यामुळें लोक, राजाच्या भीतिपेक्षां जनाची व मनाची भीति विशेष बाळगितात.

पण हल्लीं लोकांस जनलज्जा व मनलज्जा बिलकुल राहिली नाहीं. जनलज्जा नाहींशी होण्याचें कारण, बहुतेक लोकांच्या मनाचा दुर्वर्तनाकडे ओढा झाल्यामुळें कोणीं कोणास हंसावें, आणि कोणीं कोणास लाजावें ! सारे

एकाच माळेचे मणी बनून जो तो त्यांतले त्यांत आपणास मेरुस्थान मिळावें ह्मणून चढाओढ करणार. मनलज्जा नाहींशी होण्याचें कारण पाहूं गेलें तर, तें वरच्याहूनही घोरतर आहे. जेव्हां मनाची धर्मश्रद्धेनें सदाचरणाकडे प्रवृत्ति असते, व ती असूनही प्रसंगविशेषीं केवळ मानवी दौर्बल्यामुळें मनोविकारांचें दमन न होतां प्रमाद घडतो, तेव्हां ती दुर्विकाराची ऊर्मि गेल्यावर मनास तळमळ लागते. कारण अशा प्रसंगीं घडलेल्या वर्तनाच्या प्रमादीपणाचें भान नष्ट झालेलें नसतें. परंतु अधार्मिकपणानें विपरीत भावना मनांत उद्भवून जेव्हां मनुष्य अविहित गोष्ट विहितच आहे, अशी भावना करून ती करूं लागतो, तेव्हां तिजबद्दल तळमळ वाटण्याचें कारणच उरत नाहीं. परमेश्वरास ज्या लोकांचा पराभव[1] व्हावा असें वाटतें, त्या लोकांची तो आधीं विवेकबुद्धि नष्ट करितो, व त्यामुळें ते अविहित गोष्ट विहित समजून ती आग्रहानें करूं लागतात. आणि ह्या प्रमाणें विनाश जवळ येऊन बुद्धि कलुषित झाली ह्मणजे, नीति-

---

१यस्मै देवाःप्रयच्छन्ति पुरुषाय पराभवम्। बुद्धिं तस्यापकर्षन्ति सोऽवाचीनानि पश्यति ॥ ८१ ॥

बुद्धौ कलुषभूतायां विनाशे प्रत्युपस्थिते । अनयो नयसंकाशो हृदयान्नापसर्पति ॥ ८२ ॥ उद्योग, अ० ३४.

प्रमाणें भासणारी अनीति, व सद्वर्तना प्रमाणें भासणारें दुर्वर्तन, मनास लाजवीत नाहीं.

प्रस्तुत कालीं कापट्यानें मुत्सद्दीपणाचा वेष घेतला आहे, आपमतलबानें व्यवहारदाक्षिण्याचें सोंग आणलें आहे, स्वैरवर्तनानें व्यक्तिस्वातंत्र्याची भूमिका धारण केली आहे, व स्त्रीजितत्वानें अथवा बाईलबुध्या स्वभावानें अंगीं प्रतिष्ठितपणाचा आविर्भाव आणून दारपरिचर्या असें संभावित नामाभिदान स्वीकारलें आहे, अशा प्रकारें नानाविध दुर्गुणांनीं निरनिराळ्या सद्गुणांचीं नामरूपें धारण करून, लोकांच्या अंतरंगांत प्रवेश केला आहे. व तेथें त्यांस स्वागतपूर्वक वसतिस्थान मिळून, त्यांनीं जो तेथें तमाशा मांडला आहे, त्या तमाशांत सध्यां लोक आपलें देहभान विसरले आहेत. अशा प्रसंगीं त्यांस भावाभावांनीं एकत्र रहावें हा उपदेश गोड कसा लागणार ! वर निर्दिष्ट केलेले हलकट सोंगाड्ये जोंपर्यंत हृदयांत नांदत आहेत, तोंपर्यंत मोठमोठीं कुटुंबें सुयंत्रपणें एकत्र राहणें शक्य आहे असें मानणें, ही निवळ वेडगळपणाची समजूत आहे. यास्तव कालमानान्वयें भावाभावांस वेगळें पडल्याशिवाय गत्यंतरच नाहीं, असें जर आहे, तर त्यांनीं केवळ पूर्वाचाराच्या भिडेस्तव अगदीं एकमेकांचीं मनें विटेपर्यंत लौकिकांत दर्शनी

एकत्रता दाखविण्याच्या भरीस पडून हाडवैर संपादणें रास्त नाहीं. गोडी आहे तोंच एकमेकांच्या सलूख्यानें वेगळें व्हावें हें बरें. असें समजूनउमजून वेळींच वेगळें झाल्यानें परस्परांच्या स्वार्थबुद्धीचा झगडा लागून, त्यांत नैसर्गिक बंधुप्रीतीचा चुराडा उडण्याचा संभव रहात नाहीं. वांटण्याकरितांना ज्येष्ठांनीं कनिष्ठां विषयीं वात्सल्य, व कनिष्ठांनीं ज्येष्ठांविषयीं पूज्यभाव मनांत वागवून, अल्पस्वल्प घस लागली असतांही, एकमेकांचा संतोष राखण्यास तत्पर असावें. होतां होईल तों, आपला लढा तिऱ्हाइतांनीं अगर सरकारानें तोडण्याची पाळी येऊं द्यावयाची नाहीं, असा अभिमान बाळगावा. एखाद्या बाबतींत समजूत होईलसें न दिसेल तर, ज्यांस आपणापैकीं कोणा एकाचा विशेष ओढा नाहीं, असे निष्पक्षपाती व सर्वांस मान्य असणारे पंच नेमून, त्यांकडून तडजोड करून घ्यावी. वृथाभिमानास पडून सरकारची तिजोरी व वकिलाचें घर कदापिही भरूं नये. जे भाऊ आपलें प्रेम पुढें कायम रहावें, या बुद्धीनें गोडी आहे तोंच, सावधगिरीनें विभक्त होण्यास उद्युक्त होतात, त्यांच्या वांटण्या आपसांत अगर पंचमार्फत समाधानीनें होण्यास कांहीं अडचण नसते. दुराग्रह उत्पन्न झाल्यावर मात्र भिकारी होऊन हायकोर्टाचा निवाडा मिळ-

विल्या शिवाय निकाल होणें शक्य नसतें. याकरितां सामान्य लढ्याबद्दल दुराग्रहास पेटून विरोध वाढवीत बसूं नये.

घर बहुधा एक्या कुटुंबाच्या सोयीचें बांधलेलें असतें, त्यांत भावाभावांच्या वांटण्या होऊन चार कुटुंबें नांदूं लागलीं ह्मणजे तें कोणाएकासही सोयकर होत नाहीं. याकरितां तें एकानें घेऊन बाकीच्यांनीं आपल्या हिश्शाबद्दल रोख पैसा अगर दुसरी मालमत्ता घ्यावी, आणि निराळीं घरें बांधून रहावें. एक्या घरांत कूडभिंती घालून एकमेकांची अडचण सोशीत, व एकमेकांस अडचण करीत राहूं नये. असें केल्यानें गैरसोय होत नाहीं, व निकट सान्निध्यानें बायकापोरांवरून तंटे होण्याचा संभव रहात नाहीं. घर फुटण्यास बहुधा बायका कारण होतात. त्यांचें प्राबल्य संसाराच्या अनेक कृत्यांत नानाविध प्रकारांनीं हानिकारक होत असतें, या करितां त्यांशीं कसें वागावें, याविषयीं विचार करणें इष्ट आहे.

स्त्रिया जशा अपकारक आहेत तशा त्या महान उपकारकही आहेत, यास्तव त्यांपासून बाधा न होतां सुखप्राप्तीच होईल, अशा रीतीनें कधीं कठोर व कधीं मृदु, अशा तारतम्यविचारानें त्यांशीं वागलें पाहिजे. स्त्रिया

संततिदायक,[1] अनेक कल्याणप्रद गुणांनीं युक्त, सत्कार करण्यास पात्र, लक्ष्मी प्रमाणें गृहास शोभा देणाऱ्या, मुलांबाळांचें संवर्धन व रक्षण करणाऱ्या, आलेगेले व इष्टमित्र यांची बरदास्त राखणाऱ्या, सेवासुख देणाऱ्या, आणि वंशवृद्धि व धर्मकार्यें करण्यास सहायभूत होऊन, पितरांसहवर्तमान सर्व कुळास स्वर्गप्राप्ति करून देणाऱ्या, अशा अत्यंत उपकारक आहेत. यास्तव पुरुषानीं त्यांचा सन्मान राखणें, व त्यांवर प्रेम करणें, ही गोष्ट मेहेरबानीची नव्हे. हें त्यांचे महत्वाचें कर्तव्यच आहे.

ज्या घरीं स्त्रियांचा[2] सन्मान होतो, त्या घरीं सर्व देवता प्रसन्नतेनें वास करीत असतात. व ज्या घरीं स्त्रियांचा अपमान होतो, त्या घरीं झालेलीं सर्व शुभकर्में, देवता प्रसाद नसल्यामुळें निष्फळ होतात. दारपरिग्रहानें

---

१ प्रजनार्थं महाभागाः पूजार्हा गृहदीप्तयः । स्त्रियः श्रियश्च गेहेषु न विशेषोऽस्ति कश्चन ॥ २६ ॥

उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनम् । प्रत्यहं लोकयात्रायाः प्रत्यक्षं स्त्रीनिबन्धनम् ॥ २७ ॥

अपत्यं धर्मकार्याणि शुश्रूषा रतिरुत्तमा । दाराधीनस्तथा स्वर्गः पितृणामात्मनश्च ह ॥ २८ ॥ मनु. अ० ९.

२ यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमंते तत्र देवताः । यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥ ५६ ॥ मनु, अ० ३.

मनुष्य क्रियावान्[1], गृहस्थाश्रमी, आनंदी, व भाग्यवान् होतो. प्रवासामध्यें देखील स्त्रीवियुक्त एकाकी पुरुषाला स्त्रीची चिंतनिका विश्रामप्रद[2] होते. यास्तव स्त्रिया पुरुषांना परम आधार होत. सपत्निक पुरुष विश्वसनीय समजले जातात. कारण, त्यांचीं हृदयें प्रेमार्द्र झालीं असल्यामुळें, ते भूतमात्राविषयीं निष्ठुर अगर बेपर्व न होतां, सर्वांशीं प्रेमळपणानें व दयार्द्र बुद्धीनेंच वागतात. दारपरिग्रहाशिवाय पुरुषाला पूर्णत्व येत नाहीं, तो अर्धवटच असतो. ह्मणजे पक्का गृहस्थ बनून धर्मार्थकामादि त्रिविध पुरुषार्थांना पात्र होत नाहीं, असें वाजसनेय श्रुतींत सांगितलें आहे.

अशा अनेक प्रकारांनीं स्त्रिया सन्मानास पात्र आहेत हें खरें, तथापि स्त्रिया जशा पुरुषांस उपयुक्त आहेत, तसे पुरुषही स्त्रियांस तितक्याच मानानें उपयुक्त आहेत. यास्तव स्त्रियांनींही पुरुषांचा सन्मान ठेविला पाहिजे. केवळ बायकांनीं देवी बनून, पुरुषांनीं त्यांचा " नमो देवी महा देवी " या मंत्रानें हात जोडून स्तु-

---

१ भार्यावन्तः क्रियावन्तः सभार्या गृहमेधिनः ।
भार्यावन्तः प्रमोदन्ते भार्यावन्तः श्रियान्विताः॥४३
२ कान्तारेष्वपि विश्रामो जनस्याऽध्वनिकस्य वै ।
यः सदारः स विश्वास्यस्तस्माद्दाराः परागतिः ॥ ४५

} आदिपर्व, अ० ७४.

तिपाठ करावा, आणि त्यांचे पुजारी बनावें, असा कांहीं अर्थ नाहीं. स्त्रियांच्या ठायीं दुर्बलता व सुकुमारता इत्यादि शारीरिक दुर्गुण आणि अस्थैर्यादि[1] मानसिक दुर्गुण विधात्यानें स्वभावसिद्ध ठेविले आहेत. यामुळें त्यांचें स्वामित्व पुरुषास प्राप्त झालें आहे. यास्तव पुरुषानें स्त्रीस निरंकुश होऊं न देतां, लागेल तेवढा मान द्यावा. तो देण्यास कोणी नांव ठेवीत नाहीं. सर्व प्रयत्नें करून स्त्रियांस मर्यादेंत[2] राखणें, हें पुरुषाचें धर्मशास्त्रदृष्ट्या पहिलें कर्तव्य आहे, व व्यवहारदृष्ट्याही तसेंच करणें भाग आहे, या कर्तव्या पासून तो विमुख झाल्यास दोषी होतो.

गृहाचें आधिपत्य जसें गृहस्थास असतें, तसेंच किंचित् खालच्या दर्जाचें आधिपत्य गृहिणीसही असतें. गृहिणी ही घराची शोभा व संसाराच्या अर्ध्या हिश्शाची भागीदारीण आहे, यास्तव तीस सामर्थ्याप्रमाणें वस्त्रालंकारांनीं भूषित करून तिचा बोज राखित जावा. दुर्भाषणें बोलून वाक्ताडण करूं नये. बायकांस शिवीगाळ करणें, हें परमावधीचें नीचपणाचें कृत्य आहे. स्त्रीपुरुषें हीं दोघें

१ पौंश्चल्याच्चलचित्तत्वात् नैस्नेह्याच्च स्वभावतः।
रक्षिता यत्नतोऽपीह भर्तृष्वेताविकुर्वते ॥ १५ ॥
२ एवं स्वभावं ज्ञात्वासां प्रजापतिनिसर्गजम्।
परमं यत्नमातिष्ठेत्पुरुषो रक्षणं प्रति ॥ १६ ॥

} मनु. अ० ९.

संसाराचीं वांटेकरी असतात. यास्तव उभयतांच्या स्वाभाविक सामर्थ्याप्रमाणें संसाराचीं निरनिराळीं कामें दोघांकडे वांटलेलीं असतात. बलाधिक्यामुळें द्रव्यार्जनाचीं, घराबाहेरचीं, व कष्टसायासाचीं कामें पुरुषानें करावीं, हा त्याचा अधिकार आहे. व मार्दवादि शारीरदुर्बलतेस्तव घरांतील ठेवरेव, पाकनिष्पत्ति, व शुश्रूषा वगैरे शीतळ छायेचीं कामें स्त्रियांनीं करावीं, हा स्त्रियांचा अधिकार आहे. परंतु सांप्रत हिंदुस्थानांत, विशेषेंकरून ब्राह्मणजातींत, स्त्रियांच्या सन्मानास हल्लीं फार वेडें पीक आलें आहे, तेव्हां अशा सुबत्तेच्या दिवसांत नवऱ्यास तीसचाळीस रुपये पगार मिळत असल्यावर बायकोनें दोन पानांचा तरी स्वयंपाक कां करावा ! व नवऱ्यानें तरी कां करवून घ्यावा ! लघुत्वास्पद पतिशुश्रूषा तरी कशी करावी ! व नवऱ्यानें तरी अमर्यादपणें त्या शुश्रूषेस मान्य कसें व्हावें !

घरांतील ठेवरेवीसंबंधें पाहूं गेलें तर स्त्रियांच्या भाग्यदशेनें आज तें काम बहुतेक आंवरून टाकिलेंच आहे. राहतां पैकीं तुपाचें बोळकें शिक्यास लाव, व लोणच्याच्या पडग्यावर झांकण ठेव, असें बारीकसारीक जें काम उरलें आहे, त्या कामाकरितां नवऱ्यानें बायकोवर अगदीं टेकून राहणें, हें त्याच्या मर्दुमकीस योग्य नाहीं.

द्रव्य तर निर्वाह होऊन संग्रहीं पडतच नाहीं, मग त्याच्या जपणुकीची गोष्ट बोलण्याचें प्रयोजन काय ? सारांश, मनूंसारख्या पंचांच्या विद्यमानें स्त्रियांच्या वांटणीस गेलेल्या कामांपैकीं कांहीं कामें त्यांच्या सुदैवानें आज उरलीं नाहींत, व कांहीं स्त्रीसन्मानाच्या नवीन अक्टान्वयें रद्द झालीं आहेत. अशा कालीं स्त्रियांनीं प्रतिष्ठितपणें ओटीवर बसून धांगडधिंगा, लावालावी, व भांडणतंटे कां बरें करूं नयेत !

मर्यादशील कुलिन स्त्रिया पुरुषास एकांतांत रमंवितात, धर्मकृत्यांत सहायभूत होऊन पितरांप्रमाणें पालन करितात, व रुग्णावस्थेंत मातप्रमाणें काळजी घेतात, याकरितां त्यांस परमाप्त समजून त्यांवर संसारांतील अनेक अधिकार सोंपविलेले असतात. पत्नी ही संसाराची दुय्यम मालकीण, गृहसंबंधीं नित्यकृत्यांतली मंत्री, एकांतांतील खेळगडीण, व कलाकुसरी संबंधें पट्टशिष्यीण स-

---

१ अर्थस्य संग्रहे चैनां व्ययेचैव नियोजयेत् । शौचे धर्मेऽन्नपंक्त्यां च पारिणाह्यस्य चेक्षणे ॥ ११ ॥ मनु. अ. ९.

२ सखायः प्रविविक्तेषु भवन्त्येताः प्रियंवदाः । पितरो धर्मकार्येषु भवन्त्यार्तस्य मातरः ॥ ४४ ॥ आदिपर्व, अ० ७४.

नच भार्यासमं किंचिद्विद्यते भिषजां मतम् । औषधं सर्व दुःखेषु सत्यमेतद्ब्रवीमि ते ॥ २९ ॥ वनपर्व, अ. ६१.

मजली जाते. ह्मणूनच अजराजानें इंदुमती मरण पावली असतां तिचा “ ॥ **गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्यः ललिते कलाविधौ** ॥ ” अशा निरनिराळ्या संबोधनांनीं निर्देश केला आहे. पण हे निरनिराळे अधिकार कोणामुळें व कोणाकरितां स्त्रियांस प्राप्त झाले आहेत, हें मनांत आणून तिनें ते चालविले पाहिजेत. बायको मामलेदारीण कां, नवरा मामलेदार ह्मणून, नवरा जर तलाठी असता, तर तिलाही निमुटपणें तलाठीणच व्हावें लागतें. ह्याच न्यायानें बायको घरची मालकीण कां, नवरा घरचा मालक ह्मणून. नवरा दास ह्मणून बायको मालकीण, असा कांहीं अर्थ नाहीं. वास्तविक पाहिलें तर बायकोचे सर्व अधिकार नवऱ्याच्या आधीन असतात. ह्मणून तिनें ते नवऱ्याच्या अनुमतानेंच चालविले पाहिजेत, त्याच्या मर्जीविरुद्ध चालवितां कामा नये. परंतु सांप्रत घरोघर बायकांचें प्राबल्य इतकें वाढलें आहे कीं, त्या संसाराचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेऊन नवऱ्यास कळसुत्री बाव्हल्याप्रमाणें नाचवितात. साताऱ्याच्या महाराजांस आपल्या प्रतिबंधांत ठेवून ज्याप्रमाणें पेशव्यांनीं सर्व राज्यकारभार आपल्या मुखत्यारीनें केला, व गादीवर बसते वेळीं मात्र महाराजांकडून वस्त्रें आणवून शिष्टाचारादाखल त्यांचा मान राखला; त्याप्रमाणेंच

सांप्रत स्त्रिया पुरुषांचा मान, 'आहो जाहो' इत्यादि बहुवचनी शब्दप्रयोगांनीं केवळ शिष्टाचारार्थ मात्र राखतात.

असें होण्याचीं जीं अनेक कारणें आहेत त्यांत एक-दोन फार महत्वाचीं व विचारणीय आहेत. त्यां विषयीं पोक्त विचार केला असतां, ह्या बेबंदशाहीचा प्रतिबंध इच्छा असल्यास ज्यास त्यास आपल्या स्थित्यनुरूप करितां येईल. पहिलें व सर्वांत मोठें कारण ह्मटलें ह्मणजे, या देशांत पाश्चिमात्य लोकांची पायरव व राजसत्ता वाढल्यापासून आमच्या तरुण नोकरमान्यांस त्या लोकांतलें दिखाऊ व शिष्टसांप्रदायिक बायकांचें स्तोम व आर्जव खरें भासलें. आपल्या लोकांत लग्नकार्यांच्या मिरवणुकींत स्त्रियांचें अग्रेसरत्व जसें लौकिकी व औपचारिक आहे, त्याप्रमाणेंच त्या लोकांतही स्त्रियांचें लौकिकांत दिसणारें वर्चस्व पुष्कळ अंशीं औपचारिकच आहे. व जें थोडेंसें खरें आहे, तें त्या लोकांच्या तेजस्वितेमुळें व स्त्रियांच्या सुशिक्षितपणामुळें त्यांस फारसें बाधकही होत नाहीं. परंतु हा विचार मनांत न आणतां आमच्या तरुण नोकरमान्यांनीं आपल्या स्त्रियांस सुशिक्षित करण्यापूर्वींच वाजवीपेक्षां फाजील स्वातंत्र्य दिलें, व त्यांच्या अरेरावी वर्तनाकडे दुर्लक्ष केलें, व तो प्रघात उत्तरोत्तर बळावत जाऊन सांप्रत बाधक होऊन बसला.

अशा निरंकुश व डोइजड झालेल्या बायका नवऱ्यास बदलौकिकाची भीति दाखवून आपल्या कह्यांत ठेवूं पाहतात, व प्रसंगविशेषीं त्यानें तोंडावाटे ब्र काढला कीं, ह्या शेजारच्या घरीं रुसून जाऊन जगास तमाशा दाखविण्यास कमी करीत नाहींत. असा फाजीलपणाचा प्रकार न घडण्यास, नवऱ्यानें बायकोस आपल्या करड्या स्वभावाची पुरी ओळख पूर्वींपासूनच करून देत गेलें पाहिजे. ज्या बायकोस रुसून घराबाहेर जाण्याच्या बागुलबोवास आपला नवरा भिणार नाहीं, व एकदां आपलें पाऊल घराबाहेर पडलें कीं, पुन्हा दुसरा जन्म घेतला तरी, तें तो परत घरांत घालूं देणार नाहीं, अशी बालंबाल खात्री असेल, ती बायको असले ढंग काय करणार आहे ?

सारांश बायकांस पहिल्यापासूनच जितक्यास तितक्या ठेविल्या पाहिजेत.आपण ह्मणूं तसें आपलें मान्य होईलच, किंवा आपण जो हेका धरूं, तो खातरीनें सिद्धीस जाईलच, ह्याचा भरंवसा त्यांस वाटूं न दिला, ह्मणजे त्याही मर्जीचा कल पाहून वागूं लागतात. असें धोरण न ठेविलें तर आनंदीबाई पुढें राघोबादादांचें कांहींएक न चालतां जसा महाप्रलय झाला, तसा प्रलय होण्याचा प्रसंग येतो. यास्तव स्त्रीजातीच्या ठायीं सामान्यत्वानें राहणारे दुर्गुण मनांत

वागवून प्रत्येकानें त्यांशीं वागत असावें ह्मणजे स्त्रियांच्या डोइजडपणास उत्तेजन मिळत नाहीं.

पतीची सुस्थिति[1] असली तर त्याच्या सुखास वांटेकरी व्हावें, दुःस्थिति असली तर त्यास व्यर्थ गांजावें, विद्युल्लते[2] सारखें क्षणिक प्रेम करावें, स्नेहबंधन तोडण्याविषयीं शस्त्राची तीक्ष्णता धारण करावी, निंद्यकर्मास प्रवृत्त होण्या विषयीं उतावीळ व्हावें, धर्माधर्म विचाराविषयीं बेपर्वा रहावें, क्रूर कर्मे करावीं व कुटुंबांत फूट पडावी, हे स्त्रीजातीचे सामान्य दुर्गुण मनुष्यमात्रानें कधींही विसरूं नयेत.

इंग्रजलोकांतले प्रसिद्ध विद्वान् डाक्तर जान्सन व त्यांशीं लग्न लावणारी त्यांची भावी स्त्री, हीं उभयतां वधुवरें त्यांच्या देशांतील चाली प्रमाणें घोड्यावर बसून जवळच मैला दोन मैलांवर एक देऊळ होतें, तेथें लग्नलावण्यास जात असतां, त्यांच्या भावी कुटुंबानें आपले

---

१ एषा हि प्रकृतिः स्त्रीणामासृष्टे रघुनन्दन । समस्थमनुरज्यन्ते विषमस्थं त्यजन्ति च ॥ ५ ॥

२ शत-ह्रदानां लोलत्वं शस्त्राणां तीक्ष्णतां तथा । गरुडानिलयोः शैघ्र्यमनुगच्छन्ति योषितः ॥ ६ ॥

रामायण. अरण्यकाण्ड, सर्ग १३.

३ स्वभावस्त्वेष नारीणामेषु लोकेषु दृश्यते । विमुक्तधर्माश्चपलास्तीक्ष्णा भेदकराः स्त्रियः ॥ ३० ॥ **रामायण अरण्यकाण्ड सर्ग ४६.**

यजमान नरम आहेत, कीं गरम आहेत, हें अजमावून पहाण्याचा घाट घातला. तिनें आपल्या घोड्यास किंचित् टांच मारून ती थोडीशी जान्सन साहेबांच्या पुढें गेली, आणि त्यांस ह्मणूं लागली कीं, तुह्मी आपला घोडा मागें राखून रेंगाळत येतां, त्याचा मला कंटाळा येतो, हें ऐकून साहेबमजकुरांनीं आपला घोडा जरा जलदीनें चालविला, त्याबरोबर ह्या बाईनें मुद्दाम लगाम आखडून आपण मागें राहिली, आणि ह्मणूं लागली कीं, तुह्मीं एकसारखे दवडत जातां त्यामुळें मजला त्रास होतो. हा बायकोचा चवढाळपणा जान्सन साहेबांच्या नजरेस आल्याबरोबर त्यांनीं आपला घोडा एकदम भरधांव काढून, व तीस एकटी मागें सोडून, ते तिच्या अगोदर देवळांत जाऊन बसले. मागाहून ही बाईही हिरमुसलें तोंड करून डोळे पुशीत पुशीत, देवळांत येऊन प्रविष्ट झाली, व त्या उभयतांचें लग्न लागलें. ह्या पहिल्याच प्रसंगानें आपल्या नवऱ्यापुढें आपले चाळे कितपत चालतील, ह्या गोष्टीचा ह्या बाईस पक्का अंदाज लागून, तिनें पुढें यावज्जन्म असले ढंग कधींही केले नाहींत.

वरील गोष्टी वरून पाश्चात्य लोकांतील स्त्रियांचें वर्चस्व कितीं दिखाऊ व नकली असतें, व ते लोक आपल्या तेजस्वितेच्या योगानें त्या वर्चस्वाचा आपणास

उपसर्ग कसा लागूं देत नाहींत, याची अटकळ वाचकांस होईल. आमचे लोकही हेंच धोरण राखून, स्त्रियांकडून आपल्या अधिकाराची पायमल्ली होऊं न देतां, त्यांचा सन्मान राखतील, तर तें करणें शिष्टसम्मतच होईल. स्त्रियांस दासीबटकी प्रमाणें वागविणें, किंवा त्यांस अनिर्बंध स्वतंत्रपणें वागूं देणें, हें कोणत्याही विचारी व प्रतिष्ठित मनुष्यास मान्य होणार नाहीं.

सुमारें साठ पाउणशें वर्षांपूर्वी आपल्या देशांत राजघराण्यांतून देखील स्त्रियांच्या वागणुकी संबंधें कितीं बारकाईचे निर्बंध ठरविलेले असत, याचा मासला नागपूरसंस्थानचे अधिपति तिसरे रघुजी भोंसले सेनासाहेब सुभा, यांनीं आपली पत्नी दर्याबाईसाहेब, यांनीं कसें वर्तावें, या बद्दल एक अठेचाळीस कलमांची यादी ठरवून दिलेली होती, ती हल्लीं नागपूरकर भोंसल्यांचे कागदपत्र छापून प्रसिद्ध झाले आहेत, त्यांत आहे. वाचकांना इच्छा असल्यास त्यांनीं ती अस्सल यादी वाचून पहावी. प्रस्तुत प्रसंगीं त्या यादींतील कांहीं कलमांचा गोषवारा, मूळलेखांतील अर्थाचा विपर्यास होऊं न देतां, आह्मी खालीं देत आहों.

---

१ दर्याबाई ही तिसऱ्या रघोजी भोंसल्यांची सहावी बायको, हिचें लग्न इ० स० १८४२ च्या सुमारास झालें ही इ०स०१८७६त मरण पावली, हिला ४२ हजारांचें वार्षिक पेन्शन होतें.

१ प्रातःकाळीं उठून शौचविधि मुखमार्जन व स्नान आटोपावें, देवब्राह्मणांची व तुळशीची पूजा करावी, नंतर पुराणश्रवण वगैरे चारघटका दिवस येईपर्यंत उरकून सहावे घटकेपर्यंत वेणीफणी करावी, व पोषाखी लुगडें नेसून सकाळचा उपहार करावा.(कलम पहिलें पहा.)

२ उपहार झाल्यानंतर जामदारखान्याच्या जिन्यानें मुदपाकखान्यांत जाऊन आजीबाईच्या पायां पडावें, व त्यांस फुरसत असल्यास घडीभर त्यांजपाशीं बसून, त्या ज्या कांहीं शिकवणीच्या गोष्टी सांगतील, त्या लक्षांत ठेवाव्या. आजीबाई समोर विडा खाऊं नये, तस्तांत चूळ भरूं नये, व त्यांच्या समोर पिकदाणी ठेवून बसूं नये. मर्यादेनें बसून बोलणें चालणें करावें. आजीबाई वरतीं आल्यास त्यां समोर तक्ये लावून बसूं नये, तक्ये त्यांस दिसणार नाहींत, असे एकीकडे उचलून ठेववावे. (कलम ३ व ६ पहा.)

३ अन्नपूर्णा बाईसाहेबां समोर तस्तांत चूळ भरूं

---

१ बाकाबाईसाहेब–दुसऱ्या रघोजीची बायको, व तिसऱ्या रघोजीची आजी, ही सन १८५८ त मरण पावली. मरणसमयीं हिचें वय ७५ वर्षांचें होतें.

२ ही तिसऱ्या रघोजीची तिसरी बायको, व दर्याबाईची वडील सवत, हिजपेक्षां वडील बायका मरण पावल्या असल्यामुळें त्यावेळीं, घरांतील मानकरीण हीच होती. ही इ० स० १८५६ त मरण पावली.

नये, व पिकदाणींत थुंकूं नये, हात धुणें झाल्यास तस्तांत न धुतां, जोत्यावर बसून धुवावे. त्यांज समोर विडा मात्र खावा. त्या वरतीं आल्यास, त्यांस भरताजिम देऊन आपल्या तक्याशीं बसवावें. (कलम ७ पहा.)

४ दोन चार दिवसां आड फुरसत करून पाकनिष्पत्ति आपल्या हातें करावी, आचारी वगैरे माणसें शिकवितील. पदार्थ बिघडल्यास चिंता नाहीं. जो पदार्थ आपणास अगर सरकारास आवडेल, तो आचारी वगैरे माणसें हाताशीं घेऊन आपण जातीनें करावा. (कलम ८ पहा.)

५ कोणी बाहेरचीं बायकामाणसें भेटीस आल्यास त्यांचा योग्यतेनुरूप सन्मान करावा. व पानसुपारी देऊन त्यांची बोळवण करावी. (कलम ९ पहा.)

६ हलक्या माणसांशीं कानगोष्टी करूं नयेत, व त्यांच्या तोंडीं लागूं नये, आपला बोज हलका पडतो; त्यास दाबांतच ठेवणें नीट आहे. नोकर माणसांकडून चाकरी बराबर घ्यावी, चुकल्यास सजा मुनासब करावी. (कलम ११ व १८ पहा.)

७ लेंकूरपणाचा स्वभाव टाकून बुरदबारी[1] अंगीं ठेवावी, बेजाहा हांसूं नये, व धावूं नये.(कलम२०पहा.)

---

१ प्रौढता, भारदस्तपणा.

८ सरकार[1], बाईसाहेबांस जो हुकुम करतील, तो सूक्त असो अगर असूक्त असो, त्याबद्दल बिलकुल नाहीं हो न करितां, बाईसाहेबांनीं तो बजाविला पाहिजे, तथापि सरकार जो हुकुम करणें, तो समजूनच करतील. (कलम २५ पहा.)

वरील कलमबंदी इ० स० १८४२ नंतर लिहिली आहे, त्यावरून साठ पाउणशें वर्षांपूर्वी स्त्रियांच्या वागणुकीसंबंधें कितीं दक्षता ठेविली जात असे, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. आलीकडे या गोष्टीसंबंधें जी बेबंदशाही माजली आहे, ती तरुण नोकरमान्यांच्या भिन्न विचारसरणीमुळें व गाफलपणामुळेंच माजली, असें कोणीं अनुमान केल्यास तें अगदीं निराधार आहे, असें आह्मांस ह्मणवत नाहीं.

दुसरें कारण गतानुगतिकत्व व संसर्ग हें होय. इतर देशांपेक्षां गतानुगतिकत्व व दांभिकपणा, हे दोन्ही दुर्गुण प्रस्तुत आमच्या देशांत फारच वाढले आहेत. त्यांत पुरुषांपेक्षां स्त्रियांत तर ते अमर्यादच. राधाबाईनें सांवरीच्या फुलांची लाखोली वाहिली कीं, लक्ष्मबाई लागली पारंग्याच्या फुलांचा कोट वहावयाला. अशी गतानुग-

---

१ तिसरे रघोजी भोंसले, हे स्वतःविषयीं कांहीं बोलणें झाल्यास " सरकार " या पदाचा उपयोग करीत असत.

तिकत्वाची चढाओढ असली ह्मणजे, एकीनें आंपल्या नव-यास तांटाखालचें मांजर बनविल्यावर तिच्यावर ताण करून दुसरी आपल्या नव-यास कुलुंगी कुत्रें कां बनविणार नाहीं. घरचा मालकच जर दोघेचौघे टोळभैरव जमा करून बायकांच्या देखत ओटीवर चारगटपणा करीत बसला, व अनीतिवर्तनाचा डौल मारूं लागला, तर बायकाही पाणवठ्यावर वाचाळपणाचे व वेडगळपणाचे निरर्गल प्रलाप कां बरें करणार नाहींत? पाणवठ्यावर क्षणैक उभें राहण्याचा प्रसंग आला तर, बायकांच्या अमर्याद वाचाळपणाच्या वल्गना कानीं आल्यावांचून, व त्याबद्दल विचारी पुरुषास सखेदाश्चर्य झाल्यावांचून, राहणार नाहीं. राधाबाई व्यवहारज्ञपणाच्या डौलानें लक्ष्मबाईस ह्मणते—कायहो बाई, तुह्मी खरेंच सांगा. संसारांत खोटें बोलायला नको का ? आपणांस संसार करावयाचा आहेना ? संसारांत खोटें बोलल्याशिवाय पाऊल तरी पुढें टाकतां येईल का ? पण आमच्या घरीं कनई संसाराचें कांहीं धोरण नाहीं, मला नाहीं बाई असला वेडगळपणा आवडत, बायकांनीं मेलें कोणी कोणीकडे लक्ष पुरवावें. हें ऐकून लक्ष्मबाईचे तारे तुटावयाचे कीं, बाई तुह्मी ह्मणता तें खोटें का आहे, खोटें केल्याशिवाय कोठें संसार चालला आहे ?

कृष्णपरमात्म्यास देखील संसारांत खोटसाळपणानें वागावें लागलें. पुरुषांस जर तुकारामबोवा व्हावयाचें, तर त्यांनीं लग्नें करून दुसऱ्याच्या पोरीबाळी कां नाडाव्या! बायकांच्या अशा वेडगळपणाच्या जल्पना कानीं येण्यास पुरुषांची वागणुकच कारणीभूत होते. पुरुष जर शिस्तीनें वागून भारदस्तपणा धरतील, तर अशा वेडगळपणाच्या वल्गना करण्यास बायकांचें काय तोंड लागलें आहे.

असो, सांप्रतकालीं मुलाबाळांस वागविण्याचा प्रकारही, बायकांस वागविण्याच्या वेडगळ प्रकाराप्रमाणें अगदीं भोपळसुती चालला आहे. पोरेंबाळें अर्भकावस्थेंत असतात, तेव्हां त्यांस विनोदाखातर शिव्या द्यावयास शिकवावयाचें, व पुढें तीं बाल्यदशेंत येऊन घरांतील माणसांस व शाळेंतील सोबत्यांस, शिवीगाळ करूं लागलीं ह्मणजे कौतुक करावयाचें. किंवा आपल्या मुलाची कड घेऊन दुसऱ्याच्या मुलास रागें भरावयाचें. किंवा फार झालें तर, लडिवाळपणानें आपल्या मुलांस हांसत हांसत लुच्चा लबाड ह्मणून, रागें भरल्याचा लटका आविर्भाव दाखवावयाचा. बाळपणीं असा ओळा असल्यावर तींच मुलें वयांत आलीं ह्मणजे आईबापांची शोभा कशी राखीत असतील, याचा अंदाज वाचकांनींच करावा. शिक्षण संबंधानें पाहिलें तरी, मुलाचें नांव शा

ळेंत घालून महिन्याचा एक आणा फेंकला कीं, बापाच्या डोकीवरची जबाबदारी अजीबात उडाली. कालिदासानें दिलीपाविषयीं ह्मटल्याप्रमाणें, आमच्या दयाळु सरकारानें प्रजेच्या सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या आपल्या शिरावर घेतल्यामुळें, लोकांस प्रजोत्पादनाशिवाय दुसरी जबाबदारी आपणाकडे उरली नाहीं असें वाटतें, यांत नवल तें काय ! रघुवंशांत दिलीपाविषयीं असेंच ह्मटलें आहे.

॥ अन्नाच्छादन देउनी जगविणें भीतीसही वारणें ॥
॥ विद्या सांगुनि सद्‌गुणां शिकविणें कष्टांतुनी तारणें ॥
॥ हें तो भूप करी ह्मणून ह्मणती त्याला प्रजांचा पिता ॥
॥ तेव्हां केवळ जन्मदत्व उरलें बापांकडे तत्वतां ॥

अशा प्रकारें सरकारच्या कृपेनें मुलगा सतरा अठरा वर्षांचा होईपर्यंत जेमतेम चवथी इयत्ता पास होतो, व त्यास चुन्याचा रंग पांढरा, व हरभऱ्याच्या डाळीचा रंग पिंवळा, हें चांगलें समजावयास लागतें. तदनंतर बापाच्या हाताखालीं मोठ्या फरीनें माप घेणें, कुळानें वसूल दिला असतां त्यास पावती न देणें, कुंपण पुढें सारून थोडी थोडी शेजाऱ्याची जागा बळकावणें, इत्यादि प्रकारचीं व्यवहाराचीं सर्व अंगें शिकून तो व्यवहारज्ञ बनला कीं, बापास मी आतां कृतकृत्य झालों असें वाटतें, व मुला-

सही वडिलांच्या तालिमेंत राहून कष्टानें संपादन केलेलें व्यवहारचातुर्य अजमावून पहाण्याची, व जगास दाखविण्याची, उतावळी होते. आणि तो व्यवहारसूत्रें आपल्या हातीं घेण्यास व तीर्थरूपांस महायात्रेस पाठविण्यास तयार होतो. परंतु, यावेळीं बापाची संसार करण्याची हौस पुरली नसते, ह्मणून परस्परांत बहुधा ओढाताण होऊन संसार फाटण्याची वेळ येते.

आईबापांनीं मुलांवर प्रेम करावें, व सामर्थ्यानुरूप त्यांचें कोडकौतुकही पुरवावें. पण वाउगे लाड करून त्यांस अमर्याद, निर्विघ्न, व दुर्गुणी करूं नये. "लालनाद्बहवो दोषास्ताडनाद्बहवो गुणाः" असें जें ज्ञात्यांनीं ह्मटलें आहे, तें पोक्त विचार करूनच ह्मटलें आहे.

सद्वर्तनाचा ओळा लावण्याचा काळ, मुलें बोलूं चालूं लागलीं कीं सुरू होत असतो, यास्तव तेव्हां पासूनच त्यांचें वयोमान लक्षांत घेऊन, आईबापांनीं हरतऱ्हेनें चांगल्या वागणुकीचें बीज त्यांचे मनांत पेरीत गेलें पाहिजे. हें काम फार नाजुक आहे, व त्याचा प्रारंभ आईचे मांडीवर व बापाच्या कडेवरच झाला पाहिजे, लहान लेकरास काय समजतें, त्यास शिकविण्यास कांहीं समजूत तर आली पाहिजेना, असें पुष्कळांचें ह्मणणें असतें. परंतु हें ह्मणणें फार चुकीचें आहे. कोणीं न शिकवितां मुलें

दोन तीन वर्षांचीं झालीं नाहीं तोंच, ऐकून ऐकून स्वभाषा समजूं व बोलूं लागतात. व मोठ्या माणसाच्या बसण्या उठण्याची हुबेहुब नक्कल करितात. ह्या गोष्टी त्यांच्या ठायीं समजूत असल्या शिवाय तीं कशीं करूं शकतील, ह्याचा विचार कोणी करीत नाहीं. अगदीं लहान अर्भकांच्या ठायीं अनुकरणशक्ति व पृथक्करणशक्ति, हे दोन मनोव्यापार आणि जिज्ञासा, स्वाभाविकपणेंच मोठ्या माणसांपेक्षां जास्ती असते. मोठेपणीं एखादी परभाषा शिकण्यास जितके श्रम व जितका काल लागतो, त्या कालापेक्षां फारच अल्प कालांत व अल्प श्रमानें, मुलें वर सांगितलेल्या दोन्ही मनोव्यापारांच्या जोरावर व्यवहारापुरती स्वभाषा शिकतात. त्यांस कोणी स्वभाषेचा पाठ द्यावा लागतो, असें नाहीं, तीं स्वप्रयत्नानेंच बोलूं लागतात. ह्यास्तव लहान मुलांस चांगला ओळा लावणें, किंवा रीतभात शिकविणें, ह्मणजे त्यांजकडून नीतिवचनें घोकविणें, किंवा तांगडून बसवून कांहीं धडा पाठ करून घेणें, असें नव्हे. तर त्यांस अनुकरण करण्यास चांगल्याच गोष्टी नेहमीं सांपडाव्या, ह्मणून तशा चांगल्या गोष्टी त्यांच्या नेहमीं नजरेस पडतील अशी व्यवस्था राखणें, व आपण स्वतः चांगलें वर्तन ठेवणें, याचें नांव ओळा लावणें होय. रीतभात शिकविण्यास

मोठी खटपट करावी लागते, असा प्रकार मुळींच नाहीं. मुलें जसें पहातात तसें स्वप्रयत्नानें करितात, फक्त वाईट गोष्ट त्यांच्या नजरेस पडूं न देणें, व चांगल्या गोष्टी सदोदित त्यांच्या नजरेसमोर मांडणें, एवढेंच मातापितरांनीं आस्थापूर्वक केलें ह्मणजे झालें. व हें करितांना आपल्या वर्तनानें मुलांच्या हृदयांत स्वाभिमान जागृत केला पाहिजे.

बालकांस जगांतील वस्तुमात्राचा पूर्वपरिचय नसून, त्यांस हरएक गोष्टी विषयीं नवीन ओळख होत चाललेली असते. यामुळें अशा समयीं त्यांची जिज्ञासा ह्मणजे चौकसबुद्धि फार प्रखर असते. ह्मणूनच तीं मोठ्या माणसास, 'हें काय तें काय' असे नाना तऱ्हेचे प्रश्न करीत असतात, व पुष्कळ प्रसंगीं त्या प्रश्नांची समजूत होण्यासारखीं समर्पक उत्तरें देणेंही फार कठोण पडतें. परंतु हरप्रयत्नानें त्यांची समजूत पडेल, व जिज्ञासा जिरून न जातां विशेष उत्तेजित होईल, अशा रीतीनें उत्तरें देण्याची खबरदारी मोठ्या माणसांनीं ठेविली पाहिजे. बालकांच्या, शाळेंतील शिक्षणावरही आईबापांनीं विशेष नजर पुरविणें जरूर आहे. केवळ शाळेंतील शिक्षकांवर ह्या गोष्टीचा भरंवसा टाकून बेफिकीर राहणें, वाजवी नाहीं. प्रस्तुतकालीं आमच्या

उदार सरकारानें आह्मांस विद्यान्नदान करण्याकरितां खेड्यापाड्यांतून सुद्धां जीं विद्यान्नसत्रें उघडलीं आहेत, व ज्यांबद्दल आपण सरकारचे गोडवे गातों, त्यांस अन्नसत्रें ह्मणण्या पेक्षां भिकार खाणावळी ह्मणणें मजला रास्त वाटतें. कारण, तीं आमच्याच पैशावर चालतात, व ह्या खाणावळींत आमच्या बालकांच्या पानावर कदन्न वाढलें जातें. अशा कदन्नावर पोसलेलीं बालकें निर्बल, हताश, व बुद्धिमंद कां बरें निपजणार नाहींत? सरकारी शाळांतून अनास्थेचें व घोकंपट्टीचें शिक्षण मिळतें, आणि तेंही बऱ्याच अंशीं परभाषेच्या द्वारें, यामुळें विश्वविद्यालयांत प्रवेश करण्याच्या लायकीची परिक्षा उतरली असूनही, मुलाची बुद्धि पाहूं गेलें तर, कांहींएक न शिकलेल्या मुलाइतकीच असंस्कृत असते. फरक कायतो एकास लिहितांवाचतां, व इंग्रजी र, ट, फ करितां येत असतें, व दुसऱ्यास तें येत नसतें, इतकेंच कायतें. अशा शिक्षणानें सांगकामे नोकर तयार होतात, यास्तव आपल्या हिताकरितां आपण वेगळ्या प्रकारचें शिक्षण दिलें पाहिजे. व तसें शिक्षण मिळण्याची सोय जर सरकारी शाळांत होणें शक्य नाहीं, तर त्याबद्दल आपण आपल्या घरीं सोय केली पाहिजे. व स्वतंत्र खाजगी शाळाही सर्व देशभर स्थापन केल्या पाहिजेत.

गृहशिक्षणांत कांहीं विशिष्ट गुण असतात, ते अर्धचोबड्रें पुस्तकी शिक्षण देणाऱ्या हल्लींच्या शाळांत असत नाहींत. ह्या शाळांत विद्यार्थ्यांच्या वर्तनावर पांचसहा तासच कायती शिक्षकाची नजर राहणें शक्य असते, व येथील शिक्षण कितीं केलें तरी मोलाचें, त्यांत कळकळीचा अंश अगदीं नसतो. असा प्रकार गृहशिक्षणाचा नाहीं. घरीं मुलांच्या वर्तनावर सर्वकाळ नजर राहूं शकते. या शिवाय गृहशिक्षण प्रेमाचें व आस्थेचें असतें, यामुळें लहान अर्भकें तें खुषीनें ग्रहण करितात. या शिक्षणानें मुलाचें शील बनत असतें, आणि त्यास चांगल्या सवई व ओळा लागतो. असें जरी आहे, तरी ह्याही शिक्षणांत कांहीं न्यूनता असतात. घरीं बापाजवळ किंवा शिक्षकाजवळ शिकणाऱ्या मुलास निरनिराळ्या मनुष्यस्वभावाचा व बाह्य सृष्टीचा चांगला परिचय होत नाहीं, समाजांत मिळून मिसळून वागण्याची संवय लागत नाहीं, सभाधीटपणा अंगीं येत नाहीं, व मनोवृत्ति उल्लसित राहत नाहीं, या शिवाय शिक्षणाचीं सर्व अंगें शिकविण्यासारखी सोय तरी घरीं कोठें असते ? या न्यूनतांची भरपाई गुरुगृहनिवासानें पूर्वीं भरपूर होत असे. पूर्वीं गरिबांचीं व श्रीमंतांचीं मुलें दूरदेशीं जाऊन गुरुगृहीं एक्याच प्रकारच्या राहणीनें रहात, व परावलंबी न होतां

मधुकरवृत्तीनें उदरनिर्वाह करीत. यदुकुलश्रेष्ठ श्रीकृष्ण व दरिद्री सुदामा, आणि राजपुत्र द्रुपद व निर्धन द्रोण, ह्या दोन्ही दुकली गुरुगृहीं एक्याच रीतीनें राबत, हें पुराणप्रसिद्धच आहे. निरनिराळ्या ठिकाणचे, निरनिराळ्या ऐपतीचे, व निरनिराळ्या स्वभावाचे सहाध्यायी सर्वकाल गुरुसान्निध्यानें राहून, व एक्याच प्रकारच्या अन्नपानादिकांचें सेवन करून, एक्याच शिस्तीनें सदाचाराचें वळण व बुद्धिशिक्षण प्राप्त करून घेत. यामुळें ते सदाचरणी, स्वावलंबी, निरभिलाषी, तेजस्वी, व कार्यतत्पर निपजत. परंतु, ही गुरुकुलनिवासाची पद्धत व सोय कालवैपरीत्यामुळें आज राहिली नाहीं. यास्तव कालदेशवर्तमानानुरूप त्या पूर्वपद्धतींत थोडा बदल करून, ती पुन्हां प्रचारांत आणणें आवश्य आहे.

यद्यपि गुरुगृहनिवासानें शिक्षण मिळण्याची सोय होणें, आज शक्य नाहीं, तथापि गुरुशिष्यांच्या राहण्याची एक्या ठिकाणीं सोय करून, विद्यार्थ्यांचें जेवणखाण, निजणेंबसणें, व खेळणेंशिकणें, या सर्व गोष्टींवर शिक्षकांची रात्रंदिवस नजर राहील अशा तऱ्हेच्या, व लोकमतानें ठरविलेल्या नियमानें चालणाऱ्या, राष्ट्रीयशिक्षणसंस्था जागोजाग स्थापन करणें शक्य आहे. व अशा संस्थांनीं इच्छित हेतु बऱ्याच अंशांनीं सिद्धीस जाण्याची खात्रीही आहे.

बालशिक्षण नेहमीं लोकसमाजाच्या हातांत असणें फार चांगलें. तें सरकारच्या हातांत असणें, तितकें चांगलें नाहीं. पण, त्यांतही सरकार जेव्हां परधर्मी व परदेशचें असतें, तेव्हां तर तें अत्यंत अहितकारक होय. कारण, अशा सरकारास प्रजेच्या गृहस्थितीचें, धर्माचें, आचारांचें, व गरजांचें वास्तव ज्ञान असणें, संभवनीयच नसतें. व कधीं कधीं प्रजेच्या न्याय्य गरजा असल्या तरी त्या अशा सरकारच्या गरजांशीं विरोधी असतात, यामुळें प्रजेस इष्ट असणारें शिक्षण देण्यास तें अयोग्य ठरतें.

पूर्वी आपल्या देशांत आपलें राज्य होतें, परंतु तेव्हां देखील आपल्या लोकसमाजानें लोकशिक्षण राजाच्या हातांत दिलें नव्हतें. मागील कोणचाही काल घेतला तरी पूर्वीचे राजे विद्याभिवृद्धीस द्रव्यसाहाय्य व उत्तेजन मात्र देत असत, पण त्यांनीं लोकशिक्षण आपल्या हातांत घेतलें होतें, किंवा लोकांनीं तें त्यांच्या हातांत दिलें होतें, असें इतिहासपुराणांत कोठेंही उदाहरण सांपडत नाहीं. अमेरिका व जर्मनी इत्यादि इतर देशांतही लोकशिक्षण लोकांच्याच हातांत आहे, त्या देशांतील राजाच्या हातांत नाहीं.

तर मग आपल्या समाजानें पूर्वपरंपरेप्रमाणें लोकशिक्षण आपल्या हातीं घेऊन लोकनियंत्रित शिक्षण-

संस्था निर्माण केल्या, तर त्यांत नवें काय आहे ? त्या संस्थांस ‘ राष्ट्रीय ’ हें उपपद जोडल्यानें तर आह्मांपैकीं कांहीं लोक बुजत नसतील ना ? मला वाटतें ह्या शब्दाला भिण्या इतके आमचे लोक त्या शब्दाशीं अपरिचित नाहींत, व सरकारही नुसत्या शब्दास भिण्याइतकें भेकड नाहीं, असें असूनही, या संस्था पुंढावे उत्पन्न करणाऱ्या ह्मणून कांहीं लोक गर्गशा करितात, ह्यांतलें इंगित काय असावें, हें पाहूं गेलें तर, असें दिसून येतें कीं, कांहीं तरी लटकें निमित्त योजून सरकारच्या मनांत नसती शंका उत्पन्न करावी, व त्यायोगें सरकारास आपण राजनिष्ठ आहों, असें भासवावें, आणि आपल्या देशबांधवांस बाहुलीं बनवून सरकारच्या आश्रयानें इतराहून आपण वरचढ व्हावें, असा ह्या लोकांचा मतलब असावा.

सांगकाम्याप्रमाणें सामान्य दर्जाची राजसेवा करावी, किंवा मोलमजुरी करून पोट भरावें, याशिवाय कोणच्याही प्रकारची दगदग सरकार आह्मांस पडूं देत नाहीं, यामुळें आह्मी आज तीन चार पिढ्या केवळ बाहुलीं बनत गेलों, त्यामुळें आज आह्मांत करामत बिलकुल उरली नाहीं. ती करामत अंगांत यावी, ह्मणूनच लोकशिक्षणाची दगदग आपणास शिरावर घ्यावयाची आहे.

पुंडावा करण्याकरितां नाहीं. निर्द्रव्य व निःशस्त्र झालेली प्रजा पुंडावा करून काय जोड मिळविणार ? सध्यांच्या स्थितींत पुंडावा करून कांहीं लभ्यांश प्राप्त होईल, असें मानणारा दुधखुळा समाजामध्यें आज हजारांत एक तरी सांपडेल कीं नाहीं, याचा वानवाच दिसतो. ज्याचें काम त्यानें करावयास शिकण्यास पुंडाव्याची काय गरज आहे ? लोकांनीं आपले वादविवाद कोर्टापर्यंत न नेतां गांवपंचाइतीनें निवडले, लोकशिक्षण आपलें आपल्या हातीं घेतलें, गांवकऱ्यांनीं एकजुटीनें आपल्या मालमत्तेचें रक्षण केलें, एक विचारानें गांवसफाई, आरोग्यरक्षण, व इतर गांवसुधारणा आपल्या आपण केल्या, व अशाच करितां येण्यासारख्या गोष्टींचा भार सरकारावर न घातला, तर सरकारास मदत केल्यासारखेंच होणार आहे. सामर्थ्यहीन प्रजेवर पुंडाव्याचा आरोप करणें, हें मुक्या मनुष्यावर शिवीगाळी केल्याचा आरोप करण्यासारखेंच कुभांडीपणाचें आहे. दुर्बल व निःशस्त्र प्रजेजवळ पुंडावा करण्यास सहनशीलते शिवाय दुसरें कोणचें प्रखर शस्त्र असणार ! व तें काय कमी उग्र आहे !

सहनशीलतेंतही कमी उग्रत्व नाहीं, ती उग्रापेक्षांही उग्रतर आहे, असें आमचें धर्मशास्त्र सांगतें. हरिश्चंद्र,

अंबरीष इत्यादि सहनशील पुरुषांनीं विश्वामित्र, दुर्वास इत्यादि उग्रमूर्तींसही हात टेंकावयास लावलें, ह्या गोष्टी आह्मांस पक्क्या माहीत असतां आह्मी दीनप्रजा दुर्बलावस्थेंत पुंडावे काय ह्मणून करणार ?

राष्ट्रीयशाळा ह्मणजे समाजानें आपल्या खर्चानें चालविलेल्या खाजगी शाळा इतकाच समज बाळगणें चुकीचें आहे. शाळा खाजगी असूनही त्या शाळेंतील शिक्षणानें विद्यार्थ्यांच्या अंगीं राष्ट्रीयसद्गुण उद्भवणार नाहींत, तर ती राष्ट्रीयशाळा नव्हे. अशा खाजगी शाळा सरकारी शाळां इतक्याच निरुपयोगी होत. ज्या शाळांतील शिक्षण लोकांच्या गरजा व धर्म, आणि देशाची पूर्वपरंपरा ह्यांस अनुरूप असून, ज्याच्या योगानें विद्यार्थ्यांस राष्ट्र ह्मणजे काय, हें तत्वार्थानें समजू लागतें, आपला उदरनिर्वाह सचवटीनें व अब्रूनें आपल्या हिंमतीवर करितां येतो, व त्याच्या हृदयांत स्वाभिमान, तेजस्विता, स्वावलंबन, करारीपणा, आत्मविश्वास, कार्योत्साह, व पराक्रमाची धमक इत्यादि गुण उत्पन्न होतात, आणि जेथील शिस्तीनें सभ्याचार, नीतिमत्ता, व पापभीरुत्व अंगीं बाणतें, त्याच राष्ट्रीयशाळा होत. मग त्यांस तुह्मी ‘राष्ट्रीय’ हें उपपद जोडा किंवा जोडूं नका. वास्तविक पाहिलें तर ह्याच शाळा उपयोगी.

ज्या शाळांतील विद्यार्थी नेभळे किंवा पुंड बनणार, त्या राष्ट्रीयशाळा कसल्या! व त्यांचा उपयोग तरी काय!

वर निर्दिष्ट केलेल्या उपयुक्त शिक्षणाचा उपदेश श्रीसमर्थांनीं दासबोधांत पूर्वींच केलेला आहे. व तें एक शतकापूर्वीं मुलांस घरींदारीं, लोकवर्तनांत, व कथापुराणादि प्रसंगीं, मुबलक मिळत असे. यामुळें ज्यांनीं कधीं घराबाहेरच्या शाळांचें तोंड देखील पाहिलें नव्हतें, अशा स्त्रीवर्गांत देखील कर्तृत्वाच्या, मुत्सद्दी, रणशूर, व हिम्मतबहाद्दर शेंकडों स्त्रिया निर्माण होऊन गेल्या. अहल्याबाई[१] होळकरीण, उमाबाई[२] दाभाडी, झांशीची[३] राणी लक्ष्मीबाई, माहूरपरगण्याच्या[४] देशमुखाची पत्नी रायबागीण, बापूगोखल्यांची[५] चुलती, ताई तेलीण[६], सावित्री[७] पाटलीण, अर्गळची[८] राणी, वढवाणची राणी राजसबाई[९], वरंगळची रांणी[१०] रुद्रम्मादेवी, इत्यादि स्त्रियांप्रमाणें तेजस्वी,

---

१ होळकरांची कैफियत पान ३५ ते ३८ पहा. २ दाभाडे सेनापति ह्यांची हकीकत, काव्येतिहास संग्रहांत छापलेली. पान १२ ते १५ पहा. ३ पारसनिसकृत झांशीच्या राणीचें चरित्र पहा. ४ मराठी साम्राज्याची छोटी बखर पान २५ वरील टीप पहा. ५ धनुर्धारीकृत बापूगोखल्यांचें चरित्र पहा. ६ तेलिण मारी सोटा ही आर्या तर प्रसिद्धच आहे. ७ मराठी साम्राज्याची छोटी बखर पान ४६ पहा. ८ करमणुक ता० १४ मे १९०४ पहा. ९ करमणुक तारीख ७ मे पहा. १० करमणुक तारीख ६ डिसेंबर सन १९०२ पहा.

कर्तृत्ववान्, व हिम्मतबहाद्दर असे कितीसे पुरुष आज शंभर वर्षांत सरकारी शाळांत शिकून तयार झाले आहेत ? फारच थोडे, पण ते देखील यदृच्छाप्रभावानें, शिक्षण-प्रभावानें खास नव्हत. भांगेच्या मळ्यांत यदृच्छेनें जसा एखाददुसरा तुळशीचा माडा रुजावा, त्याप्रमाणेंच ही ईश्वरीघटना समजावयाची. अशा आपोआप रुजलेल्या एखाददुसऱ्या तुळशीच्या माड्याकडे बोट दाखवून कोणी भांगेच्या मळ्यास तुळशीची बाग ह्मणा ह्मणून सांगूं लागला, तर तें कोण ऐकेल. दोनतीन हजार रुपये खर्च, व बारापंधरा वर्षें उरस्फोड करून सरकारी शाळांपासून विद्यार्थ्यांस काय जोड लाभते, हें पाहूं गेलें तर इंग्रेजी पहिल्या दोन मुळाक्षरांचा व्यत्यास, (ए. बीचा व्यत्यास बी. ए) क्रियारहित वाक्पांडित्य, व भाकरीच्या तुकड्याकरितां "**लांगूलचालनमधश्चरणावपातम् । भूमौ निपत्य वदनोदरदर्शनं च ॥**" अशी श्ववृत्ति. धिक्कार असो, अशा अस्पृहणीय लाभास ! यास्तव विद्यार्थ्यांनीं जवळ असलीनसलेली पुंजी, व तरुणपणची नवी उमेद व्यर्थ खर्चीं न घालतां, राष्ट्रीयशाळांकडे धांव घ्यावी हें फार बरें.

एका शतकापूर्वीं सर्वांस अभिज्ञात व त्या कालीं सर्व देशांत प्रचलित असलेलें राष्ट्रीय शिक्षण, जें आज सु-

मारें शंभर वर्षें लोकांच्या अगदीं विस्मृतींत पडलें होतें, त्याची समाजाला आज पुन्हां आठवण होऊं लागली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे खरी, तथापि ही आठवण अद्याप पुष्कळ लोकांना अस्पष्टच आहे. ती चांगली स्पष्ट झाल्याशिवाय राष्ट्रीयशिक्षणाचा आस्थापूर्वक प्रसार व्हावयाचा नाहीं. राष्ट्रीयशाळा अशा प्रतिकूल कालीं व विषमपरिस्थितींत कधींही भरभराटीस यावयाच्या नाहींत, त्यांस मदत करणें, व त्यांत आपलीं मुलें शिकावयास पाठविणें, ह्मणजे केवळ असंभाव्य गोष्टीच्या भरीं भरणें आहे, असें जें पुष्कळांस वाटतें, त्याचें कारण, त्यांस राष्ट्राच्या वास्तव स्वरूपाचें यथार्थ ज्ञान झालें नाहीं, हें आहे. तें झाल्यावर त्यांस विषमपरिस्थितीचा मोठासा बाऊ वाटणार नाहीं. आजची विषमपरिस्थिति नव्हती तेव्हां राष्ट्रीयशिक्षणाची आठवण देखील कोणास झाली नव्हती. यावरून ही परिस्थितीच कालानुकूलता मिळवून देणारी आहे, अशी आपण मनांत खूणगांठ मारिली पाहिजे.

हिंदीराष्ट्र ह्मणजे हिमालयापासून कन्याकुमारी पर्यंत, व पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत पसरलेला भूप्रदेश, व त्यावर राहणारा लोकसमाज, इतकाच त्रोटक अर्थ सामान्य जन समजतात. हा त्यांच्या हृदयांतला जो

संकुचित अर्थ तो लाक्षणिक आहे, वास्तव नाहीं. कागदावर काढलेल्या सिंहाच्या चित्रास आपण सिंह ह्मणतों, ह्मणून तो काय खरा सिंह समजतो? चलनवलनयुक्त व हस्तपादादि अवयवघटित देहास आपण पुरुष ह्मणतों मात्र, पण अवयवांचा चालक व त्यास व्यापून राहणारा, आणि चर्म चक्षूंस न दिसणारा, जीवात्मा ह्मणून जी त्यांत एक चालकशक्ति असते, त्या शक्तिसच आपण तत्वार्थानें पुरुष समजतों. दृश्य देहांत अदृश्य असणारा चालकपुरुष नसेल तर, त्या देहास आपण मढें समजून पुरुष ह्मणणार नाहीं. अशाच विचारानें सर्वांनीं, केवळ बुद्धीलाच गम्यमान होणाऱ्या राष्ट्रपुरुषाची ओळख आपल्या मनांस करून दिली पाहिजे. वरील विचारानें पाहिलें ह्मणजे हिंदीलोकसमाज हा आपल्या राष्ट्रपुरुषाचा केवळ दृश्य देह आहे, व पृथक् पृथक् व्यक्ति हे त्याचे देहघटक अवयव समजावयाचे. ह्या सर्व अवयवांस प्रेरणा देणारा अदृश्य असा जो शक्तिप्रभाव, तोच आमचा खरा राष्ट्रपुरुष होय. हा तीस कोट अवयवांचा विराट्पुरुष मागें मोठे मोठे पराक्रम केल्यामुळें थकून भागून आज शंभरसवाशें वर्षें झोंपीं गेला होता. या अवधींत त्याच्या अवयवांची जी हालचाल दृष्टीस पडत असे, ती केवळ झोंपेंतली चळवळ होती, परंतु तो आतां

अर्धवट जागा झाला आहे, व प्रस्तुत काल त्यास डंवचून खडखडीत जागें करीत आहे, तर मग अशा कालास प्रतिकूल कसें ह्मणतां येईल ? या कालाच्या कृपेनें त्याच्या डोळ्यांवरची झांपड नाहींशी होऊन तो पूर्वपठित राष्ट्रीयशिक्षणाची उजळणी, आणि पाश्चात्य भौतिकशास्त्रें व कला यांचा नवा अभ्यास, करूं लागेल तर त्यास पाय धरून मागें कोण ओढूं शकणार ? हा राष्ट्रपुरुष बलभीमा सारखा शक्तिमान व चिरंजीव आहे, ह्यावर ईश्वराची कृपा आहे, हा पुराणपुरुष असून त्यानें आजपर्यंत अनेक राष्ट्रांचीं बारशीं व बारावे बघितले आहेत. त्यानें मागें अनेक प्रसंगीं आजच्याहूनही विशेष घोर परिस्थितीचे तडाखे गुमान न बाळगितां सहज लीलेनें सहन केले आहेत. यास्तव सध्याच्या परिस्थितीचे तडाखे सहन करून धिम्मेपणानें त्यास लोकशिक्षण खात्रीनें चालवितां येईल.

लोकांनीं मात्र सद्यःस्थितीनें पुढें केलेल्या बागुलबोवास भिऊन हिम्मत खचूं देतां कामा नये. विद्या ह्मणजे केवळ लिहितां वाचतां येणें एवढेंच नव्हे, किंबहुना तें येत नसतांही उपदेशादि अन्य उपायांनीं मनुष्यास विचारशील, बहुश्रुत, नीतिमान्, व कार्यदक्ष बनवितां येईल. यास्तव सद्यःपरिस्थितीनें राष्ट्रीयशाळांच्या प्रगतीस

किंचित् अवरोध झाला, तरी समाजांतील स्त्रिया व शूद्र इत्यादि निरक्षर वर्ग, आणि लहान मुलें, यांस शाळांशिवायही इष्ट शिक्षणाचा ओनामा शिकवितां येणें शक्य आहे. लिहितां वाचतां येणें, हीच कायती विद्या, व विद्या हें फक्त नोकरीचाकरी मिळविण्याचें साधन, याशिवाय तिचा दुसरा कांहीं उपयोग नाहीं, अशी जी देशांतील बऱ्याच लोकांची ठाम समजूत होऊन बसली आहे, त्या समजुतीमुळेंच त्यांचा सरकारी शाळांकडे विशेष ओढा आहे, व तो देशाच्या अभ्युदयास विघातक आहे.

ज्यांस विद्यानंदा करितांच विद्या शिकावयाची सवड व बुद्धिमत्ता नाहीं, व ज्यांस उदरनिर्वाहाकरितां सेवाधर्माचाच स्वीकार करणें फार अगत्याचें आहे, त्यांची राष्ट्रीयशाळांत निराशाच होईल असेंही नाहीं. केवळ सरकारी शाळांसच नोकर तयार करावयाचे आहेत, व राष्ट्रीयशाळांस ते करावयाचे नाहींत, अशांतली गोष्ट नाहीं. राष्ट्र ह्मटलें कीं, त्यांत सेव्यसेवक, गुरुशिष्य, वाणीउदमी, शेटसावकार, कारागीर व शेतकरी, इत्यादि प्रकारची खिचडी असावयाचीच, व या सर्वांच्या धंद्यास जरूर असणाऱ्या शिक्षणाची सोय राष्ट्रीयशाळांत सोईसोईनें व्हावयाचीच आहे.

सरकारीशाळांत अनन्यगतिक होऊन भाकरीच्या

तुकडद्या करितां ओशाळे बनून राहणारे नोकर तयार होतात, त्यांचे अंगीं निस्पृहपणा व स्पष्टवक्तेपणा इत्यादि गुण येत नाहींत, ते राष्ट्रीय शिक्षणसंस्थांच्या द्वारें आणावयाचे आहेत. स्वामिनिष्ठेस किंवा राजनिष्ठेस निस्पृहपणा व पाणीदारपणा इत्यादि गुण कांहीं विरोधी नाहींत. द्रोणाचार्य व कृपाचार्य ह्यांनीं दुर्योधनाच्या निंद्य राज्यपद्धतीचा निर्भीडपणें धिःकार केला, तथापि देह खर्चीं घालावा लागला तरी राजनिष्ठेपासून व प्रजाधर्मापासून ते पराङ्मुख झाले नाहींत. अशींच उदाहरणें आलीकडील इतिहासांतही सांपडतात. थोरल्या राजाराम महाराजांची स्त्री ताराबाईसाहेब, यांनीं शाहूमहाराज प्रतिबंधांत असतां, धाकटे शिवाजीमहाराजांची मुंज करून त्यांस तक्तारूढ करावें, अशी योजना केली. ती न्याय्य नव्हती, ह्मणून तिचा कुलकारभारी रामचंद्रपंत अमात्य, यांनीं निषेध[1] केला, व " मी धन्याच्या मर्जीस येईल तसें बोलणारा सेवक नाहीं. " असें स्पष्ट उत्तर करून ते रागानें घरीं उठून गेले. तथापि त्यांनीं ताराबाईचा पक्ष आमरणांत सोडला नाहीं.

सारांश सरकारी शाळांत जे विषय शिकविले

---

१ मल्हाररामरावकृत थोरले राजारामसाहेब यांचें चरित्र पान ६९ पहा.

जातात, ते सर्व विषय राष्ट्रीय शाळांत शिकविले जाऊन धर्मशिक्षणादि आणखी पुष्कळ गोष्टी जास्त शिकवावयाच्या आहेत. दोन्ही शाळांतील शिक्षणपद्धतींतही जमीनअस्मानचें अंतर आहे. सरकारी व राष्ट्रीय शाळांतील शिक्षणांमध्यें उद्देश, धोरण, विषय, शिक्षणपद्धति, व पुस्तकें इत्यादि सर्वच गोष्टींत फरक आहे, तो येथें सविस्तर सांगण्याइतकी जागा नाहीं. तथापि सरकारी शाळांतील शिक्षणानें होत असलेले दुष्परिणाम, व राष्ट्रीय शाळांतील शिक्षणानें पुढें घडून येणारे सुपरिणाम, यांचें येथें दिग्दर्शन केल्यास दोहोंप्रकारच्या शिक्षणांतील फरक ध्यानीं येण्यास फारशी अडचण पडणार नाहीं. सरकारी शाळांतील शिक्षणानें, असावें एक आणि भासावें एक, अशी विक्षेपबुद्धि उत्पन्न होते, आत्मविश्वास नाहींसा होऊन, आह्मी दुर्बल व नेभळे आहों, असें वाटतें, स्वदेशाच्या पूर्वेतिहासाचें खरें ज्ञान न होतां, आपल्या थोरपुरुषांविषयीं व त्यांच्या पराक्रमाविषयीं मनांत असद्भावना उद्भवते. पण ह्याच्याच उलट राष्ट्रीयशिक्षणानें, आत्मविश्वास, आपल्या थोर कुलपरंपरेची स्मृति, राष्ट्रपुरुषाची ओळख, स्वदेशाची पूर्वस्थिति व आजची स्थिति यांतील तफावतीचें ज्ञान, हल्लींची दुःस्थिति सुधारण्यास लागणाऱ्या शारीरिक, मानसिक,

व नैतिकगुणांची उत्पत्ति, गुरूविषयीं पूज्यभाव, अध्ययनकालीं ब्रह्मचर्यादि व्रतांचें परिपालन, आपली आर्यांची सर्वोत्तम पूर्वसंस्कृति कायम राखण्याविषयीं अभिमान, पाश्चात्य संस्कृतीमध्यें राज्यतृष्णा, धनतृष्णा, स्वार्थपरता, चढाओढ, इत्यादि घातक तत्वें आहेत; त्यांचें अनुकरण करण्याविषयीं तिटकारा, व आसुरीसंपत्तीचा तिरस्कार, इत्यादि सद्गुण विद्यार्थ्यांच्या अंगीं बाणण्याची खात्री वाटते, अशी या दोहों शिक्षणांतील तफावत आहे. यास्तव आमच्या लोकांनीं राष्ट्रीय शाळांकडे मनाचा ओढा ठेवून आपलीं मुलें त्या शाळांत आदरानें पाठविलीं पाहिजेत. गुरुगृहनिवासानें विद्यार्थ्यास लागणारा ओळा बऱ्याच अंशानें राष्ट्रीयशाळांत लागणारा आहे, व तो लागल्याशिवाय नुसत्या घोकंपट्टीच्या शिक्षणानें पुढील प्रजा धैर्यशाली, विचारशील, कर्तृत्ववान्, करारी व तेजस्वी निपजणार नाहीं, ही दगडावरची रेघ ह्मणून पक्कें समजावें.

मुलींच्या शिक्षणाचाही प्रकार असाच अनास्थेचा आहे. मुली लवकरच दुसऱ्या कुटुंबांत जावयाच्या असतात. यास्तव आईबापें त्यांस लडिवाळपणानें फारच स्वच्छंदानें वागूं देतात, परंतु माझ्या मतें वरील कारणास्तवच त्यांस आईबापांनीं फार कैदशीर वागविलें पाहिजे, व उपयुक्त शिक्षण दिलें पाहिजे. जी मुलगी

दहा बारा वर्षांची झाली नाहीं तोंच, जेथें तिजवर पोटागीचें प्रेम करण्यास कोणी नाहीं, अशा दुसऱ्या कुटुंबांत नांदावयास जाणार, ती मुलगी तेथें सर्वांस हवीहवीशी होण्यास तिच्या अंगीं कांहीं विशेष प्रकारचे गुण असावे लागतात, व ते गुण तिच्या अंगीं उत्पन्न करण्याची तजवीज आईबापांनीं आधींपासूनच ठेविली पाहिजे. विवाहसंस्कारानें व हितैक्य संबंधानें तिजबद्दल पोटागीच्या प्रेमाइतक्याच जिव्हाळ्याचें प्रेम, दुसऱ्या कुटुंबांतही बीजरूपानें प्रस्थापित झालें असतें हें खरें, तथापि तें प्रेम प्रथमतः अगदीं अव्यक्त असतें. त्याचा नजरेंत भरे असा अंकुर उद्भवून पुढें लवकरच त्याचा जोमदार व फलभारानें लादलेला वृक्ष बनण्यास त्या मुलीनें त्या प्रेमबीजास आपल्या मधुर वाग्रसानें सिंचन करीत गेलें पाहिजे, व नानाविध सद्गुणांचे मसाले घालून वाढविलें पाहिजे. असें न होईल तर त्या प्रेमबीजाचा खुरटलेला अंकुर फक्त जीव धरून राहील, फलभारानें लादलेला वृक्ष होणार नाहीं.

मुलगी मर्यादशील, कामसू, आज्ञाधारक, प्रेमळ, प्रसन्नचित्त व मितभाषी अशी असेल तरच ती आपल्या सासऱ्यां आवडती होते, व पुढेंही वस्त्रपात्रादि सर्व वस्तूंच्या ठेवरेवींत कुशल, द्रव्यसंरक्षणाविषयीं दक्ष, सं-

सार करण्यांत टीपशीर, पाकनिष्पत्तींत सुग्रण, सर्वांशीं मनमिळाऊ, भूषावेषादि प्रकारांत चतुर, पतिशुश्रूषेंत तत्पर, व बालसंगोपनांत प्रवीण, अशी निपजेल तरच उत्तम गृहिणी बनते. यास्तव प्रत्येक आईनें आपल्या स्वतःच्या वागणुकीनें व शिकवणीनें आपल्या मुलीस लग्नापूर्वींच वर सांगितलेल्या सद्गुणांचा परिचय करून दिला पाहिजे, कैदशीर वागविण्यानें ओळा लाविला पाहिजे, व उपदेशानें त्यांविषयीं अभिलाष उत्पन्न केला पाहिजे. वास्तविक ह्मटलें तर मुलीचें शिक्षण हेंच होय. यांत लिहितां वाचतां येण्याची भर पडली तर दुधांत साखर पडली, असें समजलें पाहिजे, परंतु ही साखरेची चिमटी न पडली, तरी नुसत्या दुधाचा पौष्टिकपणा कांहीं कमी होणार नाहीं. येथें उपमेस्तव मानलेल्या सद्गुणरूपी दुधाची, व दारिद्र्यामुळें खऱ्या दुधाची सांप्रतकाळीं मुलांस ओळख देखील होत नाहीं. लिहिण्यावाचण्याच्या चिमुटभर साखरेच्या फसवणुकीनेंच आईबापें त्यांस आनंदानें नाचावयास लावतात. यामुळेंच हल्लींची प्रजा शारीरसामर्थ्यानें व मानसिक सामर्थ्यानें अगदीं दुर्बल होत चालली आहे. ही दुर्बलता लोकांनीं लक्ष न देतां अशीच वाढत गेली, तर कांहीं काळानें हें आपलें राष्ट्र नामशेषच होऊन राहील, यांत संशय नाहीं.

विद्या व वर्तन ह्यांच्या शिक्षणाचा आरंभ प्रथमतः मातापितरांच्याच मुखानें होणें प्रशस्त आहे. मुलास गायत्री मंत्रद्वारें वेदाध्ययनाचा आरंभ पितृमुखानेंच होणें प्रशस्त गणिलें जातें, पित्याच्या अभावीं किंवा आपत्तींत मात्र तो दुसऱ्याच्या मुखानें होणें विहित मानलें आहे. मातापितरें हीं कन्या व पुत्र ह्यांचीं आद्यगुरु होत, असें असूनही तीं या कामीं उदासीन राहतात, किंवा या कामाची दुसऱ्यावर निरवानिरव करितात, हें केवढें आश्चर्य! पण ही इतकी हेळसांड करूनच जर तीं स्वस्थ बसतीं तर कांहींतरी दुःखांत सुख मानून घेतां आलें असतें. बाप सद्गुण शिकवीत नाहीं तर नाहींच, पण उलटा मुलास संसारदक्ष बनविण्या करितां परस्वापहार, अनृतवादित्व, व कुटिलता इत्यादि दुर्गुणांची तालीम देत असतो, व आई त्याबद्दल अभिनंदन करीत असते. अशा अविचारी वर्तनामुळें बापाचें मुलांवर वजन न पडतां, तो बापाची अमर्यादा करितो, व सून सासूस केराबरोबर लोटते, व नवऱ्यास दास बनवूं पाहते.

सांप्रतकालीं सासवासुनांची परस्पर वागणुक कशी असते, हें सर्वांस विदितच आहे त्या बद्दल वृथैव लेखनविस्तार कशास पाहिजे? उंदीर आणि मांजर, किंवा गाय आणि वाघ, अशा भक्ष्यभक्षक प्राण्यांत जेवढा

प्रेमभाव राहणें शक्य आहे, तितकाच हल्लीं सासवा सुनांत प्रेमभाव राहणें शक्य आहे. सासवा आपल्या आचरणानें सुनांस वाईट वळण लावीत असूनही, चांगलें वळण लावण्याच्या मिषानें त्यांस निष्कारण क्रूरतेनें वागवितात, व सुनाही प्रौढदशेंत आल्यावर सासवांचा सूड उगवितात, असा धुमाकूळ बहुतेक कुटुंबांत चाललेला दृष्टीस पडतो. हा प्रकार फारच गैरशिस्त होय. सासूसासऱ्यांनीं सुनांस कैदशीर वागविणें जरूर आहे, तरी तसें वागवितांना निष्ठुरता केलीच पाहिजे असें नाहीं. निष्कारण कठोरता धारण करून केलेला उपदेश रुचत नाहीं, व ठसतही नाहीं. यास्तव सुनांस वात्सल्यानें वागवून, व त्यांच्या मनांत आपणाविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न करून, ओळा लाविला पाहिजे. जी सून आपल्या संसाराची पुढें लवकरच मालकीण होणार, तिचा चालरीत शिकविण्याच्या मिषानें छळ करणें, व तिला घरांत काडीचीही सत्ता न देणें, हा सासवांचा वेडेपणा आहे. मुलगा जसा युवराज तशी सूनही युवराज्ञी आहे. संसारांत ज्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणें सर्वांस सत्ता व अधिकार असणें जरूर आहे. तसें नसेल तर ज्यास त्यास माझा अधिकार घरांत चालावा असें वाटून कोणी कोणाचें ऐकत नाहीं व प्रत्येक जण दुसऱ्यावर चरफडत राहतो.

यामुळें घरांत सुखाचा घास कोणासच खावयास मिळत नाहीं. ज्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणें संसारांत सर्वांचा हात असला ह्मणजे, कोणीही असंतुष्ट न राहतां सर्वजण कुटुंबनायकाच्या मुठींत राहून, एकोप्यानें आपआपले अधिकार चालवितात. सर्वच नियंते व नायक बनून निर्नायकी होत नाहीं. कुटुंबास व सैन्यास एकच नियंता लागतो, तसें नसेल तर बंडाळी होऊन नाश रोकडा ठेविलेलाच आहे ह्मणून समजावें.

मुलांचें सोळापासून पंचवीस वर्षांचें वय फार लक्ष ठेवण्यासारखें असतें. ह्या वयांत त्यांस बाळपणची परवशता नकोशी होते, व स्वतंत्रतेनें वागण्यासारखा त्यांस जगाचा अनुभव आलेला नसून त्यांची बुद्धिही परिपक्व झालेली नसते. यामुळें तीं अनावर होऊन तोंडास तोंड देणारीं, बेहुकमी, व मनमानेल तसें वर्तन करणारीं होतात. ह्या वयांत अशा गोष्टींचा प्रतिबंध ताडनादि प्रकारांनीं करणेंही विहित नसतें. यास्तव मुलांची पहिल्यापासूनच तोंडास तोंड देण्याची भीड चेपूं न देणें, व शिक्षण संस्कारानें त्यांची तारतम्यबुद्धि वाढविणें, हें अत्यंत महत्वाचें आहे, असें सर्वांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे.

मुलांच्या मनाची सद्वर्तनाकडे प्रवृत्ति करून देणारें, व व्यवहारांतील नानाविध व संकीर्ण कृत्यांच्या बरेवा-

इटाची ओळख करून देणारें व्यवहारशिक्षण, हा राष्ट्रीय-शिक्षणाचा आधारभूत पाया आहे. हा पाया भक्कम न घालतां, समाजरचना व समाजाचे नियंत्रणप्रकार जे राजसत्ता, महाजनसत्ता, व लोकप्रतिनिधिनियुक्तसत्ता, यांविषयीं मुलांस कितींही सूक्ष्मतेचे पाठ दिले, तरी त्या पाठांचें रहस्य त्यांस कळणार नाहीं, व त्यांच्या वर्तनांत कांहींएक बदलही होणार नाहीं. उलट हा प्रकार "आधीं कळस मग पाया" असा होऊन सर्व इमारत ढांसळून पाडील, अशी आमची समजूत आहे. विचार करणें सुज्ञांकडे आहे.

प्रकरण सहावें समाप्त.

प्रकरण सातवें.

शिष्टाचार व द्रव्यविनियोग.

शिष्टाचार—शिष्टाशिष्टविवेक, शिष्टांचे प्रकार, शिष्टसन्मान, सभ्याचार, गुरुजन कोण कोण समजावे, आश्रित व सेवक ह्यांशीं कसें वागावें, सरकारदरबारांत कसें वागावें, भूषावेषादि प्रकार कसा असावा, **द्रव्यविनियोग**—स्वोपभोग, द्रव्यदान, अन्नदान, पात्रापात्र विचार, दांभिकदाननिषेध, लग्नकार्यादि उत्सव. तत्संबंधीं खर्चवेच, हुंडा फार घेणें व लग्नकार्यांतील इतर वाईट चाली ह्यांचा निषेध, **उपसंहार.**

प्रकृत प्रकरणांत शिष्टाशिष्टविवेक, सभ्याचार, व द्रव्यविनियोग इत्यादि गोष्टींचा विचार करावयाचा आहे. शिष्ट कोणास ह्मणावें व अशिष्ट कोणास ह्मणावें, हें ध्यानीं आणून त्याशीं वागण्याचा प्रकारही सूक्ष्मतेचा असावा. वेळेस जें बनेल तें बनेल असा भरमसाट प्रकार असूं नये. काम, क्रोध, दंभ व लोभ इत्यादि मनोविकारांचें दमन करून जे धर्मन्यायानें वागतात, जे विद्वान, निर्मत्सर, क्षमाशील, व उदार असे असून स-

१ कामक्रोधौ वशे कृत्वा दम्भं लोभमनार्जवम् ।
धर्ममित्येव संतुष्टास्ते शिष्टाः शिष्टसंमताः ॥ ६४ ॥
अक्रुध्यन्तोनसूयन्तो निरहंकारमत्सराः । ऋजवः
शमसंपन्नाः शिष्टाचारा भवन्ति ते. ॥ ७९ ॥
(वनपर्व अ. १०७)

वांचा आदर करितात, आपणास जें मिळेल तें सर्व कुटुंबास विभागून देतात, आणि सचवटीनें व सरळपणानें वागतात, ते शिष्ट होत. प्राणिमात्रावर दया करणें, कठिण प्रसंगीं चंचल होऊन कुमार्गाचें अनुसरण न करणें, व सदोदित बऱ्या वाइटाची विचारणा करणें, हा शिष्टांचा लोकमान्य आचार आहे. सदाचारानें वागणें हेंच शिष्टपणाचें मुख्य लक्षण खरें, तथापि जनरूढीनें तीन प्रकारचे शिष्ट मानले जातात. जन्मानें व कर्मानें जे शिष्ट ते उत्तम प्रकारचे, व पहिल्या दर्जाचे शिष्ट समजावे. जे नुसत्या कर्मानेंच शिष्ट ते मध्यम, व दुसऱ्या दर्जाचे शिष्ट समजावे. व जे मोठ्या कुळांत जन्म घेतल्यामुळें केवळ जन्मानेंच शिष्ट, ते कनिष्ठ तिसऱ्या दर्जाचे. ह्यांशिवाय इतर लोक ते सामान्यजन होत. अशा चार प्रकारच्या लोकांशीं ज्याच्या त्याच्या योग्यतेनुरूप तफावतीनें वागणें भाग आहे. सर्वांचा आदरसत्कार करावा खरा, परंतु तो सर्वांचा सारखा करणें रास्त नाहीं. ज्यांनीं प्रतिष्ठित व खानदानीच्या कुळांत जन्म घेतला असून, ज्यांचें वर्तन परम पवित्र व प्रति-

१ दातारः संविभक्तारो दीनानुग्रहकारिणः । सर्वपूज्याः श्रुतधनास्तथैव च तपस्विनः ॥ ८९ ॥
सर्वभूतदयावन्तस्ते शिष्टाः शिष्टसंमताः । दानशिष्टाः सुखांल्लोकानाप्नुवन्तीह च श्रियम् ॥ ९० ॥
(वनपर्व. अ. २०७)

ष्ठितपणाचें अशा लोकांस मान देणें, तो उपायनाप्रमाणें किंवा करभाराप्रमाणें हक्क समजून द्यावा. ज्यांची खानदानी व कुल बघूं गेलें तर मान देण्यासारखें नाहीं, परंतु आचरण पाहिलें तर स्तुत्य, अशा लोकांस संभावनापूर्वक मान देणें उचित होय, व ज्यांची खानदानी किंवा कुल थोर खरें, पण आचरण सांगण्यासारखें निर्मल नाहीं, अशा लोकांस मान द्यावयाचा तो त्यांच्या कुलाकडे बघून व जनरूढीखातर द्यावयाचा असतो, यास्तव तो केवळ औपचारिक रीतीनेंच द्यावा, त्यांत अंतरही करूं नये, व फारसें स्तोमही माजवूं नये. तेलंगे ब्राह्मण फार लांबून आपल्या इकडे येतात, एवढाच विचार ध्यानीं घेऊन त्यांच्या विद्वत्तेकडे न बघतां, त्यांस दुप्पट दक्षणा देण्याची जशी कांहीं कालापूर्वी चाल असे, त्याप्रमाणेंच वर सांगितलेले तिसऱ्या दर्जाचे शिष्ट हे बडे बापके बेटे आहेत, येवढाच विचार मनांत घेऊन त्यांस मान देण्याची वहिवाट आहे, व ह्या वहिवाटीनें त्यांच्या पूर्वजांबद्दल कृतज्ञता दर्शविली जाते, हेंही नीटच आहे. कोणाचेंही आगतस्वागत करणें तें ज्याचा त्याचा दर्जा ध्यानीं आणून करीत असावें. कोणास चार पावलें सामोरें जाऊन, कोणास खडी ताजीम देऊन, कोणास बसण्यास हातानें स्थाननिर्देश करून, कोणास

नुसतें कुशल विचारून, व कोणास पाहिलें एवढें सुचविण्याकरितां फक्त किंचित् मान हालवून, योग्यतेप्रमाणें सत्कार करावा. दर्जापेक्षां जास्ती बहुमान केल्यानें आपला अप्रयोजकपणा दिसून येतो, व दुसऱ्यास थट्टा केल्यासारखेंही वाटतें. कोणाचीही लटकी मुखस्तुति करून आपण भाट बनूं नये. सर्वांशीं भाषण सरळ, मधुर, आणि अदीन असून नम्र, असें करावें. बहुभाषपणा कधींही करूं नये, व बोलतांना हंसूं नये. मोठें आश्चर्यच झालें तर मुखचर्या किंचित स्मित करावी. सस्मित हास्य उत्तम, दंतपंक्ति किंचित दिसेल असें विहसित मध्यम, व खदखद शब्द होईल असें अट्टहास्य कनिष्ठ व अप्रतिष्ठित समजावें. अश्लील व ग्राम्य शब्द बोलण्यांत येऊं न देण्याची खबरदारी ठेवावी. अशा प्रकारचें वर्तन शिष्टसम्मत नाहीं, यास्तव तें शिष्टसमुदायांत कधींच करूं नये. क्वचित प्रसंगीं वयस्यां समवेत नर्मपरिहास करीत असतां जरी तें क्षम्य मानलें जातें, तरी तें वर्ज्य आहे, असें ध्यानीं ठेवावें.

विद्वान गुरुजन ह्यांचा बहुमान राखावा. वडील माणसें बसलीं असतां, त्यांच्या समोर बसूं नये, बाजूस बसावें, व तीं उभीं असतील तर आपणही उभें रहावें. उपाध्याय ह्मणजे विद्या सांगणारा, पिता, ज्येष्ठ भ्राता,

राजा, मातुल, श्वशुर, रक्षणकर्ता, मातामह, पितामह, श्रेष्ठवर्णाचा पुरुष, आणि पितृव्य हे पुरुषांपैकीं गुरुजन[1] समजावे. तसेंच माता, मातामही, गुरुपत्नी, पित्याच्या आणि मातेच्या बहिणी, सासू, पितामही, व उपमाता ह्या स्त्रियांमधील गुरुजन[2] समजाव्या. इतक्या प्रकारच्या वडील माणसांशीं पायरीनें वागून त्यांचा सन्मान राखावा.

नोकरांचाकरांशीं कसें वागावें याविषयीं प्रसंगानुरोधानें मागील प्रकरणीं कांहीं विवरण झालेंच आहे. येथें विशेष इतकेंच सांगतों कीं, हलक्या नोकरांस एकमेकांच्या खोटयानाटया चाहडया सांगून यजमानाची प्रीति संपादन करण्याची खोड असते, सबब त्यांनीं सांगितलेलें मनास आणणें, तें फार विचारानें व धिम्मेपणानें आणावें. अशा लोकांस लुब्रेपणा करण्याची छाती न होईल, अशा कदरीनें वागलें असतां, तेही बेतानेंच वागतात. नोकरांनीं कामकाज चांगलें बजाविल्यास त्यांस उत्तेजनार्थ बक्षीस अगर शाबासकी द्यावी. पण मगदुरापेक्षां जास्त शाबासकी किंवा बक्षीस देऊं नये. शिपायानें

---

१ उपाध्यायः पिता ज्येष्ठो भ्राता चैव महीपतिः । मातुलः श्वशुरस्त्राता मातामहपितामहौ ॥ वर्णज्येष्ठः पितृव्यश्च पुंस्त्वेते गुरवः स्मृताः ।

२ माता मातामही गुर्वी पितुर्मातुश्च सोदराः । श्वश्रूः पितामही ज्येष्ठा धात्री च गुरवः स्त्रियाम् ॥

रणांत पराक्रम केल्यास शिवाजीमहाराज त्यांस बहुमानार्थ दहापांच रुपयांचें कडें किंवा सखलाद पासोडी वगैरे वस्त्र, असें बेताबातानेंच बक्षीस देत असत. बक्षीस हा बहुमान आहे. त्याच्या किंमतीवर मोठेंसें तात्पर्य नसतें. तसेंच नोकरांकडून अपराध झाल्यास, अपराधाचें स्वरूप व हेतु यांजकडे नजर पुरवून शिक्षाही माफकच करावी. बाळकाच्या चोरीस बुक्यांचा मार करूं नये. तसेंच विद्वान् व गुणी लोक पदरीं बाळगिले असल्यास त्यांस अनुचित सेवा सांगूं नये.

कुळांडाळांशींही बेहुरमत भाषण, किंवा फाजील कठोरपणा करूं नये. आपलें जें वाजवी येणें असेल तें घ्यावें, परंतु घेतांना कुळास देण्यास खरोखर ऐपत नाहीं, व तें अगदीं मोडकळीस आलें आहे, असें दिसून येईल तर जरा रहीम नजर व सबुरी करावी. प्रसंग व वास्तविक स्थिति पाहून थकलेल्या कुळांस नीट कागदपत्र करून घेऊन द्रव्याची मदत करणें, व त्यांस उद्योगास लावणेंही जरूर आहे. आपलें येणें वसूल झालें पाहिजे, इतक्याच खातर त्यांच्या घरादारांचें लिलांव करून त्यांचीं पोरेंबाळें उघडीं पाडणें, हें बरोबर नाहीं. असा निकर करणें झाल्यास, जें कूळ ऐपत असून कर्जाची फेड करण्यास लफंगेगिरी करतें, व मदत केली तरी उ-

द्योगास लागून फेड करीत नाहीं, दिलेलें खाऊन मात्र बसतें, त्याजवरच करावा. कुळें हीं सावकाराचीं फळझाडें[1] आहेत, त्यांची तोडमोड करून सर्पण गोळा करीत बसण्यापेक्षां उस्तवारी राखून प्रतिवर्षीं फलोपभोग घेणें चांगलें. पण, ही कुळाडाळांविषयीं दयार्द्रबुद्धि मर्यादेंतच असूं द्यावी, तिचा अतिरेक करूं नये. कारण, कोहळ्याभोपळ्याच्या वेलांस देखील पोषकद्रव्य वाजवीपेक्षां फाजील मिळालें तर ते वेल जसे माजून लागास येत नाहींत, तशींच कुळें हीं वाजवीपेक्षां फाजील पोषण झालें तर मस्तावतात. त्यांस आपला सावकार आपला पोशिंदा आहे, असें तर वाटावें, पण बिथरला तर आपलीं पाळेंमुळें खणून टाकण्याची हयगय करणार नाहीं, अशी त्यांस दहशत असावी. सारांश “ **वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि** ” ह्मणजे लोण्या पेक्षां मऊ आणि तरवारीच्या धारेपेक्षां तीक्ष्ण, असें तारतम्ययुक्त वर्तन ठेवावें, तेव्हां कुणवी वठणीस येतात. येणें वसूल करितांना खोटें माप अगर खोटा हिशेब करून कोणाचेंही जाफा घेऊं नये, अथवा कोणी अडला जाऊन हवे-

---

१ यथा मधु समादत्ते रक्षन्पुष्पाणि षट्पदः । तद्वदर्थान्मनुष्येभ्य आदद्यादविहिंसया ॥ १७ ॥ पुष्पं पुष्पं विचिन्वीत मूलच्छेदं न कारयेत् मालाकार इवारामे न यथाङ्गारकारकः ॥ १८ ॥ उद्योगपर्व अ० ३४

तसे करार लिहून देण्यास राजी झाला, तरी अटीचें व्याज किंवा भलतेच करार लिहून घेऊन कुळाची नागवण करणें, हें सावकारास योग्य नाहीं. व्यवहारांत सावपणें वागेल तो सावकार, बाकीचे सारे दगलबाज होत.

आतां सरकारदरबारांत आपली इभ्रत व वागणूक कशी असावी, याविषयीं संक्षेपानें दोन शब्द सांगतों. राजानें लोकरंजनतत्पर असावें, व प्रजाजनांनीं राजनिष्ठ असावें, हीं दोन्ही तत्वें आपणा हिंदु लोकांस नव्यानें शिकविलीं पाहिजेत असें नाहीं. कारण, आपण वैदिकधर्मानुयायी लोक, विशिष्ट मानव देहांत जें लोकपालांचें तेज विराजत असतें, त्या तेजास राजा समजतों. त्या तेजाचें अधिष्ठान जें मानवकलेवर, त्यास राजा ह्मणण्याची वहिवाट केवळ लाक्षणिक अर्थानें आहे, तत्वार्थानें नाहीं, व अशा उदात्त समजुतीमुळेंच राजास " हे देव " अशा संबोधनपदानें प्रख्यापन करण्याची आपली पुरातन रीत आहे. यास्तव लोकानुग्रहकारक जें लोकपालांचें तेज, तें कोणत्याही जातीच्या व धर्माच्या मानवदेहांत प्रविष्ट होऊन आपलें कल्याण व रक्षण करीत असेल, तर त्याविषयीं आपण एकनिष्ठ असावें, हें

१ अष्टाभिश्च सुरेंद्राणां मात्राभिर्निर्मितो नृपः ॥
(असें स्मृतिवचन आहे.)

प्रार्थनापूर्वक सांगावयास नकोच; कारण, तो आमचा विहित असा कुळाचारच आहे. परंतु, केवळ बलाधिक्यामुळें निष्कृप होऊन क्रूरतेनें लोकांस अंकित करून गांजणारें जें आसुरी तेज तें दैवी तेज नव्हे, यास्तव तशा तेजाविषयीं एकनिष्ठ असावें, असें सांगणारानें सांगावें तरी कसें, व सांगून ऐकणार तरी कोण.

प्रतिष्ठित ह्मणविणारानें सरकारदरबारांत आपलें वजन अवश्य राखिलें पाहिजे. सरकारदरबारांत मान नसेल तर प्रतिष्ठितांस लिहिण्यांत "**राजमान्य राजश्री**" हें उपपद लावण्याची सार्थकता काय ? राजसभेंत ज्यास मान मिळतो तोच सभ्य. इतर सर्व आडनांवाचे सभ्य होत. सर्व भूमंडलावर राजाहून थोर कोण, व त्यास जो मान्य त्यास अमान्य तरी कोण ह्मणणार ? सरकारदारबारांत आपलें कामकाज पडतें, व तें आपल्या तर्फेनें व्हावें, इतकाच हेतु बाळगून जो आपलें वजन दरबारांत राखूं इच्छितो, त्याचें वजन तेथें चांगलें पडणार नाहीं, हें सर्वांनीं पुरें लक्षांत ठेविलें पाहिजे. राजापेक्षां कोणी मोठें नाहीं, हें नुकतेंच सांगितलें आहे, व राजतेज राजसेवकांचे ठिकाणीं प्रविष्ट झालेलें असतें, यास्तव त्या राजतेजामुळें राजसेवकही मोठे समजले पाहिजेत, व त्यांचा मानही ठेविला पाहिजे. त्यांस मान द्यावयाचा तो

त्यांच्या गुणावगुणाकडे बघून द्यावयाचा नसतो. सरकारच्या गादीकडे बघून द्यावयाचा असतो. यास्तव सरकारी कामगार कसाही असो, त्याच्या खाजगी वर्तनाकडे नजर न देतां, त्याशीं आपण आदबीनेंच वागावें. कामकाजाविषयीं रदबदली करितां यावी ह्मणून पुढें पुढें करणें, ह्यास मान राखणें ह्मणत नाहींत, तें श्वानासारखें शेपूट हालविणें होय. अशा कृतीनें अधिकाऱ्याचा मान ठेविलासें होत नाहीं, व आपलाही मान रहात नाहीं. कामकाज रितीप्रमाणें जसें व्हावयाचें असेल तसें होईल, त्याची पर्वा बिलकुल करूं नये. सरकारी कामगार जसे मोठे, तसे आपणही मोठे, असें मनांत वागवून त्यांजपाशीं आपलाही मान जवळ जवळ त्यांच्या बरोबरीचाच असावा. राजाधिकारामुळें सरकारी कामगार कितीही मोठा असला, तरी त्यानें आपला देह व नागरिकपणाचा हक्क सरकारास विकला आहे, व तो वेतनाच्या मोबदल्यांत सरकारची ताबेदारी उठविणारा आहे. परंतु, प्रजाजन कितींही दीन असला, तरी तो स्वतंत्र नागरिक आहे. व सरकारचें वेतन न खातां सरकारास साहाय्य करणारा आहे. यास्तव एखाद्या कामागारानें गर्विष्टपणामुळें अगर उन्मत्तपणामुळें आपला मान ठेविला नाहीं, तरी तो आपला आपण राखवेल तेवढा राखिला

पाहिजे, पण तो सरकारी कामगारापुढें हांजी हांजी केल्यानें राहत नाहीं. कामकाजाची रदबदली कधींही न करणें, खोटें काम घेऊन त्यांजपुढें न जाणें, व राजासनासमोर खोटें[1] न बोलणें, इत्यादि सद्वर्तनानेंच तो राहतो. आपलें काम खोटें नसलें, व दरबारांत वजन चांगलें असलें, ह्मणजे तें बहुधा आपल्या सारखें होतेंच, त्यासाठीं मोठी हांजी हांजी करण्याचें कारणच पडत नाहीं. आपल्या बोलण्याची साकसचवटी मनांत आणून कामगारांनीं आपण होऊनच आपलें कामकाज पार पाडणें, ह्याचेंच नांव वजन. कामगारांस लांचलुचपत देणें, व त्यांस नीतिभ्रष्ट करणें, व आपणही नीतिभ्रष्ट होणें, हें मोठें हलकटपणाचें काम व पापकर्म आहे. त्याचा नेहमीं कंटाळा करावा. पण, राजांस व त्यांचे प्रतिनिधीभूत जे कामगार त्यांस नजरनजराणा देण्याची वहिवाट असूं द्यावी. राजास व देवास उपायन अर्पण करणें, हा त्यांस सन्मान देण्याचा प्रकार आहे, व तो फार प्राचीन काळापासून प्ररूढ आहे. ह्या करितां सरकारी कामगारांस

---

१ असूयन्ति हि राजानो नराननृतवादिनः । तथैव चावमन्यन्ते नरान् पंडितमानिन: ॥ ३१ ॥

यत्नाच्चोपचरेदेनमग्निवद्देववच्चिह । अनृतेनोपचीर्णो हि हन्यादेव न संशयः ॥ २२ ॥ विराटपर्व. अ. ४

योग्य प्रसंगीं मेजवानी देणें, नजरनजराणा पाठविणें, व लग्नाकार्यांत त्यांस आगत्यपूर्वक आमंत्रणचिठ्या लिहिणें, ह्या गोष्टींना हांजी हांजी किंवा लांचलुचपत समजूं नये. परंतु, त्या करितांना अधिकाऱ्यांस हांजी हांजी करतों असें वाटेल, किंवा त्यांस हा उपचार प्रिय नसेल, तर त्याचा आधीं पोक्त विचार करून त्या वर्ज कराव्या, व जेव्हां कांहीं आपलें मोठें काम त्यांजपुढें असेल, तेव्हां तर त्या कामाचा निकाल होई पर्यंत अगदीं उदासीन रहावें.

योग्य प्रसंग पाहून मधून मधून दरबारी लोकांकडे जाण्याबसण्याचीही वहिवाट असूं द्यावी. परंतु त्यांचे उंबरे मात्र झिजवीत बसूं नये. अशा लोकांकडे गेलें असतां, सामान्य लोकांच्या मालिकेंत न बसतां जरा तफावतीनें बाजूंस[1] बसावें. यदाकदाचित् एखादा अधिकारी गर्वानें बेपर्वाई दाखवील तर न बसतां, उभ्या उभ्या भेटीस येण्याचें समर्पक कारण निवेदन करून त्याच पावलीं माघारें फिरावें. भेटीस जातांनाच समर्पक कारणाची योजना करून ठेवावी. उगाच भेटीस आलों होतों, असें ह्मणून दारवठे पुजल्यासारखें दाखवून अप्रयो-

---

१ दक्षिणं वाथ वामं वा पार्श्वमासीत पण्डितः। नित्यं हि प्रतिषिद्धं तु पुरस्तादासनं महत् ॥ २७ ॥ २८ ॥ विराटपर्व, अ० ४.

जकपणाचें उत्तर देऊं नये. व तेथें बसलें असतां हस्त-पादादिकांचा अंगविक्षेप[1] करूंनये. कारण उपस्थित झालें तरी मोठ्यानें हंसूं[2] नये, व विचारल्या शिवाय मध्यें तोंड घालून बोलूं[3] नये. हीन वेषानेंही असूंनये, व नट-वेगिरीचा किंवा वरचढपणा दिसेल असा डौली पोषा-खही करूंनये. प्रतिष्ठितपणास साजेल असाच वेष असावा. सोंगट्यागंजिफा खेळण्याचा प्रसंग आल्यास तो कांहीं तरी निमित्त सांगून टाळावा. अशा सलगीनें आपणांकडे खुषमस्करेपणा येतो, व खेळांत बहुधा वाद-विवादाचा प्रसंग आल्यावांचून राहतच नाहीं. याशिवाय ज्या कामगाराशीं आपला निकट संबंध पडतो, त्या काम-गाराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपाशीं व हुजूर कचेऱ्यांत आपलें वळण ठेवण्यास दक्ष असावें.

असो, इतकावेळ इतरांशीं कसें वागावें हें सांगितलें. आतां आपलें आपल्याशीं वर्तन कसें असावें, व दानधर्मा-दिकांविषयीं विचार कसा असावा, या विषयीं थोडासा

---

१ न चोष्ठौ न भुजौ जानू नच वाक्यं समाक्षिपेत् । सदा वातं च वाचं च ष्ठीवनं चाचरेच्छनैः ॥ ३९ ॥

२ हास्यवस्तुषु चान्यस्य वर्तमानेषु केषुचित् । नाति गाढं प्रहृष्येत न चाप्युन्मत्तवद्धसेत् ॥ ३६ ॥

३ नचानुशिष्याद्राजानमपृच्छन्तं कदाचन । तूष्णीं त्वेनमुपासीत काले समभिपूजयेत् ॥ १६ ॥ विराटपर्व. अ. ४

ऊहापोह करूं. आरंभापासून येथवर जी दक्षता ठेवण्यास सांगितली, ती द्रव्य व तद्वारा कीर्ति संपादन करावी ह्मणून सांगितली. द्रव्य व आचरण हीं दोन्ही कीर्ति संपादन करण्याचीं साधनें आहेत खरीं, परंतु द्रव्य अनुचित प्रकारानें मिळविलें, व वागणुक गैरशिस्त व अन्यायाची ठेविली, तर कीर्ति व्हावयाची एकीकडे राहून अपकीर्ति मात्र होते. द्रव्य पराक्रमानें व सद्वर्तनानें मिळवावें, अनीतीनें व याचनेनें मिळवूं नये. व सदुद्योगानें मिळविलेल्या द्रव्याचा सद्व्यय करावा. विचारदृष्टीनें पाहूं गेलें तर धनाचा व्ययाखेरीज दुसरा उपयोग काय? द्रव्य संचय करून त्याचा व्यय न करितां त्याकडे टकमक पहात बसणें, हा त्याचा उपयोग नव्हे. सांचलेल्या पाण्यास उसपा नसेल तर तें जसें नासून विकारी होतें, तद्वत् व्ययाखेरीज सांचविलेलें द्रव्य विकारी होतें. त्यापासून मदांधता, कृपणता, व गर्व हे विकार उत्पन्न होतात. विहिरींत जसें शेंदोनशें घागरी पाणी रोज नवें आलें पाहिजे, व शेंपन्नास घागरी रोज खर्च झालें पाहिजे, ह्मणजे तें जसें मधुर व स्वच्छ राहतें, त्या प्रमाणें द्रव्यासही रोज आदा आणि व्यय झालाच पाहिजे. द्रव्याचा व्यय ह्मटला ह्मणजे स्वोपभोग, दान, व लग्नकार्यादि उत्सव, अशा तीन प्रकारांनींच मुख्यत्वेंकरून होत

असतो. यास्तव या तिन्हीं प्रकारांची गुणदोषविवेचना करणें आवश्य आहे.

स्वोपभोगांत स्वकीय परिवाराचाही उपभोग समाविष्ट होतो, हें उघडच आहे. आपल्या परिवाराच्या उदरपोषणाकरितां व शरीरभूषस्तव केलेला अन्नवस्त्रादि खर्च, हा आवश्यक स्वोपभोग खरा, परंतु शरीरापेक्षां श्रेष्ठ जें मन त्याच्या भूषेविषयीं खर्च करणें, हाही अत्यावश्यक स्वोपभोगच समजला पाहिजे. विद्यार्जनाकरितां विद्वानांस पदरीं बाळगून त्यांप्रीत्यर्थ केलेला व ग्रंथसंग्रहार्थ केलेला खर्च, हा सर्वोत्कृष्ट स्वोपभोग समजावा. संभावित गृहस्थानें पोषाख साधा, स्वच्छ, व सर्व देह आवृत राहील असा करावा. हरदासासारखीं किंवा भटभिक्षुकासारखीं मोठमोठ्या कांठांचीं रेशीमकांठी धोतरें प्रौढवयांत नेसूं नयेत. तशा लोकांस तीं विद्येची किंवा गुणाची संभावना ह्मणून मिळालेलीं असतात, व तीं अंगावर वापरल्यानें तोंडानें आत्मश्लाघा केल्याशिवाय आह्मी विद्वान् किंवा गुणी आहों, असें त्यांस मुकाट्यानें जगास कळवितां येतें, परंतु संभावित गृहस्थानें तसें केल्यास डौल व गर्विष्टपणा मात्र दिसतो. तसेंच अंगावर अलंकारही वाण्याउदम्यासारखे पुष्कळपणीं घालूं नयेत, अनुकूलता असेल तर मौल्यवान् हिऱ्याची अंगठी

किंवा पवित्रक बोटांत असलें ह्मणजे पुरे आहे. विशेष प्रकारचे राजोपचार व नृपोचित भूषणें, सामर्थ्य असलें तरी गृहस्थानें वर्ज समजावीं. नागपूरकर भोंसल्यांजवळ अपार संपत्ति होती, व ते शिवछत्रपतिमहाराजांच्या कुळांतलेही होते, तरी देखील त्यांस नृपोचित भूषणें राजाज्ञेनें व राजोच्छिष्ट समजून अंगावर वापरावीं लागत. रघोजी भोंसल्यांचें लग्न झालें, ते समयीं त्यांच्या घरांतील बायकांचा मनोदय नवऱ्यामुलीच्या पायांत सोन्याच्या सांखळ्या घालाव्या असा होता, यास्तव भोंसल्यांनीं पेशव्यांस लिहून साताऱ्याहून महाराजांची आज्ञा व राणीसाहेबांचा पादस्पर्श झालेल्या सुवर्णाच्या सांखळ्या आणविल्या, या संबंधाचा पत्रव्यवहार नागपूरकर भोंसल्यांचे कागदपत्र छापून प्रसिद्ध झाले आहेत त्यांत आहे, व त्याची अस्सलबरहुकूम नक्कल वाचकांकरितां आह्मीं खालीं देत आहों, त्यावरून ध्यानीं येईल.

श्री.

राजश्री मुधोजी भोंसले सेनाधुरंधर गोसावी यांसी. सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित माधवराव नारायण आशिर्वाद विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष, राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा

यांचें लग्न मार्गशीर्ष मासीं करणार; त्यास घरांतील बायकांचा बेत सोन्याच्या सांखळ्या पायीं घालाव्या, याजकरितां श्रीमंत महाराज छत्रपती स्वामींस विनंती करून राणीचे पायांतील सांखळ्या आणवून लग्नसमारंभास पाठवाव्या, ह्मणून राजश्री दिवाकर पुरुषोत्तम यांनीं राजश्री सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन यांस लिहिलें, याजवरून कळलें. ऐशीयास आपलेकडील बायकांचे मनोरथ सिद्धीस न्यावे हें आह्मांसही आवश्यकच; यास्तव महाराजांस विनंती करून दागिने मागविले आहेत, आले ह्मणजे बाबुराव विश्वनाथ याजबरोबर पाठवून देऊं. नवरीस लहान दागिने असावेत ते तेथें आपण करावेत. रवाना छ ५ माहे रमजान बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती. लेखनसीमा.

असो, वस्त्रालंकारांत जसा मर्यादितपणा पाहिजे, त्याप्रमाणेंच आहारविहारांतही औचित्य व मर्यादितपणा ठेवणें जरूर आहे. अनुकूलता आहे ह्मणून रोज पक्कान्नें व रोज गाण्याबजावण्याचे जलसे करणें रास्त नाहीं; असल्या गोष्टी उचित प्रसंगींच केल्या पाहिजेत. तान्ह्या लेकरांच्या अंगावर पुष्कळ दागदागिना घालण्याचा बायकांस सोस असतो, परंतु त्यापासून लेकरांस सुख न होतां क्वचित् प्रसंगीं दगा होण्याचा मात्र संभव असतो.

ज्यांस समजूत आली आहे, अशा जाणत्या मुलांमुलींस जरा डामडौलाचा पोषाख व अलंकार घातले असतां चालेल. श्रीमंत व प्रतिष्ठित लोक स्वतः अलंकार घालून आपलें वैभव दाखवीत नाहींत. आश्रित व खिजमतींत असणारे नोकर यांस वस्त्रालंकारांनीं भूषित करून आपलें वैभव दाखविण्याची त्यांची रीत आहे. बाह्यांगापेक्षां श्रेष्ठ जें अंतरंग त्यास सुशोभित करणें आवश्यक असतां, तें ओंगळ असलें तरी सांप्रत श्रीमंत लोकांस परवडतें. अंतरंग हें विद्या, विनय, व सद्वर्तन यांनींच सुशोभित दिसतें, याकरितां पदरीं एखाद दुसरा विद्वान् व गुणी मनुष्य बाळगून मन सोज्वळ होईल असें करावें. कोठारांत धान्य पुष्कळ आहे, त्याअर्थीं एखादा विद्वान् पंक्तीस जेवला ह्मणून कांहीं कमी पडत नाहीं, व सालाच्या कांठीं दानधर्माच्या निमित्तानें पांचपन्नास रुपये त्यांस पोहोंचवून त्यांच्या मुखानें आपल्या उदारत्वाची टिमकी जगभर वाजविण्यास हें एक चांगलें साधन आहे, एवढ्याच बुद्धीनें पदरीं विद्वान् बाळगणें, हा अगदींच गौण पक्ष आहे. वास्तविक ह्मटलें तर विद्वान् व गुणीजन आश्रयास ठेवण्याचा मुख्य उद्देश त्यांजपासून विद्या व गुण संपादन करण्याचा आहे, तथापि या मुख्य उपयोगांकडे लक्ष न देतां, क्वचित् कोठें कोठें श्रीमान्

लोकांकडून विद्वानांस जो आश्रय मिळतो, तो फक्त डामडौलाकरितां व त्यांच्या मुखानें आपलें स्तुतिस्तोत्र ऐकण्याकरितांच मिळतो. हा प्रकार चौरीचा उपयोग धुरळा झाडण्याकडे करण्यासारखाच असमंजसपणाचा नव्हे काय? विद्या हें मनाचें भूषण आहे. तिच्या योगानें मनांस शोभा येते, कार्य व अकार्य यांतील तारतम्य समजतें, व दुर्दैवानें विपत्काळ प्राप्त झाला असतां, तशा काळांतही तिच्या योगानें मनास विनोद होतो. जी कीर्ति, लक्ष्मी, शोभा, व सुख देणारी विद्या, तिच्या संपादनाकरितां द्रव्य खर्च करणें, हा इतर सर्व प्रकारच्या सुखोपभोगांत सर्वोत्कृष्ट सुखोपभोग समजेल तोच पुरुष शहाणा होय. जो तुच्छ सुखोपभोगांस महत्व न देतां, विद्याजन्य सुखानंदास महत्व देतो, तोच विवेकी ह्यांत संशय नाहीं.

शाहणा कोणास ह्मणावें, व मूर्ख कोणास ह्मणावें, याविषयीं उल्लेख दासबोधादि अनेक ग्रंथांत केलेला सर्वांस ठाउकच आहे, येथें त्याची पुनरुक्ति नको. परंतु, ती प्रसंगोपात्त ह्मणून संक्षेपानें तरी येथें थोडी केली पाहिजे. जे प्रशंस्त[१] कर्मांचें आचरण करितात, व निंद्य-

---

१ निषेवते प्रशस्तानि निन्दितानि न सेवते। अनास्तिकः श्रद्दधान एतत्पण्डितलक्षणम् ॥२१॥ उद्योगपर्व, अ० ३३.

कर्मापासून अलिप्त राहतात, आणि आस्तिक्यबुद्धि व धर्मश्रद्धा मनांत बाळगितात, ते शाहणे समजावे. क्रोध[1], गर्व, उद्धटपणा, आणि अहंता हे दुर्गुण ज्यांचे ठायीं वास करीत नाहींत, जे स्वकार्याविषयीं नेहमीं दक्ष राहतात, आणि ज्यांच्या कार्यांस शीत, उष्ण, भय, आनंद, आणि बरावाईट काळ ह्यांच्या योगानें अडथळा होत नाहीं, ते शाहणे होत. जे स्वसामर्थ्याचा पूर्वीं पोक्त विचार करूनच कोणतेंही काम हातीं घेतात, हातीं घेतलेलें काम नेटानें पार पाडण्यास झटतात, आणि कर्तव्यापासून कधींही पराङ्मुख होत नाहींत, ते मोठे विचारी पुरुष ह्यांत संशय नाहीं. प्राणिमात्राचा स्वभाव जाणणारा, कोणत्याही कर्माचा परिणाम काय होईल हें बरोबर समजणारा, आणि मनुष्यें आपलींशीं करून घेणारा पुरुष पंडित होय.

---

१ क्रोधो हर्षश्च दर्पश्च ह्रीस्तम्भो मान्यमानिता। यमर्थान्नापकर्षन्ति स वै पण्डित उच्यते ।। २२ ।।

यस्य कृत्यं न विघ्नन्ति शीतमुष्णं भयं रतिः । समृद्धिरसमृद्धिर्वा स वै पण्डित उच्यते ।। २४।।

यथाशक्ति चिकीर्षन्ति यथाशक्ति च कुर्वते । न किंचिदवमन्यन्ते नराः पण्डित बुद्धयः ।। २६ ।।

तत्वज्ञः सर्वभूतानां योगज्ञः सर्व कर्मणाम् । उपायज्ञो मनुष्याणां नरः पण्डित उच्यते ।।३१।। उद्योमपर्व, अ० ३३

सांगितलेलें ग्रहण करणें, तें समजावें ह्मणून शांतचित्तानें ऐकून घेणें, व सूक्त गोष्ट आपल्या इच्छेविरुद्ध असली तरी तिचा आदरानें स्वीकार करणें, हें शाहण्या मनुष्याचें लक्षण होय. अस्खलित भाषण करणारा, नानाविध विषयांविषयीं अभिज्ञ, तार्किकपणानें सर्व गोष्टींचा ऊहापोह करणारा, आठवणीचा धड, ग्रंथांचें रहस्य समजणारा, बुद्धीला अनुरूप ज्याचें अध्ययन, अध्ययनाला अनुरूप ज्याचे विचार, व विचाराला अनुरूप ज्याची वागणूक, तोच ज्ञाता असें समजावें. जो दुसऱ्यास भारभूत व तापप्रद न होतां, आपल्या उद्योगबलानें श्रीमान् होतो, श्रीमंतीच्या बलानें विद्यावृद्धीस कारणीभूत होतो, विद्यावृद्धीस उत्तेजन दिल्यानें स्वदेशाचा किंबहुना मनुष्यमात्राचा हितकर्ता बनतो, लोकहित केल्यानें कीर्तीस पात्र होतो, व कीर्तीच्या योगानें जो या मृत्युलोकांतही देवासारखा अजरामर होऊन राहतो, तोच धन्य. त्यानें जन्मास आल्याचें साफल्य केलें. जे केवळ लबाडीनें, मुखस्तुतीनें, याचनेनें, व

---

१ क्षिप्रं विजानाति चिरं शृणोति विज्ञाय चार्थं भजते न कामान् । नासंपृष्टो व्युपयुङ्क्ते परार्थे तत्प्रज्ञानं प्रथमं पण्डितस्य ॥ २७ ॥

प्रवृत्तवाक्चित्रकथ ऊहवान्प्रतिभानवान् । आशु ग्रंथस्य वक्ता च यः स पण्डित उच्यते ॥ ३३ ॥

श्रुतं प्रज्ञानुगं यस्य प्रज्ञा चैव श्रुतानुगा । असंभिन्नार्थमर्यादः पण्डिताख्यां लभेत सः ॥३४॥ उद्योगपर्व, अ० ३३

लोकद्रोहानें राजकृपा संपादून द्रव्यवान् होतात, व त्या द्रव्याचा अप्पलपोटेपणानें उपभोग घेतात, ते खरे श्रीमान् नव्हेत. ते कंगाल भिकाऱ्यापेक्षांही भिकारी समजून त्यांच्या दाराशीं अत्यंत गरजू मनुष्यानेंही जाऊं नये.

मूर्खांचीं लक्षणें सांगत बसून लेखन विस्तार कोठवर करावा? याकरितां सर्व गोष्टींतलें सार एवढेंच सांगतों कीं, जो परहिताविषयीं उदासीन राहून अन्यायार्जन करणारा, तो सर्व मूर्खांतला मूर्खशिरोमणी होय, व त्याच्या अन्यायार्जित द्रव्याच्या स्वोपभोगाला धिःकार असो.

द्रव्याच्या व्ययाचा दुसरा प्रकार जो दान, त्याविषयीं विचार करूं. दान तीन प्रकारचें आहे, विपद्ग्रस्तास विपत्तींतून काढण्याकरितां निरपेक्षबुद्धीनें केलेलें दान पहिल्या प्रतीचें होय. गुणीजनांस संभावनेदाखल दिलेल्या द्रव्यासही दान ह्मणण्याची रूढी आहे, पण तें दुसऱ्या प्रतीचें दान होय. पहिल्या प्रकारच्या दानांत विपद्ग्रस्ताची विपत्ति हीच पात्रता समजावयाची, तेथें अन्य तऱ्हेनें पात्रत्व पहावयाचें नसतें. दुसऱ्या प्रतीचें दान ह्मणजे विद्या, कला, व सद्गुण ह्यांच्या प्रोत्साहनार्थ गुणीजनांस संभावनेखातर दिलेलें दान, हें देतांना पात्रापात्रत्व व गुणाचें मान पाहून दान देणें चांगलें. दानांत तिसराही एक प्रकार आहे, पण तो गौण व प्रासंगिक

आहे, त्यास लौकिकीदान ह्मटलें असतां शोभण्यासारखें आहे.

लग्न कार्यांत कोंडीमध्यें जी दक्षणा वांटतात, ती विपद्ग्रस्तांच्या उद्धारार्थही नसते, व गुणांस किंवा विद्वत्तेस अनुलक्षूनही नसते. ती केवळ दक्षणा वांटणाराच्या नांवलौकिकावर अवलंबून असते, यास्तव असल्या प्रकारचें जें दान तें केवळ लौकिकी ह्मटलें पाहिजे. गृहस्थास अशा तिन्हीं प्रकारचें दान करणें जरी आवश्यक आहे, तरी पहिल्या दोन प्रकारच्या दानांविषयीं विशेष आदर असावा. तिसऱ्या प्रकारचें लौकिकी दान बेताबातानें व जरा आखडत्या हातानेंच करावें. मिथ्या लौकिकाच्या भरीं भरून असल्या दानधर्माची चढाओढ करीत बसणें, हा द्रव्याचा अपव्यय आह्मीं समजतों. अन्नदान असो किंवा द्रव्यदान असो, तें पहिल्या प्रकारचें असेल तर निरक्षेप व सात्विक होय. वैदिक, शास्त्री, पुराणिक, व हरदास इत्यादिकांपासून आपणांस सदुपदेश होऊन आपलें मनोरंजनही होतें, यास्तव त्यांस दिलेल्या द्रव्याचा आपणांस मोबदला मिळतो, ह्मणून तें केवळ निरपेक्ष दान ह्मणतां येत नाहीं. तथापि असल्या दानांपासून विद्वान् व गुणी लोकांस उत्तेजन मिळून देशांत विद्वान् व गुणी लोकांची वृद्धि होते, या-

स्तव तेंही अत्यावश्यक समजून हौसेनें करावें. परंतु, अल्पगुणास मोठी संभावना असा तारतम्याभाव मात्र करूं नये. गुणानुरूप संभावना करावी. अशा प्रकारच्या गुणीजनांस जो देकार होत असतो, तो बहुधा कीर्त्यर्थ व मनोरंजनार्थच होत असतो. यास्तव तें दुसऱ्या प्रतीचें राजस दान समजावें. सात्विक दान जसें पारलौकिक सुखास कारणीभूत होतें, तसें राजस दानही ऐहिक सुखास कारणीभूत होतें, यास्तव हीं दोन्ही प्रकारचीं दानें सुखोत्पादक आहेत. पण, पात्रापात्र विवेकहीन व देशकालाविषयीं विचारणा ज्यांत नाहीं असें अवगणनापूर्वक व सत्कार रहित केलेलें दान, तें तामस होय. ह्या दानापासून कांहींएक लाभ न होतां उलटें तें अधोगतीस नेण्यास मात्र कारणीभूत होतें, व त्यापासून निरर्थक द्रव्याचा अपव्यय होतो.

आमचे लोक अन्नसंतर्पणांत तारतम्यविचार बिलकुल करीत नाहींत, असें आह्मांस वाटतें. क्षुधार्त किंवा अन्नार्थी ह्यांस अन्नदान केलें तर तें वाजवी आहे, पण हा विचार सहस्रभोजनें व संतर्पणें यांत केलेला कोठेंही आढळून येत नाहीं. ज्यांस तादृश अपेक्षा नाहीं अशा संपन्न लोकांस त्यांच्या गळ्यांतील जानवें बघूनच संख्यापूर्ती करितां भोजनास गोळा करण्याची जी चाल सर्वत्र

प्रचारांत आहे, तद्विरुद्ध चर्चा करणें, हें धाडसाचें व अरण्यरोदनवत् आहे खरें, तरी तिचा येथें निर्देश करून तिच्या बरेवाइटाविषयीं सूज्ञांस पृच्छा करणें गैर नाहीं. ल्हान तोंडीं मोठा घास घेऊन जनमान्य व प्ररूढ झालेल्या चालीचा अधिक्षेप आह्मीं करूं इच्छित नाहीं, पण तत्संबंधानें आमचे विचार निर्भीडपणें येथें नमूद करण्यास काय हरकत आहे?

फार प्राचीनकाळीं सर्व ब्राह्मणजाति, विद्याव्यासंग व परमार्थसाधन यांत अखंड मग्न राहून दैवानें जें प्राप्त होईल त्यांत संतुष्ट असे, व उदरपोषणाविषयीं अकृतयत्न राही. अशा कालीं ब्राह्मणांस विशेष आदरानें अन्नदान करण्यास सबळ कारण होतें. परंतु सांप्रत तें कारण नष्ट असतांही पूर्वीं इतका आदर ज्यांस करणें इष्ट असेल, त्यांनीं खरे गरीब अन्नार्थी ब्राह्मण असतील त्यांस यथेष्ट जेऊं घालावें. त्याबद्दल कोणाचीही ना नाहीं. पण शेतीवाडी व सावसावकारी करणाऱ्या धनाढ्य व अविद्वान् लोकांस सहस्रभोजनादि संतर्पणांत आग्रह करकरून आकंठमर्याद जेऊं घालण्यांत काय पुण्यप्राप्ति असेल ती असो. माझ्या मतें अशा संतर्पणास संभोजनी[1]

---

१ संभोजनी साभिहिता पैशाची दक्षिणा द्विजैः ।
इहैवास्ते तु सा लोके गौ रन्धवैकवेश्मनि ॥१४१॥ } मनु. अ. ३.
यथेरिणे बीजमुप्त्वा न वप्ता लभते फलम् । तथाऽ
नृचे हविर्दत्त्वा न दाता लभते फलम् ॥ १४२ ॥

अथवा मेजवानी ह्मणावें हें बरें दिसतें, व ती मैत्री व कीर्ति इत्यादि ऐहिक फल देण्यास योग्य होईल. पण तीपासून पुण्यफल मिळेल किंवा नाहीं याबद्दल मजला संशयच वाटतो.

लग्नकार्यादि मंगलकृत्यांत धर्मार्थ व कीर्त्यर्थ अशा दोन्ही प्रकारच्या अन्नसंतर्पणाचें संमेलन असतें. यास्तव तशा प्रसंगीं वर सांगितलेल्या धनाढ्य लोकांस सत्कारपूर्वक भोजन दिलेंच पाहिजे, त्याबद्दल आमचें कांहीं ह्मणणें नाहीं. फक्त पारमार्थिक उद्देशानें केलेल्या अन्नदानांत अशा प्रकारचे लोक केवळ संख्यापूर्तीस्तव गोळा करणें सयुक्तिक दिसत नाहीं, असें आमचें ह्मणणें आहे. ज्यांस जरूर नाहीं, अशा खात्यापित्यांस धर्म किंवा दान समजून पोट फुटे तों मिष्टान्न चारणें, व इतर जातीच्या गरीबदुबळ्या अन्नार्थ्यांच्या पदरीं या बैडालवृत्तीनें व बकवृत्तीनें वागणाऱ्या मुनिजनांच्या उष्ट्या पत्रावळीही पडूं न देणें, हें कोणच्या प्रकारचें अन्नदान तें आह्मांस नकळे! अन्नार्थ्यांची क्षुधार्तता व अन्नेच्छा हेंच अन्नदानाविषयीं पात्रत्व. त्यास वय, लिंग, जाति, व विद्या यांची अपेक्षा नसावी असें आह्मांस वाटतें. असें असतांही खऱ्या अन्नार्थ्यांच्या किंकाळ्यांकडे लक्ष न देतां, उलटें त्यांस हिडिसफिडिस करावें, आणि ज्या

बैडाल[1] व्रतिकांस व बक[2]व्रतिकांस सर्व प्रकारच्या दानाचा धर्मशास्त्रानें निषेध[3] सांगितला आहे, आणि ज्यांचा शब्दांनेंही[4] आदर करूं नये, ह्मणून सांगितलें आहे, त्यांस आग्रहपूर्वक अन्नसंतर्पण करावें हें नीट नाहीं. अशा अन्नदानापेक्षां वापीकूपतटाकादि शाश्वत व लोकोपयोगी धर्मकृत्य करणें, किंवा स्वदेशास ऊर्जितदशा यावी ह्मणून प्रस्तुतकालीं अत्युपयुक्त असणाऱ्या ज्या राष्ट्रीय-शिक्षणादि संस्था त्यांस द्रव्यसाहाय्य करणें फार बरें.

---

१ बैडालव्रतिकलक्षण.

यस्य धर्मध्वजो नित्यं स्वराड्ध्वज इवोच्छ्रितः । चरितानि च पापानि बैडालं नाम तं विदुः ॥ स्मृतिरत्नाकर.

धर्मध्वजी सदा लुब्धश्छाद्मिको लोकदंभकः । बैडालव्रतिको ज्ञेयो हिंस्रः सर्वाभिसारकः ॥ १९५ ॥ मनु. अ. ४

२ बकव्रतिकलक्षण.

अधोदृष्टिर्नैष्कृतिकः स्वार्थसाधनतत्परः । शठो मिथ्या विनीतश्च बकव्रतचरो द्विजः ॥ १९६ ॥ मनु. अ. ४.

३ नवार्यपि प्रयच्छेत्तु बैडालव्रतिके द्विजे । न बकव्रतिके विप्रे नावेदविदि धर्मवित् ॥ १९२ ॥ मनु, अ० ४

त्रिष्वप्येतेषु दत्तं हि विधिनाप्यर्जितं धनम् । दातुर्भवत्यनर्थाय परत्रादातुरेव च ॥ १९३ ॥ मनु. अ. ४

ये बकव्रतिनो विप्रा ये च मार्जारलिंगिनः । ते पतंत्यंधतामिस्रे तेन पापेन कर्मणा ॥ १९७ ॥ मनु. अ० ४

४ ऐहिकान्बकवृत्तींश्च वाङ्मात्रेणापि नार्चयेत् ॥

(असेंही एक वचन आहे.)

सांप्रत स्त्रीजातींत इतकी धर्मबुद्धि वाढली आहे कीं, तेणेंकरून स्वर्गलोकीं पाऊल ठेवण्यास रिकामी जागा सांपडेल किंवा नाहीं, याबद्दल संशय उत्पन्न होऊं लागला आहे. अति साधुवृत्ति, अतिदान, व अतिव्रताचरण या गोष्टी गृहस्थास अश्रीक असल्यामुळें, जणुं परमेश्वरास कींव येऊन त्यानें स्त्रियांच्या सद्यःकालीन अतिदानशीलतेस व अतिव्रताचरणास मर्यादेंत राखावें ह्मणून दंभाजीरावांची त्या कामावर बुद्धिपुरस्सर नेमणूक केली असावी असें वाटतें. दांभिक व्रताचरणानें व कुपात्रीं दान करण्यानें, ह्या स्त्रियांच्या अमर्याद वाढलेल्या दानधर्मास आळा पडतो आहे ह्मणून बरें आहे. तसें नसतें तर स्वर्गांत या पूर्वीं कधींच स्त्रीराज्य होऊन गेलें असतें. स्त्रिया एकमेकींच्या चढाओढीनें दांभिकपणाखातर लुडबुडे ब्राह्मणांस व्रतवैकल्याच्या मिषानें दानधर्म करून द्रव्याचा अपव्यय करितात, तो कुटुंबनायकानें सदुपदेश करून व प्रसंग पडला असतां आपला अधिकार चालवूनही बंद केला पाहिजे. अशा अविचारानें केवळ द्रव्यनाशच होऊन रहाता तर पुरवलें असतें, पण त्याच्या योगानें दात्याच्या व प्रतिग्रहीत्याच्या अनेक

---

१ अत्यार्यमतिदातारमतिशूरमतिव्रतम् । प्रज्ञाभिमानिनं चैव श्रीर्भयान्नोपसर्पति ॥ ६४ ॥ उद्योगपर्व, अ. ३९

दुर्गुणास उत्तेजन मिळतें. सांप्रत वेदपाठापेक्षां नुसत्या स्तुतिपाठानें जर उत्तम वैदिक बनतां येतें, व भिक्षुकीचा धंदा चांगला चालतो, तर दशग्रंथी होण्याकरितां उरस्फोड करतो कोण? 'रामो हरिः ' देखील न शिकतां ज्यांस व्रतवैकल्याच्या कथा सांगून छानीनें निर्वाह करितां येतो, व शास्त्रिबोवा हें उपपद सहज पटकावितां येतें, त्यांनीं पंचमहाकाव्यें व कौमुदी घोकीत बसण्याचे श्रमसायास काय ह्मणून करावे! अशाप्रकारें खऱ्या विद्येची अनावड व ठकविद्येची आवड सर्वत्र उत्पन्न होण्याचें कारण लोकांचें व स्त्रियांचें अपात्रीं दान हें आहे, यांत शंका नाहीं. पुरुषांनीं अनीतीनें द्रव्यार्जन करावें, व घरांतबायकांनीं अपात्रीं दान करावें, आणि उभयतां स्त्रीपुरुषांनीं निर्विघ्न तोंडपुजे ब्राह्मणांकडून आपला स्तुतिपाठ करून घ्यावा, यांत पुण्यप्राप्ति काय होणार! योग्यकालीं शुद्ध मनानें न्यायार्जित[1] द्रव्याचें सत्पात्रीं अल्प जरी दान केलें, तरी तें अक्षय्य फलदायक होतें. गृह-

---

१ विशेषस्त्वत्र विज्ञेयो न्यायेनोपार्जितं धनम् ।
पात्रे काले च देशे च साधुभ्यः प्रतिपादयेत् ॥३१॥
अन्यायात्समुपात्तेन दानधर्मो धनेन यः । क्रियते
न स कर्तारं त्रायते महतो भयात् ॥ ३२ ॥
पात्रे दानं स्वल्पमपि काले दत्तं युधिष्ठिर । मनसा हि
विशुद्धेन प्रेत्यानन्तफलं स्मृतम् ॥ ३४ ॥
(वनपर्व, अ० २५९.)

स्थानें हव्यकव्य संबंधी दानधर्म विद्वान् व ज्ञानी अशा भटभिक्षुकांस करावा. चुकतमाकत श्राद्धसंकल्प व रडतखडत चातुर्मास्यसंबंधी पूजा सांगण्यापुरतीच ज्यांची विद्वत्ता, यजमानीण बाईच्या पाकनिष्पत्तीची तारीफ करण्यांतच ज्यांचें प्राविण्य, व सोंवळ्याओंवळ्याची लटकी घासघीस घालण्यांत तत्परता, अशा अर्धबोबड्या दांभिक भिक्षुकांस कधींही दानधर्म करूं नये. भस्मोद्धूलितविग्रह व आकर्णमर्याद गंधलेपन, हें कांहीं विद्वत्तेचें प्रमाण नव्हे. ज्ञान व आचरण हेंच विद्वत्तेचें प्रमाण शिष्टसम्मत आहे.

सर्व व्रतांपेक्षां स्त्रियांस पतिव्रत फार श्रेयस्कर मानलेलें आहे. पतीच्या छंदानें वागणें, व पतीची शुश्रूषा करणें, हेंच त्यांचें मुख्य व्रत असतां, तिकडे लक्ष न देऊन बायका दांभिकपणानें व छांदिष्टपणानें हसें होण्यासारखीं वेडगळपणाचीं व्रतवैकल्यें व नेमधर्म करितात, यास काय ह्मणावें! अलीकडे चतुर्मासांत ब्राह्मणास रोज चाहा पाजून चातुर्मास्यसमाप्तीच्यावेळीं पितळेची कोपबशी दान के-

---

१ ज्ञानोत्कृष्टाय देयानि कव्यानि च हवींषि च । न हि हस्तावसृग्दिग्धौ रुधिरेणैव शुद्ध्यतः ॥ १३२ ॥ मनु. अ० ३

१ भर्ता देवो गुरुर्भर्ता धर्मतीर्थव्रतानि च । तस्मात्सर्वं परित्यज्य पतिमेकं समाचरेत् ॥ **स्मृतिरत्नाकर.**

ल्याचीं उदाहरणें कितिएकांच्या नजरेस आलीं आहेत. हा नूतन प्रकार अद्याप चांगला बळावला नाहीं, ह्मणून हें लिहिणें कोणास मिथ्या वाटेल, परंतु ह्यांत अतिशयोक्तीचा एकशब्द देखील नाहीं. अशा छांदिष्टपणाच्यागोष्टी स्त्रियांनें वर्ज केल्या, पतीची सेवा[1] करून त्याचा मान राखिला, अपात्रीं दान करून द्रव्याचा अपव्यय न केला, व निरक्षरपणास उत्तेजन न दिलें, तर त्यांचीं सर्व व्रतें यथासांग उजवलीं असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं; त्यांतूनही एखाद्या माउलीस दानधर्माची विशेष आवड व अनुकूलता असेलच तर तिनें उदारपणानें लागेल तेवढा दानधर्म करावा, त्या बद्दल आमचें कांहीं ह्मणणें नाहीं. आमचा कटाक्ष दानधर्मावर किंवा ब्राह्मणांस न देण्यावर मुळींच नाहीं, तो कायतो दानधर्माच्या गलिच्छ प्रकारांवर

---

१ भर्ता तु खलु नारीणां गुणवान्निर्गुणोपि वा । धर्मं विमृशमानानां
प्रत्यक्षं देवि दैवतम् ॥ ८ ॥ रामायण अयोध्याकाण्ड सर्ग ६२
व्रतोपवासनिरता या नारी परमोत्तमा । भर्तारं नानुवर्तेत सा च
पापगतिर्भवेत् ॥ २६ ॥
भर्तुः शुश्रूषया नारी लभते स्वर्गमुत्तमम् । अपि या निर्नमस्कारा
निवृत्ता देवपूजनात् ॥ २७ ॥
शुश्रूषामेव कुर्वीत भर्तुः प्रियहिते रता । एष धर्मः स्त्रिया नित्यो वेदे
लोके श्रुतः स्मृतः ॥ २८ ॥ अयो० सर्ग २४
नैषा हि सा स्त्री भवति श्लाघनीयेन धीमता । उभयोर्लोकयोर्लोके
पत्या या संप्रसाद्यते ॥ १३ ॥ रामा. अयो. सर्ग. ६१

व निर्विद्य तोंडपुजे भिक्षुकांस दान करण्यावर आहे. शिथिलवर्तनी, व निर्विद्य असून प्रतिग्रहाची आवड धरणारे आशाळभूत[1] ब्राह्मण, आपल्या बरोबर दात्यास घेऊन अधोगतीस जातात. निर्धनें[2], विद्वान्, सदाचरणी, कुटुंबवत्सल, व संतोषी अशा भूदेवांहून दान करण्यास दुसरें श्रेष्ठतम सत्पात्र कोणचें असणार ! अशा सत्पात्रांस थोडें स्वसामर्थ्याबाहेरही देण्याचा प्रसंग आला, तरी प्रहृष्टमनानें, परम आदरानें, व सत्कारपूर्वक द्यावें. समृद्ध असून लोभी, व निरक्षर अशा शंखंभटांची मात्र त्यांच्या ब्राह्मण्याकडे लक्ष देऊन नुसत्या नमस्कारावर बोळवण करावी.

आमचे लोक भिक्षेकऱ्यांस कोरडी भिक्षा घालण्यांतही तारतम्यविचार राखीत नाहींत. सांप्रत सर्व जा-

---

१ अतपास्त्वनधीयानः प्रतिग्रहरुचिर्द्विजः । अंभस्यश्मप्लवेनेव सहतेनैव मज्जति ॥ १९० ॥

तस्मादविद्वान् बिभियाद्यस्मात्तस्मात्प्रतिग्रहात् । स्वल्पकेनाप्यविद्वान् हि पंके गौरिव सीदति ॥ १९१ ॥

यथोडुपेनोपलेन निमज्जत्युदके तरन् । तथा निमज्जतोऽधस्तादज्ञौ दातृप्रतीच्छकौ ॥ १९४ ॥ मनु अ० ४

२ श्रोत्रियाय दरिद्राय गृहस्थायाग्निहोत्रिणे । पुत्रदाराभिभूताय तथा ह्यनुपकारिणे ॥ २७ ॥

एवं विधेषु दातव्या न समृद्धेषु भारत । को गुणो भरतश्रेष्ठ समृद्धेऽत्रभिवर्जितम् ॥ २८ ॥ वनपर्व अ० २००

तीचे लोक चांगले धट्टेकट्टे असूनही भिक्षेचा सोपा धंदा उचलून निर्वाह करूं लागले आहेत, अशा लोकांस भिक्षा घालून देशांत आळसाची वृद्धि करणें, नीट नाहीं. आंधळा, पांगळा, व ह्मातारा ज्यास कोणी पोशिंदा नाहीं, अशास मात्र भिक्षा घालावी. उद्योगधंदा करण्यास लायक अशा मनुष्यास, मग तो कोणच्याही जातीचा असो, त्यास भिक्षा घालूं नये.

गोंधळी, जोशी, कोल्हाटी, चित्रकथी, व भाट इत्यादि लोक आपणास भिक्षेकरी वाटतात, व त्यांसही आपण भिक्षेकरीच आहों असें सांप्रत वाटूं लागलें आहे, परंतु विचार करून पाहतां, ते गुणी लोक असून आपला गुण लोकांस दाखवून पोट भरणारे आहेत, व ह्या लोकांस पैसा, धान्य, व उतारवस्त्र ह्या रूपानें बिदागी देण्याची पुरातन वहिवाट आहे, व त्या वहिवाटीस अनुसरून हे लोक दाराशीं येतात. आपल्या देशांत न्हावी, सुतार, व लोहार इत्यादि कारागीर लोकांसही धान्याचें बलुतें देण्याची वहिवाट असे. ही वहिवाट जरी सांप्रत मोडत चालली आहे,तरी देखील ती अद्याप कोठें कोठें आढळते. हल्लीं मागें सांगितलेले लोक अंगीं गुण न बाळगितां व लोकरंजन न करितां,भिकाऱ्याप्रमाणें भीक मागतात, यास्तव त्यांस अंगीं गुण नसेल तर कांहींएक देऊं नये.

द्रव्यव्ययाचा तिसरा प्रकार,लग्नमुंजी इत्यादि मंगलकार्यांत होणारा खर्च, हा होय. ह्या मंगलकार्यांतही अत्याचार व अपव्यय फार होत असतो. लग्नकार्यांत होणारी उधळपट्टी, तंटेबखेडे, व अमंगलपणा ह्या गोष्टी जितक्या मोडवतील तितक्या मोडून टाकण्याविषयीं प्रत्येकानें मनापासून झटलें पाहिजे."काय करावें, बायकांपुढें इलाज नाहीं" इत्यादि प्रकारच्या खोटसाळ व पोकळ बाहण्यांनीं अशा गोष्टीविषयीं आपली खोटी प्रतिकूलता दाखवून दोषमुक्त झाल्यानें हा घाणेरडा प्रकार मोडतो असें नाहीं. तो मोडण्यास त्या बद्दल अंतर्यामापासून तिरस्कारच वाटला पाहिजे. लग्नांत बेसुमार हुंडा मागण्याची वाईट चाल सांप्रत बळावत चालली आहे, ती हुंडा देतांना श्रीमंतापासून गरिबापर्यंत सर्वांस दुःसह वाटते; पण हुंडा घेतांना कोणीही तिचा तिरस्कार करीत नाहीं, ह्यास काय ह्मणावें! अशानें ही चाल मोडावी कशी! खरें ह्मटलें तर ही गैर चाल मोडण्यास प्रथमतः श्रीमंतांनींच कंबर बांधली पाहिजे. पण हुंडा कमी घेणें, हें आपल्या गांवालौकिकास कमीपणा आणणारें आहे, असें वेड त्यांच्या डोक्यांत शिरलें आहे, तें निघावें कसें! हें जर खऱ्या गैरसमजाचें वेड असतें, तर तें समजूत घालून काढून टाकितां आलें असतें. पण, हें पडलें मतलबी

वेड, तें कसें काढितां येणार! तूर्त फायदा होत आहे तो साधावा, पुढचें कोणीं पाहिलें आहे. हुंडा द्यावयाची वेळ येईल तेव्हां गयांवयां करून गरिबी दाखवितां येईल, व कसें तरी कार्य पार पडेल, अशा अदूरदृष्टीनें मतलब साधणें हीच कायती व्यवहारकुशलता, असा श्रीमान्लो-कांचा कोता समज झालेला आहे, तो त्यांनीं सोडला तरच ही वाईट चाल मोडण्याचा संभव आहे.

मंगलकार्यांत नृत्य, गायन, व वाद्यें आणि मिष्टान्नें, ह्यांप्रीत्यर्थ केलेला खर्च हा अपव्यय ह्मणतां येत नाहीं. या गोष्टी मंगलकार्यांत करूं नये, तर केव्हां कराव्या? त्या मंगलकार्यांत उक्तच आहेत, पण त्या स्वसामर्थ्या-बाहेर, व लग्नसमारंभांत सोयऱ्यांच्याही सामर्थ्याबाहेर करूं नयेत. सामर्थ्याबाहेर केल्या तर मात्र, तो अपव्यय समजावा. चार दिवसांच्या सोहळ्यांत फाजील धौतालपणा करून पुढें जन्मभर किंवा निदान पांचसात वर्षें तरी ओढगस्तींत रहावयाचें, ह्यास अपव्यय कां न ह्मणावें? आपणास सामर्थ्य असलें तरी सोयऱ्यांचा फारच कमी-पणा दिसेल, अशा रीतीनें खर्च करून सोयऱ्यांवर ताण करण्याच्या छंदीं पडूं नये. व मानपान देण्याघेण्यांतही त्यांस कमीपणा देऊं नये. शरीरसंबंध हा बरोबरीचा संबंध आहे, त्यांत एकाच्या कमीपणानें दुसऱ्यासही कमी-

पणा येतो, हें मनांत वागविलें पाहिजे. 'सोय जाणेल तो सोयरा' अशी ह्मण आपणांत आहे, ती यथार्थ आहे. तसेंच आंबवणावर वांग्यांचीं डेंखणें आणिलीं नाहींत, विहिणीस दांत कोरण्यास लवंग दिली नाहीं, इत्यादि प्रकारचीं हास्यास्पद व क्षुल्लक निमित्तें शोधून रुसणें, व कडोविकडीनें भांडणें, यांत अप्रतिष्ठितपणा आहे असें बायकांस वाटतच नाहीं, हें केवढें आश्चर्य ! तसेंच नवरा-नवरीचें न्हाणें होत असतां, एकमेकांच्या अंगावर चूळ टाकणें, भांडीं चोरणें, व उभयपक्षाकडील वऱ्हाडणींनीं परस्पर उखाणे घालून अमंगल व बीभत्स प्रलाप करणें, इत्यादि अनेक अविचाराच्या गोष्टी दिवसानुदिवस वाढत्या प्रमाणावर होत आहेत, त्यांचा प्रतिबंध करणें फारच आवश्यक आहे, असें आमच्या लोकसमाजास वाटेल तरच या गोष्टींचा बंदोबस्त होणार आहे. एरव्हीं व्हावयाचा नाहीं, हें उघड आहे. उपलक्षणार्थ मागें कांहीं गोष्टी सांगितल्या, तथापि तशा प्रकारचे अत्याचार लग्नकार्यांत अनेक होत असतात, ते कोठवर सांगावे, व त्या संबंधें विधिनिषेध तरी काय सांगावा ! प्रत्येक समंजस मनुष्यानें गतानुगतिकत्व सोडून देऊन हरप्रयत्नानें ह्या घाणेरड्या चाली मोडण्यास मनापासून झटलें पाहिजे. असो, येथ-वर गृहस्थाच्या व्यवहाराचीं मुख्य मुख्य अंगें संक्षेपानें

सांगितलीं. व्यवहार हा समुद्रासारखा विस्तीर्ण आहे. त्याचीं यच्चयावत् सर्व अंगें अगदीं निर्विवादपणें सांगणें अशक्य आहे. यास्तव सांगितलेल्या गोष्टींच्या धोरणानें उर्वरित गोष्टींचा निर्णय ज्याचा त्यानें करावा. गुरु फक्त मार्गदर्शकच होतो, तो विद्यार्थ्यांस खांद्यावर बसवून विद्यारण्यांतून घेऊन जात नाहीं. यास्तव सांगितलेल्या खुणांवरून ज्याचा त्यानें आपापला मार्ग शोधून काढिला पाहिजे. सांगितली विद्या आणि बांधली शिधोरी किती दिवस पुरणार.

आतां प्रस्तुत लेखाची परिसमाप्ति करितांना उपसंहाररूपानें इतकेंच सांगतों कीं, प्रापंचिक व्यवहार नीटनेटका व दक्षतेनें करण्याचा उद्देश जरी सुखप्राप्ति, संपत्ति, व कीर्ति मिळविण्याचा असतो, तरी तो गौण समजावा. विचारदृष्टीनें पाहिलें असतां तो कांहीं मुख्य अथवा अंतिम उद्देश नव्हे, असें स्पष्ट कळून येतें. प्रवृत्तिमार्गही पारलौकिक सुखाच्या जोडीकरितांच सांगितलेला आहे. त्याही मार्गाचें ज्ञात्यांनीं सांगितलेल्या खुणाखुणांनीं आक्रमण केलें असतां, पारलौकिक सुख निश्चयानें प्राप्त होतें. परंतु कोठेंही न चुकतां संसारपथ आक्रमण करीत राहिलें, तरी ऐहिक सुख निश्चयानें प्राप्त होईलच असा भरंवसा नाहीं. न्यायानें द्रव्य मिळवूं गेलें तर भगीरथ-

प्रयत्न करावे, तेव्हां कोठें थोडेंसें मिळालें तर मिळतें. मिळाल्यावर त्याचें रक्षण करण्यासही आयास करावे लागतात. व त्यास वांटेकरीही फार जमा होतात. तसेंच सुखही, आप्तांचा मृत्यु, रोग, अग्निप्रलय, व जलप्रलय इत्यादि आधिदैविक व आधिभौतिक उपाधींनीं विकृत होणारेंच आहे. कीर्तीविषयींही पाहूं गेलें तरी, तीही अनिश्चित व अशाश्वतच दिसते. कीर्तीनें[1] स्वर्गप्राप्ति होते, कीर्ती मृतासही अमर करून त्याचें नांव रक्षण करिते, कीर्तीवाचून जगणें आणि मरणें सारखेंच गणलें जातें इत्यादि प्रकारचा अर्थवाद व गौरव ग्रंथांतरीं आढळतो खरा, परंतु बहुत काळपर्यंत टिकून राहणारी कीर्ति लोकोत्तर कर्मे करणारासच लाभली तर लाभते. सामान्यजनांस ती प्राप्त होत नाहीं. यथान्याय द्रव्यार्जन करून सरळपणानें व सत्वस्थपणानें वागणारास दैवानें यदाकदाचित् नांवलौकिक प्राप्त झाला, तरी तो एकदोन पिढ्यांतच लोकांच्या विस्मृतींत गडप होऊन जातो, व तो त्यांस त्यांच्या मरणानंतरच

---

१. कीर्तिमानश्नुते स्वर्गं हीनकीर्तिस्तु नश्यति । कीर्तिर्हि पुरुषं लोके संजीवयति मातृवत् ॥

अकीर्तिर्जीवितं हन्ति जीवितोपि शरीरिणः। इहलोके विशुद्धा च कीर्तिरायुर्विवर्धनी ॥ ३० ते ३४ ॥ वनपर्व अ० ३००

बहुधा प्राप्त होतो. परंतु, मरून तीन चिमट्या राख[1] झाल्यावर पुरुषास कीर्तीचा काय उपयोग? मृत मनुष्य आपली कीर्ति ऐकून आनंद पावत नाहीं. मढ्याला शृंगार जितका सुखदायक होतो, तितकाच मेल्या माणसास त्याचा नांवलौकिक सुखदायक होतो. जिवंत असतां लोकांनीं केलेला धन्यवाद कानीं आला तर फायदा, पण तसा योग बहुधा येतच नाहीं. या शिवाय सद्वर्तनानें वागलें ह्मणजे कीर्ति होतेच असा नेम कोठें आहे? कारण, ती होण्यास गुणग्राहक व निर्मत्सर लोकांची अपेक्षा असते. पण सर्वच सद्वर्तनी पुरुषांस निर्मत्सरी गुणग्राहकांच्या भेटीचा अगर संगतीचा योग कोठें लाभतो? व तो लाभला नाहीं तर त्यांची वाहवा व्हावी कशी, व चोहोंकडे कीर्ति पसरावी कशी? बरें यदाकदाचित कांहीं थोडे गुणग्राहक मिळून कीर्ति झालीच, तर ती दुसऱ्या अनेक मत्सरी व अनभिज्ञ लोकांच्या दूषणांनीं मलीन व संदिग्ध होते. नुकतेंच शेंसवाशें वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या राजकीय पुरुषांच्या कीर्तीस देखील मत्सरी व

---

१ मृतस्य कीर्त्या किं कार्यं भस्मीभूतस्य देहिनः । मृतः कीर्तिं न जानीते जीवन्कीर्तिं समश्नुते ॥ ६ ॥

मृतस्य कीर्तिर्मर्त्यस्य यथा माला गतायुषः । अहं तु त्वां ब्रवीम्येतद्भक्तासीतिहितेप्सया ॥ ७ ॥ वनपर्व अ० ३०१

अनभिज्ञ लोकांच्या दूषणांनीं संदिग्धता येऊन ती मलिन झालेली आहे.

कोणी शिवाजीमहाराजांस धर्मसंरक्षक व प्रजापालक ह्मणतात, व कोणी त्यांस दगलबाज व लुटारू समजतात. नाना फडणिसांस कोणी साडेतीन शहाण्यांतले शहाणे ह्मणून स्वामीनिष्ठ व राजकार्यधुरंधर मानतात, व कोणी त्यांची स्वामिद्रोही, विषयलंपट, व निमकहराम अशी निंदा करितात. सांप्रत तर गुणग्राहकतेचा देशांत दुष्काळ पडल्यामुळें, व बहुजनसमुदायाचा दुर्गुणाकडे ओढा असल्यामुळें, नीतिमान् लोकांचें बदनाम व ठेवी गिळंकृत करून ढेंकर देणाऱ्या व खोटा व्यवहार करून श्रीमान् झालेल्या लोकांची प्रतिष्ठा व लौकिक होत असतो, हा उलट प्रकार डोळे उघडून पहाणारांस दिसतच आहे.

सारांश, द्रव्य, सुख, व कीर्ति या गुळखोबऱ्याची आशा धरून जे सद्वर्तनास प्रवृत्त होतात, त्यांची ह्या गोष्टी प्राप्त न झाल्या तर निराशा होऊन ते सद्वर्तनापासून परावृत्त होतात. यास्तव द्रव्य मिळो वा न मिळो, सुख होवो किंवा कष्ट पडोत, आणि कीर्ति होवो किंवा न होवो, त्याची पर्वा न करितां, पारमार्थिक लाभाकरितांच सद्वर्तन करीत असावें. संसार

करून त्यांत संदिग्ध, अनिश्चित, व अशाश्वत लाभाविषयीं आसक्त न होतां परमार्थ जोडावा, हेंच विचारशील मनुष्यास योग्य होय.

असो, परमार्था विषयीं गाफल न राहतां छानीनें संसार करून मुलेंबाळें कर्तीं झालीं, व आपलें उतारवय झालें, ह्मणजे संसाराचा सर्व भार पुत्रावर सोंपवून आपण फक्त मंत्र्याचें काम करावें. पण, तेंही आसक्ति ठेवून आग्रहानें करूं नये. अनासक्तपणानें व परोपकार बुद्धीनें मंत्र्याचें काम केलें ह्मणून परमार्थ संपादनास कांहीं व्यत्यय येतो, असा अर्थ नाहीं. श्रीरामदासस्वामींनींही आसक्ति न ठेवितां परोपकार बुद्धीनें राजकारणांत मन घातलें होतें, परंतु तेणेंकरून त्यांच्या परमार्थास तिळभर सुद्धां व्यत्यय आला नाहीं. संसाराचा सर्व कारभार पुत्राच्या स्वाधीन करतांना अत्यल्प द्रव्य आपलें खासगी ह्मणून आपल्या ताब्यांत असूं द्यावें, व त्याचा व्यय दानधर्म, आणि आपल्या पश्चात् कन्या, दौहित्र, मित्र व सेवक यांस आपली आठवण ह्मणून देणगी देण्यांत करावा. संसार वल्हावितांना पुत्राकडून कांहीं गैर होत असल्यास त्यास आपला अनुभव सांगून हितोपदेश करावा. ऐकिल्यास बरेंच आहे, न ऐकिल्यास भवितव्या प्रमाणें जें व्हावयाचें तें होईल, असा विचार करून नि-

राकुळ रहावें, आग्रह बिलकुल धरूं नये. सर्प जसा अंगावरची कांत एकदां टाकिली म्हणजे तिच्याविषयीं आस्था धरीत नाहीं, तद्वत् एकदां संसाराचा त्याग केल्यावर त्यांत पुनश्च लिपटूं नये. उदासीन राहून परमशाश्वत जो परमार्थ, त्याची जोड करण्यांत उर्वरित आयुष्य खर्च करावें. परमार्थ साधण्यास वनांतच गेलें पाहिजे असें नाहीं. संसाराकडे ओढ ठेवून तपोवनास गेलें तर, पुण्यांतील तुळशीबागेंतल्या देवदर्शनाची नक्कल उडावयाची, तुळशीबागेंत देवदर्शनास जाणारे लोक पायरीशीं जोडा ठेवून गाभाऱ्याच्या दरवाजापाशीं रामाकडे पाहून ॥ " अन्यथा शरणं नास्ति " ॥ इतकें ह्मणत आहेत तोंच त्यांच्या मनांत भामट्या जोडा उपटील, हें येऊन मागें वळून जोड्यास ॥ " त्वमेव शरणं मम "॥ असें म्हणतांना पुष्कळांनीं पाहिलें असेलच, तसेंच पुनरपि देवाकडे बघून " ॥ तस्मात् कारुण्यभावेन ॥ " हा चरण ते संपवितात, तोंच जोड्याकडे पाहून "॥रक्ष रक्ष परमेश्वर॥" अशी हात जोडून त्यांस जोड्याची प्रार्थना करण्याची पाळी येते. अशा रीतीनें आसक्ति ठेवून तपोवनांत जाण्यापेक्षां घरीं राहून विरक्तपणानें ईश्वरभजनांत काळ घालविल्यास घरच तपोवन बनतें. ह्मणूनच ज्ञात्यांनीं ह्मटलें आहे.

॥ वनेपि दोषाः प्रभवन्ति रागिणाम् ॥
॥ गृहेपि पंचेंद्रियनिग्रहस्तपः ॥
॥ अकुत्सिते कर्मणि यःप्रवर्तते ॥
॥ निवृत्तरागस्य गृहं तपोवनम् ॥

अस्तु, अशा रीतीनें सदाचरणानें वागून जे महात्मे चारी आश्रमधर्म, व चारी पुरुषार्थ संपादन करून पंचभूतांपासून उसना घेतलेला देह, पुन्हां पंचभूतांस अर्पण करितात, तेच धन्य होत. ॐ तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु.

शुभं भवतु.

॥ दृष्टिव्याकुल शक्तिहीन असतां वृद्धापकाळीं मुला ॥
॥ कष्टें म्यां रचुनी निबंध लघु हा प्रेमें तुला अर्पिला ॥
॥ यातें वाचुनि वागशील जरि तूं या अन्वयें सर्वदा ॥
॥ होवोनी बुधमान्य रे तव गृहीं नांदेल बा संपदा ॥

मनःप्रार्थना.

॥ मद्वाणि ! मा कुरु विषादमनादरेण ॥
॥ मात्सर्यमग्नमनसां सहसा खलानाम् ॥

समाप्त.

कठिणशब्दांचा कोश.

अ, आ.

आकिंचन–वि. ज्यापाशीं द्रव्यादिक कांहींच नाहीं असा, दरिद्री.

अग्रेसरत्व–ना. अग्रभागीं चालणें, पुरोगामित्व, पुढारीपणा. जिलबीला चालणें, अघाडीला चालणें.

अजबाब–ना. सामानसुमान, चीजवस्त.

अजातशत्रु–ना. ज्यास कोणी शत्रु उत्पन्न झाला नाहिं असा, निर्वैर.

अतिरेक–ना. अतिरिक्तपणा, अतिशयता, वाजवीपेक्षां फाजीलपणा.

अत्याचार–ना. कुमार्गानें जाणें, फाजीलपणाचें वर्तन.

अधिक्षेप– ना. टपकादेणें, दोष ठेवणें, निंदा करणें.

अनभिज्ञ–वि. अजाण, मूर्ख, गैरवाकब, गैरमाहितगार.

अनन्यगतिक–वि. ज्यास दुसरी गति नाहीं असा.

अनुबंध–ना. कार्यकारणभावसंबंध, संबंध, बंधन.

अनुज्ञा–ना. परवानगी, मोकळीक.

अनृत–ना. लटकें, खोटें, असत्य.

अनृतवादित्व–ना. खोटें बोलणें.

अपकर्ष–ना. अवनति, हीनस्थिति, गरीबी, (हा उत्कर्ष शब्दाचा प्रतियोगी शब्द आहे.) अप्रतिष्ठा.

अर्थवाद–ना." फुगवून सांगणें, गैरवास्तव फुगवून सांगितलेली फलश्रुति.

अर्भकावस्था–ना. बाल्यावस्था, बालपण.

अवडंबर–ना. (सं. आडंबर शब्दाचा अपभ्रंश) भपका, गर्गशा, पोकळडौल.

अवधीरणा–ना. अपमान, तिरस्कार.

अश्रीक–वि. अकल्याणकारक. अशुभ, अभागी.

अश्लील–वि. घाणेरडें, विचकट, अशुभ, चावट, ग्राम्य.

अस्पृहणीय–वि. ज्याची इच्छा करूं नये असें.

अन्तरुपाधी–ना. नाशकारक अंतस्थविकार, अंतर्व्याधी, अंगभूत-असणारें नाशकारण.

आकर्णमर्याद–वि. एका कानशिलापासून दुसऱ्या कानशिलापर्यंत.
आतुर–वि. अत्युत्सुक, रोगी.
आदब–ना. मान, सन्मान.
आधिदैविक–वि. दैवी पीडा. ईश्वरेच्छेनें होणारी पीडा.
आधिभौतिक–वि. पंचमहाभूतांपासून झालेलीपीडा.
आर्जव–ना. ऋजुता, सरळपणा, मिनतवारी, हांजीहांजी.
आशय–ना. हेतु, उद्देश, मतलब.
आसन्नमरण–वि. मरावयास टेकलेला, नाकाशीं सूत धरलेला.
आन्हिकपरंपरा–ना. सर्व दिवसभर करावयाच्या कृत्यांची मालिका.

इ.

इंगित–ना. मुखचर्येवरून मनोभाव ओळखण्याची खूण.

उ, ऊ.

उत्तीर्ण–वि. तरून गेलेला, पैलतीरास पोहोंचलेला.
उत्पाटन–ना. उपटणें, उन्मूलन.
उन्नत–वि. वर उचललेला, श्रेष्ठ.
उपायन–ना. देव, राजा, इत्यादिकांस अर्पण करावयाची भेट, नजर-नजराणा, वायन, वाण, उच्छेद.
उमर–ना. वय.
ऊर्मि–ना. पाण्याची लाट, मनाचा आवेग.
ऊहापोह–ना. तर्क करणें, कल्पना करणें, घाटाघाट करणें.

ऐ.

ऐनजिनशी–वि. (रोकड) पैक्या शिवाय धान्य, कापड इ० इतर वस्तुसंबंधीं,
ऐहिक–वि. इहलोक संबंधी, मृत्युलोकसंबंधी.

औ.

औचित्य–ना. उचितपणा, यथायोग्यपणा.
औपचारिक–वि. शिष्टसांप्रदायिक, केवळ आदरातिथ्य संबंधी. वास्तविक नव्हे असा (सन्मान)

क.

कच्छपीं रहाणें–क्रि. कांसेस लागुन राहणें. अवलम्बून असणें.

कदन्न–ना. निकृष्ट अन्न, वाईट अन्न.
कदर–ना. कठोर मनोवृत्ति, विसविस, चारकाई, जाण, जाणीव.
कपटप्रचुर–वि. ज्यांत पुष्कळ कपट आहे असा, कपटानें भरलेला.
कबीला–ना. (सं. दार शब्दाप्रमाणें हा फारशी शब्द नेहमीं पुलिंगीं अनेकवचनीं चालतो.) बायको, स्त्री.
कर्षण–ना. अपकर्ष, गरीबी. कृशत्व, नांगरणें.
कलिदा अथवा कलिजा–ना. जिवलग, आवडता, काळीज.
कलम करणें–ना. तोडणें.
कलेवर–ना. देह, शरीर.
कालयापन–ना. वेळ दवडणें.
क्रिया–ना. कर्म, शपथ, कृतज्ञबुद्धि.
कुटिल–वि. वाकडा, लबाड, ठग, कपटी.
कुत्सा–ना. निन्दा, गर्हा, कुटाळी.
कुशाग्रबुद्धि–ना. सूक्ष्मबुद्धि.
कूटयुद्ध–ना. गनिमीयुद्ध, छापा, कपटयुद्ध.
कृष्यादि–ना. (कृषि+आदि)–शेतकी आदिकरून.
कोरड–ना. असूड, (कोरड फुटणें) = असूड वाजविणें.
कोशबल–ना. द्रव्यबल,
कौटिल्य–ना. कुटिलता, लबाडी, लुच्चेगिरी.

ख.

खुषदिल–वि. प्रसन्नचित्त. आनंदी, प्रहृष्ट.

ग.

गतानुगतिक–वि. एकाचें आचरण पाहून त्याप्रमाणें जो करतो तो.
गम्यमान–वि. जाणण्याजोगा.
गर्हणीय–वि. निन्देस पात्र.
ग्राम्य–वि. गांवढळ, विषयलंपट, विषयासक्त.
गुणबाहुल्य–ना. गुणप्रकर्ष, बहुत गुणांचा समुच्चय.
गुरुलाघव–ना. लहान मोठेपणा, तारतम्यभाव.

गोष्पदोपम—वि. गाईचें पाऊल चिखलांत रुतलें असतां त्यांत जें पाणी सांचतें त्याची उपमा ज्यास आहे असा.

ज.

जहामर्दी—ना. शूरत्व (जवानमर्द या शब्दाचा अपभ्रंश आहे.)
जलशा—ना. समारंभ (हा जलूश शब्दाचा अपभ्रंश आहे)
जिव्हारीं—ना. मर्मी.

त.

तगारी—ना. थाळी, ताट.
तसनस—ना. नासधूस, नासाडी.
तैवजी—(सामान) वि. पानसुपारी संबंधी.
त्रोटक—वि. तोकडा, कोता, संक्षिप्त.

द.

दर्जा—ना. पदवी, अधिकार, पायरी.
दारपरिग्रह—ना. गृहस्थाश्रमस्वीकारणें, स्त्रीशीं लग्न लावणें, नवरीला वरणें.
दारपरिचर्या—ना. स्त्रीची आराधना, स्त्रीसेवा.
दिलजमाई—ना. मनमिळणी, समजूत घालणें.
द्विजाति—ना. ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य या तीन वर्णांचे पुरुष.
दुधखुळा—वि. तान्ह्या लेकराप्रमाणें असमंजस,नेणता,बालिश,अज्ञान.
दुर्भेद्य, वि. फोडण्यास कठीण, न फुटणारा.
दुर्ज्ञेय—वि. न समजणारा, जाणण्यास कठीण.
दौहित्र—ना. मुलीचा मुलगा.
धारातीर्थी—(पडणें) ना. लढाईत शस्त्राच्या धारेनें मरून स्वर्गी जाणें.
धुरीण—वि. धुरा = गाडीचें जूं, तें वाहणारा तो धुरीण, ह्यावरून कार्यभार वाहणारा पुरुष, कार्यकर.

न.

नर्मपरिहास—ना. थट्टा, मस्करी.
नामशेष—वि. फक्त नांवच उरलें आहे ज्याचें असा,

निरर्गल-वि. अर्गला = दरवाज्याचा अडसर,तो नाहीं ज्याला असा,
मोकळा, ज्यास कोणतीच आडकाठी नाहीं असा.
निरंकुश-वि. स्वैर, स्वच्छन्दी, ज्याला कोणाचा प्रतिबंध नाहीं असा
निर्घृण-वि. निर्दय, निष्कृप.
निर्विकल्प-वि. कल्पना रहित, मनाची शून्य किंवा तटस्थवृत्ति.
निषाद-ना. भिल्ल,कोळी, शूद्रीचे ठायीं ब्राह्मणापासून झालेला पुत्र.
निष्कृति-ना. प्रायश्चित्त.
नेकनामी-वि. उत्तम, योग्य.
नैसर्गिक-वि. स्वाभाविक.

प.

पयःस्राव-ना. स्तनांतून दूध गळणें, पान्हा फुटणें. दुधाची धार.
परस्वापहार-ना. दुसऱ्याचें हरण करणें.
पराङ्मुख-वि. माघार घेणें, पाठ फिरविणें, (लढाईत) पाठ दाखवून
पळून जाणें.
परिमार्जन-ना. स्वच्छकरणें, साफ करणें, क्रोध, दोष इत्यादिकांचें
निरसन करणें.
परिशीलन-ना. अभ्यास,वारंवार आवृत्ति करून घट्टकरणें, पाठ करणें.
पर्यालोचन-ना. वारंवार चिंतनिका करणें.
पायरव-ना. जाणें येणें ठेवणें.
पाश्चिमात्य-वि. पश्चिम दिशेकडील देशांतले लोक. पश्चिमेकडील.
पितृव्य-ना. चुलता, बापाचा भाऊ.
पृच्छा-ना. प्रश्न.
पोटागीचें-(प्रेम), वि. जिव्हाळ्याचें, आंतड्याचें .
पंचमहाभूतें-ना. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, हीं पंचतत्वें.
प्रकृत-वि. आरंभलेला, चालू, वर्णनीय.
प्रख्यापन-ना. प्रसिद्धीकरण.
प्रगल्भ-वि. प्रौढ.
प्रच्छन्न-वि. आच्छादिलेलें, झांकलेलें गुप्त.
प्राङ्मुख-वि. पूर्वाभिमुख,
प्रोत्साहन-ना. उत्तेजन देणें, उठावणी करणें.

ब.

बकवृत्ति–ना. दांभिकपणा, लटकीनम्रता धारण करून बगळ्याप्रमाणें स्वार्थसाधनाकरितां ढोंगी ध्यानधारणा करणें.

बट्टी–ना. दोष ठेवणें, दुर्लौकिक करणें, नांव बद्दू करणें.

बरखास्त–ना. सभा विसर्जन होणें.

बुडीद–ना. समुद्राच्या पाण्याची खोली समजण्याकरितां किंवा ठाव पहाण्याकरितां जें लोखंडाचें वजन पाण्यांत सोडतात तें.

बुभुक्षित–वि. भुकेला, क्षुधित, खाखावलेला.

बेहुर्मत–वि. हुरमत किंवा हुर्मत=अब्रू, इज्जत, बेहुर्मत–बेअब्रू होण्यासारखें.

बैडालवृत्ति–ना. धर्मध्वजी, दांभिक, कपटी, मांजराप्रमाणें डोळे मिटून ध्यानस्थाच्या मिषानें लोकांस फसविणारा.

भ.

भरमसाट–वि. बेअंदाज, विचार केल्याशिवाय, बेसुमार.

भस्मोद्धूलितविग्रह–ना. भस्मचर्चित देह, ज्यानें अंगास राख फासली आहे असा मनुष्य.

भूदेव–ना. ब्राह्मण.

भूमिका–ना. नाटकांत कोण्या एका पात्राचा धारण केलेला वेष.

भ्रामक–वि. भ्रम उत्पन्न करणारें.

म.

मजलस–ना. राजसभा. सभा.

मसनद–ना. राजासन, राजाची गादी. बैठक.

मालिम–ना. गलबतावरील मुख्य नावाडी.

मोवासपणा–ना. लुटारूपणा, पेंढारशाई, अनिर्बंध.

य.

यदृच्छा–ना. आपोआप होणारी घटना, स्वाभाविक घटना, ईश्वरेच्छा.

र.

रदबदली करणें–ना. आर्जवानें विनवणी करणें, मध्यस्थी करणें.

रहस्य–ना. एकांतांतील मसलत, गुप्त गोष्ट, गूढार्थ.

रहीम-(नजर) ना. कृपादृष्टि.
रुआब-ना. रु-मुख आणि आब-पाणी यावरून तोंडावरचें तेज, मुखचर्येचा दरारा, मुद्रेवरची इभ्रत.(हा फारशी शब्द आहे.)
रुग्णावस्था-ना. आजारीपणा, सरोगता.

ल.

लाग-ना. समुद्रांत पाण्यानें झाकलेले खडक अथवा रेतीचे बांध, नंस्त, ज्यास गलबत लागतें असा खडक वैगैरे.
लाक्षणिकअर्थ-ना. लक्षणेनें जाणावया जोगा अर्थ, एखाद्या शब्दास त्या शब्दाच्या वाच्यार्थाहून भिन्न अशा निराळ्या अर्थाची बोधकता केवळ वाक्य संदर्भानें येते ती.
लांगूलचालन-ना. शेपूट हालवणें, हांजी हांजी करणें.
लोकपाल-ना. सूर्य, चंद्र, अग्नि, वायु, इंद्र, यम, वरुण व कुबेर हे आठ देव.

व.

वर्चस्व-ना. वरचढपणा, श्रेष्ठत्व.
वयस्य-ना. सोबती, मित्र, बरोबरीच्या वयाचा सवंगडी.
वाकब-वि. माहितगार, निष्णात, वस्ताद.
विकल्प-ना. शास्त्रार्थाविषयीं अगर एखाद्या गोष्टी विषयीं जें मतद्वय तें, किंतु, संशय.
विपदर्णव-ना. विपत्×अर्णव, दुःखसागर.
विपर्यय-ना. उलटापालट, विपर्यास, उलट प्रकार.
विशदता-ना. स्पष्टपणा, फोड.
विषमपरिस्थिति-ना. कठिणपरिस्थिति.
विक्षेपबुद्धि-ना. असावें एक आणि भासावें भलतेंच, अशा प्रकारची अयथार्थ बुद्धि.
वीरसू-ना. वीरमाता, शूर पुरुषास प्रसवणारी स्त्री.
वैरनिर्यातन-ना. वैराची शुद्धी करणें, सूड उमगवणें.
व्यापृत-वि. व्यापारांत मग्न असलेला, कामांत गढलेला.

श

शाळूसोभती–ना. अल्पकाल सोबत देणारे, चालता काळ आहे तोंपर्यंतच मित्रत्व राखणारें.

शिलेपास–वि. जय्यत, कडेकोट, शस्त्रास्त्रासमवेत.

शुश्रूषा–ना. सेवा.

शैथिल्य–ना. ढिलाई.

श्रुतिप्रणीत–वि. वेदप्रतिपादित, वेदांनीं सांगितलेलें.

श्रेय–ना. कल्याण.

श्लाघ्य–वि. स्तुति करण्यास योग्य, वाहवा करण्या जोगा.

स.

सकृत्–ना. एकवार, सकृद्दर्शनीं = प्रथमदर्शनीं.

सराईत–वि. पटाईत.

सहोदर–ना. सख्खा भाऊ.

सुभ्रातृत्व–ना. उत्तम भाऊपणा, उत्तम बंधुप्रीति.

संकीर्ण–वि. गुंतागुंतीचा, घोटाळ्याचा.

सांगोपांग–वि. अंग उपांग सहित.

स्तोम–ना. मुखस्तुति, लटकी बडेजाव.

स्त्रीजितत्व–ना. स्त्रीच्या अंकित असणें, बाईलबुद्धीनें वागणें. बाईलबुद्धेपणा.

ह

हताश–वि. नाउमेद.

हप्तहजारी–वि. सातहजार सैन्याचा सरदार.

हिंसायुक्त–वि. हिंसा = वध नाश, नासाडी, नुकसान. मानसिक हिंसा = शिव्याशापदेणें निर्भर्त्सना करणें अंगहिंसा = शस्त्राचा घाय करणें मारणें. इत्यादि प्रकारच्या हिंसेनें युक्त.

हृदयसंवेद्य–वि. मनास ज्ञात झालेलें.

क्ष

क्षीत–ना. काळजी, पर्वा.

क्षुद्बोध होणें–ना. चांगली भूक लागणें.